
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. १६०७८



# मराठी मनाची नवी क्षितिजे

वक्ते

विनायकराव पाटील

REFBK-0015111


संपादन

राव खंडूजी पाटील

निबंध
११।८।५८

# मराठी मनाची नवी क्षितिजे

ग्रहालय ठाणे
१५११७



# मराठी मनाची नवी क्षितिज

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ............... दि: ...................
क्रमांक ........................ नों दि ...............

वक्ते

*विनायकराव पाटील*

REFBK-0015111

*बाबुराव खंडूजी पाटील*

प्रकाशक :
ग. ल. ठोकळ, बी. ए., बी. टी.
ठोकळ प्रकाशन,
ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे २

© सौ. शकुंतला पाटील

मुद्रक :
सी. एस्. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव पेठ
शिव-पार्वती, पुणे २

किंमत चार रुपये पन्नास पैसे



माननीय यशवंतरावजी चव्हाण
यांच्या शुभंकर नेतृत्वास—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... दि: ....................
[illegible] ....................

# प्रस्तावना

" मराठी मनाची नवी क्षितिजे " मराठी जनतेच्या हाती सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. महाराष्ट्र कॉंग्रेसचे अध्यक्ष माननीय विनायकरावजी पाटील यांचे हे विचार. गेल्या चार वर्षांच्या कालात ते विविध ठिकाणी विविध प्रसंगांच्या निमित्ताने बोलले. श्रोत्यांच्या पुढे बोलताना अत्यंत कळकळीने अंतर्यामी जे स्फुरले ते त्यानी मराठी जनतेपुढे मांडले. या कार्य-क्रमात गेल्या चार वर्षांत कधी खंड पडला नाही. जिथे जिथे जाणे घडले, त्याला स्थलाची मर्यादा नाही, आणि कालाचीही मर्यादा नाही. ते सतत फिरत आणि बोलत राहिले. चांद्यापासून ते बेळगाव-चंदगडपर्यंत. बासष्ट ते आज सहासष्ट या कालात याला कधी खंड पडला नाही. या निमित्ताने ते जे बोलले, त्या सर्वांला देशकाल विशिष्ट पार्श्वभूमी तर होतीच परंतु त्या विचारात केवळ तेवढाच भाग अभिप्रेत नव्हता. त्यातून त्यानी काही चिरंतन मूल्यांचे विशेष आस्थेने परिशीलन केले. मूलभूत विचार लोकांपुढे विशद करण्याचा प्रयत्न केला. यातून महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक नि सांस्कृतिक जीवनाचा मागोवा त्यानी घेतला. त्या संदर्भात त्यांच्या दृष्टीपुढे कालचा, आजचा आणि उद्याचा महाराष्ट्र होता आणि याच संदर्भातील त्यांचे विचार मला अत्यंत महत्त्वाचे वाटले. ते विविध ठिकाणी विविध प्रकारच्या समस्यां· बाबत बोलले. त्यात कॉंग्रेस संघटना, युवक नेतृत्व, स्त्रीसंघटना, कामगार संघटना, दलित वर्गांच्या संघटना, विद्यार्थी युवक तसेच महाराष्ट्र आणि राष्ट्र-जीवनातील ज्वलंत समस्या त्यानी मराठी जनतेपुढे विशद केल्या. संबंधित समस्या आणि लोक याना विधायक मार्गदर्शन व नेतृत्व पुरवीत असतानाच त्यांनी मराठी जनतेपुढे ज्या मूलभूत मानवी जीवननिष्ठा सदैव सांगितल्या, त्या मला अत्यंत महत्त्वाच्या वाटल्या. त्या संदर्भात ते जे जे बोलले ते ते एकत्रित करण्याची संधी मी दवडली नाही. त्यांचे वृत्तपत्रीय प्रसिद्धीकरण, तसेच मी घेतलेली टिपणे यांचा एक संग्रह मी माझ्याकडे जमा केला. त्यांच्या मनात जे

विचारमंथन चालू असे, ते अशा प्रसंगी उत्स्फूर्तपणे होई. त्या सर्वाला शब्दांकित करण्याचा माझा प्रयत्न असे आणि या शब्दांकनातूनच मला गवसलेली ही "मराठी मनाची नवी क्षितिजे" मी आज मराठी जनतेला सादर करीत आहे, म्हणून ही अत्यानंदाची भावना !

एकोणीसशे पंचावन्न-छप्पन्नच्या दरम्यान महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर मा. यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व साकार झाले. महाराष्ट्र काँग्रेसच्या घरकुलात यशवंतरावजींच्या नेतृत्वाचा नवा पुरुषार्थ आकारू लागला. त्या वेळी महाराष्ट्रात यशवंतरावजी आणि महाराष्ट्र काँग्रेस यांच्या विरुद्ध प्रचंड लोकक्षोभ पसरला होता. झंझावाती वादळ सुटावे, ताडमाड वृक्ष कोसळून पडत असावेत, प्रचंड पर्वतप्राय लाटांचे जबरदस्त तडाखे सहन करावे लागावेत आणि दूरवर आसपास साहाय्याची अपेक्षाही फोल ठरावी अशा वादळात महाराष्ट्र काँग्रेसच्या तारूचे यशवंतराव तांडेल बनले. या लोकप्रक्षोभाच्या लाटांवर आरूढ होऊन यशवंतराव या वादळी झंझावातात घुसले आणि अत्यंत कुशलतेने ही झुंझ दिली आणि 'यशवंत' झाले. स्थिरस्थावर झाले. त्या वेळी बरीच मोड-तोड झाली होती...किंबहुना उद्ध्वस्त घडी त्याना नीट बसवायची होती. महाराष्ट्र काँग्रेसचे "विस्कटलेले घरटे" त्याना उभारायचे होते. आणि या नव्या जडणी घडणीला त्यांनी पूर्ण विचारांती हातही त्वरित घातला. नव्या उभारणीत त्यानी पुरोगामी विचारांच्या निकषावर कसास उतरेल, तेच संग्रही ठेवले. या पुरोगामी वैचारिक नेतृत्वाद्वारेच त्यानी महाराष्ट्र जीवनाच्या विविधांगातून कुशल कार्यकर्त्यांचे एक मोहोळ निर्माण केले. या पुरोगामी वैचारिक नेतृत्वातून तरुण कार्यकर्त्यांचा एक संच महाराष्ट्रात तयार झाला आणि त्या नेतृत्वाची धुरा एकोणीसशे बासष्ट साली विनायकरावजींच्याकडे आली.

अशा प्रकारे वाताहत झालेल्या महाराष्ट्र काँग्रेसला यशवंतरावजी म्हणजे "संजीवनी" ठरली. या संजीवनीच्या ध्येयधोरणाने अभिमंत्रित झालेल्या महाराष्ट्र काँग्रेसच्या नेतृत्वाची धुरा विनायकरावजी पाटील यांच्याकडे आल्या-नंतर महाराष्ट्र काँग्रेसची शान आणि प्रतिष्ठा सदैव वृद्धिंगत करण्याचा त्यानी प्रयत्न केला. प्रत्येक कार्यकर्त्याची प्रेरकशक्ती दिवसेदिवस काँग्रेस संघटनेच्या पाठीशी भक्कमपणे उभी केली.

महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर यशवंतराजींचे पुरोगामी नेतृत्व आकारत

असतानाच विनायकरावजी आपल्या सहकाऱ्यांसमवेत मराठवाड्याच्या शैक्षणिक व सामाजिक जीवनात कार्यरत झाले होते. याबरोबरच त्यानी महाराष्ट्र जीवनात घडत असलेली स्थित्यंतरे डोळस भावनेने अभ्यासली आणि दिवसेदिवस ते यशवंतरावजींच्या पुरोगामी वैचारिक नेतृत्वाकडे आकृष्ट होत गेले. तसे थोडे खोलात शिरून पाहू गेल्यास एकोणीसशे बावन्न सालापासून ते महाराष्ट्राच्या राजकीय नि सामाजिक जीवनातील विविध स्थित्यंतरे अत्यंत काळजीपूर्वक अभ्यासीत होते. परंतु यशवंतरावजींच्या उदयोत्तर कालखंडापर्यंत त्यांची या बाबतीत निराशाच होई. यशवंतरावजींच्या नेतृत्वाच्या संदर्भात बोलताना या पूर्वकालातील सगळ्या स्मृतीना ते, अधून मधून बोलताना, न राहवून उजाळा देतात. हे क्षण माझ्या सारख्याला अत्यंत विलोभनीय वाटतात. परंतु ती क्षणचित्रे रेखाटणे इथे अप्रस्तुत ठरेल म्हणूनच तो अनावर मोहदेखील इथे आवरणे भाग आहे.

विनायकरावजींचा पिंड तत्त्वचिंतकाचा! प्रथमदर्शनी त्यांच्यातील या सुप्त सामर्थ्याचा जाणत्या व्यक्तीखेरीज इतराना सहसा प्रत्यय येणे कठीण. निर्माण होणाऱ्या समस्या, राष्ट्राच्या जीवनात वाहणारे विचारप्रवाह यांचा ते सखोल चिंतनातून मागोवा घेतील त्यातून येणारे निष्कर्ष वस्तुस्थितीच्या निष्कषावर कसास लावतील आणि प्रामाणिक चिंतनातून होणाऱ्या निश्चित निकर्षानुसार अव्यभिचारी निष्ठेने वागतील. अशा महत्त्वाच्या चिंतनात ते गढले की सहसा कधी ते बोलणार नाहीत. दिवसच्या दिवस असेच व्यतीत होतात. भेटायला येणाऱ्या व्यक्तींचे सर्व कथन अशा वेळी ऐकून घेतील पण मनातल्या विचारवादळाचा धागा त्या क्षणीही अखंड राहिलेला असतो. त्यामुळे एखाद्या दुसऱ्या वाक्यातच भेटणाऱ्याशी महत्त्वाचे तेवढे बोलून त्याचा निरोप घेतील. आणि पुन्हा पूर्ववत आपल्या चिंतनात गढून जातील. एखादे दिवशीची सकाळही अशीच उजाडते की, बिछान्यातून ते लवकर बाहेर पडत नाहीत. आवश्यक तेवढेच बोलले आणि पाहिजे तेवढ्या गोष्टी मागून घेतल्या आणि मुग्धता स्वीकारून पडले की, मी मनाशी ठरवून टाकतो, 'आज मनात काहीतरी विलक्षण खळबळ आहे.' किंबहुना गेल्या चार पाच वर्षातील अनुभवाने मी हा आडाखाच मनाशी बांधून ठेवला आहे.

विनायकरावजींचा जन्म मराठवाड्यातील एका छोट्या खेड्यात झाले.

वडील प्राथमिक शाळेत शिक्षक. राष्ट्रीय बाण्याने पेशाकडे पाहणाऱ्या प्राथमिक शिक्षकाच्या, शेतकरी घराण्यात वैभव कुठले ? आणि निजामशाहीच्या प्रतिगामी राजवटीच्या टाचांखाली चिरडल्या गेलेल्या, अप्रगत राहिलेल्या, गरिबीने गांजलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्याच्या घरी तर नाहीच नाही. मग त्यानी हा तत्त्वचिंतक पिंड पोसला कसा ? प्रतिकूल परिस्थितीतही हा चिंतक प्रेरणेचा अंकुर जिवंत ठेवला कसा ? ती तर एक दीर्घ कहाणी आहे. त्यासाठी त्यानी जंग जंग पछाडले. गाठीला पैसाही नसताना त्यानी एक दिवस घर सोडले. नासिक, बडोदा, पुणे अशी भ्रमंती केली. पडेल ते कष्ट उचलले. हलकी कामे करण्यातही कधी अपमान मानला नाही. प्रसंगी कोळशाच्या वखारीत पोती भरून शिवण्याचेही काम केले. परंतु स्वाभिमान सोडला नव्हता. विनम्र वृत्ती आणि स्वाभिमानी स्वभाव ही त्यांची शक्ती होती. विनम्र राहूनही जिथे स्वाभिमान डिवचला गेला तिथे तडजोड कधी केली नाही. सरळ रोखठोक मामला. बडोद्याला त्यांना "मराठा" असल्याचे प्रशस्तिपत्र मागितले गेले. विनायकरावजींच्यातला 'माणूस' जागा झाला आणि त्यांनी जातीच्या प्रशस्तिपत्राला स्पष्ट नकार दिला. झाले. शैक्षणिक जीवनातला एक आसरा तिथे तुटला. पुन्हा भ्रमंती. यात खूप अनुभव घेतले, माणसे जोडली, काही तोडली, कटू अनुभव पचविले. परंतु कडवट भावना कधी रुजू दिली नाही. आणि जे कटू कधी विसरूच शकणार नाहीत अशा गोष्टींचा, या अपूर्व भ्रमंतीतल्या वाइटाचाही त्यांच्या मनाला ना खंत ना खेद !

असा हा माणूस. दारिद्र्यात दडपलेला पण न पिचल्या मनाचा. समाज जीवनातल्या प्रतिष्ठित विद्वानांच्या, समाजधुरिणांच्या सान्निध्यातही स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाने उठून दिसणारा. विसाव्या शतकातील नव्या मनूच्या विज्ञानाधिष्ठित जीवननिष्ठांचा डोळस मानाने विचार करणारा. आणि शेवटी माणसातला "माणूस" मरता कामा नये याकरिता "मानवतेच्या कल्याणाच्या अट्टाहासाने" भारलेला !

म्हणूनच त्यांच्या सर्व आशाआकांक्षा महाराष्ट्रातील युवक पिढीच्या कर्तृत्वावर केंद्रित झाल्या आहेत. महाराष्ट्रातील सुबुद्ध आणि विवेकी युवकांची प्रकृती चिंतनशील आणि कार्यप्रवण कशी होईल याची त्याना काळजी आहे. या कामात त्याना जिव्हाळा वाटतो. विनायकराव ज्या वेळी, ही शक्ती प्रभावित करण्यासाठी

आपण काय केले पाहिजे याचा विचार करीत असतात, त्या वेळी एकाग्र होऊन जणू अंतराळात प्रेरणांचा मागोवा घेत असतात. या चिंतनात ते स्वतःला हरवून तल्लीन होतात. आज अशाच एका प्रसंगाची आठवण मला होते. १९६३ च्या मे मध्ये बारामतीला युवक काँग्रेसचा मेळावा भरला होता. त्या वेळी विनायकरावानी युवकाना सांगितले,—

"राष्ट्राच्या भावी जीवनातील कर्त्या पिढीचे घटक आहात तुम्ही. तुमच्याकडे या दृष्टीने पाहताना माझ्या मनात नवीन आशा फुलतात. तुमच्यामध्ये विवेकी, कार्यक्षम प्रेरणा रुजल्या पाहिजेत. तुमची मने संस्कारक्षम आहेत. या काळात नव्या गोष्टी आत्मसात करण्याची, त्यावर विचारमंथनाची प्रक्रिया करुन त्यांचे विशुद्ध स्वरूप तपासण्याची जिज्ञासा युवकात असते. ही जिज्ञासा पूर्ण करण्याची जबाबदारी आमची आहे. त्याचप्रमाणे परिक्षण करण्याची, काळजी वाहण्याची जिम्मेदारी तुमची आहे. तुमच्या आमच्यातील निकट नात्याच्या ह्या दोन बाजू आहेत. त्या परस्परावलंबी आहेत. दोघांनीही ही जिम्मेदारी काळजीपूर्वक पार पाडावयाची आहे. उद्याचा महाराष्ट्र निर्माण करताना, त्याच्या प्ररणा काय आहेत, त्याकरिता आमच्या पिढीचे अनुभव तुम्ही धडे म्हणून तपासाल, राष्ट्राच्या भावी जीवनात निर्माण होणाऱ्या समस्या आणि नवीन कार्यक्षेत्रे यांचे स्वागत करताना तुमच्यात रुजलेल्या प्रेरणा आणि अंगभूत गुणांचा उद्याच्या महाराष्ट्रास फायदा होईल एवढी अपेक्षा मी करतो. धन्यवाद."

विनायकरावजी असे तन्मय होऊन बोलावयास लागले की मन रोमांचित होते. या उमद्या मनाचे हे व्यक्तिमत्त्व ताबडतोब पकड घेते. हेवा करावा इतके प्रसन्न आणि निर्मळ व्यक्तिमत्व या माणसाला निसर्गाने दिले आहे. हालचालीतील सहजता, चेहऱ्यातील सात्विकता, स्वभावातील शालीनता आणि अंतःकरणातील तन्मयता याने त्यांच्या सान्निध्यात येणारी व्यक्ती भारावून जाते. नम्र वाणी आणि आत्मीयतापूर्ण वागणूक यानी विनटलेले, शुभ्र खादी कपड्यातले विनायकराव पाहिले की, एक आंतरिक नाते मनात निर्माण होते. वाटते ह्या व्यक्तीच्या विचारी आणि चिंतनशील सान्निध्यात अविरत राहावे. डोळ्यात निर्व्याजता आणि स्नेह आहे. विचारात अन्यायाची चीड आणि न्यायाची चाड आहे. तत्त्व आणि सत्त्व यांची जिवाभावाने जपणूक करणारे हे आदर्शवादी मन म्हणूनच हवे हवेसे आणि निकटचे वाटते. विनायक-

रावजींच्या सात्त्विक राहणीतील विनय माणसाला भारावून टाकतो. विनायक-रावजी म्हणजे विचारमंथन आणि प्रेरक चिंतन यांचा गंभीर प्रवाह आहे !

१९६२ मध्ये ते महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष झाले. पुढच्या सहा महिन्यात त्यानी वेगाने संघटना बांधणीस गती दिली. ऑक्टोबर १९६२ मध्ये त्यानी खुलताबादला शिबीर भरविले. या शिबिरात " नवसमाज निर्मितीच्या " ध्येय-वादाने काँग्रेस संघटना त्यानी अभिमंत्रित केली. नवीन उत्साह आणि जिद्द महाराष्ट्रात काँग्रेसमध्ये निर्माण केली. यशवंतरावजींच्या मार्गदर्शनाने संजीवित झालेली महाराष्ट्र काँग्रेस विनायकरावजीनी खुलताबादला " नवसमाज निर्मितीच्या ध्येयवादाची दीक्षा " देऊन प्रभावित केली. शिबिरानंतर लगेच देशात आणी-बाणी जाहीर झाली. चिनी आक्रमणाने सर्वच हतबुद्ध झाले होते. मित्रत्वाचे नगारे बडवीत असतानाच सरळ मनाच्या आणि उमद्या स्वभावाच्या भारता-सारख्या दिलदार मित्राचा चिनी साम्राज्यवादी लाल सत्तेने विश्वासघात केला होता. आणीबाणीच्या या काळात विनायकरावजी आजारी होते तरी त्याना गप्प बसवले नाही. या काळात जनतेला, संघटनेला सरकारची भूमिका, युद्ध कालातील त्यांची कर्तव्ये समजावून देण्याचे काम प्रकृतीची पर्वा न करता या माणसाने केले. एक फुटाचे बँडेज जखमेत आणि ऑपरेशनची ओली जखम अंगावर घेऊन या काळात आख्ख्या महाराष्ट्रभर विनायकरावजी वणवण हिंडले. प्रकृतीची काळजी नाही. राष्ट्राच्या हृदयावरील जखमेपुढे स्वतःच्या शरीरावरील जखमेची त्यानी पर्वा केली नाही. महाराष्ट्राचा अखंड दौरा पूर्ण केला. त्या सहा महिन्यात उसंत नाही, विश्रांती नाही. अखंड काम. आपले उमदे व्यक्ति-मत्त्व, असामान्य संघटना कौशल्य, पुरोगामी व लोकशाही मूल्यांचा मागोवा घेणारी विचारसरणी, प्रभावी आणि मुद्देसूद वक्तृत्व यानी महाराष्ट्राचे मन त्यानी काबीज केले. संघटनेवरील आपली पकड त्यानी भक्कम केली. प्रकृतीपेक्षा कर्तव्य आणि स्वप्रतिष्ठेपेक्षा संघटना यांचे मोल अधिक आहे, हे त्यांनी कार्य-कर्त्यांना पटवून दिले. म्हणूनच कृतीने बोलणारे हे काँग्रेसचे विनयी नेतृत्व सर्वांना आपले वाटते. महाराष्ट्र काँग्रेसच्या अध्यक्षपदाची माला पुन्हा सप्टेंबर १९६३ मध्ये विनायकरावजींच्या गळ्यात पडली. अवघ्या छत्तीस सदतीस वर्षांचे विनायकरावजी पुन्हा एकमताने निवडले गेले. त्यांच्या कर्तृत्वाची आणि संघटना कौशल्याची ही साक्षात विजयपताका होती. या बहुमानाला उत्तर देताना

ते बोलले ते किती अर्थपूर्ण. कॉंग्रेसच्या कार्याची दिशा देताना आणि संघटनेच्या प्रत्येक घटकाला उत्स्फूर्त करून कार्यरत होण्याचे आवाहन करताना ते म्हणाले,

"लोकजीवनाशी समरस होऊन कॉंग्रेसचे कार्य करावयाचे आहे आपणाला. सामान्य जनता व कार्यकर्ता यांना दिलासा, नवीन उत्साह, नवी प्रेरणा आणि कार्यास बल देणारी प्रभावी अशी जनताहिताभिमुख पक्ष संघटना आपणास उभारावयाची आहे. लोकशाहीत समाजवादी समाजरचनेच्या महत्त्वपूर्ण विचारांचे प्रतिबिंब कॉंग्रेस संघटनेच्या आचारविचारात दिसले पाहिजे. लोकशाहीच्या मार्गाने समाजवादाच्या प्रगतीची वाटचाल आपणास करावयाची आहे. सच्चा दिलाच्या कार्यकर्त्यांची, प्रजाहितदक्ष पक्षाची बलवत्तर संघटना, जनतेच्या हिताची जिवाभावाने जपणूक करणारी शक्ती आपणास उभारावयाची आहे. सामाजिक समस्यांची आस्थेवाईक विचारपूस, कर्तव्याबाबतची दक्षता हे विश्वासार्ह चित्र कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या आचारविचारात सामान्य जनतेस दिसले पाहिजे. कोठेही कार्य करीत राहा, परंतु लोकशाही निष्ठेने कार्यरत व्हा. लोकशाही समाजवादाचा केवळ विचार नको, प्रत्यक्ष आचार हवा आहे. तरच तो अंतःकरणास भिडेल आणि सामाजिक सौहार्दाचा उद्‌गम आणि विकास होईल.

लोकशाही आणि समाजवादी समाजरचना यासाठी शांततामय प्रगतीचा हा महान यज्ञ आपणास पार पाडावयाचा आहे. कृषिऔद्योगिक समाजवादी महाराष्ट्राचे मनोहर चित्र रंगविता रंगविता अर्धेच टाकून, राष्ट्रसंरक्षणाच्या रथास जुंपून घेणाऱ्या यशवंतरावजींचे भविष्य स्वप्न साकार करण्यासाठी संघटना कार्याद्वारे प्रचंड शक्ती आपणास उभारावयाची आहे.ही जिम्मेदारी आज आपणावर आहे. या कार्यात मला सर्वांचे सहकार्य हवे आहे. प्रत्येक कार्यकर्त्याची मला गरज आहे. आणि म्हणूनच मी तुम्हाला आश्वासन देतो की, ज्या ज्या वेळी तुम्ही मला साद घालाल त्या त्या वेळी मी तुम्हाला प्रतिसाद देईन."

मंत्रमुग्ध होऊन प्रत्येक जण ऐकत होता. प्रत्येकाचे अंतःकरण ह्या तळमळीच्या आवाहनाने ओथंबून निघाले होते, विवेकी नायकाचे ते नम्र आवाहन आजची कॉंग्रेस पाळीत आहे. संघटना आणि सरकार हातात हात घालून जणू ह्या जबाबदारीचे जू वागवीत आहेत. विनायकरावजींची तडफ, कर्तव्याची

कळकळ, आणि असामान्य जिद्द आज महाराष्ट्र कॉंग्रेसला प्रेरणा देत आहे. दुसऱ्यांदा अध्यक्ष झाल्याबद्दल मुंबईच्या जनतेने त्यांचा मुंबईत सत्कार केला. ह्या प्रसंगीच्या शुभसंदेशात माननीय यशवंतरावजी म्हणतात,

" संधी मिळाली की, तरुण मनुष्य अवघड जबाबदारीही पेलू शकतो हे श्री. विनायकराव पाटील यानी गेल्या काही वर्षांत आपल्या कर्तृत्वाने सिद्ध केले आहे. किंबहुना विनायकरावांची पुन्हा महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी निवड झाली ती त्यांच्या गुणांची जाणीव कार्यकर्त्यांना झाली म्हणूनच ! विनायकरावांचे कर्तृत्व व गुण महाराष्ट्राच्या कार्यासाठी सतत वृद्धिंगत होवोत, हीच शुभेच्छा ! "

या सत्काराला उत्तर देताना विनायकरावजींनी एक विधायक नि पुरोगामी विचार मांडला. त्यांच्या चिंतनशीलतेची आणि तर्कशुद्ध विचारांची ही साक्ष आहे. या भाषणात त्यांची समयज्ञता आणि महाराष्ट्राच्या विकासाची आस प्रगट होते.

" महाराष्ट्राची श्रमशक्ती अपार आहे, ती अनुत्पादक राहून वाया जात आहे. आणि मुंबापुरी कुबेर नगरी बनली आहे. दरिद्री महाराष्ट्राची श्रमशक्ती आणि मुंबईच्या कुबेरांची लक्ष्मी एकत्र येतील तर समृद्ध महाराष्ट्राचे स्वप्न साकार होईल. " असे सांगून त्यानी मुंबईच्या धनिकांना आवाहन केले की, " तुमची लक्ष्मी खेड्यापाड्यात फिरू द्या. या लक्ष्मीला श्रमाची जोड मिळाली तर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात नंदनवन फुलेल." विनायकरावजींच्या हाकेला धनिकांनी प्रतिसाद दिला तर या नवमहाराष्ट्राच्या कलावंताचे मन अक्षरशः हर्षवेडे होईल.

स्पष्ट विचार, उच्च बौद्धिक घडण आणि दूरदृष्टी यानी विनायकरावजींचे जीवन समृद्ध आहे. उद्याच्या वैभवास या माणसाचे कर्तृत्व निश्चित प्रेरणास्पद आहे. महाराष्ट्र कॉंग्रेस हे उमदे नेतृत्व अखंड धडपड आणि अविरत श्रम यांचा आदर्श आहे. निःस्वार्थपणे आजच्या राजकारणात सेवाव्रत अंगीकारलेली जी माणसे आहेत, त्यात विनायकरावजींचे स्थान उच्च आहे. सत्तेची अभिलाषा कधी धरली नाही. मा. यशवंतरावजी चव्हाण संरक्षणमंत्री झाले आणि लगेच विनायकरावजींनी राज्यसभेवरील आपला सभासदत्वाचा राजीनामा सादर करून सेवामयी त्यागी वृत्ती कृतीने सार्थ केली.

१९६४ च्या ९-१० फेब्रुवारीस त्यानी केलेल्या नगरहवेलीच्या दौऱ्यात

झुंजार विनायकरावजींची प्रचीती येते. पोलीस आणि गुजराथी जमीनदारांच्या अत्याचाराने नाडलेल्या मराठी आदिवासींच्या हाकेला ओ देऊन विनायकरावजी नगरहवेलीस धावले. आदिवासीचा छळ आणि त्यांच्या जीविताची झालेली सर्वस्वी वाताहत पाहून या माणसाच्या डोळ्यात अश्रू आले. अंतःकरण अन्यायाच्या चिडीने पेटून निघाले. आदिवासींना दिलासा देऊन त्यानी नगर-हवेलीतील या अत्याचारांचा धिक्कार केला आणि ही "गुंडगिरी चालणार नाही" असा उघड निर्वाणीचा इशारा गुजराथी जमीनदार आणि प्रशासकाना दिला. बंदी हुकुमाचे चिटोरे पोलीस अधिकाऱ्यांच्या तोंडावर भिरकावून विनायक-रावांनी सभा घेतली. अन्यायी प्रशासनाला नैतिक धैर्याच्या जोरावर ठोकरून आदिवासींच्या न्याय मागणीस आणि त्यांच्यावरील अत्याचाराना वाचा फोडली. आदिवासींचे हाल पाहून त्यांचे मन तळमळले, अंतःकरण पिळवटले, डोळ्यात अश्रू आले, अन् अन्यायाच्या चिडीने त्याच डोळ्यात अंगार फुलला. त्यांचे सामर्थ्य पाहून त्याना हात लावायला एकही पोलीस धजू शकला नाही. विनायकरावजीनी गुजराथी दंडेलीला केलेले सरळ सरळ छातीठोक आव्हान पाहून आदिवासींचा आत्मविश्वास वाढला, गुजराथवाल्यांचे नीतिधैर्य खचले. या प्रकरणाचे सादपडसाद देशाच्या कानाकोपऱ्यात उठले. भारतीय लोकसभा खडबडून गेली. खालपासून वरपर्यंत कानपिचक्या बसल्या आणि नगरहवेलीतील संभावितानी विनायकरावजीना आमंत्रण देण्याचे लांगूलचालनही केले. तथापि हा प्रश्न विनायकरावजी धसास लावल्याशिवाय सोडणार नाहीत. नगरहवेली-नंतर वालचंदनगरला साखर कामगारांच्या परिषदेच्या अध्यक्षपदावरून त्यानी, "व्यवस्थापनात कामगाराना न्याय्य हिस्सा मिळालाच पाहिजे" अशी मागणी केली. नंतर विनायकरावजी चंदगड तालुक्यात दौऱ्यावर गेले. तेथे सीमावासीयाना भेटले. सीमेचे गाऱ्हाणे त्यानी सोडविण्यासाठी प्रयत्नांच्या पराकाष्ठेचे आश्वासन दिले. मुंबईत ना. नंदांशी वाटाघाटी झाल्या. त्यात विनायकरावजीनी सीमावासी-यांची मागणी मांडली. त्यांच्या चंदगडच्या दौऱ्यात कर्नाटकी वृत्तपत्रानी व छुप्या हस्तकानी हीन कारवाया करून गलिच्छ निंदेची राळ उडविली. पण खंबीर विनायकरावजी डगमगले नाहीत. त्यानी चंदगडचा दौरा तर यशस्वी केलाच आणि सीमावासीयांच्या गाऱ्हाण्याची दादही मागितली. या वेळी आम्ही काही लोकानी या टीकेचा आणि गलिच्छ निंदेचा समाचार घेण्याचा

मनोदय व्यक्त केल्यावर त्यानी, "वैयक्तिक प्रतिष्ठेसाठी आरोप प्रत्यारोपांचे रण माजवून सीमा प्रश्नाची कटुता अधिक वाढवू नका," असे सांगून आम्हास गप्प बसविले. त्यांच्या या महाराष्ट्र प्रेमाने नि सीमावासीय महाराष्ट्रीय जनतेबद्दलच्या सहानुभूतिपूर्ण स्नेहाने मी स्तिमितच झालो.

औरंगाबादेस स्फोट झाले. स्वतःच्या जन्मभूमीच्या परिसरात झालेल्या या प्रकाराने हा माणूस अत्यंत हवालदिल झाला. स्फोट झाल्यानंतर दहा-पंधरा मिनिटांच्या आत विनायकरावजी दुःखितांचे सांत्वन करून त्याना दिलासा आणि धीर देत असताना दिसत होते. उध्वस्त झालेले संसार आणि रस्त्यावर पडलेली माणसे पाहून विनायकरावजींचे अंतःकरण विद्ध झाले. या गंभीर क्षणी त्यानी मोठी समयता दाखविली. स्वतः सर्वांअगोदर तिथे जाऊन त्या दुःखितांचे सांत्वन करण्यासाठी अहोरात्र चोवीस तास हिंडत होते. स्वतः गृहमंत्र्यांबरोबर सर्वत्र पाहणी करीत होते. एवढेच नव्हे तर स्फोटाच्या ठिकाणी कमिशनर आणि कलेक्टरला त्यानीच बोलावले. विनायकरावजी त्या क्षणी हजर राहून हे न करते तर कदाचित परिस्थिती अधिकच बिघडली असती. जातीय दंग्याचे हिंसक वरूप लागायला कितीसा अवधी होता तिथे ?

या माणुसकीचा ध्यास घेतलेल्या माणसाबद्दल आणखी कितीही सांगितले तरी संपणार नाही. तरुणांची ती एक प्रेरक शक्ती आहे. अखंड काम हीच या माणसाची धारणा आहे. संघटना हाच ध्यास आहे. अन्यायाविरुद्ध बंड ही प्रवृत्ती आहे. विधायक कर्तृत्व ही निष्ठा आहे.

मला विनायकरावजी दिसतात ते तरुणपिढीचे आशास्थान म्हणून. आज माझ्या मनात नेहरू–विश्वास मोर्च्यांचे प्रसंगी कॉंग्रेसच्या विधायक कार्यक्रमाचे तर्कशुद्ध विवेचन करणारे मुठेच्या काठावरील विनायकरावजी दिसतात. उद्याच्या कर्त्या होणाऱ्या तरुणाना समयज्ञतेचे आणि विधायक कर्तृत्वाचे आवाहन करणारे विनायकरावजी दिसतात. समृद्ध महाराष्ट्राचे भविष्य स्वप्न साकार करण्यासाठी मुंबईच्या धनिकांना आवाहन करणारे विनायरावजी दिसतात. नगरहवेलीतील आदिवासी मराठी जनतेवर होणाऱ्या अन्यायावर आसूड ओढणारे झुंजार विनायकरावजी दिसतात. सीमावासीयांच्या दुःखित मनाला धीर देऊन त्यांच्या डोळयातले अश्रू पुसणारे विनायकरावजी आज माझ्या मनःपटलावर उभे राहतात! औरंगाबादच्या स्फोटात खचलेल्या जनतेच्या पाठी

वरून प्रेमाचा हात फिरवून त्याना दिलासा देणारे आणि शांतता प्रस्थापनासाठी रात्रंदिन वणवण फिरणारे विनायकरावजी माझ्यापुढे उभे राहतात. किल्ले पन्हाळागडाच्या बुलंद बुरुजावरून महाराष्ट्रातील बुद्धिजीवी आणि विचारवंताना कॉंग्रेसच्या जवळ या अशी साद घालणारे विनायकरावजी आज मला दिसतात! अस्पृश्यतेचा दुर्दैवी वारसा नष्ट करण्यासाठी सामाजिक समतेचा उदारमतवादी दृष्टिकोन स्वीकारून सहकारी क्षेत्रात हरिजनना प्रतिनिधित्व मिळाल्याशिवाय ती सहकारी संस्था रजिस्टर होऊच नये, असे तळमळीचे साकडे घालणारे विनायकरावजी मला दिसतात. ग्रामीण भागात उदयास येणाऱ्या नव्या बुद्धिमंतांनी सत्तालोलुप न बनता आपल्या आचारविचारानी लोकशाही–स्वातंत्र्य–सामाजिक समता ही जीवनमूल्ये रुजवून भारतीय लोकशाही बळकट करण्याकरिता वचनबद्ध व्हावे असे आवाहन करणारे प्रज्ञावादी विनायकरावजी मला दिसतात! लोकजीवन अधिकाधिक समृद्ध करण्याकरिता भ्याड अर्थसंकल्पाचा आसरा घेण्यापेक्षा धाडसी अर्थसंकल्पाचे आव्हान स्वीकारण्याचे आवाहन करणारे विनायकरावजी आज मला दिसतात. आर्थिक लोकशाहीचें स्वाभिमानी मन तयार करण्यासाठी, सहकाराच्या आसऱ्याला आलेली व्यक्ती सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या दारातला याचक न बनता ती तिथली हक्कदार बनली पाहिजे, या निष्ठेने सहकारी क्षेत्रातील कार्यकर्त्यांना कार्यरत होण्याचें आवाहन करणारे विनायकरावजी माझ्या स्मृतिपटलावर उभे राहतात! भंडारदऱ्याच्या डोंगरदऱ्यातून लोकशाही समाजवादी जीवननिष्ठांविषयी विनायकरावजीनी सांगितलेल्या शब्दांचे प्रतिध्वनी आज मला ऐकू येतात!

गेल्याच आठवड्यात मुंबईच्या आमदार निवासात बोलता बोलता प्रचलित राजकीय नि सामाजिक प्रश्नावर चर्चा झाली. चर्चेच्या ओघात देशातील विविध विरोधी राजकीय पक्षोपपक्षांचे राजकारण, कॉंग्रेसची राजनीती नि ध्येय, सामाजिक समस्या, विशेषत्वाने अस्पृश्यतानिवारण, ग्रामीण विकासाचे प्रयत्न, लोकशाही विकेंद्रीकरणातून उद्याच्या सुजाण नेतृत्वाचे हुंकार आणि पुरोगामी विचारप्रवाह यांची इतिहास, वर्तमान व भविष्य या दृष्टिकोनातून चर्चा रंगली. चर्चेत विनायकरावजी लोकप्रतिनीधी, बुद्धिजीवी आणि शैक्षणिक क्षेत्रातील जाणत्यांशी विचारविनिमय करीत होते. त्यात त्यानी आपले विचार त्या

संदर्भात बोलून दाखविले. रात्रीचा एक वाजला तरी चर्चेची रंगत वाढतच होती. समारोप केला तो विनायकजींनी. त्यानी सांगितले, “आज महाराष्ट्र काँग्रेसची धुरा मी वाहत आहे. गेल्या चार वर्षांत या पुरोगामी विचारांच्या वृद्धीसाठी मी अविरत प्रयत्न केले. व्यक्ति-व्यक्तींचे मतभेद संघटनेच्या निकोप वाढीसाठी संपविण्याचा मी प्रयत्न तर केलाच, पण त्याहूनही महत्त्वाचा विचार मी अविरत माझ्यापुढे ठेवला आहे. तो म्हणजे महाराष्ट्र जीवनात उद्याचे निर्माण होणारे नेतृत्व, हे अधिक सुजाण व्हावे. महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीने विधायक दृष्टिकोनाचे, पुरोगामी तत्त्वचिंतक स्नेही मी माझ्याभोवती गोळा करण्याचा निश्चित प्रयत्न केला. आता त्यात मी किती यशस्वी झालो ते काळ ठरवील. यापरते दुसरे काही महत्त्वाचे, मी केले असा माझा दावा नाही, परंतु अशी जर पाच पंचवीस माणसे माझ्या या प्रयत्नातून महाराष्ट्र जीवनात कार्यरत झाली तर तीच माझ्या कारकीर्दीच्या यशाची मी खूण समजेन.”

या प्रामाणिक कर्तव्यबुद्धीने खपलेल्या विनायकरावजींनी ह्या निष्ठेने हे प्रयत्न केले. राष्ट्राच्या आणि महाराष्ट्राच्या जीवनातील बदलत्या घटनांचा अन्वयार्थ समजावून दिला. विविध समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न केला. पुरोगामी तत्त्वांचा पुरस्कार करून महाराष्ट्राच्या तरुण पिढीला विधायक नेतृत्वाचे आवाहन केले, मूलभूत मानवी जीवननिष्ठा महाराष्ट्र जीवनात रुजविण्याचा अहोरात्र प्रयत्न केला. निरनिराळ्या ठिकाणी आपले विचार त्यानी बोलून दाखविले...किंबहुना हे विचारांचे विविध धागे स्वतंत्ररीत्या विहरत ठेवले. ते एकत्रित करून त्या आडव्या उभ्या धाग्यातून एक वस्त्र विणण्याचा हा प्रयत्न केला आहे. त्यांचे विचार एकत्रित रूपाने महाराष्ट्रापुढे मांडण्याकरिता विविध विषय निवडून त्या त्या संदर्भातील विचार एकत्रित केले आहेत. जिथे जिथे हे संदर्भ मला जुळले नाहीत, तिथे तिथे व्यक्तिशः विनायकरावजींशी प्रत्यक्ष चर्चा करून ते जुळवून घेतले. अशा प्रकारे क्षणोक्षणी उलगडत गेलेली ही क्षितिजे आज मराठी जनतेच्या पुढे सादर करण्याचे महद्भाग्य मला लाभले. या आनंद-अपूर्वाईने मी कृतार्थ झालो.

गेले कित्येक दिवस हे विचार पुस्तकरूपात मराठी वाचकांपुढे सादर करावे असे माझ्या मनात घोळत होते. आज आपल्या हाती देण्यासाठी मा. विनायक-रावजी पाटील यानी त्यांच्या प्रकाशनास संमती दिली व जरूर तिथे बहुमोल

साहाय्य दिले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. हे ऋण फेडण्यापेक्षा त्यांच्या ऋणातच राहण्याचा बहुमान मी पत्करीन. माझे मित्र विलास पाटील यांचे कष्टही या पुस्तकाच्या उभारणीत मला साह्यीभूत ठरले आहेत. या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी ठोकळ प्रकाशनाचे श्री. ग. ल. ठोकळ यानी स्वीकारली. त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. मुखपृष्ठाचे रेखन श्री. अनंत सालकर यानी अल्पावधीत करून दिले याबद्दल त्यांचा व कल्पना मुद्रणालयाचे आमचे मित्र श्री. चिं. स. लाटकर यानी पुस्तकाची छपाई उत्कृष्ट करून दिली याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. मराठी मनास माझा हा उपक्रम आवडो हीच प्रार्थना.

' गुस्ताद चेंबर्स ', पहिला माळा,
ब्लॉक नं. ३, जेलरोड ( नॉर्थ ),
मुंबई नं. ९.

बाबुराव खंडूजी पाटील
महाराष्ट्रदिन
१ मे १९६६

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नों. दि. ........................

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र काँग्रेस : बदलते स्वरूप | १ |
| २ | भारतीय लोकशाही : काही विचार | १० |
| ३ | भारताचे धर्मपंथातीत राज्य | १९ |
| ४ | चिनी कम्युनिझमचे स्वरूप | २५ |
| ५ | महाराष्ट्रातील शिक्षण : काही विचार | ३४ |
| ६ | सहकारी चळवळ | ४३ |
| ७ | महाराष्ट्रातील नगरपालिका : काही विचार | ५४ |
| ८ | महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा | ६६ |
| ९ | लोकमान्य टिळक : एक व्यक्तिमत्त्व | ७२ |
| १० | पंडित जवाहरलाल नेहरू : एक व्यक्तिमत्त्व | ७८ |
| ११ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक व्यक्तिमत्त्व | ८५ |
| १२ | काँग्रेसजनांची कर्तव्ये | ९१ |
| १३ | काँग्रेस व विरोधी पक्ष | १०४ |
| १४ | लोकसंख्येची वाढ : एक समस्या | ११५ |
| १५ | महाराष्ट्रातील कामगार चळवळ | १२० |
| १६ | महाराष्ट्रापुढील समस्या | १२८ |
| १७ | भारतीय नियोजन | १४० |
| १८ | लोकशाही समाजवाद | १४५ |



मा. विनायकरावजी पाटील

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम.......................... दि: ....................
........................... क्रं. कि ..............

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम..................... दि: .................
क्रमांक ........................ नों. दि ..............
१५१११

# महाराष्ट्र काँग्रेस : बदलते स्वरूप

काँग्रेस संघटनेने गेली अठरा वर्षे या देशाला स्थिरसरकार व स्थिर लोकशाही दिली आहे. आशियातील इतर कोणत्याही राजकीय पक्षाला जे करता आले नाही, ते भारतातील या राजकीय पक्षाने केले आहे. काँग्रेस संघटनेमागे स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास आहे, त्यामुळे काँग्रेसमागील लोकप्रियता कायम आहे असे विरोधक म्हणतात यात काही अंशी सत्य आहे. पण काँग्रेसच्या लोकप्रियतेला केवळ एवढेच कारण नाही. आशियातील इतर राष्ट्रांमध्ये राजकीय स्वातंत्र्यासाठी चळवळी चालू होत्या. काँग्रेस पक्षासारखेच राजकीय पक्ष या सर्व देशातून होते. काँग्रेसप्रमाणेच स्वातंत्र्यचळवळीचा वारसा त्यांच्या मागे होता. परंतु आशियातील इतर कोणत्याही राजकीय पक्षाला जे स्थिर सरकार देण्याचे कार्य करता आले नाही, ते कार्य काँग्रेसने केले आहे. ब्रह्मदेशात, सिलोनमध्ये, इंडोचायनात काँग्रेससारखेच राजकीय पक्ष होते. परंतु या पक्षांच्या अपुऱ्या किंवा अकार्यक्षम राजकीय नेतृत्त्वामुळे या सर्व देशातील

---

सोलापूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यकर्त्यांच्या शिबीरात केलेले भाषण.

राजकीय पक्ष विस्कळीत झाले. उलट भारतातील कॉंग्रेस पक्षाने मात्र केवळ या देशाला स्थिर सरकारच दिले असे नाही, तर आमच्या स्वातंत्र्यामध्ये आर्थिक व सामाजिक समता, मानवी स्वातंत्र्य यांचा भावनात्मक आशय ओतण्याचा प्रयत्न केला आहे. सबंध आशियाच्या राजकीय जीवनाच्या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस संघटनेने केलेले हे कार्य कोणालाही उल्लेखनीय आणि अभिमानास्पद वाटेल. कॉंग्रेस संघटनेच्या अभ्यासाला दुसऱ्या दृष्टीने महत्त्व आहे. कॉंग्रेस ही आशियातील सर्वांत मोठी राजकीय संघटना आहे. या देशात २०-२२ कोटी मतदार आहेत. त्यातील सुमारे ४७–४८ टक्के मतदार कॉंग्रेसच्या मागे आहेत. म्हणजे सुमारे ८–१० कोटी मतदार कॉंग्रेससंघटनेच्या मागे आहेत. कॉंग्रेसच्या क्रियाशील सभासदांची संख्या देखील जगातील कोणत्याही मोठ्या राजकीय संघटनेच्या बरोबरीने असेल. कदाचित त्याच्यापेक्षाही थोडीशी अधिकच असेल. आशियातील नव्हे तर काही अंशी जगातीलही एक फार मोठी राजकीय संघटना म्हणून कॉंग्रेसचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. या दृष्टीने या संघटनेचा इतिहास, या संघटनेचा वारसा आपल्यासारख्या प्रत्येक कॉंग्रेस कार्यकर्त्याने काळजीपूर्वक अभ्यासला पाहिजे. यासंबंधीचे अधूनमधून का होईना चिंतन, मनन केले पाहिजे. या दृष्टीने आज आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यासमोर यासंबंधीचे काही विचार मी मांडणार आहे.

### परिस्थितीची गरज म्हणून कॉंग्रेसचा जन्म

आपणा सर्वांना माहीतच आहे की १८८५ साली मुंबई येथे कॉंग्रेसचा जन्म झाला. कॉंग्रेस स्थापनेच्या आधीची ३०-३५ वर्षांची पार्श्वभूमी आपण थोडी समजावून घेतली पाहिजे. या देशात १८३४ ते ५४ या काळात कोणते शिक्षण द्यावे यासंबंधी मोठे वादंग माजले होते. त्यातला एक पक्ष संस्कृत भाषावाल्यांचा होता; तर दुसरा पक्ष पाश्चात्य इंग्रजी ज्ञान शिकवावे असे म्हणणाऱ्यांचा होता. पहिल्या पक्षाचे म्हणणे आमच्या जुन्या संस्कृत वेदात, उपनिषदात, भरपूर ज्ञान आहे. तेच ज्ञान विद्यार्थ्यांना द्यावे. युरोपमध्ये चौदाव्या पंधराव्या शतकानंतरच्या प्रबोधनाच्या चळवळीनंतर विशेषतः फ्रेंच राज्यक्रांती, अमेरिकन राज्यक्रांती, औद्योगिक क्रांती यानंतर तिकडील ज्ञानात इतकी

आमूलाग्र क्रांती झाली आहे की, ते ज्ञान आपल्याला मिळाल्याशिवाय आपण नव्या जगाबरोबर धावच घेऊ शकणार नाही, असे दुसरा पक्ष म्हणत होता. सुदैवाने या वादाचा निकाल इंग्रजी ज्ञानाच्या बाजूने लागला, व १८५४ साली या वादावर पडदा पडला. यानंतर या देशात आधुनिक पद्धतीचे इंग्रजी शिक्षण सुरू झाले. कलकत्ता, मद्रास, मुंबई येथे नवी विद्यापीठे सुरू झाली. या विद्यापीठातून पाश्चात्य शिक्षण घेतलेले अनेक तरुण बाहेर पडू लागले. १८४० ते ८५ पर्यन्त देशभर या शिक्षणावर तयार झालेली एक नवी पिढीच्या पिढी निर्माण झाली. ही पिढी इंग्लंड, अमेरिका, येथील राजकीय जीवन अभ्यासत होती. पेन्सरसारख्या विचारवंतांच्या विचारांचा अभ्यास करीत होती. त्यातून स्वाभाविकच त्यांच्यामध्ये येथील राजकीय गुलामगिरीबद्दलचा असंतोष निर्माण होऊ लागला होता. थोड्याफार प्रमाणात सर्व आशियाभर हे चित्र दिसू लागले होते. अशा या कालात देशातील काही विचारवंत तरुण ध्येयवादी मंडळी एकत्र आली व त्यानी राजकीय असंतोषाला वाचा फोडावी म्हणून काँग्रेसपक्ष स्थापन केला. दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती रानडे, नामदार फिरोजशाह मेहता, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, सर ह्यूम यांच्यासारखी तोलामोलाची माणसे काँग्रसच्या संस्थापकांमध्ये होती. त्यांच्या कर्तृत्वाने व परिस्थितीच्या गरजेतून काँग्रेसचा जन्म झाला. काँग्रेसच्या जन्माची पार्श्वभूमी ही अशी आहे.

## उदारमतवाद व नेमस्तपणा

१८८५ पासून तो १९०५ पर्यंत काँग्रेस ही मवाळ मार्गानेच जात होती. न्यायमूर्ती रानडे, ना. गोखले, फिरोजशहा मेहतादी या मवाळ पक्षाची नेते मंडळी होती. उदारमतवाद व नेमस्तपणा ही यांच्या विचारांची दोन मार्गदर्शक तत्त्वे होती. नेमस्तपणा म्हणजे फार लांबच्या, अवघड, अशक्य अशा ध्येयाच्या मागे न लागता जे शक्य आहे, नजिकच्या भविष्य काळात मिळण्यासारखे आहे अशा ध्येयासाठी प्रयत्न करणे होय. या काळात त्यामुळे सरकारला अर्ज विनंत्या करणे आणि सरकारचे मत अनुकूल करून घेऊन सुधारणा घडवून आणणे येवढेच या पक्षाचे प्रमुख कार्य होते. त्या काळच्या मानाने हे कार्य देखील आवश्यक व पुरोगामी होते. आजच्या मानदंडाने १९ व्या शतकातील कार्यांचे मूल्यमापन करणे योग्य होणार नाही.

## नव्या युगाची पहाट

१९८५ नंतर मात्र कॉंग्रेस जहाल राजकारणाकडे झुकू लागली. लोकमान्य टिळकांच्याकडे तिचे नेतृत्त्व जाऊ लागले. सुरत कॉंग्रेस हा कॉंग्रेसच्या इतिहासातील एक नवा टप्पा मानायला हरकत नाही. याची दोन तीन कारणे सांगत येतील. पहिले असे की, १८८५ पासून ते १९०५ पर्यंत कॉंग्रेस मवाळ मार्गाने गेली होती. परंतु या मार्गाने जाऊन हातात फारसे यश पडत नाही असे नव्या पिढीला वाटू लागले. दुसरे असे की, १८८० ते ८५ पासून पुढे २० वर्षे या देशात अनेक मोठमोठे दुष्काळ पडले. या दुष्काळामध्ये हजारो माणसे उपासमारीने मेली. यातून देशात नवा असंतोष धुमसू लागला. त्याचप्रमाणे प्लेगसारख्या मोठ्या साथी येथे आल्या. या साथीलाही देशातील शेकडो माणसे बळीं पडली. या कालात सरकारने ज्या पद्धतीने दुष्काळ व प्लेग यांच्यासारखे प्रश्न हाताळले त्यामुळे देशात अधिकच असंतोष पेटला. यात १९०४ व १९०५ च्या बंगालच्या फाळणीची भर पडली. स्वाभाविकच आधीच्या मवाळ मार्गावरील लोकांचा विश्वास कमी होऊन त्यांची मने जहाल मार्गाकडे वळू लागली. लोकमान्य टिळकांनी आपल्या भाषणातून, वृत्तपत्रातून, सहकार्यांच्या मदतीने कॉंग्रेसमध्ये हा जहाल पक्ष अतिशय प्रभावी केला. १९०५ पासून ते १९२० पर्यंत कॉंग्रेस ही जहाल मार्गाकडेच झुकलेली होती. १९०५ च्या आधीचे युग हे जर रानडे, गोखले यांचे युग असेल तर नंतरचे युग हे टिळक युग असे म्हणायला काहीच हरकत नाही. टिळकांच्या मृत्यूनंतर मात्र भारतीय राजकारणात फार मोठा बदल झाला. महात्मा गांधींच्या उदयाबरोबर राष्ट्रीय कॉंग्रेसचे स्वरूपच पार बदलून गेले. येथून एका नव्या युगाला सुरुवात झाली.

## बदलते नेतृत्व
## बदलते विचार

टिळक युग संपले आणि गांधी युग सुरू झाले. याच्या प्रतिक्रिया विशेषतः महाराष्ट्रामध्ये वेगळ्या पद्धतीने उमटल्या. टिळकांच्या काळातील पुष्कळसे नूकॉंग्रेसचे मित्र गांधी युगात कॉंग्रेसचे विरोधक ब लागले. या काळात कॉंग्रेस

मुख्यतः शहरातील सुशिक्षित मध्यम वर्गात गेली होती. परंतु महाराष्ट्रातील बहुसंख्य सुशिक्षित वर्ग गांधींना व पर्यायाने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसला विरोधी बनला. गांधींचे असहकाराचे, सत्याग्रहाचे, अहिंसेचे मार्ग त्यांना मान्य नव्हते. इतरही अनेक काही कारणे असतील. परंतु टिळकांच्या मृत्यूनंतर येथील बहुसंख्य सुशिक्षित वर्ग काँग्रेस विरोधी बनू लागला. न. चिं. केळकर, बॅ. जयकर यांच्याकडे या विरोधी पक्षाचे नेतृत्व गेले होते. अशा या काळात काँग्रेस संघटनेमध्ये एक प्रकारची पोकळी निर्माण होऊ लागली होती. या काळात शंकरराव देव पुढे आले आणि त्यानी काँग्रेस संघटनेची ताकद कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील काँग्रेस संघटनेच्या दृष्टीने शंकरराव देवानी केलेले हे कार्य महत्त्वाचे मानावे लागेल. विरोधी बाजूला महाराष्ट्रातील बहुसंख्य सुशिक्षित वर्ग, त्यांचे नेतृत्व केळकर जयकर यांच्यासारख्या मुरब्बी राजकीय नेत्यांकडे आणि अशा या कालात त्यांच्याशी दोन हात करून काँग्रेस संघटनेमागे ताकद उभी करणे एका दृष्टीने अवघड होते. गांधींनी देशव्यापी आंदोलन सुरू केले होते. त्याचा फायदा शंकरराव देवाना मिळाला होता. तरी देखील येथील स्थानिक संघटनेला येथील सुशिक्षितांशी झगडा द्यावयाचा होता. हे कार्य शंकरराव देव यानी चांगल्या प्रकारे केले. युक्तिवादाला युक्तिवाद भिडविला, वैचारिक सामर्थ्याला वैचारिक सामर्थ्याने उत्तर दिले व काँग्रेस बळकट केली.

## जेध्यांनी काँग्रेस समाजाभिमुख केली

१९२९-३० साल हे काँग्रेसच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे साल मानावे लागेल. येथून काँग्रेस संघटनेचे स्वरूप अधिक व्यापक होऊ लागले. याचे श्रेय केशवराव जेधे यांना द्यावे लागेल. त्यानी आपल्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातून पसरलेल्या शेकडो कार्यकर्त्यांना काँग्रेस संघटनेत आणून सोडले. केशवराव जेधे यांच्यामुळे, शहरात रेंगाळणारी काँग्रेस एकदम खेड्यापाड्यात गेली. त्याचे एक कारण केशवराव जेधे यानी सत्यशोधक चळवळीतील अनेक कर्तबगार, ध्येयवादी तरुण कार्यकर्ते काँग्रेसमध्ये आणले. काँग्रेसच्या इतिहासातील हे वर्ष दुसऱ्या एका दृष्टीने महत्त्वाचे आहे. कारण

याच वेळी केशवराव जेधे खेड्यापाड्यातून बहुसंख्य समाजातील शेकडो कार्यकर्ते घेऊन एका दाराने कॉंग्रेसमध्ये प्रविष्ट झाले आणि उलट केळकरांच्या नेतृत्वाखाली अनेक सुशिक्षित मध्यम वर्गातील तरुण दुसऱ्या दाराने कॉंग्रेस-बाहेर पडले. केशवराव जेधे यांच्यामुळे महाराष्ट्रातील कॉंग्रेस लहान लहान खेड्यात गेली. ती अधिक समाजाभिमुख झाली. केशवराव जेधे यांचे कॉंग्रेस संघटनेवरील हे ऋण आपल्याला कधीही विसरता येणार नाही.

### स्वातंत्र्यचळवळीला भावात्मक आशय

१९३० पासून तो जवळजवळ १९४४ पर्यंत कॉंग्रेस जास्तीत जास्त लढाऊ व लोकाभिमुख झाली. या काळात जेधे-गाडगीळ यांनी केलेले कार्य महत्त्वाचे मानावे लागेल. शंकरराव देव व मामासाहेब देवगिरीकर यांचे नेतृत्व अर्थातच येथील संघटनेमध्ये होते. या काळात कॉंग्रेसमध्ये समाजवादाचा विचार पंडित नेहरू, जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वामुळे सुरू झाला होता. त्यामुळेही येथील स्वातंत्र्याच्या चळवळीला भावात्मक आशय मिळत होता. कॉंग्रेस खेड्यापाड्यात गेल्यामुळे शेतकऱ्याच्या प्रश्नाला महत्त्व मिळत होते. हे स्वरूप जवळजवळ स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत म्हणजे १९४५ ते १९४८ पर्यंत कायम राहिले. परंतु या वर्षी पुन्हा कॉंग्रेस संघटनेत नवे प्रश्न निर्माण झाले.

### महाराष्ट्र कॉंग्रेसचा अर्जुन : भाऊसाहेब हिरे

१९४७ ते १९४८ साली शंकरराव मोरे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कामकरी पक्ष स्थापन झाला. या संघटनेमध्ये महाराष्ट्र कॉंग्रेस संघटनेतील बहुसंख्य समाजातील अनेक मान्यवर नेते सामील झाले. कॉंग्रेसचा ध्येयवाद अपुरा आहे, येथे कम्युनिझमचा प्रसार झाला पाहिजे असे या पक्षाचे म्हणणे होते.या पक्षात केशवराव जेधेही सामील झाले.त्याचप्रमाणे तुळशीदास जाधव, काकासाहेब वाघ, व्ही. एन. पाटील, माधवराव बागल, जी. डी. लाड, दत्ता देशमुख, नाना पाटील, उद्धवराव पाटील यांच्यासारखे मान्यवर नेते कॉंग्रेस-मधून बाहेर पडले. कॉंग्रेसमध्ये यामुळे एक नवी पोकळी निर्माण झाली. कॉंग्रेस

मधून एका दाराने ही बाहेर गेली तर दुसऱ्या दाराने समाजवादी विचाराचे नेते नानासाहेब गोरे, एस. एम. जोशी, अच्युतराव पटवर्धन काँग्रेसच्या बाहेर पडले. काँग्रेसमधील अशी अनेक मान्यवर मंडळी बाहेर गेल्यामुळे महाराष्ट्र काँग्रेससमोर मोठी चमत्कारिक समस्या निर्माण झाली होती. या काळात भाऊसाहेब हिरे यांच्यासारखे कणखर नेतृत्त्व पुढे आले व त्यानी काँग्रेसचा बालेकिल्ला उत्तम तऱ्हेने सांभाळला. १९४८ ते १९५२ या कठीण काळात महाराष्ट्रभर वाऱ्यासारखा संचार करून त्यानी काँग्रेस संघटनेची जी सेवा केली ती अत्यंत उल्लेखनीय व अभिमानास्पद आहे. शेतकरी कामकरी पक्ष व समाजवादी पक्ष यामधील नेत्यांना तोंड देणे त्या वेळी खरोखरच अवघड होते. विशेषतः शे. का. पक्षाचा विरोध या काळात खेड्यापाड्यातूनही जाणवत असल्यामुळे या पक्षाला तोंड देऊन काँग्रेस प्रत्येक खेड्यापर्यंत मजबूत ठेवणे अवघड होते. परंतु भाऊसाहेब हिरे या विरोधास तोंड देण्यास समर्थ होते. हे त्यानी १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत दाखवून दिले. भाऊसाहेब हिऱ्यानी १९५२ पासून १९५५ पर्यंतही काँग्रेस संघटनेचे प्रभावीपणे नेतृत्व केले.

## समर्थ नेतृत्त्वाचा पुरुषार्थ : यशवंतराव चव्हाण

परंतु १९५६ नंतर महाराष्ट्र काँग्रेस संघटनेत पुन्हा काही नवीन प्रश्न निर्माण झाले. महाराष्ट्रात भाषिक राज्याच्या प्रश्नावर प्रचंड आंदोलन निर्माण झाले व भारतातील इतर राज्यांना भाषिक राज्याचे तत्त्व लागू केले, पण महाराष्ट्राला मात्र हे तत्त्व नाकारून सापत्न भावाने वागविले, अशी भावना महाराष्ट्रात सर्वत्र निर्माण झाली. काँग्रेसमधील अनेक कार्यकर्ते व नेते देखील केंद्र सरकारच्या द्विभाषिक राज्याच्या कल्पनेवर अतिशय रुष्ट झाले होते. या काळात काँग्रेस संघटनेला फार मोठा धक्का बसला. काँग्रेसने अनेक वर्षे काम करून मिळवलेली पुण्याई अपुरी पडू लागली. १९५७ च्या निवडणुकीत काँग्रेसला कधी मिळाले नव्हते एवढे अपयश मिळून जबरदस्त धक्का बसला. महाराष्ट्रात भाषिक चळवळीच्या नावाखाली कम्युनिझम मूळ धरतो की काय अशी धास्ती अनेकाना वाटू लागली आणि अशा या काळात ना. यशवंतरावजी चव्हाण यांच्यासारखे अत्यंत विचारी, व्यापक दृष्टीचे, संयमी, अतिशय कर्तबगार व समर्थ नेतृत्त्व पुढे आले.

त्यानी कॉंग्रेसचे तारू वाऱ्यावादळातून सुरक्षितपणे किनाऱ्याला लावले. द्विभाषिकाच्या काळातही मुख्यमंत्री म्हणून त्यानी या राज्याचा कारभार अत्यंत उत्कृष्टपणे पार पाडला. सर्व भारतातील एक अग्रगण्य राज्य म्हणून या राज्याचा लौकिक निर्माण झाला. आपल्या वैचारिक सामर्थ्याच्या जोरावर व संयमी वृत्तीने विरोधकांच्या शिडातील वारंच त्यांनी काढून घेतले. इतकेच नव्हे तर केंद्र पातळीवरील नेत्यांच्या विचारातही परिवर्तन करून संयुक्त महाराष्ट्राचा मंगल अमृतकळश दिल्लीहून मुंबईस आणला. आणि त्यानंतर कॉंग्रेससंघटना नव्या तेजाने, नव्या सामर्थ्याने पुढे आली. ना. यशवंतराव चव्हाण यांनी भाषिक चळवळींच्या काळात कॉंग्रेस संघटना मजबूत करण्याचे जे कार्य केले ते महाराष्ट्र कॉंग्रेसच्या इतिहासात सुवर्ण अक्षरानी लिहून ठेवावे लागेल. महाराष्ट्र कॉंग्रेस संघटनेच्या इतिहासातील हा अत्यंत महत्त्वाचा व गौरवशाली कालखंड आहे. ना. यशवंतरावजी चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा पाया घातला. आर्थिक विकासासाठी विविध योजना त्यांनी मार्गस्थ केल्या. परंतु त्याचबरोबर महाराष्ट्राची शैक्षणिक, सांस्कृतिक वाढ व्हावी म्हणून अनेक प्रकारे महत्त्वाचे कार्य केले आहे. या दृष्टीने त्यांनी स्थापन केलेल्या साहित्य व सांस्कृतिक मंडळाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. या मंडळाच्या द्वारे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विकासाला अनुदानाच्या रूपाने महत्त्वाचे साहाय्य होत आहे. त्याचप्रमाणे १२०० रु. खालील उत्पन्न असणाऱ्या समाजातील गरीब विद्यार्थ्यांना ज्ञानाची दारे उघडी करून खेड्यापाड्यात कधी नव्हे अशी शैक्षणिक प्रगतीची नवी दिशा निर्माण केली. त्यांच्या या पुरोगामी शैक्षणिक धोरणामुळे महाराष्ट्रभर चैतन्याची नवी लाट निर्माण झाली. गरीबीमुळे शिक्षणाला वंचित झालेल्या शेकडो तरुणांचे चेहरे आनंदाने उजळून निघाले. त्यांच्या डोळ्यात आत्मविश्वासाचे नवे तेज चमकू लागले. शैक्षणिक क्षेत्रात नवीन निःशब्द क्रांती सुरू झाली. ना. यशवंतरावजी हे या काळात केवळ राजकीय नेतेच राहिले नाहीत तर आमच्या शैक्षणिक, सांस्कृतिक जीवनाचे एक प्रमुख शिल्पकार बनले. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील सर्वांगीण प्रगती घोडदौडीने सुरू झाली. परंतु तेवढ्यात लाल चीनने हिमालयातून आमच्या स्वातंत्र्यावर घाव घालण्याचा प्रयत्न केला. दिल्लीला यशवंतरावजी चव्हाण यांच्या नेतृत्वाची गरज निर्माण झाली.

देशाच्या हाकेला ओ देऊन ना. यशवंतरावजी मुंबईहून दिल्लीला गेले. हिमालयाच्या रक्षणासाठी सह्याद्री आपल्या सगळ्या सामर्थ्यानिशी धावून गेला. या काळातील यशवंतरावजींचे महाराष्ट्र काँग्रेसवरील ऋण शब्दात व्यक्त करण्यासारखे नाही. इतके ते मोठे आहे. परंतु त्यांचे ऋण केवळ काँग्रेस संघटनेवर नाही; ते अवघ्या महाराष्ट्रावर आहे. यानंतरच्या पुढच्या कालखंडासंबंधी मी न बोललेले बरे. परंतु या काळात ना. यशवंतरावजी चव्हाण यांनी महाराष्ट्र काँग्रेससंघटनेसंबंधी ज्या आशाआकांक्षा मनात बाळगल्या होत्या, त्या साकार करण्याचा प्रयत्न निष्ठेने ही संघटना करीत आहे. या पुढील काळातही आपल्या या थोर नेत्याने महाराष्ट्राच्या प्रगतीसंबंधी ज्या अपेक्षा आपल्या हृदयाशी बाळगल्या आहेत, त्या साऱ्या आशा आकांक्षा आपण परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करू या. या कार्यात आपण सर्वच निष्ठेने, प्रामाणिकपणे सहभागी व्हाल यात मला शंका नाही. कारण हे कार्य थोर आहे, तसेच ते पवित्र आहे. या जगन्नाथाच्या रथाला आपल्या सर्वांच्या सहकार्याचे हात लागले पाहिजेत. त्यात आपल्या सर्वांचाच उत्कर्ष आहे. भविष्यकाळातील विकासाचे ते भक्कम आश्वासन आहे.

# २

# भारतीय लोकशाही : काही विचार

महाराष्ट्रातील ग्रामीण कार्यकर्त्यांच्या अभ्यास शिबीराचे उद्घाटनप्रसंगी भारतीय लोकशाही या विषयावर मी काही विचार सांगावेत असे मला आता सुचविण्यात आले.

भारतीय लोकशाहीसंबंधी चर्चा करण्यापूर्वी लोकशाही म्हणजे काय यासंबंधी आपण आपल्या कल्पना स्पष्ट केल्या पाहिजेत. या संदर्भात भारतीय लोकशाहीचा विचार करणे आपणास उपयुक्त ठरणार आहे.

### लोकशाहीचा आशय व्यापक अन् गतीमान

लोकशाही ही एक गतिमान कल्पना आहे. गेल्या ३०० वर्षांतील लोकशाहीचा इतिहास पाहिला तर या कल्पनेचा आशय सतत बदलत आला आहे, असे आपणास दिसून येईल. या विचाराची क्षितिजे सतत वाढत गेलेली आहेत असे आपणास पाहावयास मिळेल. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात

---

महाराष्ट्रातील ग्रामीण कार्यकर्त्यांचे अभ्यास शिबीर–
कोथरुड, जि. पुणे, उद्घाटनाचे भाषण.

लोकशाहीचा प्रथम स्पष्ट उद्घोष झाला. या वेळीं लोकशाहीचा अर्थ मुख्यतः सामाजिक समता असाच होता. फ्रान्समध्ये अनेक शतके सरंजामशाही व पोपशाही यांचेच राज्य होते. या सामाजिक व धार्मिक विषमतेविरुद्ध फ्रान्समधील लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांनी वैचारिक बंड पुकारले आणि या काळात लोकशाही म्हणजे मुख्यतः सामाजिक समता असेच समीकरण त्या वेळीं अनेकांच्या मनात होते. औद्योगिक क्रांतीनंतर लोकशाहीचा अर्थ अधिक व्यापक होऊ लागला. औद्योगिक क्रांतीमुळे युरोपमध्ये अनेक नवी शहरे जन्माला आली. शेकडो कामगार एकत्र येऊन काम करू लागले. या कामगारांच्यामध्ये नवी राजकीय जागृती निर्माण होऊ लागली. या काळात लोकशाही राजवटीमध्ये मतदानाचे तत्त्व सुरू झाले होते. परंतु मतदानाचा हक्क समाजातील वरिष्ठ वर्गातील मूठभर लोकांपुरताच मर्यादित होता. या काळात मतदानाचा हक्क आम्हालाही मिळाला पाहिजे अशी मागणी कामगारानी केली. १८४८ सालातील चार्टिस्ट चळवळींमध्ये याचे स्वच्छ प्रतिबिंब आपणास पाहावयास मिळते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात मतदानाचे क्षेत्र सतत विस्तीर्ण होत गेले. या काळात लोकशाही म्हणजे मुख्यतः राजकीय समता असाच अर्थ सर्वांना अभिप्रेत होता. १९१७ सालातील रशियन राज्यक्रांतीनंतर लोकशाहीच्या कक्षा आणखी जास्त रुंद झाल्या. यानंतर मुख्यतः लोकशाहीच्या तत्त्वज्ञानामध्ये समतेची भर पडली. औद्योगिक क्रांतीपासून ते पहिल्या महायुद्धापर्यंत राजकीय समता पुष्कळाना मिळाली होती. परंतु आर्थिक समतेवाचून राजकीय समता फारशी उपयुक्त होऊ शकत नाही याची जाणीव रशियन क्रांतीनंतर जगातील अनेक विचारवंतांना होऊ लागली. गेल्या ३०–४० वर्षांत सामाजिक आणि राजकीय समतेबरोबर नागरिकांना आर्थिक समताही मिळाली पाहिजे हा विचारही आता सर्वमान्य झाला आहे. फ्रेंच राज्यक्रांतीपासून तो दुसऱ्या महायुद्धापर्यंत अशा तऱ्हेने लोकशाहीचा आशय व्यापक, गतिमान बनत गेला आहे.

लोकशाहीचे हे तात्त्विक विवेचन केल्यानंतर मी भारतीय लोकशाहीवरील काही विचार आपल्यापुढे मांडणार आहे. भारतीय लोकशाहीचे पहिले वैशिष्ट्य असे की जगातील ही सर्वांत मोठी लोकशाही आहे. येथे सुमारे २२–२३ कोटी मतदार आहेत. अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाची सर्व लोकसंख्या देखील

आपल्या देशातील मतदारांच्या संख्येइतकी नाही. जगात कोणत्याही लोकशाही राष्ट्रात भारताइतके मतदार नाहीत आणि त्यामुळेच भारतीय लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही आहे असे मला वाटते.

## आशियाखंडातील नंदादीप

भारतीय लोकशाहीचे दुसरे वैशिष्ट्य असे की, आशियातील गेली अठरा वर्षे अत्यंत सुस्थिर असलेली ही लोकशाही आहे. आशियाच्या भव्य राजकीय पार्श्वभूमीवर भारतीय लोकशाहीचे हे वैशिष्ट्य चटकन आपल्या नजरेत भरते. कारण आशियावर आपण सर्वत्र नजर टाकली तर तेथील बहुतेक सर्व देशांत गेल्या १०–१५ वर्षांत डावी हुकूमशाही तरी आलेली अहे अथवा उजव्या हुकूमशाहीचा तरी उदय झालेला आहे. भारताबरोबरच आशियातील सुमारे ३०-४० राष्ट्रे स्वतंत्र झाली. परंतु त्या सर्व राष्ट्रांमध्ये भारतीय लोकशाही अशी एकमेव लोकशाही आहे की जिथे गेली अठरा वर्षे स्थिर सरकार आहे. नागरिकांचे मूलभूत हक्क सुरक्षित आहेत. हिंदुस्थानबरोबर स्वतंत्र झालेल्या इतर सर्व राष्ट्रातून लोकशाहीचा जवळजवळ अस्त झाला आहे. इंडोनेशिया, ब्रह्मदेश, इजिप्त या देशांवर नुसती नजर टाकली तरी आपणास याचा प्रत्यय येईल. भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने ही घटना अत्यंत उल्लेखनीय आणि अभिमानास्पद आहे.

## एकपक्षीय लोकशाही ?

भारतीय लोकशाहीचा विचार करताना नेहमी असे सांगितले जाते की इथे प्रत्यक्षामध्ये एकपक्षीय राजवट आहे. विरोधी पक्ष इथे वाढलेले नाहीत. आणि त्यामुळे भारतीय लोकशाहीत ही एक महत्त्वाची उणीव आहे. ही टीका मला फारशी मूलगामी वाटत नाही. एक गोष्ट खरी आहे की, गेल्या १८ वर्षांत इथे विरोधी पक्ष वाढू शकला नाही. १९४५ सालापासून तो ६५ साला-पर्यंतच्या सर्व निवडणुकांचा आपण अभ्यास केला तर एक गोष्ट त्यामधून स्पष्ट दिसते ती ही की, या २० वर्षांत मतदारांचा काँग्रेसमागील पाठिंबा जवळ जवळ कायम आहे. काँग्रेसला या सर्व निवडणुकांत ४४ ते ४८ टक्के मते पडलेली आहेत. मतांची जी वाटणी झाली आहे ती विरोधी पक्षातच झाली

आहे. म्हणजे समाजवादी पक्षाची मते स्वतंत्र पक्षाने खाल्ली आहेत वा स्वतंत्र पक्षाची मते जनसंघाने घेतली आहेत. या विरोधी पक्षातील मतांची वाटणी त्यांच्यामध्ये आपसाआपसात झालेली आहे. पण काँग्रेसच्या एकूण मतदारांवर त्याचा फारसा परिणाम झालेला नाही. त्यामुळेच एक गोष्ट स्पष्ट आहे की, काँग्रेस हा पक्ष गेली १८ वर्षे सतत सत्तारूढ राहिला आहे. विरोधी पक्ष येथे एवढ्या मोठ्या काळात वाढू शकले नाहीत. या राजकीय घटनेची थोडीशी खोलात जाऊन आपण चर्चा केली पाहिजे. या देशात विरोधी पक्ष फारसे वाढू शकले नाहीत याचे एक महत्त्वाचे कारण हे की, विरोधी पक्ष आपल्या कर्तृत्वासंबंधी मतदारामध्ये विश्वास निर्माण करू शकले नाहीत. विरोधी पक्षांच्या हातात सत्ता दिली तर ते या देशाचा कारभार कसा हाकू शकतील, याबद्दल मतदाराना जबरदस्त शंका वाटते. मतदारामध्ये ते योग्य तो विश्वास निर्माण करू शकले नाहीत याचे एक कारण म्हणजे त्यांची टीकापद्धती होय. विरोधी पक्षांची गेली १८ वर्षांतील या देशातील टीका ही पुष्कळशी नकारात्मक वा विध्वंसक अशी आहे. अनेक वेळा विरोधासाठी विरोध हेच त्यांच्या टीकेचे मुख्य सूत्र असते. याचे एक महत्त्वाचे कारण त्यांच्या विशिष्ट परिस्थितीत सापडेल. इंग्लंडसारख्या देशामध्ये आजचा विरोधी पक्ष उद्याचा सत्तारूढ पक्ष असतो. त्यामुळे सत्तारूढ पक्षावर टीका करताना वा लोकाना आश्वासने देताना त्याना ती विचारपूर्वक द्यावी लागतात. आज जर काही वेडीवाकडी विधाने केली वा वारेमाप आश्वासने दिली तर उद्या सत्तारूढ झाल्यावर जनतेसमोर ते उघडे पडण्याची भीती असते. या देशात विरोधी पक्षांना हे भय कधीच वाटले नाही. ते अधिकारारूढ होऊ शकले नाहीत. नजीकच्या भविष्य काळात तसा संभव दिसत नाही. त्यामुळे समाजात कशाही प्रकारची टीका केली तरी मतदारासमोर उघडे पडण्याची त्याना भीति नाही. यातूनच त्यांच्या बेजबाबदार, नकारात्मक विध्वंसक टीकेचा जन्म झाला आहे. उलट अशा टीकेमुळेच मतदारांचा विश्वास ते संपादन करू शकलेले नाहीत. याउलट काँग्रेसमागे मतदारांचा पाठिंबा गेली २० वर्षे सतत कायम आहे. याचे एक महत्त्वाचे कारण असे की, हा पक्ष लोकांच्या बदलत्या आशाआकांक्षेशी सदैव इमानी राहिला आहे. त्यांच्या बदलत्या जीवनाशी समरस होण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. गेल्या २० वर्षांतील काँग्रेस अधिवेशनातील ठराव जर आपण

अभ्यासले तर आपणास त्याचा प्रत्यय येईल. काँग्रेसच्या यशाचे सर्वांत महत्त्वाचे रहस्य हेच आहे, असे मला वाटते.

## मानवी मूलभूत हक्क हा लोकशाहीचा कणा

हिंदुस्थानात गेल्या १८ वर्षांत विरोधी पक्ष वाढू शकले नाहीत त्यामुळे भारतीय लोकशाही सदोष लोकशाही आहे असा एक आक्षेप वारंवार घेतला जातो. हा आक्षेप मला मान्य नाही. याचे एक साधे कारण असे की, दोन पक्ष वा तीन पक्ष हा लोकशाहीचा केवळ सांगाडा आहे. लोकशाहीचा तो प्राण नव्हे. पक्षपद्धती १५०, २०० वर्षांपूर्वी जन्मास आली. आणखी ५० वर्षांनंतर तिचे स्वरूप पुष्कळच बदलून जाईल. त्यामुळे द्विपक्ष पद्धती हे लोकशाहीचे केवळ बाह्यांग आहे. तिचा तो आत्मा नव्हे. दुसरे असे की, लोकशाहीचा हा जो सांगाडा युरोपमध्ये विशेषतः १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात तयार झाला, त्यालाच आशियातील परिस्थितीने नवी आव्हाने केलेली आहेत. लोकशाहीसंबंधीच्या अनेक परंपरागत कल्पना आशियाच्या परिस्थितीच्या संदर्भात नव्याने तपासण्याची गरज निर्माण झाली आहे. युरोपमधील लोकशाहीचा सांगाडा आशियामध्ये जशाचा तसा लागू करावा का असाही प्रश्न नव्याने निर्माण झाला आहे. आपल्या अनेक परंपरागत कल्पना येथे वितळत आहेत, असे मला वाटते. या द्विपक्ष पद्धतीबद्दलही हाच सिद्धांत लागू केला पाहिजे असे मला प्रामाणिकपणे वाटते. मी थोड्या वेळापूर्वी म्हटल्याप्रमाणे द्विपक्ष पद्धती हा लोकशाहीचा केवळ सांगाडा आहे. व्यक्तीचे मूलभूत स्वातंत्र्य, मानवाचे मूलभूत हक्क हा लोकशाहीचा कणा आहे. लोकशाहीचा सांगाडा बदलू शकेल, परंतु लोकशाहीचा हा अत्यंत महत्त्वाचा गाभा सुरक्षित आहे की नाही हाच या संदर्भात महत्त्वाचा प्रश्न आहे. या दृष्टीने विचार करता हिंदुस्थानात एक पक्ष असून देखील लोकशाही पूर्णपणे सुरक्षित आहे असेच आपणास दिसून येईल. या देशामध्ये व्यक्तीचे मूलभूत स्वातंत्र्य अबाधित आहे. येथे व्यक्तींना इतके स्वातंत्र्य आहे की कधी कधी ते स्वातंत्र्याच्या शत्रूंना देखील मुबलक प्रमाणात दिले जाते. या देशातील मानवी स्वातंत्र्याचा विचार करताना येथील स्वातंत्र्य जगातील कोणत्याही प्रगत

राष्ट्रातील स्वातंत्र्याशी तुलना करता येईल इतके मुबलक आहे. त्यामुळे लोकशाहीच्या सांगाड्याकडे पाहून या देशातील लोकशाहीवर टीका करणे योग्य होणार नाही. लोकशाही युरोपमधून आशियामध्ये येऊ लागली त्या वेळी तिच्या परंपरागत स्वरूपात बदल होऊ लागला. आता ती आशियातून आफ्रिकेकडे जाऊ लागली आहे. तेथे तिच्या परंपरागत स्वरूपात आणखी बदल होईल. हिंदुस्थानने उलट गेल्या वीस वर्षांच्या इतिहासाने असे दाखवून दिले आहे की येथे एक पक्ष असून देखील लोकशाही राहू शकते. दोष दूर करणे हे विरोधी पक्षातील लोकांचे मुख्य कार्य असते. सत्तारूढ पक्षाने जर वेळोवेळी कठोर आत्मनिरीक्षण केले व आपले दोष जर दूर केले तर विरोधी पक्षांचे कार्य सत्तारूढ पक्ष करू शकतो. त्यामुळे सत्तारूढ पक्ष नसला तर लोकशाहीच बरोबर नाही. असे म्हणता येणार नाही. आणि त्यामुळे यासंबंधीची टीका मला पुस्तकी व म्हणूनच टाकाऊ वाटते.

## अपायकारक टीका

सत्तारूढ पक्षावर दुसरीही अशी टीका केली जाते की या पक्षावर येथील कारखानदार, जमीनदार, भांडवलदार यांचा मोठा प्रभाव आहे. या वर्गाच्या प्रभावाच्या छायेखालीच हा पक्ष वावरत आहे. ही टीका देखील मला अवास्तव व अन्यायकारक वाटते. गेल्या अठरा वर्षातील कॉंग्रेसच्या धोरणावर जमीनदार, भांडवलदार यांचा कुठे प्रभाव आहे असे मला वाटत नाही. या देशातील सुमारे ४५ टक्के जमीन ही जमीनदारीखाली होती. कॉंग्रेसने ही सर्व जमीनदारी नष्ट करून टाकली आहे. आता या देशात कसणारा शेतकरी हाच जवळ जवळ जमिनीचा मालक आहे. जमीनदारांचा प्रभाव असता तर हे धोरण कॉंग्रेस स्वीकारू शकली असती का ? त्याचप्रमाणे कारखानदार, भांडवलदारांच्या उत्पन्नावर कमाल प्राप्तीकर हा सुमारे ८५ टक्के आहे. प्राप्तीवर जास्तीत जास्त कर असणारा जगातील हा एकमेव देश आहे. म्हणजे आज कारखानदाराला ३० लाख रुपये प्राप्ती झाली तर त्यातील २७ लाख रुपये कराच्या रूपाने सरकार घेते. इतका मोठा कर कॉंग्रेसने लादला आहे. जर भांडवलदारांचा या लोकशाहीवर प्रभाव असता तर हे शक्य झाले असते काय ? या देशातील अनेक कायद्यांचा आपण अभ्यास केला तर आपणास असेही दिसून येईल की

येथील जहागिऱ्या, जमीनदारी, भांडवलशाही नष्ट करण्याकडे सर्व कायद्यांचा कल आहे. कॉंग्रेसच्या धोरणावर त्यामुळे या वरिष्ठ वर्गाचा कुठेही प्रभाव दिसणार नाही. त्यांची छाप असलीच तर ती धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये कुठे कुठे सापडण्याचा संभव आहे. व्यक्तिगतरीत्या हे भांडवलदार, कारखानदार कायद्यातून पळवाटा काढून आपला फायदा करून घेत असतील. परंतु तो प्रश्न अंमलबजावणीचा आहे, धोरणाचा नव्हे ! येथील केंद्र वा राज्यसरकारचे धोरण पाहिले तर त्यावर भांडवलदार, कारखानदारांची छाप कोठेही आढळणार नाही आणि त्यामुळे कॉंग्रेस पक्ष हा वरिष्ठ वर्गाच्या छायेखाली वावरत आहे ही टीकाही मला अयोग्य व अपायकारक वाटते.

## नवे वैचारिक आवाहन

भारतीय लोकशाहीच्या संदर्भात मतदारांचे बदलते स्वरूपही लक्षात घेतले पाहिजे. मागच्या निवडणुकीच्या वेळेला १६।७ वर्षांचा असणारा विद्यार्थी हा या निवडणूकीत २१ । २२ वर्षांचा प्रौढ मतदार होत असतो. प्रत्येक निवडणुकीच्या वेळी अशा मतदारांची नव्याने भर पडत असते. एकूण मतदारवर्गामध्ये नव्याने दाखल होणाऱ्या या मतदारांची संख्याही कमी नसते. समाजशास्त्रज्ञांच्या मते अशा मतदारांची संख्या ३८ टक्केच्या दरम्यान असावी. या नव्या मतदार वर्गावर लोकशाहीचे, स्वातंत्र्याचे संस्कार झाले पाहिजेत. जगात सगळीकडे प्रत्येक लोकशाहीमध्ये मतदारांचा असा नवा वर्ग निर्माण होत असतो. परंतु भारतीय लोकशाहीच्या संदर्भात याला एक वेगळे महत्त्व आहे. ते असे की, या नव्या मतदार वर्गाला स्वातंत्र्यपूर्व काळातील झगड्याचे; तुरुंगवासाचे फारसे आकर्षण वाटत नाही. कायदेभंगाच्या चळवळीतील मोठ्यातला मोठा कार्यकर्तादेखील या नव्या मतदारवर्गातल्या भावना हेलावू शकत नाही. विशेषतः आताचा २१।२२ वर्षांचा मतदारवर्ग ४५ ते ४६ साली जन्माला आलेला होता. म्हणजे स्वातंत्र्याचे आंदोलन संपल्यावर तो जन्माला आला व तो सर्वस्वी नव्या वातावरणात वाढलेला आहे. अशा मतदारवर्गाची संख्या सतत वाढत जाणार आहे. या नव्या मतदार वर्गाच्या नव्या गरजा ओळखूनच त्याला आपल्याला आजच्या काळाला साजेसे असे नवे वैचारिक आवाहन केले पाहिजे.

कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी या मतदार वर्गाच्या बदलत्या स्वरूपाची वेळींच दखल घेतली पाहिजे.

## तेजस्वी लोकशाहीसाठी भावनात्मक ऐक्य

भारतीय लोकशाहीमध्ये भावनात्मक ऐक्य महत्त्वाचे आहे. या देशातील वेगवेगळ्या धर्मीयांमध्ये, भाषिकांमध्ये, राज्यातील नागरिकांमध्ये, जातीजातींमध्ये जबरदस्त भावनात्मक ऐक्य निर्माण झाले पाहिजे. त्यातूनच आपली लोकशाही नव्या तेजाने बाहेर पडणार आहे. परंतु यासाठी या देशातील भूतकाळाकडे,आपल्या देशातील जुन्या परंपरांकडे फारसे वळून पाहता येणार नाही. भावनात्मक ऐक्यासाठी जुन्या परंपरांमधून जेवढी प्रेरणा घेता येईल तेवढी जरूर घ्यावी. परंतु या देशातील भूतकाळापासून या कार्यासाठी आपण कितपत प्रेरणा घेऊ शकू याबद्दल मला शंका आहे. या देशातील भूतकाळात निरनिराळ्या जाती–जमातींना, भाषिकाना एकत्रित बांधणाऱ्या शक्तीपेक्ष विभागणाऱ्या शक्तीच अधिक आहेत. अस्पृश्य आणि स्पृश्य, हिंदू आणि मुस्लिम या सर्वांना या देशात आपल्याला एका भावनेच्या धाग्याने बांधवयाचे आहे.

यासाठी आपल्याला भूतकाळातील परंपरेपेक्षा भविष्यकाळातील समान ध्येयाकडेच अधिक पाहिले पाहिजे, असे मला वाटते. स्वातंत्र्य, लोकशाही समता, ही भविष्यकाळातील आमची श्रेष्ठ जीवनमूल्ये आहेत. या मूल्यांवरील आपली निष्ठा हाच आम्हा सर्वांना एकत्र बांधणारा प्रभावी भावनेचा धागा आहे. आणि या दृष्टीनेच आमच्या भारतीय ऐक्यासाठी आमच्या भूतकाळातील भविष्यकाळातील परंपरेपेक्षा समान ध्येयाकडे आपण अधिक पाहिले पाहिजे असे मला प्रांजलपणे वाटते.

## लोकशाही जीवनातील हे नवे क्षितिजे

भारतीय लोकशाहीच्या जीवनातील आणखी एका महत्त्वाच्या घटनेचा मला उल्लेख केला पाहिजे. गेली अठरा वर्षे आमच्या जीवनाच्या मुख्य

प्रवाहापासून येथील बुद्धिवादी वर्ग जास्तीत जास्त अलिप्त राहात आहे. ही घटना बुद्धिवादी वर्ग व लोकशाही या दोघांच्याही हिताच्या दृष्टीने फारशी चांगली नाही. बुद्धिमंत वर्गाने समाजातील बहुसंख्य घटकांच्या आशाकांक्षेशी समरस होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. केवळ पूर्वी आपल्या हातात असलेली सत्ता गेल्यामुळे त्यांनी अशी अलिप्ततेची भूमिका स्वीकारणे योग्य नाही. त्यांच्या बुद्धिमत्तेचा उपयोग समाजाला झाला पाहिजे. अर्थात राजकर्त्यांनीही त्यांच्या बुद्धिमत्तेचा उपयोग जास्तीत जास्त समाजविकासासाठी करून घेतला पाहिजे. ही एका दृष्टीने उभयपक्षी जबाबदारी आहे. परंतु गेल्या अठरा वर्षांतील हा प्रवाह थांबला पाहिजे, असे मात्र मला प्रामाणिकपणाने वाटते याच संदर्भात दुसऱ्याही एका मोठ्या घटनेकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. गेल्या १०–१५ वर्षांत ग्रामीण भागात महाविद्यालयीन शिक्षणाचा झपाट्याने प्रसार होत आहे. त्यामुळे खेड्यापाड्यात बुद्धिमंतांचा नवा वर्ग तयार होत आहे. एका दृष्टीने १८९४ पासून तो दुसऱ्या महायुद्धापर्यंत पाश्चात्य शिक्षणातून नागर भागात बुद्धिमंतांचा वर्ग निर्माण झाला होता. आता हीच प्रक्रिया ग्रामीण भागातून सुरू झाली आहे. ग्रामीण भागातून हा जो बुद्धिमंताचा वर्ग पुढे येत आहे, याचे प्रमाण पुढील १० वर्षांत किती तरी वेगाने वाढेल. ग्रामीण भागात लोकशाही, स्वातंत्र्य व समता ही मूल्ये रुजविण्याचे महत्त्वाचे कार्य या नव्याने पुढे येऊ लागलेल्या वर्गाला करावयाचे आहे. परंतु हा वर्ग अकालीच सत्तेच्या मागे लागतो की काय अशी मला भीती वाटते. या नव्याने पुढे येऊ घातलेल्या बुद्धिमंतांच्या वर्गाला माझे कळकळीचे असे आवाहन आहे की, लोकशाही, स्वातंत्र्य ही मूल्ये रुजविणे अधिक महत्त्वाचे आहे. आपल्या आचार आणि विचारातून ही मूल्ये जर त्यांनी रूजविली नाहीत, तर ग्रामीण भागातील लोकशाही अडचणीत आल्यावाचून राहणार नाही. या दृष्टीने सत्तालालसेच्या आहारी अवेळीच न जाता या थोर मूल्यांची जोपासना करावी. असे जर झाले तर येथील लोकशाही जीवनातील नवक्षितिज म्हणून या वर्गाचा मी उल्लेख करीन. माझी खात्री आहे की, संक्रमण अवस्थेत हे आव्हान स्वीकारून ग्रामीण भागातील हा बुद्धिमंत वर्ग लोकशाही बळकट करण्यासाठी वचनबद्ध होईल. जयहिंद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ....................
क्रा. ........................ नों दि ....................

# ३

# भारताचें धर्मपंथातीत राज्य

हिंदुस्थान व पाकिस्तान यांच्यामध्ये जो संघर्ष चालू आहे, हा संघर्ष एका दृष्टीने दोन जीवननिष्ठांमधील संघर्ष आहे. पाकिस्तान हे धर्माधिष्ठित राज्य आहे, तर भारत हे धर्मपंथातीत राज्य आहे. एका दृष्टीने हा संघर्ष या दोन जीवनमूल्यांमधील संघर्ष आहे. आणि ही गोष्ट मला अतिशय महत्त्वाची वाटते. या दृष्टीने आपली धर्मपंथातीत राज्याची कल्पना काय आहे ? आपण हे तत्त्व का स्वीकारले आहे ? त्यामागील वैचारिक व नैतिक भूमिका कोणती आहे ? हे आपण समजावून घेतले पाहिजे. यासाठी आजच्या या व्याख्या-नातून याच विचाराचा प्रपंच करावयाचे मी ठरविले आहे.

**शतकपूर्व वैचारिक आंदोलनाचे**
**मनोहर अपत्य**

आपण जी भारतीय राज्यघटना स्वीकारली, या राज्यघटनेमध्येच आपण

---

अहमदनगर :
जिल्हा काँग्रेस कार्यकर्त्यांसमोरील भाषण.

धर्मपंथातीत राज्याची कल्पना मान्य केलेली आहे. १९५० साली स्वीकारलेले हे तत्व एका दृष्टीने आधी १०० वर्षे आपणाकडे जो विचारप्रवाह चालू होता त्याचेच एक मनोहर असे अपत्य आहे. भारताच्या १८५७ च्या बंडानंतर इंग्लंडच्या राणीने जो जाहीरनामा प्रसिद्ध केला होता त्यामध्ये सर्वधर्मीयांना सारखी वागणूक मिळेल असे घोषित केले होते. एका दृष्टीने आजच्या धर्म-पंथातीत राज्याची ती सुरुवातच होती. परंतु त्यानंतर १८८५ साली राष्ट्रीय काँग्रेस स्थापन झाली. या राष्ट्रीय काँग्रेसने सतत आग्रहाने धर्मपंथातीत राज्याचाच पुरस्कार केला आहे. काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनातून वेळोवेळी जे ठराव पास झाले आहेत, या ठरावांमधून आपणास याची प्रतिबिंबे पाहाव-यास मिळतात. १९२० साली आपल्या देशा'त हिंदु-मुस्लीम यांचे संबंध अधिक तीव्र होऊ लागले. यानंतर तर आपणास धर्मपंथातीत राज्याची अतिशयच गरज भासू लागली. राष्ट्रीय काँग्रेसने धर्मनिरपेक्ष राज्याचा पाठपुरावा केला याचे एक महत्त्वाचे कारण असे की, भारताच्या राष्ट्रीय झगड्यात सर्व धर्मांचे, जातीजमातीचे लोक आत्मबलिदानासाठी स्वेच्छेने पुढे आले होते.

या स्वातंत्र्यसैनिकांमध्ये पारशी, ख्रिश्चन, मुसलमान, हिंदू अशा सर्व धर्मांतील लोक होते. भारताला मिळालेले स्वातंत्र्य हे सर्वधर्मीयांच्या प्रयत्नातून मिळालेले स्वातंत्र्य आहे.

त्यामुळे स्वाभाविकच सर्वधर्मीयांकडे पाहण्याची समदृष्टी आपल्या राष्ट्रीय चळवळीत वाढलेली होती. शिवाय १९२० नंतर भारतीय राजकारणाचा जागतिक राजकारणाशी अधिक संबंध येऊ लागला होता आणि १९२० नंतर जगात सर्वत्र धर्मपंथातीत राज्याची कल्पनाच मोठ्या प्रमाणावर मान्यता पावू लागली होती. मध्य आशियात देखील तुर्कस्थानची उभारणी याच तत्त्वावर झाली होती. या जागतिक राजकारणातील विचारप्रवाहांचा भारतीय राज-कारणावर निकोप परिणाम झाला होता. १९४७ च्या सुमारास फाळणीच्या वेळी झालेल्या जातीय दंगलीमुळे जातीयतेचे भयानक स्वरूप आपल्या अधिकच लक्षात आले. आणि या दंगलीनंतर धर्मनिरपेक्ष राज्यावरील आपला विश्वास अधिकच दुणावला. काँग्रेसने राजकारणात धर्म घुसडून देण्याच्या तत्त्वाला कधीच मान्यता दिलेली नव्हती. काँग्रेस स्थापनेपासून तो भारतीय राज्यघटना तयार होईपावेतो या संघटनेने धर्मनिरपेक्ष राज्याचाच पुरस्कार

केलेला होता. या दृष्टीने विचार करता भारतीय राज्यघटनेमधील धर्मपंथातीत राज्याची कल्पना म्हणजे आधीच्या १०० वर्षे चाललेल्या वैचारिक चळवळींचीच केवळ स्वाभाविक अशी परिणती आहे.

## प्राचीन : मध्ययुगीन परंपरा आणि आजचे धर्मपंथातीत राज्य

भारताच्या प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाचा अभ्यास केला तरी तिथे धर्माधिष्ठित राज्ये कधीच नव्हती, असे आपणास दिसून येईल. अशोक, कनिष्क, अकबर वा छत्रपती शिवाजीमहाराज या सर्वांनी सर्वधर्मीयांना नेहमीच समानतेते वागविले आहे. भारतीय परंपरेमध्ये जी एक दुसऱ्याच्या मतावर सहिष्णुता दाखविण्याची वृत्ती आहे तिचाच हा एक आविष्कार होता. युरोपमध्ये विशेषतः खिस्त शतकानंतर राज्यसंस्था ज्याप्रमाणे धर्मसंस्थेच्या पूर्ण नियंत्रणाखाली गेली होती, त्याप्रमाणे येथे कधीही घडले नाही. राज्यसंस्था व धर्मसंस्था येथे नेहमीच स्वतंत्रपणे कार्य करीत आलेल्या आहेत. आणि या अर्थाने इथे प्राचीन व मध्ययुगात देखील धर्मपंथातीत राज्यें होती. परंतु या काळातील राजेशाहीमधील धर्मपंथातीत राज्य व आजच्या काळातील लोकशाहीमधील धर्मपंथातीत राज्य यामध्ये आपणास फरक केला पाहिजे. राजेशाहीमधील धर्मनिरपेक्षता ही मुख्यतः राजाच्या म्हणजे एका व्यक्तीच्या उदार धोरणातून जन्माला आली होती. त्यामागे दुसरे कोणतेही खोल तात्त्विक अधिष्ठान नव्हते. तो उदार राजा बदलला म्हणजे या धोरणात मूलगामी बदल होण्याचा संभव होता. हे औरंगजेबाच्या राजवटीने काही अंशी आपणास दाखवूनही दिले आहे. राजेशाहीमधील धर्मपंथातीत राज्य त्यामुळे एका व्यक्तीच्या सदिच्छेवर वा सद्भावनेवर उभारलेले होते. उलट लोकशाहीमधील धर्मपंथातीत राज्य प्रत्येक व्यक्तीच्या मूलभूत हक्कावर आधारलेले असते. लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीला विचारस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, आचार-स्वातंत्र्य पूर्णपणे दिलेले असते. तो प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्कच असतो. लोकशाहीमध्ये त्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाची प्रतिष्ठा व त्याचे स्वातंत्र्य गृहीत धरलेले असते. राजेशाहीमध्ये हे हक्क असण्याचा प्रश्नच नसतो. आणि या दृष्टीने भारतातील प्राचीन व मध्ययुगातील परंपरा जरी

धर्मनिरपेक्ष राज्याची असली तरी आधुनिक काळातले लोकशाहीमधील धर्मनिरपेक्ष राज्य व आधीच्या काळातील राजेशाहीतील धर्मनिरपेक्ष राज्य यामध्ये आपणास फरक केला पाहिजे.

### अमेरिका : आधुनिक जगातील पहिले धर्मपंथातीत राज्य !

युरोपमध्ये देखील प्राचीन काळामध्ये प्रारंभी धर्मपंथातीत राज्येच नांदत होती. पर्शियन साम्राज्य हे तिकडील जगातील पहिले मोठे धर्मपंथातीत साम्राज्य होते. अर्थात त्यानी हे धोरण स्वीकारले होते, त्यामध्ये व्यावहारिक गरजेचाच भाग जास्त होता. त्यांच्या साम्राज्यामध्ये अनेक देवदेवता मानणारे लोक होते. त्या काळात सर्वत्र दैववाद प्रबळ होता. या सर्वांना एका साम्राज्यात सामावून घ्यावयाचे तर धर्मपंथातीत राज्याचाच पुरस्कार करणे जरूर होते. पर्शियन साम्राज्याने या भूमिकेतून या कल्पनेचा पुरस्कार केला होता. पुढे रोमन साम्राज्याने हाच वारसा समृद्ध केला. परंतु पुढे ख्रिश्चन व मुस्लीम धर्मांचा उदय झाला व तेथून जगात धर्माधिष्ठित राज्याची कल्पना जन्माला आली. हे सर्व धर्म एकेश्वरवादी आहेत. त्यातून त्यांची कडवी धर्मनिष्ठा जन्माला आली असावी. प्राचीन काळात या धर्मांनी केवळ राज्यसंस्थाच नव्हे तर सर्व समाजसंस्था धर्मसंस्थेच्या नियंत्रणाखाली आणल्या. साहित्य, काव्य, नाटक, कला, शिक्षण, नृत्य यासारख्या सर्वच कला त्यांनी धर्माच्या प्रभावाखाली आणल्या. कारण धर्म हेच साध्य बनले व इतर सर्व संस्था, कला ही केवळ साधने ठरली. या काळात राजसत्ता धर्मसत्तेला शरण जाणे अगदीच स्वाभाविक होते. युरोपमध्ये अशा धर्माधिष्ठित राज्याचा प्रभाव ५ व्या शतकापासून तो १४-१५ व्या शतकापर्यंत विशेष होता. परंतु या काळात युरोपमध्ये प्रबोधनाचे युग सुरू झाले. व्यक्तीचे इहलोकातील जीवन पवित्र, श्रेष्ठ आहे असा विचार पुढे येऊ लागला. त्यातून धर्मसंस्था व राज्यसंस्था यांची हळूहळू फारकत होऊ लागली. परंतु १७ व्या शतकात हॉब्ज व लॉक यांनी राज्यसंस्थेमधील सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला. तेथून धर्मपंथातीत राज्याची कल्पना विशेष वेगाने पुढे आली. या सामाजिक कराराच्या सिद्धांतामधील एक वैशिष्ट्य असे की, आधी सुमारे २००० वर्षे,

राज्यसंस्था ईश्वराने निर्माण केली आहे, राजा हा परमेश्वराचा प्रतिनिधी आहे, अशी समजूत होती. या विचाराला कलाटणी देऊन राज्यसंस्था ही मनुष्यनिर्मित आहे म्हटले म्हणजे त्याचे सर्व स्वरूपच पालटून जाते. येथून पारलौकिक विचार मागे पडून ऐहिकाचा विचार पुढे येऊ लागला. परंतु यानंतर धर्मनिरपेक्ष राज्याचे मोठे स्वरूप आपल्याला अमेरिकेच्या इतिहासात पाहावयास मिळेल. १७७९ साली अमेरिकेने आपले स्वातंत्र्य घोषित केले व जगातील पहिलीवहिली घटनाही तयार केली. जगातील या पहिल्या राज्यघटनेतच धर्मनिरपेक्ष राज्याची सुरुवात आपणास पाहावयास मिळते. या दृष्टीने अमेरिकन राज्य हेच आधुनिक अर्थाने जगातले पहिले धर्मपंथातीत राज्य आहे. यानंतर गेल्या १७५ वर्षांत हा विचार आता एखादा दुसरा अपवाद सोडल्यास सर्वत्र मान्य झाला आहे.

### धर्मपंथातीत राज्याची भारतीय भूमिका

धर्मनिरपेक्ष राज्य म्हणजे धर्मविरोधी राज्य असा एक चुकीचा समज केव्हा केव्हा आपल्या देशात पाहावयास मिळतो. परंतु धर्मनिरपेक्ष राज्य हे निधर्मी राज्य नव्हे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. जगात आता रशिया, चीनसारखी कम्युनिष्ट राष्ट्रेही धर्मपंथातीत आहेत. भारतासारखी लोकशाहीप्रधान राष्ट्रेही धर्मनिरपेक्ष राज्ये आहेत. परंतु या दोन्हीहीमध्ये एक मूलभूत फरक आहे. कम्युनिस्ट राष्ट्रे धर्मपंथातीत आहेत; परंतु त्यांची धर्मपंथातीतता धर्मविरोधावर उभारलेली आहे. धर्म ही अफूची गोळी आहे, अशीच त्यांची धारणा आहे. उलट आपली धर्मपंथातीतता सर्व धर्मांच्या समानतेवर उभारलेली आहे. आपल्या राज्यात धर्मविरोधी भूमिका नाही तर सर्व धर्मांना विकासाला समान संधी आहे. या अर्थाने आपले राज्य हे धर्मनिरपेक्ष राज्य आहे. हा फरक माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून तो आपण सतत लक्षात ठेवला पाहिजे.

### लोकशाही आणि धर्मपंथातीत राज्य : परस्परपूरक आधार !

आपल्या राज्यघटनेत आपण लोकशाहीचे तत्त्वज्ञान स्वीकारलेले आहे.

एकदा आपण लोकशाहीचे तत्त्वज्ञान स्वीकारले की, आपण धर्मपंथातीत राज्याचा पुरस्कार केलाच पाहिजे. लोकशाही व धर्मपंथातीत राज्य या दोन गोष्टी अगदी अभिन्न आहेत. एकीवाचून दुसरी राहूच शकत नाही. एकाच नाण्याच्या ह्या दोन बाजू आहेत. कारण लोकशाहीमध्ये आपण प्रत्येक व्यक्तीला विचार, भाषण-स्वातंत्र्य देत असतो. प्रत्येक नागरिकाचा तो मूलभूत हक्कच आहे. एकदा नागरिकास हा मूलभूत हक्क दिला म्हणजे कोणताही त्याचा हक्क आपणास मान्य केला पाहिजे. अशा परिस्थितीत राज्यसंस्थेने एका धर्माचा स्वीकार करून इतर धर्मीयांना दुय्यम स्वरूपाची वागणूक देणे हे लोकशाहीविरोधी होणार आहे. लोकशाहीमध्ये कोणत्याही धर्मीयांना सवतीच्या लेकरासारखे वागविता येणार नाही. सर्व धर्मियांना समान वागणूक दिली पाहिजे. आणि या अर्थानेच आपले राज्य हे धर्मपंथातीत राज्य आहे. हा विचार स्वीकारून आपण जगातील अत्यंत पुरोगामी विचार आपल्या देशात रुजविला आहे. काही वर्षांनी पाकिस्तानसारख्या धर्माधिष्ठित राज्यांना याच तत्त्वाकडे वळावे लागणार आहे. या दृष्टीने आपण आपल्या धर्मनिरपेक्ष राज्याचा वास्तव अभिमान बाळगला पाहिजे व आपले राज्य सतत बळकट कसे होईल याचा सदैव विचार केला पाहिजे. आपण आपल्या आचारातून आणि विचारातून आपले धर्मपंथातीत राज्य सामर्थ्य संपन्न कराल असा मला विश्वास वाटतो.

ाठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ........................
[illegible] ........................ [illegible] ........................

# ४

# चिनी कम्युनिझमचे स्वरुप

भारतीय लोकशाहीला नजिकच्या भविष्यकाळात अतिशय मोठ्या प्रमाणावर जर कुणाकडून आव्हान येणार असेल तर ते चिनी कम्युनिझमकडूनच ! कदाचित आशियातील लोकशाहीचे भवितव्य भारत व चीन यांच्या संघर्षानेच ठरणार आहे. दुसऱ्या महायुद्धामध्ये जगातल्या लोकशाहीचे भवितव्य ज्याप्रमाणे इंग्लंड व जर्मनी यांच्या संघर्षातून युरोपच्या भूमीवर ठरवले गेले तसेच कदाचित आशियातील लोकशाहीचे भवितव्य येथील समरभूमीवर हिंदुस्थान व चीन यांच्या संग्रामातून ठरवले जाणार आहे. चिनी कम्युनिझमचे आक्रमण हे अतिशय मोठ्या स्वरूपाचे आक्रमण आहे. या दृष्टीने चिनी कम्युनिझमचे स्वरूप काय आहे ? आज ती आशियातील सर्वात मोठी आक्रमक शक्ती का ठरली आहे ? या संहारक शक्तीशी सामना द्यावयाचा ठरला तर आपणास कोणती शस्त्रे परजली पाहिजेत ? याचा आपण गंभीरपणे विचार केला पाहिजे. आणि या दृष्टीने आजच्या व्याख्यानामध्ये मी

---

शाहू मंदीर महाविद्यालय वादविवाद मंडळ,
उद्घाटन समारंभाचे भाषण, पुणे.

चिनी कम्युनिझमच्या स्वरूपासंबंधीच अधिक खोलात जाऊन चर्चा करणार आहे.

## कम्युनिझम व त्याची वैशिष्ट्ये

चिनी कम्युनिझमच्या स्वरूपाकडे वळण्यापूर्वी कम्युनिझम म्हणजे काय आहे ? त्या तत्त्वज्ञानाचे नेमके स्वरूप काय ? त्यातील धोक्याची ठिकाणे कोणती ? याचा आपण आधी विचार केला पाहिजे. आपणा सर्वांस माहीतच आहे की, मार्क्सचे तत्त्वज्ञान हाच आजच्या कम्युनिझमचा वैचारिक पाया आहे. या मार्क्सवादाची प्रमुख वैशिष्ट्ये मला तीन वाटतात. पहिले असे की, मार्क्स हा केवळ जगाचा अन्वयार्थ लावणारा तत्त्वचिंतक नव्हता तर जग बदलू पाहणारा तो क्रांतिकारक तत्त्वचिंतक होता. प्लेटो-ॲरिस्टॉटलपासून तो कॉंट हेगेलपर्यंत सर्व तत्त्वचिंतकांनी केवळ जगाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. मार्क्स केवळ अन्वयार्थावर समाधान मानणारा विचारवंत नव्हता. आपल्या कल्पनेप्रमाणे सर्व जग आमूलाग्र बदलून टाकू पाहणारा तो क्रांतिकारक होता. त्याचे दुसरे वैशिष्ट्य असे की जग बदलण्यासाठी केवळ माणसात बदल करून भागणार नाही तर समाजाची सर्व आर्थिक घडीच बदलली पाहिजे हे जगाच्या इतिहासात स्पष्टपणे सांगणारा तो पहिला विचारवंत होता. केवळ व्यक्तीतील बदल पुरेसा नाही. त्यासाठी संख्यात्मक जीवनही बदलले पाहिजे हा त्याचा विचार मूलगामी स्वरूपाचा आहे. जगाच्या आधीच्या चार हजार वर्षांच्या इतिहासात असा विचार कुणीही मांडला नाही. गुलामगिरीवर उभारलेली अर्थव्यवस्था, सरंजामशाही अर्थव्यवस्था, भांडवलशाही अर्थव्यवस्था, साम्राज्यवादी अर्थव्यवस्था यांचा व्यक्तिजीवनावर फार मोठा परिणाम होतो आणि या दृष्टीने अर्थव्यवस्था बदलणे हा सामाजिक जीवन बदलण्याचा एक प्रभावी मार्ग आहे, हे मार्क्सने सांगितले. जगाच्या इतिहासातील मार्क्सवादाचे हे वेगळेपण नजरेआड करून चालणार नाही. मार्क्सवादाचे तिसरे वेगळेपण असे की, या तत्त्वज्ञानामागील एक प्रेरणा नैतिक प्रेरणा आहे. कामगारांना, दलित वर्गाला आर्थिक न्याय मिळाला पाहिजे या त्याच्या विचारामागील मूळ प्रेरणा नैतिक प्रेरणा आहे. परंतु त्याच्या विचारामागील प्रेरणा केवळ नैतिक नाही; ती संमिश्र आहे असे मला वाटते. त्यामध्ये नैतिक प्रेरणेला आवाहन

आहे, त्याचप्रमाणे माणसामधील मत्सर, द्वेष, असूया या प्रवृत्तींनाही आवाहन आहे. कदाचित हे आवाहन संमिश्र असल्यामुळेच ते अतिशय प्रभावी झाले असेल. परंतु मार्क्सवादामागील ही संमिश्र प्रेरणा हेही या विचाराचे वेगळेपण आहे असे मला वाटते.

## मार्क्सची विचारसरणी व त्यावरील प्रभाव

मार्क्सवादामागील वैचारिक वारसा हा मूलतः उदारमतवादी विचाराचा वारसा आहे. युरोपमध्ये १४ व्या, १५ व्या शतकातील प्रबोधनाच्या काळापासून जो व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार वाढत होता त्याचे अपत्य म्हणजे एका दृष्टीने मार्क्सवाद आहे. मार्क्सवादावर कोणकोणत्या विचारांचा प्रभाव पडला होता हे अभ्यासल्यास आपणास हे चटकन दिसून येईल. मार्क्सवादावर मुख्यतः तीन विचारवंतांचा खोल प्रभाव पडला होता. पहिला विचारवंत म्हणजे इंग्लंडमधील सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ रेकॅर्डो होय. मार्क्सचे सर्व अतिरिक्त मूल्यासंबधीचे अर्थशास्त्र रेकॅर्डोच्या अर्थशास्त्रविषयक सिद्धांतावर उभारले आहे. मार्क्सवरील दुसरा मोठा प्रभाव फ्रेंच राज्यक्रांतीतील विचारवंतांचा होता. त्यातही विशेषतः जॅकोबिन्स या जहाल गटाचा प्रभाव जास्त होता. फ्रेंच राज्यक्रांतीमधील मानवी स्वातंत्र्य, समता या कल्पनांचा प्रभाव मार्क्सच्या विचारावर दिसून येतो. मार्क्सवादावरील तिसरा प्रभाव हेगेलच्या विरोधविकासवादाचा. हेगलच्या विरोधविकासवादी कल्पनेचा मार्क्सवर इतका प्रभाव आहे की, हेगेलच्या मूळ विरोधविकासवादी तत्त्वज्ञानामध्ये 'आयडिया' हा शब्द काढून मार्क्सचा 'मॅटर' हा शब्द घातला की मार्क्सचे सर्व विरोधविकासवादी भौतिकवादाचे तत्त्वज्ञान तयार होते. इंग्लंड, फ्रान्स व जर्मनीमध्ये वरील तिन्हीही विचारवंत उदारमतवादाचीच अपत्ये होती. या सर्वांचे ऋण घेऊन मार्क्सने आपल्या वैचारिक जीवनाला सुरुवात केली. त्यामुळे मार्क्सवादामागील मूळ वारसा हा उदारमतवादाचा वारसा होता असेच आपणास दिसून येईल.

## उदारमतवाद व समूहवाद

मार्क्सचा वारसा जरी उदारमतवादाचा असला तरी दुर्दैवाने आपले

तत्त्वज्ञान तयार करताना त्याने ते अशा पद्धतीने तयार केले की, त्यामुळे त्याच्या विचारामागील उदारमतवादाचा मूळ वारसा नष्ट होऊन जावा. "स्वर्गाला जाण्याचा उदात्त हेतू मनात बाळगून माणसे कधी कधी नरकाच्या पायऱ्या चढत असतात" अशा अर्थाची जी इंग्रजी म्हण आहे, तिची या वेळी आठवण होते. मार्क्सवादातून व्यक्तिस्वातंत्र्याचा विनाश वा हुकूमशाहीचा उदय हा अटळपणाने होतो. मार्क्सचे तत्त्वज्ञान जगातील कोणत्याही देशात अंमलात आले तरी त्यातून अखेरीस हुकूमशाहीच जन्माला येईल. याला मुख्यतः पुढील तीन कारणे आहेत असे मला वाटते.

प्रारंभी मी म्हटल्याप्रमाणे मार्क्सवादामागील मूळ प्रेरणा जरी उदारमतवादाची किंवा व्यक्तिस्वातंत्र्याची असली तरी त्याने आपले सर्व तत्त्वज्ञान अखेरीला समूहवादावर उभारले. व्यक्ती ही कल्पना भ्रामक आहे, वर्ग हेच सत्य आहेत असे त्याने एका ठिकाणी म्हटले आहे. वर्ग ही कल्पना काल्पनिक आहे. व्यक्तीला ज्याप्रमाणे स्वतंत्र अस्तित्व असते, ती श्वासोच्छ्वास करते तशी वर्ग ही काही स्वतंत्र वस्तू नव्हे. ती कल्पना अव्यक्त, अमूर्त आहे. वास्तविक व्यक्ती व्यक्तींचाच समाज निर्माण होतो. व्यक्तींना वगळून समाज नावाची स्वतंत्र वस्तू अस्तित्वातच राहू शकत नाही. याच अर्थाने Man is the root of mankind असे एका विचारवंताने म्हटले आहे. परंतु दुर्दैवाने मार्क्सने आपल्या तत्त्वज्ञानामध्ये समूहवादाला इतके फाजील महत्त्व दिले की, त्यामध्ये व्यक्ती नष्टच होऊन गेली. हिटलर, मुसोलिनीने वंशवादातून वा राष्ट्रवादातून ज्या तऱ्हेचा समूहवाद निर्माण केला तशाच प्रकारचा समूहवाद मार्क्सने वर्ग या कल्पनेतून निर्माण केला. वास्तविक माणूस हा सर्व समाजसंस्थांचा निर्माता असतो. आपल्या स्वातंत्र्यासाठी, विकासासाठी त्याने निर्माण केलेली ही केवळ साधने असतात. या दृष्टीने माणूस हा पिता असतो तर समाजसंस्था ही त्याची अपत्ये असतात. परंतु समूहवादामध्ये त्याची साधने वा अपत्यच आपल्या पित्याला खाऊन टाकायला निघतात. आमच्या खेड्यापाड्यात असा एक समज आहे की, मांजरी व्याली की ती आपलेच पिल्लू स्वतः खाऊन टाकते. येथे प्रकार उलटा आहे. येथे पिल्लूच मांजरीला खाऊ पाहते. माणूस हा सर्व समाजसंस्थांचा निर्माता आहे. त्यामुळे त्याचे स्थान मध्यवर्ती असले पाहिजे. त्याचा विकास हा आपले साध्य असले पाहिजे.

मार्क्सवादातील समूहवादाने हा मूळ विचारच नष्ट करून टाकला.

## हिंसक मार्ग म्हणजे अस्थिरतेचा पाया

मार्क्सवादातील दुसरे धोक्याचे ठिकाण म्हणजे मार्क्सचा रक्तपातावर, हिंसक मार्गावर असलेला मोठा भर आणि विश्वास. क्रांती करायची झाली तर ती रक्तपाताने वा वर्गयुद्धाच्या मार्गानेच होईल असे मार्क्सने म्हटले आहे. राज्यसंस्था भांडवलदार वर्गाच्या ताब्यात असते. भांडवलदार वर्ग नफ्याच्या प्रेरणेने सर्व व्यवहार करीत असतो. त्यामुळे कामगारांना तो कधीही सत्तेवर येऊ देणार नाही. ह्यासाठी कामगारांनी हातात शस्त्र घेऊनच राज्ययंत्र आपल्या ताब्यात घेतले पाहिजे. मार्क्सने पुढे असेही म्हटले आहे की, आपले साध्य हस्तगत करण्यासाठी कोणतीही साधने वापरा, ते सर्व मार्ग धर्म्य आहेत.

हे त्याच्या नीतिशास्त्राचे सार आहे. एकदा हे तत्त्व आपण स्वीकारले की, आपल्या राजकीय, सामाजिक जीवनात भयंकर आपत्ती कोसळू लागतील. वाटेल त्या मार्गाने आपले उद्दिष्ट साध्य करावयाचे म्हटले म्हणजे वाईटातील वाईट मार्गाचा जो अवलंब करील तोच अखेरीस विजयी होईल. समाजाचा सर्व नैतिक पायाच त्यामुळे ढासळून जाईल. राजकीय जीवन गढूळ होऊन जाईल. मार्क्सचे नीतिशास्त्र एका दृष्टीने खरोखर अनीतिशास्त्रच आहे. दुसरे असे की, अल्पसंख्य लोकांनी हातात शस्त्रे घेऊन राज्यसरकार उलथून टाका-वयाचं ठरविले तर जगात कोणतेही सरकार स्थिर राहणार नाही. अस्थिरतेचा शाप सर्वत्र राज्यांच्या कपाळी लिहिला जाईल. मानवी प्रगतीच्या दृष्टीने ही घटना खासच मोठी विलोभनीय नाही.

## ठोकळेबाज फाजील आग्रही वृत्ती

मार्क्सवादावरील तिसरा मोठा धोका म्हणजे त्यातील फाजील आग्रही भूमिकेबद्दलचा. मार्क्स प्रत्येक गोष्ट अतिशय आग्रहाने मांडतो. त्यामध्ये कमालीचा कडवेपणा वा ठोकळेबाजपणा असतो. समाजामध्ये बदल व्हाव-याचा झाला तर तो विरोधविकासवादी तत्त्वज्ञानाप्रमाणेच होईल अशी

नकारात्मक भाषा त्याच्या सर्व विवेचनात आहे. युरोपमध्ये १४ व्या शतकापासून शास्त्रज्ञांनी शास्त्राच्या क्षेत्रात जी विनम्रतेची भूमिका वाढविली होती त्या नम्रतेचा मागूमसही मार्क्सच्या लिखाणात सापडत नाही. शास्त्रज्ञांच्या विवेचनामध्ये एक प्रकारची नम्रता लागते. आतापर्यंतच्या ज्ञानावरून हे असे आहे अशा नम्रतेच्या भूमिकेत त्याने आपले विचार मांडले पाहिजेत. मार्क्सच्या विचारात शास्त्रज्ञांची ही मनोवृत्ती वा भूमिका आढळत नाही. त्याच्या सर्व विवेचनात एक प्रकारची Militant Certanty दिसते. सत्यसंशोधनाच्या कार्यात ही वृत्ती मारक आहे. मार्क्सच्या वरील प्रवृत्तीतूनच कम्युनिझममध्ये एक प्रकारचा ठोकळेबाजपणा, फाजील आग्रही वृत्ती जन्माला आली आहे.

मार्क्सच्या विचारात मला आणखी एक जो धोका दिसतो तो हा की, मार्क्स हा व्यक्तीला स्वतःचे व्यक्तिमत्व असते असे मानतच नाही. माणसे ही केवळ आर्थिक शक्तीच्या हातातील खेळणी आहेत असे तो मानतो. मला हा विचार नामंजूर आहे. व्यक्तिजीवनावर आर्थिक शक्तींचा परिणाम होतो, परंतु आर्थिक शक्तीवरही माणसांचा परिणाम होऊ शकतो. "स्थितीचा असे किंकर प्राणीमात्र" हे काही अंशी खरे असले तरी परिस्थितीला आपल्या कल्पनेप्रमाणे वाकविणारा तो शिल्पकारही असतो. आर्थिक चौकट, भौगोलिक चौकट ओलांडून पलीकडे जाण्याचे सामर्थ्य त्याच्यामध्ये असते. माणसामध्ये स्वतंत्र सृजनशील शक्ती असते.

मानवी जीवन हा मंगल भावनांचा पवित्र आविष्कार असू शकते. मार्क्सने व्यक्तीमधली ही सृजनशील शक्ती पूर्णपणे डावलली. उत्पादनाच्या साधनांचा माणसाच्या जीवनावर परिणाम होतो. पण हे उत्पादनाचे साधन तरी प्रथम कसे निर्माण झाले ? माणसातील विचारातूनच ना ? माणसाचा मेंदू हे सर्वांत प्रभावी असे उत्पादनाचे साधन आहे हे मार्क्स विसरला. त्यातूनच पुढील दुःखांतिका निर्माण झाली.

## रशियन व चिनी कम्युनिझम

रशियन कम्युनिस्ट व चिनी कम्युनिस्ट यांमध्ये काही बाबतीत महत्त्वाचा फरक वाटतो. या दोन कम्युनिझममध्ये महत्त्वाचा फरक त्यांच्या जागतिक क्रांतीच्या साधनाबद्दलच आहे. क्रुश्चेवने या बाबतीत आपली भूमिका १९६०

सालातील एका भाषणातून स्पष्ट केलेली आहे. तो म्हणतो, "वर्गयुद्धाचे तत्त्वज्ञान मार्क्सने सांगितलेले असले तरी अॅटमबॉंबच्या शोधानंतर त्यामध्ये मूलभूत फरक झाला आहे. अॅटमबॉंबच्या शोधानंतर युद्धाच्या वाटेने जाणे सर्वांनाच आता धोक्याचे झाले आहे." क्रुश्चेवने याबाबतीत एक फार अर्थपूर्ण विचार मांडला होता. तो म्हणतो, "अॅटमबॉंबच्या युद्धानंतर जगात जे जिवंत राहतील ते अशा अवस्थेत जिवंत राहतील की, त्याना मेलेल्यांचा हेवा करावा लागेल! त्यामुळे यापुढे आता वर्गयुद्धाच्या वाटेने आपणाला जाता येणार नाही." यातूनच नकळत रशियाने सहजीवनाचे तत्त्व स्वीकारले आहे. उलट चिनी कम्युनिस्ट असे मानतात की, युद्धाच्या वाटेनेच जगात कम्युनिझम पसरू शकेल. माओने आपला हा विचार स्पष्ट करताना एके ठिकाणी म्हटले आहे, "युद्धाच्या मार्गानेच जगात कम्युनिझम पसरू शकेल. पहिल्या युद्धानंतर जगात रशियामध्ये कम्युनिझम आला. दुसऱ्या महायुद्धानंतर एकतृतीयांश जग लाल झाले. तिसरे महायुद्ध झाले म्हणजे सर्व जग कम्युनिस्ट होईल." माओचे असे हे साधे गणित आहे. आपले सर्वांचे गणित कच्चे असल्यामुळे दुर्दैवाने हे साधे गणितही आपणास समजत नाही! परंतु यातून चिनी कम्युनिस्टांचा युद्धाच्या मार्गावरील विश्वास दिसून येतो. त्यामुळेच चिनी कम्युनिझम अद्यापही क्रांतीची निर्यात करण्याची भाषा सतत बोलत आहे.

चीनमध्ये आर्थिक व सामाजिक मागासलेपणामुळे तेथील कम्युनिझम अधिक आक्रमक व अतिशय सर्वंकषवादी झाला आहे. चिनी कम्युनिझमचे एक वैशिष्ट्य असे की, तो सरंजामशाहीकडून एकदम कम्युनिझमकडे गेला. रशियामध्ये १८८० ते १९१४ पर्यंत काही प्रमाणात तरी भांडवलशाहीची वाढ झाली होती. त्यातून व्यक्तिस्वातंत्र्य, साहित्य, संस्कृती यांचा थोडासा तरी प्रसार तेथे झाला होता. चीनमधील शेकडो वर्षांची परंपरा हुकूमशाहीची वा राजेशाहीची आहे. त्यामुळे तेथील कम्युनिझम हा अतिशय आक्रमक बनला आहे. या कम्युनिझमचे आणखी एक वेगळे कारण असे की, रशियात कधी केले जात नाही इतके अमर्याद सत्तेचे केंद्रीकरण चिनी कम्युनिस्टांच्या राजवटीत चालू आहे. यासाठी कम्युनिस्टांच्या नावाखाली कुटुंबसंस्थेसारखा अत्यंत स्वाभाविक असा सामाजिक जीवनाचा घटक येथे नष्ट करू पाहात आहेत. कुटुंबसंस्था हा सर्व मानवी संस्कृतीचा मूलाधार आहे. कुटुंबसंस्था विस्कटली की सर्व मानवी संस्कृति

विस्कटली जाणार; त्यामुळे जगात कुटुंबसंस्था नष्ट करण्याचा कोणीही कधीही प्रयत्न केला नाही. चिनी कम्युनिस्ट त्या तऱ्हेचा प्रयत्न करून सत्तेचे केंद्रीकरण करीत आहेत. कुटुंबात संशयाचे गढूळ वातावरण ते तयार करीत आहेत. बायको नवऱ्यावर, मुलगा आईवर न कळत हेरगिरी करीत आहे. नव्हे त्यांना तसे सांगितले जाते. कुटुंबातील माणसे अशा संशयग्रस्त वातावरणात एकत्र नांदत आहेत. राष्ट्रनिष्ठा ही कुटुंबनिष्ठेपेक्षा श्रेष्ठ आहे, या नावाखाली कुटुंबसंस्थेचा हा विध्वंस चालू आहे. सत्तेच्या अमर्याद केंद्रीकरणामुळे कुटुंबसंस्था हा मोठा अडथळा आहे असे वाटल्यामुळे माओने हा मार्ग सुरू केला आहे. त्यामुळे जर्मनी, इटलीमधील फॅसिझममध्ये किंवा रशियातील कम्युनिझममध्ये कधी झाले नव्हते एवढे अमाप सत्ताकेंद्रीकरण सध्या चीनमध्ये चालू आहे.

### आक्रमक राष्ट्रवादाची दर्पोक्ती

चीनमधील या कम्युनिस्ट आक्रमक धोरणामध्ये त्यांच्या आक्रमक राष्ट्रवादी विचारांची नवी भर पडत आहे. चीनमधील राष्ट्रीय अहंकार त्यांच्या अनेक भाषणातून व्यक्त होत आहे. जगाला संस्कृती शिकविण्याचे कार्य चीनलाच करावयाचे आहे, अशी दर्पोक्ती ते अधूनमधून करीत असतात. मूळच्या आक्रमक कम्युनिझममध्ये नव्या आक्रमक राष्ट्रवादाची भर पडल्यामुळे चीनमधील कम्युनिझम अधिकच आक्रमक झाला आहे.

### शेवटी विजय सत्याचाच !

अशा या आक्रमक, भयानक कम्युनिस्ट चीनशी आपल्याला झुंज घ्यावयाची आहे. हिंदुस्थान हे आवाहन समर्थपणे स्वीकारील यात मला तिळमात्र शंका वाटत नाही. हिंदुस्थानला केवळ आपल्या देशातीलच लोकशाहीचे संरक्षण करावयाचे नाही तर सर्व आशियातील स्वातंत्र्याचे संरक्षण करावयाचे आहे. हिंदुस्थानातील लोकशाहीचे भवितव्य हेच आशियातील सर्व लोकशाहीचे भवितव्य आहे. या दृष्टीने या देशातील प्रत्येक नागरिक, दरेक सैनिक, या देशातील स्वातंत्र्य, लोकशाही या श्रेष्ठ मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी प्राण-

पणाने झुंज घेईल यात मला यत्किंचितही शंका नाही. जर आपला व चीनचा सामना झालाच तर त्यामध्ये आपण शंभर टक्के यशस्वी होऊ. कारण सत्य आपल्या बाजूस आहे. या देशाचे ब्रीदवाक्यच मुळी "सत्यमेव जयते" असे आहे. यामध्ये अखेरीस सत्याचाच जय झाल्याशिवाय कसा राहील ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम........................ वि: ..................
क्रमां ........................ नों दि ..................

## ५

# महाराष्ट्रातील शिक्षण : काही विचार

आपल्या महाविद्यालयाच्या या स्नेहसंमेलनानिमित्ताने शिक्षणविषयक काही विचार आपल्यासमोर मांडण्याचे मी ठरविले आहे. महाराष्ट्रात गेल्या १०-१२ वर्षांत शिक्षण फार झपाट्याने वाढत आहे. पुढील १० वर्षांत ते किती तरी जोमाने वाढेल. शिक्षणाचा झपाट्याने होणारा हा प्रसार पाहिला म्हणजे महाराष्ट्रात या क्षेत्रात तरी निःशब्द क्रांती होत आहे असे वाटते. अशा या काळात शिक्षणासंबंधी पुन्हा विचार झाला पाहिजे. आपण आपले कठोर आत्मपरीक्षण केले पाहिजे. तरच उद्याची आपली वाटचाल निकोप दृष्टीने होऊ शकेल. या दृष्टीने महाराष्ट्रातील शिक्षणासंबंधी माझ्या मनात रेंगाळणारे काही विचार मी आपल्यासमोर यानिमित्ताने ठेवणार आहे.

### शैक्षणिक रचना आणि पिरॅमिड

शिक्षणाच्या इतर अंगाकडे वळण्यापूर्वी शिक्षणाचा मूळ उद्देश काय आहे

मुधोजी कॉलेज, स्नेहसंमेलन
फलटण, जि. सातारा

हेच आधी आपण समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अनेक वेळा शाळा-कॉलेजात १५–१५ वर्षे घालवून देखील शिक्षणामागील मूळ उद्देशच आपल्या मनात स्पष्ट नसतो. या दृष्टीने हा प्रश्न महत्त्वाचा आहे असे मला वाटते. याच दृष्टीने माझे विचार मी स्पष्ट करीत आहे. शिक्षणाची मराठी पहिलीपासून तो पी. एच. डी. पर्यंत सर्व रचना पाहिली तर ती पिरॅमिडप्रमाणे आहे, असे आपणाला दिसून येईल. म्हणजे खाली पाया खूप रुंद व तो निमुळता होत गेलेला आहे. याचा अर्थ असा की, खाली मराठी शाळेमध्ये विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त शिकविले जाते व कमीत कमी गोष्टी विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेवर सोपविलेल्या असतात. माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना आणखी थोडे कमी शिकविले जाते व काही गोष्टी विद्यार्थ्यांच्यावर सोपविल्या जातात. कॉलेजमध्ये हीच प्रक्रिया चालू असते. पुढे पी. एच. डी. च्या वेळी तर विद्यार्थ्याला केवळ दुरून मार्गदर्शन केले जाते व जास्तीत जास्त गोष्टी त्याच्यावर सोपविल्या जातात. मराठी पहिलीपासून ते पी. एच. डी. पर्यंतच्या सर्व रचनेमध्ये एक मूलभूत तत्त्व आहे. ते म्हणजे विद्यार्थ्यांतील स्वतंत्र विचार करण्याची शक्ती वाढविणे होय. माणसामधील ज्ञान मिळविण्याची ताकद वाढविणे हा शिक्षणाचा एक महत्त्वाचा उद्देश आहे. रूसो या विचारवंताने शिक्षणाचा हा उद्देश फार चांगल्या रीतीने सांगितला आहे. तो म्हणतो, " Education gives us tools of enquiry. " शिक्षणामध्ये त्यामुळे केवळ माहिती मिळविणे याला महत्त्व नाही, तर ज्ञान कसे संपादन करावे याची साधने मिळविणे अधिक महत्त्वाचे आहे. डार्विनचा सिद्धांत अचूक रीतीने अभ्यासणे महत्त्वाचे आहे, परंतु त्याहिपेक्षा डार्विन ज्या पद्धतीने आपल्या निष्कर्षाला आला ती पद्धती अधिक महत्त्वाची आहे. त्याची ती शास्त्रीय पद्धती विगमनात्मक तर्कशास्त्र (Inductive Logic) हे अधिक महत्त्वाचे आहे. डार्विनच्या या अभ्यासाच्या पद्धती जर आपण आत्मसात केल्या तर आपण त्याच्याही पलीकडे जाऊ शकू, यामुळे शिक्षणामध्ये ज्ञानप्राप्तीच्या साधनांना महत्त्व आहे. एका चिनी भाषेतील म्हणीमध्ये ही कल्पना फार चांगल्या तऱ्हेने मांडली आहे. शिक्षणाला ही म्हण फार चांगल्या रीतीने लागू पडते. किंबहुना शिक्षणाचे मूळ उद्दिष्ट अतिशय प्रभावी रीतीने या म्हणीत सांगितले आहे. ही म्हण अशी की, " एखाद्या भुकेल्या माणसाला १५-२० मासे

दिले तर त्याच्या दोन दिवसाच्या भुकेचा प्रश्न मिटेल, परंतु मासे कसे पकडावे याचे शिक्षण दिले तर त्याच्या जन्माच्या भुकेचा प्रश्न मिटेल." हा उद्देश डोळ्यासमोर ठेवूनच विद्यार्थ्यांनी विद्या या अर्थी बनले पाहिजे. उलट विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान कसे मिळवावे याचे कुतूहल नसेल वा त्याची साधने त्याच्याजवळ नसतील तर तो विद्यार्थी खऱ्या अर्थाने चांगला विद्यार्थी होणार नाही. एखाद्या विद्यार्थ्याने सर्व ज्ञानकोषच्या ज्ञानकोष पाठ केला, परंतु त्याच्याजवळ ज्ञानप्राप्तीची साधने ( Tools of enquiry ) नसली तर तो विद्यार्थी फारसा चांगला विद्यार्थी होणार नाही. कारण ज्ञानकोषातले हे ज्ञान पुढील पाच दहा वर्षांत शिळे होऊन जाईल. जग फार झपाट्याने पुढे धावत आहे; अशा या काळात ज्ञानप्राप्तीची साधने जर धारदार असतील तरच तो या क्षेत्रात यशवंत होऊ शकेल.

## माणसातील सुप्तशक्तींचा आविष्कार : शिक्षण

शिक्षणाच्या या उद्देशाबरोबरच दुसरेही उद्दिष्ट महत्त्वाचे आहे. ते पहिल्या उद्दिष्टाला पूरकच आहे. ते असे की, प्रत्येक व्यक्तीमध्ये अमर्याद सुप्त गुण असतात. ही माणसामधील नवनिर्मितीची शक्ती वा सृजनशील शक्ती अविष्कृत झाली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीमध्ये ही अमर्याद सृजनशील शक्ती साकार करण्यासाठी त्याची धडपड चालू असते. काही व्यक्तींमध्ये कलावंताचे श्रेष्ठ गुण असतील, काहींच्यामध्ये लेखक, कवी, नाटककार यांची सुप्त शक्ती असेल. काहींच्यात शास्त्रज्ञ, विचारवंतांची सृजनशील शक्ती असेल. प्रत्येक व्यक्तीमध्ये वेगवेगळ्या प्रकारची अशी सृजनशील शक्ती असते. त्याच्यातील या सुप्तशक्तीचा मनोहर आविष्कार झाला पाहिजे. यामुळे त्याचे जीवन समृद्ध, परिपूर्ण होते. त्याप्रमाणे समाजजीवनही अधिक समृद्ध व परिपूर्ण होण्यास महत्त्वाचे साह्य होते. मानवी संस्कृतीत या मार्गाने आतापर्यंत समृद्धी झाली आहे. मानवी जीवनातील आपला वरील जो मध्यवर्ती उद्देश आहे त्याच्याशी शिक्षण हे पूरक असले पाहिजे. किंबहुना शिक्षण हे आपले साधन व मानवांमधील सुप्तशक्तींचा अविष्कार हे आपले साध्य आहे, असे मी म्हणेन.

## ग्रामीण भागातील शिक्षणप्रसाराचा प्रवाह

गेल्या १०–१५ वर्षांत महाराष्ट्रातून शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होत आहे खेड्यापाड्यातून ही प्रगती फार झपाट्याने होत आहे. ६०–७० वर्षांत झाली नाही एवढी प्रगती गेल्या ८–१० वर्षांत झाली आहे. याची ढोबळमानाने दोन कारणे सांगता येतील. पहिले कारण असे की, गेली १०० वर्षे येथील ग्रामीण भागातून शैक्षणिक प्रगतीचा प्रयत्न सतत चालू आहे. महात्मा फुले, शाहू महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिन्दे, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. आंबेडकर यांनी खेड्यापाड्यातून ही परंपरा सतत जिवंत ठेवली. विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, लोकमान्य टिळक, प्राचार्य आगरकर, अण्णासाहेब कर्वे यानी हे कार्य नागर जीवनातून मोठ्या प्रमाणावर केले. आपल्या जीवनातील हे दोन्ही प्रवाह जवळजवळ समांतर धावत आहेत असे आपणास दिसून येईल. त्यामुळे खेड्यापाड्यातील सर्वच स्थरात शिक्षणाची भूक निर्माण झाली. हिंदुस्थानातील विशेषतः उत्तर हिंदुस्थानातील बहुतेक सर्व चळवळी शहरापुरत्या मर्यादित होत्या.महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून शैक्षणिक चळवळीतील १०० वर्षांची परंपरा जशी अखंडपणे पाहावयास मिळते, तशी ती भारतातील इतर राज्यातून पाहावयास मिळणार नाही. महाराष्ट्राच्या या पार्श्वभूमीमुळे १९५९ साली महाराष्ट्र शासनाने १२०० रुपये उत्पन्न असलेल्यांच्या सर्व मुलांना मोफत शिक्षण करून शैक्षणिक प्रगतीला फार मोठा हातभार लावला. त्यामुळे शेकडो विद्यार्थी सरस्वतीच्या या दरबारात येऊन दाखल झाले आहेत. मराठी पहिलीपासून पी. एच. डी. पर्यंत सर्व शिक्षण मोफत करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले व एकमेव राज्य आहे. महाराष्ट्र सरकारच्या या पुरोगामी धोरणामुळे देखील ग्रामीण विभागात शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होत आहे.

## पिढ्यापिढ्यातील वाद व शैक्षणिक दर्जा

महाराष्ट्रात गेल्या १०–१५ वर्षांत शिक्षणाचा जो झपाट्याने प्रसार होत

आहे, त्याबाबत येथे उलटसुलट चर्चा ऐकावयास मिळते. सर्वसामान्यपणे एक असा प्रवाद कानावर पडतो की, शिक्षणाचा प्रसार जसा वाढत आहे, तसा त्याचा कस कमी होत आहे. संख्यात्मक वाढीमुळे गुणात्मक वाढ मागे पडत आहे. हा आक्षेप थोडा खोलात जाऊन तपासला पाहिजे. ढोबळमानाने आपणास असे दिसते की, प्रत्येक जुन्या पिढीला नव्या पिढीतील काही दोष दिसतात. माझ्या वेळेला सर्व काही ऑलवेल होते. नव्या पिढीत मात्र सगळीकडे बिघाड आहे असे प्रत्येकास वाटत असते. काही अंशी यातून ही ही तक्रार पुढे येत असते. याला एक चांगला पुरावा मी असा देईन की, महाराष्ट्रात निदान ६० पिढ्यात तरी प्रत्येक वेळी शिक्षणाचा दर्जा घसरत चालला आहे अशी तक्रार ऐकायला मिळते. न्यायमूर्ती रानड्यापासून प्रत्येक पिढीच्या वेळी मागच्या पिढीने हीच तक्रार केलेली आहे. हे जर खरे असते आणि प्रत्येक पिढीत आमचा शिक्षणाचा दर्जा खाली खाली गेला असता तर आजची पिढी कुठे गेली असती ? तिचा दर्जा समुद्रपातळीच्याही खाली गेला असता. प्रत्यक्षात आपणास तसे दिसत नाही. त्यामुळे या टीकेतील वरील भाग आपणास लक्षात घ्यावा लागेल.

## संख्यात्मक व गुणात्मक वाढ

दुसरे असे की, संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक वाढ कमी होत आह, हे विधान काही अंशी सत्य आहे. ते १०० टक्के सत्य नाही. म्हणजे विद्यापीठामध्ये जो शिक्षणक्रम मुख्यतः वर्णनात्मक आहे तेथे शिक्षणाचा दर्जा काही अंशी खाली गेला असेल. कारण खेड्यापाड्यातील नवा विद्यार्थीवर्ग मुख्यतः भाषेत कच्चा आहे. वर्णनात्मक विषयास भाषेला विशेष महत्त्व असते. दुर्दैवाने तेथेच हा नवा विद्यार्थीवर्ग तोकडा पडतो. त्याचे भाषेचे हत्यार फारसे धारदार नसते. परंतु ह्याचा अर्थ त्याची ग्रहणशक्ती कमी आहे असे मला मुळीच वाटत नाही. तरी देखील भाषेच्या या अडचणीमुळे वर्णनात्मक अभ्यासक्रमाचा दर्जा काही प्रमाणात खाली गेला असणे स्वाभाविक आहे. गणित, विज्ञान, इंजिनिअरिंग, मेडिकल या अभ्यासक्रमामध्ये भाषेच्या प्रश्नाला फारसे महत्त्व नसते. तेथे नवा विद्यार्थी काही कमी पडतो आहे असे मला वाटत नाही. १० वर्षांपूर्वीच्या डॉक्टर,

इंजिनियरपेक्षा आजचा डॉक्टर, इंजिनियर काही कमी आहे असे मला प्रामाणिकपणे वाटत नाही. असलाच तर त्याचा दर्जा काकणभर अधिकच असेल. कारण एक तर गेल्या १०–१५ वर्षांत ज्ञानच इतके वाढले आहे की, त्याचा फायदा नव्या विद्यार्थ्यांना मिळणे अगदी स्वाभाविक आहे. जुन्या पिढीला या ज्ञानाचा फायदा मिळू शकत नव्हता. दुसरे असे की, गेल्या १०–१५ वर्षांत आमचे अभ्यासक्रमही अधिक व्यापक व सखोल झाले आहेत. जुने अभ्यासक्रम इतके सखोल व व्यापक नव्हते. शिवाय आता स्पर्धाही खूप वाढलेली आहे. पूर्वीच्या काळी ५२ टक्के मार्क्स मिळविणाऱ्यास इंजिनियरिंग, मेडिकलकडे प्रवेश मिळत होता. आता कधी कधी ६० टक्यांवर देखील प्रवेश बंद होतो. या सर्व कारणामुळे नॉनडिस्क्रिप्टिव्ह कोर्सेसमध्ये शिक्षणाचा कस खाली चालला आहे असे म्हणणे मला पटत नाही. त्यामुळे संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक वाढ घसरत चालली आहे हे विधान मला अतिव्यापक व म्हणून सदोष वाटते. अशा तऱ्हेच्या टीकेचा तरुण मनावर अकारण वाईट परिणाम होतो. आपल्यामधील गुण हिणकस आहेत, आपले ज्ञान कमी दर्जाचे आहे अशी भावना त्याच्या मनामध्ये घर करून बसते. त्याच्या वाढीच्या दृष्टीने त्याच्या मनावर असा परिणाम होणे योग्य नाही. शिवाय वरील विधान हे काही अंशी सत्य आहे. ते निर्भेळ सत्य नव्हे. आणि म्हणूनही मी या टीकेशी सहमत होऊ शकत नाही.

### विज्ञान आणि तंत्रज्ञान :<br>एक मूलगामी गरज

शिक्षणक्षेत्रातील दुसरी एक महत्त्वाची घटना म्हणजे विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची झपाट्याने होणारी प्रगती होय. या क्षेत्रातील गेल्या १८-२० वर्षांतील प्रगती आधीच्या शंभर वर्षांतील प्रगतीपेक्षा किती तरी पटीने जास्त आहे. याचे एक साधे कारण असे की, स्वातंत्र्यानंतरच्या काळात आपल्या अर्थव्यवस्थेतच महत्त्वाचे बदल होत आहेत. पूर्वीची आपली अर्थव्यवस्था मुख्यतः शेतीप्रधान होती. आता आपण शेतीप्रधान अर्थव्यवस्थेकडून उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेकडे चाललो आहोत. गेल्या १०-१५ वर्षांत येथे अनेक प्रकारचे उद्योगधंदे निघत आहेत. पूर्वी येथे टाचण्या देखील आयात कराव्या

लागत होत्या. आता उलट अनेक प्रकारच्या वस्तू आपण निर्यात करीत आहोत. आपल्या या अर्थव्यवस्थेत होत असलेल्या स्थित्यंतरांची शिक्षणक्षेत्रातही प्रतिबिंबे पडणे स्वाभाविक आहे. उद्योगधंद्यामुळे तंत्रज्ञांची नवी गरज निर्माण झाली; त्यामुळे स्वाभाविकच या अभ्यासक्रमाला विशेष महत्त्व आले. एका दृष्टीने देशात विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची होणारी वाढ ही आमच्या बदलल्या अर्थव्यवस्थेचा परिणाम आहे. विशेषतः राजकीय दृष्ट्या पूर्वी हा देश मुख्यतः एक वसाहत होती. म्हणजे इंग्रजानी येथून कच्चा माल इंग्लंडमध्ये न्यावा व तेथे तो पक्का करून येथे विकावा. सबंध देश ही इंग्रजांची बाजारपेठ होती. आपल्या राजकीय गुलामगिरीत ही परिस्थिती निर्माण झाली होती. अशा या काळात येथे विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची वाढ होणे अवघड होते. १९४७ नंतर आपली राजकीय परिस्थिती बदलली. आपण एक स्वतंत्र राष्ट्र बनलो. हा देश कोणाचीही बाजारपेठ राहणार नाही, उलट आपला पक्का माल निर्माण करण्यास आपण स्वतंत्र झालो. या राजकीय परिस्थितीमुळे देखील गेल्या १५-२० वर्षांत विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची वाढ होत आहे. एका दृष्टीने आजच्या काळाची गरज म्हणूनच या वाढीकडे आपण पाहिले पाहिजे. परंतु या वाढीकडे आपण या मूलगामी दृष्टीने पाहिले पाहिजे असे मला वाटते. केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची वाढ होणे समाजातील प्रगती नव्हे. ही वाढ विकासासाठी आवश्यक आहे. परंतु ती पुरेशी नाही. युरोपमध्ये, जर्मनीमध्ये दुसऱ्या महायुद्धापूर्वी विज्ञान आणि तंत्रज्ञान ह्यांची कितीतरी झपाट्याने प्रगती झाली होती. सर्व युरोपचे नेतृत्व घेऊ शकेल इतकी प्रगती जर्मनीने या क्षेत्रात केली होती. परंतु दुर्दैवाने युरोपमध्ये लोकशाहीला पहिले आव्हान जर कुठून आले असेल तर ते जर्मनीमधून! हीच स्थिती आशियातील जपानबाबत आहे. जपानने या क्षेत्रात इतकी प्रगती केली होती की, त्याने सर्व आशियाचे डोळे दिपवून टाकले होते. परंतु दुर्दैवाने येथेही लोकशाहीला जबरदस्त आव्हान आले. त्यामुळे विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातील प्रगती म्हणजे समाजाची प्रगती हे समीकरण आपण काळजीपूर्वक तपासून घेतले पाहिजे. वैज्ञानिक व तंत्रविषयक प्रगती ही समाजाच्या विकासाची प्रीकंडिशन आहे. या वैज्ञानिक व तंत्रविषयक प्रगतीला इतर मानवी मूल्यांची जोड दिली पाहिजे. या दृष्टीने जगभर चालू असलेल्या जनरल एज्युकेशनचा विचारप्रवाह मला

महत्त्वाचा वाटतो. म्हणजे विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना साहित्य, नीतिशास्त्र, राज्यशास्त्र या विषयांचा परिचय झाला पाहिजे. उलट साहित्य, समाजशास्त्र या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना विज्ञानातील पदार्थविज्ञान, गणितशास्त्र वा गणित यासारख्या विषयांचा परिचय झाला पाहिजे. या दृष्टीने शिक्षणक्षेत्रातील हा विचारप्रवाह अतिशय महत्त्वाचा वाटतो.

## वसतिगृहाच जाळे निर्माण झाले पाहिजे

महाराष्ट्रातील शिक्षणप्रसाराच्या दृष्टीने एक गोष्ट मला महत्त्वाची वाटते. येथे ज्या प्रमाणात विद्यालयांची वाढ होत आहे त्या प्रमाणात वसतिगृहांची वाढ होत नाही. मोठमोठ्या शहरातून विद्यार्थ्यांची वसतिगृहातून राहण्याची सोय झाली नाही तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा वाईट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. महाराष्ट्रात या दृष्टीने वसतिगृहांची एक मोठी चळवळ सुरू व्हावी असे मला वाटते. या बाबतीत कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांचे द्रष्टेपण मला अत्यंत उल्लेखनीय वाटते. कोल्हापुरात त्यानी अनेक प्रकारची वसतिगृहे सुरू केली. त्यांच्या या वसतिगृहांमुळे खेड्यापाड्यातील शेकडो विद्यार्थी कोल्हापुरातील महाविद्यालयीन शिक्षणाचा फायदा घेऊ शकले. किंब-हुना मला असे वाटते की, मागच्या पिढीतील अनेक पुढारी आपले शिक्षण पुरे करू शकले याचे एक महत्त्वाचे कारण मोठमोठ्या शहरांतून अशी वसति-गृहे मोठ्या प्रमाणावर तयार झाली म्हणूनच. बडोदा, कोल्हापूर, पुणे, सातारा, नाशिक, नगर येथे जर वसतिगृहे नसती तर कदाचित एक नवीन पिढीच्या पिढी आपणास दिसली नसती. ह्या दृष्टीने शहरातील वसतिगृहांचे महत्त्व फार आहे. खेड्यापाड्यातील विद्यार्थीवर्गाची शहरातून कमी खर्चात राहण्याची व्यवस्था झाली तरच शिक्षणप्रसाराला महत्त्वाचा हातभार लागणार आहे. अशा वसति-गृहात मुलींच्या वसतिगृहाकडे विशेष लक्ष दिले गेले पाहिजे. मुलींची वसतिगृहातून राहण्याची सोय असली तरच त्या शिक्षण घेऊ शकतात. मुले एका दृष्टीने कुठेही राहून आपले शिक्षण पुरे करू शकतात. परंतु मुलींच्या बाबतीत अनेक अडचणी निर्माण होतात. या दृष्टीने मुलींच्या वसतिगृहांकडे आपण विशेष लक्ष पुरविले पाहिजे, असे मला वाटते. एक मुलगी शिकणे

म्हणजे कुटुंब शिकणार. या दृष्टीने तर हा प्रश्न अधिकच महत्त्वाचा वाटतो. पुढील दहा वर्षांत महाराष्ट्रात शहरातून अशा वसतिगृहांचे मोठे जाळेच निर्माण झाले पाहिजे. यातून आम्हाला शैक्षणिक विकासाचे नवचैतन्य मिळणार आहे.

## शिक्षण–एक भांडवल गुंतवणूक

भारतातील शिक्षणावर होणारा एकूण खर्च पाहिला तर तोही पुढील ५-१० वर्षांत खूप वाढला पाहिजे, असे मला वाटते. आज आपल्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी सुमारे दोन सव्वादोन टक्के खर्च शिक्षणावर होतो. अमेरिकेत हा खर्च ६ टक्के आहे. आशियातील इतर अनेक राष्ट्रे ४ टक्यांपेक्षा अधिक खर्च शिक्षणावर करतात. भारताचा शिक्षणावरील खर्च केवळ युरोपमधीलच नव्हे तर आशियातील देशांच्या मानाने कमी आहे. कोयनेसारख्या धरणात करोडो रुपये गुंतविणे हे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच शिक्षणामध्ये भांडवल गुंतवणूक करणे महत्त्वाचे आहे. हा दृष्टिकोन आपण स्वीकारला तर या सामाजिक राष्ट्रीय पुनर्रचनेच्या कार्यात आपण अधिक झपाट्याने प्रगती करू शकू असे मला वाटते. चवथ्या पंचवार्षिक योजनेतील खर्च दुप्पट जरी केला तरी मला आनंदच होईल. म्हणजे सध्या तो ४०० कोटींचा असेल तर तो ८०० कोटींचा असावा असे मला वाटते. यानूनही आपणाला व्यापक सांस्कृतिक प्रगतीचे आश्वासन मिळणार आहे.

ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम.......................... वि: ..................
............................ नों दि ..............

# ६

# सहकारी चळवळ

१९६२ साली चीनने हिमालयातून आक्रमण करून भारतीय लोकशाही आणि स्वातंत्र्याला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. त्याविरुद्ध सर्व देशभर नवचैतन्याचे वारे संचारू लागले. आमच्या सर्व अडचणींना धैर्याने तोंड देण्याचा दृढनिश्चय या देशातील प्रत्येक नागरिकाने केला. यानंतर लागलीच पुन्हा पाकिस्तानने काश्मीरवर हल्ला करून भारतीय स्वातंत्र्याला नव्या अडचणीत आणण्याचा उद्योग सुरू केला. यामुळे देशभर संतापाची प्रचंड लाट निर्माण झाली. आमच्या अंतःकरणातील स्वातंत्र्याचे खोलवर असलेले प्रेम नव्या तेजाने बाहेर पडले. या आणीबाणीच्या परिस्थितीमुळे आम्हास काही महत्त्वाच्या प्रश्नांचा पुन्हा गंभीरपणाने विचार करावा लागणार आहे. त्यामध्ये अन्नधान्यसमस्येचा आपणास ठळकपणे विचार करावा लागेल.

### मूलभूत गरज आणि तुटवडा

नेहमीच्या परिस्थितीपेक्षा आणीबाणीच्या काळात अन्नधान्यसमस्या

---

नभोवाणीच्या पुणे केंद्रावरून.

अत्यंत महत्त्वाची बनते. याचे एक साधे कारण असे की, नेहमीच्या शांततेच्या काळात अन्नधान्याची आयात नेहमीच्याच मार्गाने निर्वेधपणे चालू राहू शकते. दळणवळणाच्या साधनात कोणताही व्यत्यय येत नाही. त्यामुळे या काळात अन्नधान्य विकत घेणे वा मदतीच्या रूपाने मिळविणे एका दृष्टीने सोपे असते. परंतु आणीबाणीच्या काळात दळणवळणाच्या मार्गांत अनेक अडथळे निर्माण होण्याचा संभव असतो. धान्याने भरलेल्या बोटी निर्वेधपणे सागरातून संचार करू शकत नाहीत. अशा वेळी अन्नधान्यासाठी इतर राष्ट्रांवर अवलंबून राहणे नेहमीच बेभरवशाचे असते. अन्नधान्य हे जीवनाची मूलभूत गरज असल्याने तिचाच तुटवडा सुरू झाला तर त्यातून नवे प्रश्न उत्पन्न होण्याचा संभव असतो. त्यामुळे आणीबाणीच्या काळातील देशाची अत्यंत महत्त्वाची गरज म्हणजे अन्नधान्याबाबतची स्वयंपूर्णता होय. अशा काळात अन्नधान्याबाबत स्वयंपूर्णता राखणे हा युद्धआघाडी मजबूत करण्याचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. एकाच नाण्याची ही दुसरी बाजू आहे. हे गांभीर्य लक्षात घेऊन आपणास एखाद्या योद्ध्याप्रमाणे या प्रश्नाशी झुंज घेतली पाहिजे.

## सहकारातून उत्पादन वाढीचा कार्यक्रम

हा प्रश्न महत्त्वाचा असण्याची कारणे गेल्या १५ वर्षांच्या पार्श्वभूमीतही आहेत. या काळात तीन पंचवार्षिक योजना जवळ जवळ पूर्ण झालेल्या आहेत. प्रथमपासून आपण धान्योत्पादनाच्या वाढीवर भर दिलेला आहे. या काळात दरवर्षी सुमारे ३ टक्के धान्योत्पादन वाढलेले आहे. आणि याच काळात आपली लोकसंख्या सुमारे २। ते २॥ टक्क्याने वाढली आहे. त्यामुळे आपल्या पदरात धान्यवाढीतील फार थोडा वाटा पडलेला आहे. आणीबाणीच्या काळात धान्योत्पादनाचा हाच वेग कायम ठेवून आपल्या अडचणींशी आपण दोन हात करू शकणार नाही. तज्ज्ञांच्या मते आपले शेतीतील उत्पादन दरवर्षी ६ ते ७ टक्क्याने वाढू शकेल असे आहे. याचा अर्थ अन्नधान्याची वाढ ३ टक्क्यावरून ६ टक्क्यावर गेली पाहिजे. उत्पादनवाढीचा वेग दुप्पट केला पाहिजे. सहकारी चळवळीच्या साहाय्याने उत्पादनवाढीचा हा वेग गाठू शकू असा

विश्वास वाटतो. आपल्या आकडेशास्त्राप्रमाणे देशात एकूण ७ ते ८ टक्के धान्याचीच तूट आहे असे दिसते. आपला अन्नधान्यवाढीचा वेग जर आपण ६ ते ७ टक्क्यांवर नेला तर आणीबाणीच्या काळात या अडचणीतून आपण बाहेर पडू शकू असा विश्वास वाटतो. सहकारी चळवळीने एक महत्त्वाचे आव्हान म्हणून उत्पादनवाढीचा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे.

### सर्वस्पर्शी योजना हाती घ्या

आपल्या देशातील सहकारी चळवळीची वाढ गेल्या १०–१५ वर्षांमध्ये विशेष द्रुतगतीने झाली आहे. या संस्थांच्या संख्येकडे व त्यांच्या आर्थिक व्यवहाराकडे पाहिले असता असे दिसेल की गेल्या ५० वर्षांत जितकी झाली नाही इतकी वाढ गेल्या १२–१३, वर्षांत झाली आहे पुढील ५ वर्षांत या चळवळींची प्रगती आणखी झपाट्याने होत जाईल, या दृष्टीने हे आव्हान स्वीकारण्यास आमची सहकारी चळवळ पुरेशी सामर्थ्य-संपन्न झाली आहे असे मला वाटते ग्रामीण भागातील सहकारी चळवळीच्या कार्याचे केंद्रस्थान म्हणून उत्पादनवाढीचा कार्यक्रम ठरला गेला पाहिजे. या चळवळीने उत्पादनवाढीसाठी अनेकविध कार्यक्रम नव्या उमेदीने, नव्या उत्साहाने हाती घेतले पाहिजेत. शेतीला भांडवलपुरवठा करण्याचे महत्त्वाचे कार्यही ही चळवळ करीत आहे परंतु हा भांडवलपुरवठा खेड्यापाड्यातील अनेक लहान गरजू शेतकऱ्यांनाही झाला पाहिजे. सहकारी चळवळीतील ८० टक्के भांडवलाचा पुरवठा २० टक्के सधन शेतकऱ्याला होत आहे असे दृश्य दिसू लागले तर एका दृष्टीने त्याचा या कार्यक्रमावर अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही अशी भीति वाटते. यासाठी आमच्या सहकारी चळवळीने काही पथ्ये स्वखुषीने स्वतःवर लादून घेतली पाहिजेत. समाजातल्या दुबळ्या घटकाच्या बाजूनेही ही चळवळ उभी राहिली पाहिजे. त्यांचे आशास्थान म्हणून ही सहकारी चळवळ ठरली पाहिजे. त्याच-बरोबर सहकारी तत्त्वावर शेतीला आवश्यक असणाऱ्या खतांचे लहान लहान कारखाने काढण्यासाठी या चळवळीने पुढे आले पाहिजे. सहकारी तत्त्वावर नव्याने पाटबंधारे योजनाही हाती घेतल्या पाहिजेत. उत्तम बी.

बियाणांचे वाटप अतिशय काळजीपूर्वक या संस्थेमार्फत झाले पाहिजे. त्याचप्रमाणे शेतातून काढलेल्या धान्याची विक्रीही सहकारी सोसायट्यांनी समर्थपणे करून शेतकऱ्यांच्या पदरात त्यांच्या श्रमाचा जास्तीत जास्त वाटा टाकला पाहिजे. अशा तऱ्हेने शेतात बी-बियाणे पडण्यापासून ते हे धान्य विक्रीसाठी बाजारात येईपर्यंत सर्व व्यवहारावर सहकारी चळवळीने लक्ष पुरविले तर शेतकऱ्याला त्याचा फायदा होईल. उत्पादनवाढीच्या कार्यास हातभार लावल्याचे श्रेय त्याना मिळणार आहे.

## ही जबाबदारी सहकारी चळवळीची

आणीबाणीच्या काळात महाराष्ट्रातील सहकारी चळवळ या कार्यात विशेष महत्त्वाचा वाटा उचलू शकेल असा मला विश्वास वाटतो. याचे साधे कारण असे की इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रातील सहकारी चळवळ कितीतरी सामर्थ्य संपन्न बनलेली आहे. काही काही वेळा हिंदुस्थानातील इतर काही राज्यातून जेवढा आर्थिक व्यवहार होत असेल तितका व्यवहार महाराष्ट्रातील एखाद्दुसऱ्या जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा होत असल्याचे आपणास दिसून येईल. येथील सहकारी चळवळ झपाट्याने वाढण्याची कारणे येथील आर्थिक चौकटीमध्ये असण्याचा संभव आहे. गेली काही वर्षे या चळवळींला मिळालेल्या नेतृत्त्वाकडेही या यशाचा काही वाटा जातो. परंतु ही चळवळ हिंदुस्थानातील इतर राज्यांच्या मानाने जर अधिक प्रगत असेल तर स्वाभाविकच आणीबाणीच्या काळात अन्नधान्याच्या उत्पादनाची मोठी जबाबदारी येथील सहकारी चळवळीवर येऊन पडते. पाकिस्तानी आक्रमणापासून या देशामध्ये जे नवचैतन्य संचारले आहे, त्याचा उपयोग आपणास या कार्यासाठी करून घेता येणे शक्य आहे. नव्हे तसा तो उपयोग करून घेण्याची जबाबदारी सहकारी चळवळीची आहे.

## नवा मार्ग जरूर सापडेल

उत्पादन वाढीच्या बाबतीत जपानी पद्धतीपासून आपणास जेवढे घेता येईल

तेवढे आपण अवश्य घेतले पाहिजे. परंतु त्याचबरोबर उत्पादनवाढीसाठी स्वतंत्र भारतीय पद्धती आपणास उत्क्रांत करता आल्यास तसा प्रयत्न आपण जरूर करावा असे वाटते. यासाठी अन्नधान्याच्या उत्पादनवाढीच्या कार्यात कमालीचे यश मिळविणाऱ्या यशस्वी शेतकऱ्यांच्या परिषदा सहकारी चळवळीने वारंवार घडवून आणल्यास, तेथे या यशस्वी शेतकऱ्यांना आपल्या अनुभवांची देवाणघेवाण करता येईल. एकमेकाना परस्परापासून काही शिकता येईल. यातूनच कदाचित नवा मार्ग सापडू शकेल. या पद्धतीची मूळे आपल्या जीवनपद्धतीत असल्यामुळे असा मार्ग कदाचित आपल्याला उपयोगी पडेल. अशा परिषदामधून चर्चेला भरपूर प्रसिद्धी मिळाली तर हजारो शेतकरी त्यापासून नवी प्रेरणा घेऊ शकतील. सहकारी चळवळीची ही एक नैतिक जबाबदारी आहे, असे मला प्रांजलपणे वाटते. अमेरिकेमध्ये फक्त ९ टक्के शेतकरी शेतात काम करतात आणि ते अमेरिकेतल्या १८ कोट लोकाना पुरेल इतके धान्योत्पादन करू शकतात. तर मग हिंदुस्थानातील शेतात राबणारे ७० टक्के शेतकरी निदान या देशाला पुरेल इतके धान्योत्पादन का करू शकणार नाहीत ? आणीबाणीच्या काळातील हे आव्हान स्वीकारून आमची सहकारी चळवळ देशाला या अडचणीतून बाहेर पडण्यास समर्थपणे मदत करील असे मला विश्वास वाटतो.

## सहकारी खरेदी-विक्री

आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये जीवनाला आवश्यक असणाऱ्या वस्तूंची खरेदी-विक्री करणाऱ्या संस्थेला महत्त्वाचे स्थान आहे. धान्य, कापड यासारख्या जीवनाला आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या यंत्रणेला महत्त्वाचे स्थान आहे, यात शंकाच नाही. परंतु केवळ वस्तूंचे उत्पादन चांगले होऊन भागत नाही. उत्पादन झालेल्या वस्तूंचे वाटप समाजात योग्य रीतीने झाले पाहिजे.

समाजात केवळ राष्ट्रीय संपत्ती वाढून भागत नाही, तर ती संपत्ती समाजात योग्य प्रमाणात विभागली गेली पाहिजे. हाच नियम आपल्याला समाजातील जीवनावश्यक वस्तूनाही लावला पाहिजे. या दृष्टीने अन्नधान्य, कापड या सारख्या सामान्य माणसाच्या दृष्टीने महत्त्वाच्या वस्तूंची खरेदीविक्रीची

यंत्रणा महत्त्वाची आहे. या प्रश्नाकडे आपले विशेष लक्ष गेले ते १९४२-४३ सालच्या बंगालमधील दुष्काळानंतर. बंगालमधील या दुष्काळाचे एक वैशिष्ट्य असे की, जीवनावश्यक अशा सर्व वस्तूंची खरेदी-विक्रीची व्यवस्था खासगी व्यापारी, भांडवलदार, यांच्या हातात होती. या व्यापाऱ्यावर कोणाचेही नियंत्रण नव्हते. त्यामुळे बंगालमधील या दुष्काळाच्या वेळेला व्यापाऱ्यानी अन्नधान्याची साठेबाजी मोठ्या प्रमाणावर केली व वस्तूंच्या किंमती कृत्रिम रीतीने अतिशय वाढविल्या. त्यामुळे या दुष्काळाच्या वेळेला एका बाजूला धान्याने भरलेली गुदामे आहेत आणि दुसऱ्या बाजूला लोक उपाशी मरत आहेत असे विरोधी दृश्य दिसत होते. या काळात बंगालमध्ये सुमारे पंधरा लाख माणसे उपासमारीने मेली व अन्नधान्याच्या किंमती तिप्पट वाढल्या होत्या. बाजारपेठा संपूर्णपणे अनियंत्रित अशा व्यापाऱ्यांच्या हातात ठेवल्या तर त्याचे किती गंभीर परिणाम होतात याचा प्रत्यय सर्व देशाला यावेळी प्रथमच तीव्रतेने आला. त्यानंतर केंद्र व राज्य सरकारने जीवनावश्यक अशा वस्तूंची खरेदी-विक्री स्वतःच्या नियंत्रणाखाली आणली. बाजारपेठावर सरकारी यंत्रणेचे वा सहकारी संस्थांचे काही प्रमाणात तरी नियंत्रण असले पाहिजे याची तीव्र जाणीव या काळातच देशात झाली.

## सहकारी वा सरकारी नियंत्रण आवश्यक

यानंतर गेल्या २० वर्षांत बाजारपेठेवर सरकारी वा सहकारी संस्थांचे नियंत्रण ठेवण्याचा विचार सतत वाढत आहे. आणीबाणीच्या संदर्भात तर बाजारपेठेवरील नियंत्रणाला विशेष महत्त्व आहे. युद्धजन्य परिस्थितीमध्ये सर्वसामान्य माणसाला आवश्यक असणाऱ्या वस्तू योग्य किंमतीत व पुरेशा मिळाल्या पाहिजेत. अन्नधान्य, कापड वा इतर आवश्यक वस्तू अपुऱ्या असल्या तरी त्यांचे वाटप योग्य प्रमाणात सर्वांना झाले पाहिजे. अशा काळात अन्नधान्यासारख्या आवश्यक वस्तूंच्या विक्रीसाठी सर्वस्वी व्यापाऱ्यावर अवलंबून राहणे अडचणीचे असते. यामध्ये व्यापारी वर्गावर अविश्वास दाखविण्याचा हेतू नाही. परंतु आणीबाणीच्या परिस्थतीचा फायदा घेऊन अधिक नफा मिळविण्याच्या उद्देशाने काही व्यापाऱ्यांनी जरी कृत्रिमारित्या अन्नधान्याची

टंचाई केली वा त्यांच्या किंमती वाढविल्या तरी सामान्य माणसावर त्याचा अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे आणीबाणीच्या काळात वस्तूंच्या खरेदी-विक्रीवर सरकारी वा सहकारी संस्थांचे नियंत्रण असले पाहिजे.

परंतु वरील दोन्ही संस्थांमध्ये सहकारी संस्थांचे नियंत्रण अधिक स्वागतार्ह आहे. याचे एक कारण असे की, सरकारी यंत्रणेच्या हातात सर्वच गोष्टींचे केंद्रीकरण होणे चांगले नाही. सत्तेचे विकेंद्रीकरण हा लोकसत्तेचा कणा आहे. गेल्या काही वर्षांत जगभर सगळीकडेच लोककल्याणकारी राज्यात विज्ञान तंत्रज्ञान यामुळे राजसत्तेच्या हातात सत्तेचे केंद्रीकरण वाढत आहे. सत्तेच्या केंद्रीकरणाचा प्रवाह नियंत्रित करायचा असेल तर समाजामध्ये सहकारी संस्थासारख्या अनेक स्वायत्त संस्था निर्माण झाल्या पाहिजेत. सहकारी संस्थांसारख्या स्वायत्त संस्थांचे जाळे समाजात जितके पसरेल तितकी लोकशाही दृढमूल होईल. या दृष्टीने खरेदी-विक्रीवर सरकारी यंत्रणेऐवजी सहकारी संस्थांचे नियंत्रण असणेच इष्ट आहे.

## सहकारी अर्थव्यवस्थेचे स्थान

येथे आणखी एका मुद्द्याचा विचार केला पाहिजे. सध्याच्या स्पर्धाप्रधान अर्थव्यवस्थेमध्ये अनेक दोष आहेत आणि तिच्या जागी सहकारी अर्थव्यवस्था आस्ते आस्ते आली पाहिजे. परंतु आपल्या एकूण अर्थव्यवस्थेमध्ये सहकारी अर्थव्यवस्थेचे नेमके स्थान कोणते ?

सहकारी अर्थव्यवस्था सध्याच्या स्पर्धाप्रधान अर्थव्यवस्थेला संपूर्णपणे पर्यायी अर्थव्यवस्था म्हणून वाढवावी की, तिच्यातील केवळ दोष दूर करणारी अर्थव्यवस्था म्हणून वाढवावी असा प्रश्न निर्माण होतो. म्हणजे सहकारी अर्थव्यवस्थेचे नेमके स्थान कोणते असावे ? ती सध्याच्या अर्थव्यवस्थेला पर्यायी असावी की, Corrective असावी, याही बाबतीत आपल्याला निर्णय घ्यावा लागेल. मला वाटते सहकारी अर्थव्यवस्थेचे स्थान पर्यायी अर्थ-व्यवस्था न राहता मुख्यतः Corrective म्हणूनच असले पाहिजे. कोणतीही अर्थव्यवस्था संपूर्णपणे एका संस्थेच्या नियंत्रणाखाली जाणे चांगले नाही. नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क या देशांतील सहकारी चळवळीने

यंत्रणा महत्त्वाची आहे. या प्रश्नाकडे आपले विशेष लक्ष गेले ते १९४२-४३ सालच्या बंगालमधील दुष्काळानंतर. बंगालमधील या दुष्काळाचे एक वैशिष्ट्य असे की, जीवनाश्यक अशा सर्व वस्तूंची खरेदी-विक्रीची व्यवस्था खासगी व्यापारी, भांडवलदार, यांच्या हातात होती. या व्यापाऱ्यावर कोणाचेही नियंत्रण नव्हते. त्यामुळे बंगालमधील या दुष्काळाच्या वेळेला व्यापाऱ्यानी अन्नधान्याची साठेबाजी मोठ्या प्रमाणावर केली व वस्तूंच्या किंमती कृत्रिम रीतीने अतिशय वाढविल्या. त्यामुळे या दुष्काळाच्या वेळेला एका बाजूला धान्याने भरलेली गुदामे आहेत आणि दुसऱ्या बाजूला लोक उपाशी मरत आहेत असे विरोधी दृश्य दिसत होते. या काळात बंगालमध्ये सुमारे पंधरा लाख माणसे उपासमारीने मेली व अन्नधान्याच्या किंमती तिप्पट वाढल्या होत्या. बाजारपेठा संपूर्णपणे अनियंत्रित अशा व्यापाऱ्यांच्या हातात ठेवल्या तर त्याचे किती गंभीर परिणाम होतात याचा प्रत्यय सर्व देशाला यावेळी प्रथमच तीव्रतेने आला. त्यानंतर केंद्र व राज्य सरकारने जीवनावश्यक अशा वस्तूंची खरेदी-विक्री स्वतःच्या नियंत्रणाखाली आणली. बाजारपेठावर सरकारी यंत्रणेचे वा सहकारी संस्थांचे काही प्रमाणात तरी नियंत्रण असले पाहिजे याची तीव्र जाणीव या काळातच देशात झाली.

### सहकारी वा सरकारी नियंत्रण आवश्यक

यानंतर गेल्या २० वर्षांत बाजारपेठेवर सरकारी वा सहकारी संस्थांचे नियंत्रण ठेवण्याचा विचार सतत वाढत आहे. आणीबाणीच्या संदर्भात तर बाजारपेठेवरील नियंत्रणाला विशेष महत्त्व आहे. युद्धजन्य परिस्थितीमध्ये सर्वसामान्य माणसाला आवश्यक असणाऱ्या वस्तू योग्य किंमतीत व पुरेशा मिळाल्या पाहिजेत. अन्नधान्य, कापड वा इतर आवश्यक वस्तू अपुऱ्या असल्या तरी त्यांचे वाटप योग्य प्रमाणात सर्वांना झाले पाहिजे. अशा काळात अन्नधान्यासारख्या आवश्यक वस्तूंच्या विक्रीसाठी सर्वस्त्री व्यापाऱ्यावर अवलंबून राहणे अडचणीचे असते. यामध्ये व्यापारी वर्गावर अविश्वास दाखविण्याचा हेतू नाही. परंतु आणीबाणीच्या परिस्थतीचा फायदा घेऊन अधिक नफा मिळविण्याच्या उद्देशाने काही व्यापाऱ्यांनी जरी कृत्रिमारित्या अन्नधान्याची

टंचाई केली वा त्यांच्या किंमती वाढविल्या तरी सामान्य माणसावर त्याचा अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे आणीबाणीच्या काळात वस्तूंच्या खरेदी-विक्रीवर सरकारी वा सहकारी संस्थांचे नियंत्रण असले पाहिजे.

परंतु वरील दोन्ही संस्थांमध्ये सहकारी संस्थांचे नियंत्रण अधिक स्वागतार्ह आहे. याचे एक कारण असे की, सरकारी यंत्रणेच्या हातात सर्वच गोष्टींचे केंद्रीकरण होणे चांगले नाही. सत्तेचे विकेंद्रीकरण हा लोकसत्तेचा कणा आहे. गेल्या काही वर्षांत जगभर सगळीकडेच लोककल्याणकारी राज्यात विज्ञान तंत्रज्ञान यामुळे राजसत्तेच्या हातात सत्तेचे केंद्रीकरण वाढत आहे. सत्तेच्या केंद्रीकरणाचा प्रवाह नियंत्रित करायचा असेल तर समाजामध्ये सहकारी संस्थासारख्या अनेक स्वायत्त संस्था निर्माण झाल्या पाहिजेत. सहकारी संस्थांसारख्या स्वायत्त संस्थांचे जाळे समाजात जितके पसरेल तितकी लोकशाही दृढमूल होईल. या दृष्टीने खरेदी-विक्रीवर सरकारी यंत्रणेऐवजी सहकारी संस्थांचे नियंत्रण असणेच इष्ट आहे.

## सहकारी अर्थव्यवस्थेचे स्थान

येथे आणखी एका मुद्दयाचा विचार केला पाहिजे. सध्याच्या स्पर्धाप्रधान अर्थव्यवस्थेमध्ये अनेक दोष आहेत आणि तिच्या जागी सहकारी अर्थव्यवस्था आस्ते आस्ते आली पाहिजे. परंतु आपल्या एकूण अर्थव्यवस्थेमध्ये सहकारी अर्थव्यवस्थेचे नेमके स्थान कोणते ?

सहकारी अर्थव्यवस्था सध्याच्या स्पर्धाप्रधान अर्थव्यवस्थेला संपूर्णपणे पर्यायी अर्थव्यवस्था म्हणून वाढवावी की, तिच्यातील केवळ दोष दूर करणारी अर्थव्यवस्था म्हणून वाढवावी असा प्रश्न निर्माण होतो. म्हणजे सहकारी अर्थव्यवस्थेचे नेमके स्थान कोणते असावे ? ती सध्याच्या अर्थव्यवस्थेला पर्यायी असावी की, Corrective असावी, याही बाबतीत आपल्याला निर्णय घ्यावा लागेल. मला वाटते सहकारी अर्थव्यवस्थेचे स्थान पर्यायी अर्थ-व्यवस्था न राहता मुख्यतः Corrective म्हणूनच असले पाहिजे. कोणतीही अर्थव्यवस्था संपूर्णपणे एका संस्थेच्या नियंत्रणाखाली जाणे चांगले नाही. नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क या देशांतील सहकारी चळवळीने

जगातील सहकारी चळवळीला शिकविलेला हा धडा आहे असे वाटते. तेथे काही आर्थिक व्यवहार जवळ जवळ ९० टक्के सहकारी संस्थांच्या नियंत्रणाखाली गेले परंतु तेथे याबाबत विरोधी प्रतिक्रिया सुरू झाल्या. कोणत्याही पद्धतीच्या एका संस्थेच्या हाताखाली सर्व आर्थिक व्यवहारांचे नियंत्रण जाणे लोकशाहीच्या दृष्टीने चांगले नाही,

समाजाची अर्थव्यवस्था Monoolytive पद्धतीवर उभारली जाऊ नये तर Plurulistic पद्धतीवर आधारली जावी. अशा अर्थव्यवस्थेमध्ये व्यक्तिस्वातंत्र्याचे आश्वासन मिळते आणि आर्थिक विकास कारभारातील कार्यक्षमता सांभाळली जाते. हा विचार नेहमीच्या परिस्थितीला लागू आहे. त्याचप्रमाणे आणीबाणीच्या काळालाही लागू आहे.

## यशाचा मानदंड

सहकारी खरेदी-विक्री संघाच्या यशाचा एक मानदंड म्हणजे बाजारात एकूण किती मालाची खरेदी-विक्री होते आणि त्यापैकी किती टक्के सहकारी खरेदी विक्री संघाकडून होते हे पाहणे होय. या दृष्टीने पाहता आज आपल्या देशातील सुमारे ८ ते १० टक्के मालाची खरेदी-विक्री या संस्थांमार्फत होते. याचा अर्थ ९०–९२ टक्के मालाची खरेदी-विक्री अद्यापही खासगी व्यापारी, अडते, एजंट यांच्या हातातच आहे. याचा अर्थ मालाची बाजारपेठ अद्यापही बहुतांशी व्यापारी, अडते यांच्या हातातच आहे. सहकारी संस्थांचे बाजारपेठेवर प्रभावी नियंत्रण आले पाहिजे. म्हणजे आणीबाणीच्या काळात सर्वसामान्य जीवनाची घडी विस्कटली जाणार नाही. या दृष्टीने सहकारी खरेदी-विक्री संघाचा व्यवहार १० टक्यांवरून निदान ४० टक्यापर्यंत गेला पाहिजे.

## बी बियाणावर लक्ष केंद्रीत

सहकारी खरेदी-विक्री संघांनी शेतीच्या उत्पादनवाढीच्या दृष्टीने मुख्यतः मालाची खरेदी आणि विक्री केली. अन्नधान्य उत्पादनवाढीसाठी शेतकऱ्याला उत्तम बी-बियाणांची गरज असते. यासाठी सहकारी संघांनी अशा बी-

बियाणांच्या खरेदी-विक्रीवर विशेष भर दिला पाहिजे. याबाबत एक महत्त्वाचा बदल लक्षात घेऊन त्यानी आपला आर्थिक व्यवहार केला पाहिजे. आतापर्यंत बी-बियाणांचे जे संशोधन झाले होते ते मुख्यतः अपुऱ्या पावसात, दुष्काळी परिस्थितीतही बी-बियाणे जगून कसे राहतील या दृष्टीनेच झाले होते. म्हणजे शेतात कमी पाऊस पडला वा काही रोगराई झाली तरी बियाणी न मरता कशीबशी का होईना जगून कशी राहतील या दृष्टीनेच विचार केला होता. या बियाणांमध्ये फक्त जगून राहण्याची ताकद असते. परंतु पिके फोफावण्याची ताकद नसते. अलीकडे दोनतीन वर्षांत केवळ जगून राहणाऱ्या बियाणांपेक्षा भरघोस पीक येणाऱ्या बियाणांवर आपले लक्ष चालले आहे. संशोधक दृष्टीने शेतीच्या क्षेत्रात संशोधन केले जात आहे. अशा प्रकारच्या बियाणांवर सहकारी खरेदी-विक्री संघांनी सतत लक्ष ठेवून ते शेतकऱ्यास विकले पाहिजे. यातून धान्याच्या उत्पादनवाढीसाठी हातभार लागेल. सहकारी खरेदी-विक्री संघही बळकट होतील. आतापर्यंत ग्रामीण भागातून सहकारी पतपेढ्याची प्रगती चांगली झाली आहे.

### सांगड घालणे जरुरीचे

सहकारी पतपेढ्यांच्या दृष्टीने आवश्यक अशी चाचणीही आतापर्यंत समाधानकारक रित्या उभारली गेली आहे. त्या मानाने सहकारी विक्री संघटनांची प्रगती करू आपण शकलो नाही. सहकारी पतपेढ्या अधिक यशस्वी, प्रभावी, कार्यक्षमकरायच्या असतील तर आपल्याला यापुढे सहकारी विक्री संघटनाही वाढविल्या पाहिजेत. सहकारी पतपेढ्या आणि सहकारी विक्री संघटना यांच्यामध्ये एकसूत्रीपणा निर्माण केला तर त्याचा चांगला परिणाम दोन्ही संघटनांवर होतो; असे सुसत्रीकरण फायदेशीर ठरते. सहकारी विक्री संघटनेचा उत्पादनवाढीवर चांगला परिणाम होतो याचे एक साधे कारण असे की अशा संस्थांमुळे शेतकऱ्याच्या पदरात मालाची योग्य ती किंमत पडते. सहकारी विक्री संघटना अस्तित्वात नसली तर सर्व बाजार व्यापारी, अडते यांच्या हातात जातो. हे अडतव्यापारी स्वतःला नफा अधिक मिळावा म्हणून शेतकऱ्याचा माल प्रथम जेव्हा बाजारात येतो त्या वेळी त्याची किंमत

पुष्कळ कमी करतात. आणि शेतकऱ्याकडून सर्व मालाची खरेदी झाली की त्या मालाची किंमत भरपूर वाढवून तोच माल बाजारात अधिक किंमतीने विकतात. याचा दुहेरी परिणाम होतो. एकतर शेतकऱ्याला त्याच्या शेतमालाची कमी किंमत मिळते आणि शिवाय ग्राहकाला हा माल अधिक किंमतीने घ्यावा लागतो. मधला नफा केवळ काही थोड्या व्यापाऱ्यांच्या हातात जातो. मालाला योग्य किंमत मिळत नसली तरी शेतकऱ्याला उत्पादनवाढीसाठी आवश्यक जी प्रेरक शक्ती लागते ती मिळत नाही. उलट सहकारी विक्री संघटनेकडून त्याच्या मालाला योग्य ती किंमत मिळाली तर तो अधिक उत्साहाने उत्पादन वाढीच्या कामात लक्ष घालतो. सहकारी विक्री संघटना आणि सहकारी पतपेढ्या यांची जेथे जेथे चांगली सांगड घातली गेली, तेथे तेथे उत्पादनवाढीच्या कामाला वेग आला आहे असे आपणास दिसून येईल.

आपले हे व्यापारी स्वरूप सहकारी विक्री संघटनांनी सदैव लक्षात ठेवले पाहिजे व एखाद्या व्यापारी संस्थेप्रमाणे आपला आर्थिक व्यवहार केला पाहिजे. या ठिकाणी हे लक्षात ठेवले पाहिजे की, अनेक वर्षे व्यापार करून मिळविलेला पिढीजात अनुभव व्यापाऱ्यांच्या किंवा धंदेवाल्यांच्या संग्रही असतो त्याना ती कला उपजत प्राप्त झालेली आहे. अशा वाकबगार लोकांशी सहकारी विक्री संघटनांना लढा द्यावयाचा असतो. म्हणून सरकारी विक्री संघटनांनी आपला व्यवहार एखाद्या कुशल व्यापाऱ्याप्रमाणे धंदा म्हणून काळजीपूर्वक केला पाहिजे.

### प्रक्रियात्मक कामाची गरज

सहकारी विक्री संघटनांनी आपल्या विकासाच्या दृष्टीने आपल्या संख्यात्मक वाढीकडेही लक्ष दिले पाहिजे. सहकारी विक्री संघटनांनी केवळ एकीकडून माल विकत घेऊन दुसरीकडे विकण्याचे काम करू नये. तर घेतलेल्या मालावर त्यानी काही प्रक्रिया करावी. तो माल अधिक उठावदार कसा होईल याची दक्षता घ्यावी व त्यावर काही संस्कार करून नंतर तो बाजारात विकावा. माल एकीकडून घेऊन तो जसाच्या तसा दुसरीकडे विकण्याचे काम फारसे

समाधानकारक नाही. घेतलेल्या मालावर प्रक्रिया करून नंतर ते विक्रीसाठी बाजारात आणण्याचे धोरण त्यानी स्वीकारले पाहिजे. यामुळे सहकारी विक्री संघटना बळकट आणि उपयुक्त ठरतील.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ वि: ........................
क्रमांक ........................ नोंद दि ........................

# ७

# महाराष्ट्रातील नगरपालिका-काही विचार

आपल्या नगरपालिकेच्या शताब्दिमहोत्सवानिमित्त गेल्या शंभर वर्षांत हिंदुस्थानात व विशेषतः महाराष्ट्रात नगरपालिकांची प्रगती कशी व कितपत झाली याचा आढावा घेऊन नजीकच्या भविष्यकाळात या संस्थांच्या विकासाच्या दृष्टीने काय करणे जरूर आहे यासंबंधीचे माझे विचार मी आपणासमोर मांडणार आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांचा जन्म

आधुनिक अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्था आपणाकडे १००-१२५ वर्षांपूर्वीच सुरू झाल्या. त्यापूर्वी येथे अनेक शतके ग्रामपंचायती होत्या. परंतु प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील ग्रामपंचायती व आधुनिक काळातील स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये मूलभूत फरक आहे. पहिला फरक असा की, जुन्या काळातील ग्रामपंचायती या मुख्यतः जातिव्यवस्था, अस्पृश्यता यावर उभारलेल्या होत्या. आधुनिक काळातील स्थानिक स्वराज्य संस्था मानवी

---

बार्शी, जि. सोलापूर, बार्शी नगरपालिका
सव्वत्सरी महोत्सव.

समतेवर उभारलेल्या आहेत. या समतेमध्ये स्त्री पुरुष असाही भेद केला जात नाही. दुसरे मध्ययुगात कायद्याच्या राज्याची कल्पना नव्हती. एकाच गुन्ह्यासाठी निरनिराळ्या जातिजमातींना वेगवेगळ्या शिक्षा होत. आणि या शिक्षात अंतरही पुष्कळ होते. आधुनिक स्थानिक स्वराज्य संस्थांमधून कायद्याचे राज्य आहे. एकच कायदा सर्वांना सारखाच लागू आहे. मग तो राव असो वा रंक असो. तिसरे जुन्या ग्रामपंचायती या जवळ जवळ स्वायत्त होत्या. त्यांचा राजधानीशी वा केंद्रसरकारशी फारसा संबंध नव्हता. ग्रामपंचायतीने शेतसाऱ्याचा ६ वा हिस्सा राजाला पाठवून दिला म्हणजे ग्रामपंचायतीचा व राजाचा फारसा संबंध रहात नसे. ग्रामपंचायतीचा वर केंद्राशी जसा फारसा संबंध नव्हता त्याचप्रमाणे इतर ग्रामपंचायतींशीही फारसा संबंध नव्हता. नव्या स्थानिक स्वराज्य संस्था राज्य, केंद्र पातळीशी अतिशय प्रभावी रीतीने बांधल्या गेलेल्या आहेत. त्याचप्रमाणे त्यांचे परस्परांशी संबंधही पुष्कळच वाढलेले आहेत. ही आधुनिक स्थानिक स्वराज्य संस्थांची खास वैशिष्ट्ये आहेत. मानवी स्वातंत्र्य, समता, कायद्याचे राज्य, व्यापक प्रमाणावरील एकात्मता या अनेक दृष्टीने पाहता, आधुनिक काळातील स्थानिक स्वराज्य संस्था प्राचीन व मध्ययुगातील स्थानिक स्वराज्य संस्थांपेक्षा पुष्कळच पुढे आहेत. आणि त्यामुळेच आधुनिक अर्थाने आपल्याकडे स्थानिक स्वराज्य संस्था फक्त १००-१२५ वर्षां-पासून सुरू आहेत असे मी प्रारंभी म्हटले आहे.

### असंतोषाची कोंडी फोडली

१८५० साली हिंदुस्थानात नगरपालिकांचा पहिला कायदा झाला. परंतु व्यापक अर्थाने आपल्या देशात नगरपालिका सुरू झाल्या त्या मुख्यतः १८८२ साली. लॉर्ड रिपन हाच हिंदुस्थानातील स्थानिक लोकशाहीचा पहिला मोठा शिल्पकार आहे. त्यानेच या देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा व्यापक पाया घातला. या काळात आपणाकडे स्थानिक स्वराज्य संस्था सुरू होण्याची मुख्यतः दोन कारणे सांगता येतील. पहिले असे की, आपल्याकडे १८५४ च्या कायद्याने देशभर इंग्रजी शिक्षण सुरू झाले. १८५४–५५ पासून ८०–८२ पर्यंत पाश्चात्य शिक्षण घेतलेली एक मोठी पिढीच्या पिढी या देशात तयार झाली होती. त्यांचा इंग्लंड-युरोपमधील लोकशाही जीवनाशी परिचय झाला होता;

आधुनिक जीवनमूल्ये त्यानी अभ्यासली होती. त्यामुळे येथील राजकीय गुलामगिरीबद्दल स्वाभाविकच त्यांच्या मनामध्ये राजकीय असंतोष वाढू लागला होता. हिंदुस्थानातील या नव्या पिढीतून राजकीय असंतोष कोंडून ठेवणे ब्रिटिश साम्राज्याच्या दृष्टीने चांगले नाही, असे विचार इंग्लंडमधील पार्लमेंटमध्ये मांडले जाऊ लागले होते. या तरुण पिढीतून असंतोषाला वेळीच वाट मोकळी करून दिली, तर ते आपल्या साम्राज्याच्या दृष्टीने हिताचे ठरेल असेही विचार तिकडे मांडले जात होते. या दृष्टीने येथे स्थानिक स्वराज्य संस्था सुरू करावी म्हणजे येथील सुशिक्षित तरुण पिढीच्या असंतोषाला थोडीशी तरी वाट मोकळी करून दिल्यासारखे होईल असे त्याना वाटले. या दृष्टीने त्यानी या देशात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कायद्याला हसतमुखाने पाठिंबा दिला. म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांचा जो जन्म झाला तो मुख्यतः येथील असंतोषाला वाट मोकळी करून देण्यासाठी. दुसरे इंग्लंडमध्ये उदारमतवादी विचाराचे पुरस्कर्ते होते, त्यांना या देशामध्ये लोकशाही रुजावी असे अंशतः का होईना पण प्रामाणिकपणे वाटत होते. लोकशाहीची एक प्राथमिक शाळा म्हणून ते स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पहात होते.

### स्थानिक स्वराज्य संस्थांचा जनक : लॉर्ड रिपन

हिंदुस्थानातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे एक वैशिष्ट्य असे की, त्यांचा सांधा इंग्लंडमधील मंत्रिमंडळातील बदलाशी बेमालुमपणे सांधला होता. म्हणजे इंग्लंडमध्ये जेव्हा जेव्हा उदारमतवादी पक्ष सत्तेवर आला, तेव्हा तेव्हा त्यानी या देशातील स्थानिक लोकशाहीला हातभार लावण्याचा प्रयत्न केला. उलट तिकडे जेव्हा जेव्हा काँझरवेटिव्ह पक्ष सत्तेवर आला तेव्हा तेव्हा त्याने स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रगती रोधण्याचा प्रयत्न केला. हिंदुस्थानातील राजकीय प्रगती व इंग्लंडच्या मंत्रिमंडळातील स्थित्यंतरे यांचा हा संबंध आपणाला ग्लॅडस्टनपासून तो ॲटलीपर्यंत पाहावयास मिळतो. १८८० साली ग्लॅडस्टन हा उदारमतवादी पंतप्रधान अधिकारावर आला. त्याबरोबर त्याने रिपनसारखा उदार विचाराचा गव्हर्नर जनरल हिंदुस्थानात पाठविला व त्याने स्थानिक लोकशाहीच्या दृष्टीने झटकन पावले उचलली. स्थानिक संस्थेच्या विकासाच्या संदर्भात दोन देशातील राजकीय घटनांचा हा संबंध फार महत्त्वाचा व अर्थपूर्ण आहे.

## इतिहासाला महत्त्वाची कलाटणी

१८८२ पासून तो १९१९ पर्यंत स्थानिक संस्थांची जी वाढ झाली त्याला वरील कारणाप्रमाणे या देशातील वाढता राजकीय असंतोष कारणीभूत आहे. १६ व्या शतकाच्या शेवटी शेवटी वारंवार येणाऱ्या भयानक दुष्काळामुळे व प्लेग-सारख्या साथीमुळे या असंतोषाला अधिकच धार प्राप्त झाली. ह्यानंतर येथील दहशतवादी क्रांतिकारकांनी असंतोषाचे उग्र स्वरूप व्यक्त केले. कॉंग्रेस अधिकाधिक जहाल मार्गाकडे झुकू लागली. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्यक्षेत्र हळू हळू वाढू लागले. १९२० पर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांची अंतिम सत्ता केंद्र सरकारकडेच होती. त्यामुळे या काळात हिंदुस्थानभर नगरपालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्था यांची वाढ जवळ जवळ सारख्याच पद्धतीने झाली. परंतु १९२० नंतर या इतिहासाला एक महत्त्वाची कलाटणी मिळाली. १९२० साली देशभर मॅांटेग्युचेम्सफर्ड सुधारणेप्रमाणे द्विदल राज्यपद्धती सुरू झाली व स्थानिक स्वराज्य संस्था हे खाते लोकप्रतिनिधींकडे सोपविण्यात आले. त्यामुळे यानंतर प्रत्येक प्रांताने नगरपालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्था याबाबत वेगवेगळे धोरण स्वीकारले. बंगाल, मद्रास, पंजाब, मुंबई इत्यादी प्रांतात स्थानिक स्वराज्य संस्थांची वाढ त्यामुळे अगदी वेगळ्या मार्गाने सुरू झाली. १९३५ च्या संयुक्त राज्यघटनेने हा प्रवाह कायम झाला. १९५० साली आपण संयुक्त राज्यघटनेचे तत्त्व स्वीकारले. त्यामुळे प्रत्येक राज्याला स्वायतत्ता मिळाली. त्यामुळे ५० नंतर देखील प्रत्येक राज्याने स्थानिक स्वराज्य संस्थांची वाढ वेगवेगळया मार्गांनी केली. ढोबळमानाने त्यामुळे १८५० पासून १९२० पर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांचे धोरण केंद्र सरकारच्या हातात होते. त्यामुळे सर्वत्र सारखी वाढ दिसते. उलट २० ते ६५ या काळात प्रांताप्रांतातील वाढ वेगवेगळ्या मार्गांनी झालेली आपणाला दिसते.

## महत्त्वपूर्ण बदलाचे स्वरूप

या ऐतिहासिक विकासाच्या आढाव्यात आपणास स्वातंत्र्यपूर्व काळातील स्थानिक स्वराज्य संस्था व स्वातंत्र्यानंतरच्या काळातील स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये महत्त्वाचा फरक केला पाहिजे. हा फरक प्रारंभी म्हटल्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था सुरू करण्यामागील प्रेरणेमध्येच आहे. पूर्वी परकीयलोक सत्तेवर

होते व ते येथील असंतोषाला वाट मोकळी करून देण्याचे एक साधन म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पहात होते. स्वातंत्र्यानंतरच्या काळात या प्रेरणेत मूलभूत बदल झाला आहे. आता आपलेच सरकार आपल्याला अधिकार देत आहे. त्यामध्ये आपले राज्य, आपली लोकशाही, आपले स्वातंत्र्य बळकट करावे हाच सर्वांत महत्त्वाचा उद्देश आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामागील प्रेरणेमध्ये झालेला हा बदल अत्यंत मूलगामी स्वरूपाचा आहे. पूर्वीचे सरकार हे मुख्यतः पोलीस सरकार होते. देशात शांतता, सुव्यवस्था राखावी एवढेच त्याचे मर्यादित स्वरूप होते. स्वातंत्र्यानंतरचे सरकार हे मुख्यतः लोककल्याण-कारी सरकार आहे. आता व्यक्तीच्या जीवनाची सर्व प्रकारची काळजी राज्य सरकार घेत आहे. राज्याच्या या बदलत्या स्वरूपाची प्रतिबिंबे जर स्थानिक सरकारमध्ये न पडली तरच आश्चर्य. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामातही या काळात झपाट्याने बदल होत आहे. पूर्वीच्या नगरपालिका मुख्यतः रस्त्याची झाडझुड करणे, दिवाबत्ती पाहणे, पाणीपुरवठा करणे अशा स्वरूपाचीच मोजकी कामे करीत होती. आता नगरपालिका अनेक प्रकारची लोककल्याणकारी कामे हातात घेत आहे. गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन, गरीब लोकांसाठी स्वस्त भाड्यात घरे बांधणे, गरीब विद्यार्थ्यांना दूधपुरवठा करणे, गरीब नागरिकांसाठी हॉस्पिटलची मोफत सोय करणे, अशी कितीतरी लोककल्याणकारी कामे आता नगरपालिका हाती घेत आहे. अत्यंत आवश्यक अशा चारदोन कामापासून तो अनेक प्रकारच्या लोककल्याणकारी कामांकडे नगरपालिकांच्या कामांचा हा जो प्रवाह आहे तो अत्यंत महत्त्वाचा आहे. पुढील १० वर्षांत ही कामे आणखी वाढणार आहेत. तिसऱ्या योजनेच्या व समाजवादाच्या संदर्भात स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्वरूप पूर्वीपेक्षा आणखी जास्त बदलले आहे. योजनेच्या या काळात समाजविकासाची अनेक कामे स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविलेली आहेत. ग्रामीण भागातून तर आता शेतीच्या उत्पादनवाढीचाही कार्यक्रम स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात अशा प्रकारची कामे स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविली जातील याची पुसटसुद्धा कल्पना शिवत नव्हती. समाजवादाच्या संदर्भातही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक धोरणात, अर्थसंकल्पात आस्ते आस्ते बदल होत आहे. श्रीमंतांकडून कराच्या रूपाने अधिक पैसा घ्यावा व तो गरिबांच्यासाठी वेगवेगळ्या मार्गांने खर्च

करावा व अशा तऱ्हेने गरीब-श्रीमंतातील अंतर कमी करावे असे धोरण काही नगरपालिकाही अवलंबीत आहेत. हा काही वर्षांतील बदल महत्त्वपूर्ण मानावा लागेल.

## जगातील विचारांचे प्रतिध्वनी

महाराष्ट्रातील नगरपालिकांच्या कारभाराचा अभ्यास केला तर त्यामध्ये ठळकपणे एक प्रवाह दिसून येतो. तो असा की, गेली ५०-६० वर्षे धोरण ठरविणे आणि त्याची अंमलबजावणी करणे या कामामध्ये सतत मोठ्या प्रमाणावर फरक होत गेलेला आहे. १९०१, १९२५, १९३८, १९५० या सालातील नगरपालिकांचे कायदे पाहिले तर हे आपणास चटकन दिसून येईल. महापालिकेचा कायदा म्हणजे या प्रवाहाचा केवळ स्वाभाविक परिपाक आहे. याचा अर्थ असा की लोकनियुक्त सभासदाकडे शहराचा विकास कसा व्हावा याचे धोरण ठरविण्याचा फक्त अधिकार आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचे सर्व अधिकार अधिकारी वर्गाकडे आहे. पुष्कळशा प्रमाणात हेच तत्त्व आज युरोप व अमेरिकेतही स्थानिक संस्थांमध्ये वाढत आहे. एका दृष्टीने सर्व जगभर चालू असलेल्या विचारप्रवाहाचे प्रतिध्वनी आपल्याला आपल्या स्थानिक संस्थांच्या जीवनात पाहावयास मिळतात. यासंबंधीची मूल्यमीमांसा आज मी वेळेअभावी फारशी करीत नाही.

## उत्पन्नातील फसवी वाढ

नगरपालिकांच्या अर्थव्यवहारासंबंधी देखील मला एकदोन महत्त्वाच्या गोष्टी सांगावयाच्या आहेत. नगरपालिकात आज जवळजवळ ५० टक्के उत्पन्न जकातीपासून असते. जकात हा एका दृष्टीने अप्रत्यक्ष कर आहे. म्हणजे तो गरीब व श्रीमंत या दोन्ही वर्गांवर सारखाच आहे. मिठावरील जकातीचा बोजा मजुरावर जितका पडतो तितकाच तो मोठ्या कारखानदारावर पडतो. एका दृष्टीने हा अप्रत्यक्ष कर फारसा पुरोगामी नाही. उत्पन्नाच्या प्रमाणात त्याचा बोजा सर्वांवर वाटला जातो. परंतु आज जकातीचे उत्पन्न इतके मोठे आहे की, त्याऐवजी दुसरा कर बसवता येणार नाही आणि त्यामुळे हा अप्रत्यक्ष कर पुरोगामी नसला तरी तो आपणास चालू ठेवावा लागत आहे. नगरपालिकांचे

जकातीखालोखाल दुसरे महत्त्वाचे उत्पन्न घरपट्टीचे असते. हे उत्पन्न सुमारे एकूण उत्पन्नात २० ते २५ टक्के असतें. हा कर प्रत्यक्ष कर असल्यामुळे तो पुरोगामी व स्वागतार्ह म्हटला पाहिजे. परंतु याशिवाय नगरपालिकांनी प्रत्यक्ष करासारखे नवे पुरोगामी कर शोधून काढले पाहिजेत. व ह्या उत्पन्नातून गरिबांसाठी नव्या नव्या योजना हाती घेतल्या पाहिजेत. गेल्या २०–२५ वर्षांत नगरपालिकेची उत्पन्ने तिप्पट चौपट झाली आहेत. परंतु याचे कारण त्यानी नवे कर बसविले हे नव्हे तर जकातीचे उत्पन्न वाढत गेले हे आहे. आणि जकातीचे उत्पन्न वाढले याचे कारण मालाच्या किंमती वाढत गेलेल्या आहेत. त्यामुळे एका दृष्टीने नगरपालिकेच्या उत्पन्नातील ही वाढ काहीशी फसवी आहे.

## भ्याड अर्थसंकल्प फेकून द्या

नगरपालिकांच्या अर्थसंकल्पाबाबत मला दुसरीही एक प्रवृत्ती आपल्या निदर्शनाला आणून द्यावयाची आहे. ती अशी की आपल्या नगरपालिकांचे अर्थसंकल्प अतिशय भ्याड असतात. त्यामध्ये साहस, धाडस असे फारसे दिसतच नाही. आपले नेहमीचे उत्पन्न जेवढे असेल तेवढ्यापुरत्याच खर्चाच्या योजना हाती घेण्याकडे त्यांचा कल आहे. परंतु या धोरणामुळे त्या भांडवली स्वरूपाची कामे हाती घेऊ शकलेल्या नाहीत. पाणीपुरवठा, मलवाहिनी योजना, शहरनियोजन, वीजपुरवठा यासारख्या भांडवली खर्चाच्या योजना हाती घ्यावयाचे म्हणजे त्यासाठी धडाडीने कर्जे काढली पाहिजेत. व अशा कर्जातूनच या योजना पुऱ्या केल्या पाहिजेत. नेहमीच्या चालू उत्पन्नातूनच अशा योजना पुऱ्या करणे अवघड नव्हे तर अशक्य आहे. परंतु दुर्दैवाने महाराष्ट्रातील नगरपालिकांमध्ये कर्जे काढून अशा योजना पुऱ्या करण्याची प्रवृत्ती दिसत नाही. साधारणपणे नगरपालिकेचे एक वर्षाचे जेवढे उत्पन्न असते त्याच्या दुप्पट कर्जे काढावयास काही हरकत नाही. म्हणजे एखाद्या नगरपालिकेचे वर्षाचे एक कोटीचे उत्पन्न असेल तर त्यानी दोन कोटींपर्यन्त कर्ज काढावयास काहीच हरकत नाही. हा निकष लावला तर महाराष्ट्रातील बहुसंख्य नगरपालिकांनी आपल्या कुवतीच्या मानाने १०–१५ टक्के देखील कर्जे काढलेली नाहीत. पुणे, मुंबईसारख्या महानगरपालिकांनी गेल्या काही वर्षांत झपाट्याने प्रगती केली आहे. त्याचे एक महत्त्वाचे कारण, त्यानी या

क्षेत्रात धाडसी धोरण स्वीकारले आहे. महाराष्ट्रातील नगरपालिकांनी या मार्गाने गेल्याशिवाय त्यांची चांगली प्रगती होणार नाही. १०० वर्षांनंतर देखील महाराष्ट्रातील अनेक शहरातून उघडी गटारे वाहताना दिसतात. पाणीपुरवठा ४–२ तास होतो. आणि तो देखील माणशी ५–७ गॅलन. शंभर वर्षांनंतर दिसणारे हे दृश्य फारसे उत्साहवर्धक नाही. पुढच्या १० वर्षांत आपल्या शहरांची चेहरेपट्टी बदलून टाकावयाची असेल तर नगरपालिकांनी आमचे परंपरागत भ्याड धोरण टाकून दिले पाहिजे. राज्यसरकारने देखील स्थानिक संस्थांना कर्जे काढण्यास उत्तेजन दिले पाहिजे. या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्जे देण्यासाठी इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनच्या धर्तीवर म्युनिसिपल फायनान्स कॉर्पोरेशन ही संस्था स्थापन झाली पाहिजे.

आजच्या धोरणापासून पुढील ५–२५ वर्षांत देखील स्थानिक स्वराज्य संस्थांची फारशी प्रगती होईल असे मला वाटत नाही.

## बदलत्या काळाचा कानोसा घेणारे नेतृत्व

नगरपालिकांच्या स्थानिक नेतृत्वात गेल्या काही वर्षांत महत्त्वाचे बदल होत आहेत. १९२० पूर्वी समाजातील रावबहाद्दूर, रावसाहेब व फार मोठे सावकार हेच मुख्यतः नगरपालिकेत होते. १९२० नंतर मुख्यतः व्यापारी, सावकार, घरमालक यांच्याकडे नगरपालिकांचे नेतृत्व गेले. काही प्रमाणात वकील वर्गही या नेतृत्वामध्ये दिसत होता. परंतु १९५० नंतर या व्यापारी, सावकार वर्गाकडून नेतृत्व आता सामान्य माणसाकडे चालले आहे. एकादृष्टीने लोकशाही जीवनाशी सुसंगत असाच हा बदल आहे. परंतु सध्याच्या नेतृत्वाला माझी एवढीच विनंती आहे की, हे नेतृत्व जसे वरिष्ठ वर्गाकडून सामान्य वर्गाकडे आले, त्याचप्रमाणे ते सामान्य वर्गाकडून आणखी खालच्या गरीब समाजाकडे गेले पाहिजे. निदान खालच्या गरीब वर्गाच्या आशाआकांक्षा सध्याच्या नेतृत्वाने समजावून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्या जीवनाशी समरस होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गलिच्छ वस्तीत राहणाऱ्या लोकांची दुःखे, रस्त्याच्या फूटपाथवर झोपणाऱ्या गरिबांची दैन्ये, अस्पृश्य समाजासारख्या समाजाच्या यातना काय आहेत, हे त्यांनी जिव्हाळ्याने

समजावून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या अडचणीतून कसा मार्ग काढता येईल याची चिंता त्यानी वाहिली पाहिजे. असे जर त्यानी केले तरच बदलत्या काळाचा कानोसा त्यानी घेतला असे मी म्हणेन. माझी खात्री आहे की स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आजचे नेतृत्व आजच्या सामाजिक प्रश्नांना योग्य तो प्रतिसाद देईल व आपले व संस्थांचे जीवन तो गतिमान ठेवील. भविष्य काळ त्यांच्या या प्रतिसादाकडे लक्ष लावून बसला आहे. त्यांची अपेक्षा पूर्ण करण्याचे सामर्थ्य आजच्या स्थानिक नेतृत्वामध्ये आहे, असा मला भरोसा वाटतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ वि: ....................
[illegible] ........................ नों० दि० ................

८

# महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा

महाराष्ट्रात जिल्हा परिषदांचा प्रयोग सुरू होऊन आता ३ वर्षे झाली आहेत. या काळात जिल्हा परिषदांसंबंधी पुष्कळ अनुकूल-प्रतिकूल टीका झाली आहे. या सर्व आक्षेपांचा एकत्रित विचार करून जिल्हा परिषदेसंबंधीचे यश-अपयश आपणासमोर मांडावे असे मला वाटते. या दृष्टीने आज मुद्दाम या विषयाचाच थोडासा विस्तृत परामर्श घेण्याचे मी ठरविले आहे.

## परस्पर विरोधी सूर

जिल्हापरिषदांसंबंधी महाराष्ट्रात प्रामुख्याने दोन परस्पर विरोधी टीका ऐकू येतात. महाराष्ट्रातील टीकाकारांचा एक वर्ग असे म्हणतो की, जिल्हा परिषदांना दिलेली कामे ही शक्यतो काढून घ्यावीत व ती राज्यसरकारकडे द्यावीत. उलट टीकाकारांचा दुसरा वर्ग असे म्हणतो की, या लोकशाही विकेंद्रीकरणाच्या नावाखाली जे विकेंद्रीकरण झाले आहे, ते काही खरे विकेंद्रीकरण नाही. विकेंद्रीकरणाचा तो केवळ आभास आहे. विकेंद्रीकरण खऱ्या अर्थाने प्रभावी

जळगाव, जिल्हापरिषद अध्यक्ष
बैठकीतील भाषण

करावयाचे असेल तर जिल्हा परिषदात आहे यापेक्षा पुष्कळच जास्त सत्ता दिली पाहिजे. जिल्हा परिषदांसंबंधीची ही परस्पर विरोधी टीका आपण खोलात जाऊन तपासली पाहिजे व या दोन्हीही टीकेच्या पलीकडे जाऊन संशोधन केले पाहिजे.

वरीलपैकी पहिल्या टीकाकारांची भूमिका अशी की, सध्याच्या विकेंद्रीकरणाचा समाजावर वाईट परिणाम होत आहे. या दृष्टीने वेगवेगळ्या थरातून वेगवेगळ्या मागण्या पुढे येत आहेत. विशेषतः प्राथमिक शिक्षकांची तक्रार विशेष जोराने पुढे येत आहे. त्यांचे म्हणणे असे की, शिक्षण खाते जिल्हा परिषदांकडून काढून पूर्वीप्रमाणे ते राज्यसरकारकडे सोपवले जावे. इतकेच नव्हे तर ते शक्य असल्यास केंद्र सरकारकडे सोपवले जावे. अस्पृश्य समाजाची तक्रार अशी की, जिल्हा परिषदांमुळे अस्पृश्य समाजावर वाईट परिणाम होत आहे. नव्या यंत्रणेमुळे अस्पृश्यांचा ग्रामीण पातळीवरील सरपंचाशी संबंध येत आहे. तिथे अस्पृश्यांबद्दल पुरेशी सहानुभूती नाही. त्यामुळे त्याना पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे योग्य न्याय मिळत नाही. यामुळेच समाजविकास खाते जिल्हा परिषदांकडून काढा व राज्यसरकारकडे द्या, अशी मागणी ते करीत आहेत. सहकारी चळवळीचे नेते असे म्हणत आहेत की, सहकारी संस्था जिल्हा परिषदांकडून पूर्णपणे काढा व त्यांच्यावर सहकारी संस्थांचेच नियंत्रण राहू द्या. आणखी एक अशी मागणी पुढे येत आहे की, जिल्ह्यातील सर्व प्रमुख रस्ते एस. टी. बोर्डाकडे देऊन टाकावेत व जिल्हा परिषदांना या कामातून मोकळे करावे. वरील चारीही सूचना जर अंमलात आणल्या तर जिल्हा परिषदांकडून शिक्षण, समाजविकास, सहकार व सार्वजनिक रस्ते ही कामे काढून घ्यावी लागतील. आणि असे जर घडले तर जिल्हा परिषदेकडे कोणते काम शिल्लक राहील ? वरील सूचना अमलात येऊ शकणार नाहीत. परंतु वेगवेगळ्या वर्गाकडून पुढे येणाऱ्या सूचनावरून एक सूत्र कायम आहे आणि ते म्हणजे काहीही करा पण दिलेली कामे जिल्हापरिषदांकडून काढून घ्या व ती राज्यसरकारकडे सोपवा.

### स्थानिक प्रभावी नेतृत्वासाठी हे आवश्यक

वरील टीकाकारांना लोकशाही विकेंद्रीकरणाचा मध्यवर्ती विचार रुचलेला नाही असे जर मी म्हणालो तर वावगे ठरणार नाही. ह्यांचा लोकशाही विकेंद्री-

करणावर मूलतः विश्वासच नसावा अशी शंका येते. राज्यपातळीवरून वरील कामे गेली अनेक वर्षे चालू आहेत. आता जिल्हा हा घटक धरून जिल्हा सत्तेचे विकेंद्रीकरण केले पाहिजे. नाही तर राज्यपातळीच्या खाली प्रभावी नेतृत्व कधी तयारच व्हावयाचे नाही.

वरील टीका जशी ऐकू येते तशीच दुसरीही टीका ऐकू येते. ती म्हणजे हे विकेंद्रीकरण लोकशाहीचे नव्हे तर केवळ कारभाराचे आहे. पूर्वी जी कामे सचिवालयातून होत होती, ती कामे फक्त आता जिल्हा परिषदांच्या द्वारे होत आहेत. त्यामुळे झालेले विकेंद्रीकरण हे कारभाराचे आहे, लोकशाहीचे नव्हे ! या टीकेच्या पुष्ट्यर्थ मुख्यतः पुढील तीन विचार मांडले जातात.

### हे ते आक्षेप

जिल्हा परिषदेच्या निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांच्या हातात कारभाराची कसलीही सत्ता नाही. सर्व सत्ता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या हाती केंद्रीत झाली आहे. जिल्हा परिषेदेच्या अध्यक्ष–उपाध्यक्षांच्या हाती साध्या पट्टेवाल्याच्या नेमणूका करण्याचेही अधिकार नाहीत. नोकरवर्गाच्या बदल्या करण्याची सत्ता नाही. अध्यक्ष-उपाध्यक्षांना त्यामुळे ठराव पास करण्यापलीकडे कसलीच सत्ता नाही. त्यामुळे प्रत्यक्षामध्ये लोकशाही विकेंद्रीकरणाच्या नावाखाली केवळ कारभाराचे विकेंद्रीकरण झाले आहे.

कारभारविषयक सत्तेप्रमाणेच पैशाचीही सत्ता जिल्हा परिषदांच्या हातात कसलीच मिळालेली नाही. ९० टक्के अर्थसंकल्प हा राज्य सरकारचाच अर्थसंकल्प असतो. कारण जिल्हा परिषदेचे ९० टक्के उत्पन्न राज्यसरकारकडून येणाऱ्या अनुदानाचे उत्पन्न असते. राज्यसरकार त्यामुळे त्यावरील प्रत्येक पैशावर सत्ता गाजवीत असते. जिल्हा परिषदांना त्यामुळे स्वतःचा असा अर्थसंकल्पच नाही. त्यांच्या हातात पैसाच नाही. आणि पैसा नसेल तर मग त्यांच्या हातात इतर सत्ता तरी कुठून येणार ?

वरील दोन्ही टीकेप्रमाणे तिसरी टीका अशी की, जिल्हा परिषदांचे सहकारी सोसायट्यांवरील नियंत्रण अगदीच नाममात्र आहे. सहकारी सोसायट्यांचा सर्व अर्थव्यवहार तपासणारी, त्याना कर्जे मंजूर करणारी यंत्रणा संपूर्णपणे स्वतंत्र आहे. सहकारी सोसायट्यांवरील जिल्हा परिषदांचे नियंत्रण त्यामुळे अगदीच वरवरचे आणि फसवे असे आहे.

## मूलभूत तत्त्व आणि त्याचे परिणत स्वरूप

वरील टीकेचा आपण आता थोडा खोलात जाऊन विचार करू या. जिल्हा परिषदेच्या कारभाराबाबत एक गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे. ती म्हणजे जिल्हा परिषदेची सर्व यंत्रणा एका मूलभूत तत्त्वावर उभारलेली आहे. हे तत्त्व म्हणजे तिचे धोरण ठरविणे आणि त्याची अंमलबजावणी करणे या कामात केलेली फारकत होय. नव्या कायद्यांनी जिल्हा परिषदांना जिल्ह्याचा विकास कसा करावा यासंबंधीचे धोरण ठरविण्याचा अधिकार दिला आहे. जिल्ह्यात किती शाळा असाव्यात ? त्या कोणत्या ठिकाणी निघाव्या ? हा धोरणाचा भाग झाला. ती सत्ता जिल्हा परिषदांची आहे. परंतु या कायद्याने धोरण ठरविणे आणि त्याची अंमलबजावणी करणे या दोन भागात फारकत केलेली असल्यामुळे वरील धोरणाची अंमलबजावणी करण्याचे काम त्यानी एका स्वतंत्र यंत्रणेकडे दिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीने हे तत्त्व महत्त्वाचे आहे असे मला वाटते. हिंदुस्थानातील गेल्या ५०–६० वर्षांचा इतिहास याच तत्त्वाच्या बाजूने साक्ष देत आहे. महाराष्ट्रात १९२३ च्या प्राथमिक शिक्षण-विषयक कायद्याने लोकनियुक्त प्रतिनिधीकडे वरील दोन्हीही कामे सोपविली होती. परंतु १५ वर्षांच्या अनुभवाने १९३८ साली वरील दोन कामात फारकत केली. १९४७ च्या कायद्यात तर ही फारकत आणखी जास्त स्पष्ट केली. जुन्या मुंबई राज्यातील नगरपालिकांच्या कायद्यातही आपणास याचाच प्रत्यय येतो. यात जुन्या मुंबई राज्यात नगरपालिकांसंबंधी मुख्यतः १९०१, १९२५, १९३६ व १९५० साली चार कायदे झाले. या चारही कायद्यांनी प्रत्येक वेळी वरील दोन कामात अधिकाधिक फारकत केली आहे. महाराष्ट्रातील महापालिकांचा कायदा हा या ५० वर्षातील विचारप्रवाहाचे केवळ परिणत स्वरूप आहे. जुन्या मुंबई राज्याप्रमाणे भारतातील इतर प्रांतातही थोड्याफार फरकाने आपणास असेच दिसून येईल. भारतात गेल्या ५० वर्षांत आपणास जसा हा प्रवाह दिसतो त्याचप्रमाणे तो जगातील इतर देशातही दिसतो. अमेरिकेमध्ये वरील तत्त्वावर उभारलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रमाण सतत वाढत आहे. पहिल्या महायुद्धानंतर तेथे अशा संस्थाचे प्रमाण शेकडा ६ होते. ते आता जवळ जवळ ५०।५२ टक्के झाले आहे. युरोपमध्ये देखील या तत्त्वावर उभारलेल्या

स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रमाण सतत वाढत आहे. जगभर लोकप्रिय होत असलेल्या मूलभूत तत्त्वावरच महाराष्ट्रातील जिल्हापरिषदांची उभारणी झाली आहे. त्यामुळे आपले हे तत्त्व पुष्कळच निर्दोष व समाधानकारक आहे असे मला वाटते. जिल्हा परिषदांच्या सभासदांनी या प्रश्नाकडे अधिक व्यापक दृष्टीने पाहावे असे मला वाटते. दैनंदिन कारभारविषयक सत्ता हीच खरी सत्ता आहे अशी जी त्यांची समजूत झाली आहे ती त्यानी पुन्हा तपासली पाहिजे. जिल्हा विकासाचे धोरण ठरविणारी सत्ता ही सुद्धा अत्यंत महत्त्वाची सत्ता आहे हे त्यानी लक्षात घेतले पाहिजे. किंबहुना तिच खरी सत्ता आहे हे त्यानी समजून घेतले पाहिजे असे मला वाटते.

## हा अटळ प्रवाह

जिल्हा परिषदांकडे उत्पन्नाच्या स्वतःच्या बाबी फारशा नाहीत. त्यांच्या एकूण उत्पन्नापैकी ९० टक्के उत्पन्न सरकारी अनुदानाचे आहे. त्यामुळे स्वाभाविकच सरकारचे आर्थिक नियंत्रण त्यांच्यावर फार आहे, असा एक आक्षेप वारंवार घेण्यात येतो. मला याबाबतीत एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणावयाची आहे ती अशी की, गेली काही वर्षे कर शक्य तेवढे वरच्या पातळीवर गोळा करावेत व खाली ते अनुदानाच्या रूपाने द्यावेत असा प्रवाह दिसतो. याचे एक कारण असे की, नवा कर बसविणे अथवा तो वसूल करणे वरच्या पातळीवरच्या सरकारला अधिक शक्य असते. स्थानिक पातळीवर जसजसे खाली जावे तसतसे नवा कर बसविणे वा बसवलेला कर वसूल करणे अवघड होत जाते. याचा प्रत्यय आपल्याला जिल्हा, राज्य व केंद्र यांच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास केल्यास झटकन येतो. गेल्या पंधरा वर्षांत राज्य सरकारने नवे कर बसवून आपले उत्पन्न जवळ जवळ २५० ते ३०० पट वाढविलेले आहे. उलट स्थानिक स्वराज्य संस्थांनी २५ ते ३० टक्क्यांनी देखील आपले उत्पन्न वाढविलेले नाही. एका दृष्टीने हा प्रवाह अटळ आहे. हा प्रवाह जसा आपल्याला आपल्या देशात दिसतो तसाच तो अमेरिका व युरोपमधील काही देशातूनही दिसतो. हा प्रवाह अटळ असल्यामुळे यातून दुसरा मार्ग दिसत नाही. राज्यसरकारने ९० टक्के जर अनुदान दिले तर दिलेला पैसा योग्य कारणासाठीच वापरला जातो की नाही हे पाहणे राज्यसरकारचे कर्तव्य आहे.

केंद्रसरकार देखील राज्यसरकारला देत असलेला पैसा अशा तऱ्हेने त्याच कामासाठी वापरला जातो किंवा नाही हे पहात असते. इतकेच नव्हे तर युनोकडून भारताला मिळालेली मदत त्याच कामासाठी खर्च होते की नाही हे त्यांनी पाहिले तर त्यात वावगे असे काय आहे ? फक्त या बाबतीत नको इतके ताठर धोरण असू नये, ते लवचिक असावे म्हणजे जिल्हा परिषदांना देखील त्रास वाटणार नाही.

## ह्या टीका मूलगामी नाहीत

सहकारी सोसायट्यांबद्दल देखील ऐकू येत असलेली टीका मूलगामी स्वरूपाची नाही. सहकारी सोसायट्या जिल्हा परिषदांच्या पूर्णपणे नियंत्रणाखाली द्याव्या हा विचार दोन कारणांसाठी मान्य करता येत नाही. पहिली गोष्ट अशी की या दोन संस्थांच्या स्वरूपातच महत्त्वाचा फरक आहे. सहकारी सोसायट्या या व्यवसायसंघटना तर जिल्हा परिषदा राजकिय संघटना आहेत. त्यामुळे सहकारी सोसायट्यांना राजकीय संघटनांच्या नियंत्रणाखाली देणे कितपत योग्य होईल याचा गंभीरपणे विचार झाला पाहिजे. दुसरे असे की, जिल्हा परिषदांची उभारणी जशी लोकशाही तत्त्वावर झालेली आहे. त्याचप्रमाणे सहकारी सोसायट्यांचीही उभारणी पूर्णपणे लोकशाही तत्त्वावरच झाली आहे. एकच तत्त्व दोन्हीही ठिकाणी आहे. मग एक लोकशाही संघटना दुसऱ्या लोकशाही संघटनेच्या नियंत्रणाखाली पूर्णपणाने द्यावी असा आग्रह कसा धरता येईल ? जिल्ह्यातील सार्वजनिक रस्ते, शिक्षण, आरोग्य, यासारखी खाती जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली दिलेली आहेत. परंतु म्हणून सहकारी सोसायट्यांचेही खाते तसेच पूर्णपणे जिल्हापरिषदांच्या नियंत्रणाखाली द्यावे असे कसे म्हणता येईल ? सहकारी सोसायट्या आणि सार्वजनिक आरोग्य, रस्ते, शिक्षण यासारखी खाती यामध्ये आपणास फरक केला पाहिजे. या दृष्टीने महाराष्ट्र राज्य सरकारने आज स्वीकारलेले धोरण विचारपूर्वक स्वीकारलेले आहे असे वाटते.

## विकेंद्रीकरणास जिल्हा हाच घटक योग्य

आपल्या जिल्हा परिषदेसाठी जिल्हा हा घटक धरलेला आहे त्याऐवजी

तालुका हा घटक मानावा अशी सूचना अधूनमधून करण्यात येते. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने मला ही सूचना योग्य वाटत नाही. सत्तेचे मोठ्या प्रमाणावर विकेंद्रीकरण करावयाचे असेल तर त्यासाठी जिल्हा हाच घटक स्वीकारला पाहिजे. तालुका पातळीवर सत्तेचे मोठ्या प्रमाणात विकेंद्रीकरण होऊ शकणार नाही. याची ढोबळ मानाने दोन कारणे सांगता येतील. पाहिले असे की, तालुका पातळीवर प्रथम श्रेणीतील आय. ए. एस. च्या तोडीचे अधिकारी मिळू शकणार नाहीत. ते काम जिल्हा पातळीवरच होऊ शकेल. तालुका पातळीवर फक्त मामलेदार किंवा बी. डी. ओ. सारखे अधिकारी मिळू शकतील. यामुळे स्वाभाविकच त्यांच्यावर सोपविल्या जाणाऱ्या कामास मर्यादा पडतील. आय. ए. एस्. च्या तोडीच्या अधिकाऱ्याकडे जेवढी मोठी कामे आपण सोपवू शकू, तेवढी मोठी कामे आपण मामलेदार किंवा बी. डी. ओ. च्या श्रेणीतील अधिकाऱ्याकडे सोपवू शकत नाही. दुसरे असे की, तालुका पातळीपेक्षा जिल्हा पातळीवर राजकीय नेतृत्व अधिक कार्यक्षम व व्यापक दृष्टीचे मिळण्याचा संभव असतो. खेड्यापेक्षा तालुक्यावर, तालुक्यापेक्षा जिल्हा पातळीवर व जिल्हा पातळी-पेक्षा राज्य पातळीवर आपल्याला अधिकाधिक कार्यक्षम नेतृत्व मिळण्याचा संभव असतो. त्यामुळे जिल्हा पातळीवरील नेतृत्वाकडे अधिक व्यापक स्वरूपाची कामे सोपविणे शक्य असते. या दृष्टीने आपल्या जिल्हा परिषदेच्या कायद्यात तालुक्याऐवजी जिल्हा हा घटक धरला ते योग्य झाले असे मला वाटते.

सध्याच्या लोकशाही विकेंद्रीकरणाच्या संदर्भात मला आणखी एक मुद्दा स्पष्ट करावसा वाटतो तो असा की, आपले आजचे विकेंद्रीकरण आणि गांधीवादी तत्त्वज्ञानातील विकेंद्रीकरणामध्ये मूलभूत फरक आहे. गांधीवादामध्ये सर्वोदयवादी तत्त्वज्ञानात अभिप्रेत असलेले विकेंद्री-करण स्वयंपूर्ण ग्रामरचनेवर उभारलेले आहे. त्यामध्ये जास्तीत जास्त सत्ता खेडे व तालुका घटकाकडे आहे व कमीत कमी सत्ता राज्य व केंद्र सरकारकडे आहे. खेड्यापासून जसे जसे वर जावे तसे तसे अधिकार, कामेही कमी कमी होत जातात. थोडक्यात म्हणजे गांधीवादी समाजरचना पिरॅमिडच्या तत्त्वावर उभारलेली आहे. उलट सध्याच्या विकेंद्रीकरणामध्ये आपण केंद्र व राज्यसरकार महत्त्वाचे मानले आहे. अशाच तऱ्हेचे विकेंद्रीकरण आपल्याकडे न्यायमूर्ती रानडे, ना. गोखले, लोकमान्य टिळक, दादाभाई नौरोजी, प्राचार्य आगरकर इत्यादी विचार–

केंद्रसरकार देखील राज्यसरकारला देत असलेला पैसा अशा तऱ्हेने त्याच कामासाठी वापरला जातो किंवा नाही हे पहात असते. इतकेच नव्हे तर युनोकडून भारताला मिळालेली मदत त्याच कामासाठी खर्च होते की नाही हे त्यांनी पाहिले तर त्यात वावगे असे काय आहे ? फक्त या बाबतीत नको इतके ताठर धोरण असू नये, ते लवचिक असावे म्हणजे जिल्हा परिषदांना देखील त्रास वाटणार नाही.

### ह्या टीका मूलगामी नाहीत

सहकारी सोसायट्यांबद्दल देखील ऐकू येत असलेली टीका मूलगामी स्वरूपाची नाही. सहकारी सोसायट्या जिल्हा परिषदांच्या पूर्णपणे नियंत्रणाखाली द्याव्या हा विचार दोन कारणांसाठी मान्य करता येत नाही. पहिली गोष्ट अशी की या दोन संस्थांच्या स्वरूपातच महत्त्वाचा फरक आहे. सहकारी सोसायट्या या व्यवसायसंघटना तर जिल्हा परिषदा राजकिय संघटना आहेत. त्यामुळे सहकारी सोसायट्यांना राजकीय संघटनांच्या नियंत्रणाखाली देणे कितपत योग्य होईल याचा गंभीरपणे विचार झाला पाहिजे. दुसरे असे की, जिल्हा परिषदांची उभारणी जशी लोकशाही तत्त्वावर झालेली आहे. त्याचप्रमाणे सहकारी सोसायट्यांचीही उभारणी पूर्णपणे लोकशाही तत्त्वावरच झाली आहे. एकच तत्त्व दोन्हीही ठिकाणी आहे. मग एक लोकशाही संघटना दुसऱ्या लोकशाही संघटनेच्या नियंत्रणाखाली पूर्णपणाने द्यावी असा आग्रह कसा धरता येईल ? जिल्ह्यातील सार्वजनिक रस्ते, शिक्षण, आरोग्य, यासारखी खाती जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली दिलेली आहेत. परंतु म्हणून सहकारी सोसायट्यांचेही खाते तसेच पूर्णपणे जिल्हापरिषदांच्या नियंत्रणाखाली द्यावे असे कसे म्हणता येईल ? सहकारी सोसायट्या आणि सार्वजनिक आरोग्य, रस्ते, शिक्षण यासारखी खाती यामध्ये आपणास फरक केला पाहिजे. या दृष्टीने महाराष्ट्र राज्य सरकारने आज स्वीकारलेले धोरण विचारपूर्वक स्वीकारलेले आहे असे वाटते.

### विकेंद्रीकरणास जिल्हा हाच घटक योग्य

आपल्या जिल्हा परिषदेसाठी जिल्हा हा घटक धरलेला आहे त्याऐवजी

तालुका हा घटक मानावा अशी सूचना अधूनमधून करण्यात येते. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने मला ही सूचना योग्य वाटत नाही. सत्तेचे मोठ्या प्रमाणावर विकेंद्रीकरण करावयाचे असेल तर त्यासाठी जिल्हा हाच घटक स्वीकारला पाहिजे. तालुका पातळीवर सत्तेचे मोठ्या प्रमाणात विकेंद्रीकरण होऊ शकणार नाही. याची ढोबळ मानाने दोन कारणे सांगता येतील. पाहिले असे की, तालुका पातळीवर प्रथम श्रेणीतील आय. ए. एस. च्या तोडीचे अधिकारी मिळू शकणार नाहीत. ते काम जिल्हा पातळीवरच होऊ शकेल. तालुका पातळीवर फक्त मामलेदार किंवा बी. डी. ओ. सारखे अधिकारी मिळू शकतील. यामुळे स्वाभाविकच त्यांच्यावर सोपविल्या जाणाऱ्या कामास मर्यादा पडतील. आय. ए. एस्. च्या तोडीच्या अधिकाऱ्याकडे जेवढी मोठी कामे आपण सोपवू शकू, तेवढी मोठी कामे आपण मामलेदार किंवा बी. डी. ओ. च्या श्रेणीतील अधिकाऱ्याकडे सोपवू शकत नाही. दुसरे असे की, तालुका पातळीपेक्षा जिल्हा पातळीवर राजकीय नेतृत्व अधिक कार्यक्षम व व्यापक दृष्टीचे मिळण्याचा संभव असतो. खेड्यापेक्षा तालुक्यावर, तालुक्यापेक्षा जिल्हा पातळीवर व जिल्हा पातळीपेक्षा राज्य पातळीवर आपल्याला अधिकाधिक कार्यक्षम नेतृत्व मिळण्याचा संभव असतो. त्यामुळे जिल्हा पातळीवरील नेतृत्वाकडे अधिक व्यापक स्वरूपाची कामे सोपविणे शक्य असते. या दृष्टीने आपल्या जिल्हा परिषदेच्या कायद्यात तालुक्याऐवजी जिल्हा हा घटक धरला ते योग्य झाले असे मला वाटते.

सध्याच्या लोकशाही विकेंद्रीकरणाच्या संदर्भात मला आणखी एक मुद्दा स्पष्ट करावसा वाटतो तो असा की, आपले आजचे विकेंद्रीकरण आणि गांधीवादी तत्त्वज्ञानातील विकेंद्रीकरणामध्ये मूलभूत फरक आहे. गांधीवादामध्ये सर्वोदयवादी तत्त्वज्ञानात अभिप्रेत असलेले विकेंद्रीकरण स्वयंपूर्ण ग्रामरचनेवर उभारलेले आहे. त्यामध्ये जास्तीत जास्त सत्ता खेडे व तालुका घटकाकडे आहे व कमीत कमी सत्ता राज्य व केंद्र सरकारकडे आहे. खेड्यापासून जसे जसे वर जावे तसे तसे अधिकार, कामेही कमी कमी होत जातात. थोडक्यात म्हणजे गांधीवादी समाजरचना पिरॅमिडच्या तत्त्वावर उभारलेली आहे. उलट सध्याच्या विकेंद्रीकरणामध्ये आपण केंद्र व राज्यसरकार महत्त्वाचे मानले आहे. अशाच तऱ्हेचे विकेंद्रीकरण आपल्याकडे न्यायमूर्ती रानडे, ना. गोखले, लोकमान्य टिळक, दादाभाई नौरोजी, प्राचार्य आगरकर इत्यादी विचार-

वंतांनी पुरस्कारलेले होते. गांधीवादातील विकेंद्रीकरण व वरील विचारवंतांचे विकेंद्रीकरण यामध्ये मूलभूत फरक आहे. आजचे आपले विकेंद्रीकरण गांधीवादी विकेंद्रीकरणापेक्षा वरील विचारवंतांच्या विकेंद्रीकरणाला अधिक जवळचे आहे. आजच्या औद्योगिक क्रांतीच्या युगात कदाचित सध्याचेच विकेंद्रीकरण अधिक आवश्यक आणि उपयुक्त ठरणार आहे असे वाटते.

## नवनेतृत्वाचा खळाळणारा झरा

महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांचे सगळयात मोठे यश कोणते असेल तर त्या जिल्हा परिषदातून निर्माण झालेले नवे स्थानिक नेतृत्व हे होय. ही एकच गोष्ट इतकी महत्त्वाची आहे की, त्यापुढे मी इतर गोष्टीकडे दुर्लक्ष करीन. हे स्थानिक नेतृत्व मुख्यतः जिल्हा पातळीवर निर्माण झाले आहे. तालुका पातळीवर निर्माण व्हायला सुरुवात झाली आहे. खेड्याच्या पातळीवर जायला कदाचित आपल्याला आणखी काही वर्षे थांबावे लागेल. जिल्हा पातळीवरील आजच्या नेतृत्वाचे एक वैशिष्ट्य असे की, ते पूर्वीच्या नेतृत्वापेक्षा अधिक गतिमान आहे. पूर्वीचे नेतृत्व तुलनात्मकदृष्टया अधिक पुराणमतवादी असे वाटते. दुसरे असे की, जिल्हा पातळीवर आता तरुण नेतृत्वाचा उदय होऊ लागला आहे. पूर्वी साधारणपणे ५०–६० या वयाच्या गटातील नेतृत्वच प्रामुख्याने जिल्हा पातळीवर होते. आता ४० ते ५० या वयाच्या गटातील तरुण नेतृत्व जिल्हा पातळीवर दिसू लागले आहे. महाराष्ट्राच्या भावी विकासाच्या दृष्टीने असे तरुण नेतृत्व पुढे येणे किती तरी महत्त्वाचे आणि स्वागतार्ह म्हटले पाहिजे. या नेतृत्वाबाबत आणखी एक गोष्ट महत्त्वाची आहे ती अशी की, जिल्हा पातळीवरील आजचे नेतृत्व उद्या राज्य-पातळीवर देखील खंबीरपणे काम करू शकेल असा नवा विश्वास आता वाटू लागला आहे. नेतृत्वाचा झरा जसा या देशातील १४ राज्यातून केंद्राकडे वाहिला पाहिजे त्याचप्रमाणे राज्यातही तो २०–२५ जिल्ह्यातून जिल्हापातळी-कडून तो राज्यपातळीकडे वाहात राहिला पाहिजे. नेतृत्वाचा असा झरा सतत खळखळत राहिला तर लोकशाहीस त्यामध्ये नवे आश्वासन मिळत असते. आजच्या जिल्हा परिषदातून आपल्या राज्याची ही महत्त्वाची गरज भागवली जाईल असा मला विश्वास वाटतो.

# नवनेतृत्वाचे हुंकार आणि वैचारिक क्रांती

सध्याच्या स्थानिक नेतृत्वाचे जरी मी स्वागत करणारांपैकी असलो तरी त्याना काही इशारेही द्यावेत असे मला वाटते. पहिली गोष्ट अशी की, आमचे हे नेतृत्व वैचारिकदृष्ट्या अतिशय मजबूत, भक्कम असले पाहिजे. पुढारी हा लोकांना ' पुढे ' नेणारा असा पाहिजे. अर्थात तो वैचारिक दृष्टया पुढे नेणारा असला पाहिजे. आमच्या स्थानिक नेतृत्वाच्या लोकशाही, समाजवाद, धर्मपंथातीत राज्य इत्यादीसंबंधीच्या कल्पना स्पष्ट असल्या पाहिजेत. या जिल्हापातळीवरील नेतृत्वाला आमच्या जीवनात फार महत्त्वाचे स्थान आहे. याचे कारण आता ८० टक्के लोकांचा संबंध या नेतृत्वाशीच येत असल्यामुळे आमच्या या स्थानिक नेतृत्वाला लोकांची दैनंदिन कामे केली पाहिजेत, परंतु त्याचबरोबर त्याना नवे महत्त्वाचे विचार दिले पाहिजेत. माणसाच्या मेंदूमध्ये अॅटमबॉंबची शक्ती आहे. ही आमच्या नेतृत्वाने जागी केली पाहिजे. यातूनच वैचारिक क्रांती जन्माला येणार आहे. आमच्या स्थानिक नेतृत्वाने त्या वैचारिक क्रांतीचे पाईक बनले पाहिजे. त्यातूनच आमच्या खेड्यापाड्यातील जीवनाची चेहरेपट्टी बदलणार आहे. आमचे आजचे स्थानिक नेतृत्व या दिशेनेही नेतृत्व करील व फार मोठ्या वैचारिक क्रांतीस हातभार लावील असा मला विश्वास वाटतो.

१

# लोकमान्य टिळक : एक व्यक्तिमत्त्व

लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीनिमित्त आपण आज टिळक भवनात जमलो आहोत. लोकमान्य टिळकांच्या नावावर सुरू झालेल्या टिळक भवनमध्ये ही टिळक पुण्यतिथी आपण साजरी करीत आहोत, ही मोठी औचित्यपूर्ण घटना आहे. लोकमान्य टिळकांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी आपण या महाराष्ट्र काँग्रेसच्या इमारतीला टिळक भवन हे नामाभिधान केले आहे. त्यांचे आपल्या राष्ट्रीय चळवळींवरील ऋण व्यक्त करण्याची भावना यामागे आहे. टिळकांच्या या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांच्या विचारांचा मागोवा घेऊन त्यांचा कोणता वारसा आज आपल्याला उपयोगी पडेल वा मार्गदर्शक ठरेल यासंबंधीचे विवेचन मी आपल्यासमोर थोडक्यात करणार आहे.

## टिळकपूर्व राजकीय पर्व : जहाल क्रांतिकारक

लोकमान्य टिळकांच्या राजकीय कार्यांचे मूल्यमापन करायचे तर त्यांच्या काळातील राजकीय परिस्थिती काय होती याचा आपल्याला धावता

' टिळक भवन ', मुंबई, टिळक पुण्यतिथी

आढावा घ्यावा लागेल. त्यांच्या काळातील राजकीय जीवनाच्या पार्श्वभूमीवरच आपणाला त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करता येईल. लोकमान्य टिळकांचा राजकीय जीवनाचा कालखंड म्हणजे ढोबळ मानाने १८८० ते १९२० हा कालखंड ठरवावा लागेल. या काळात भारतीय स्वातंत्र्याची जाणीव येथील जनमानसात रुजू लागली होती. १८५७ च्या बंडाचा धक्का सरकारला व जनतेला बसला होता. या धक्क्यातून या काळात देश बाहेर पडला होता. इंग्रजी शिक्षण घेतलेली एक नवी पिढीच्या पिढी या देशात तयार झाली होती. राजकीय गुलामगिरीची खंत त्यांच्या मनात निर्माण होऊ लागली होती. राजकीय स्वातंत्र्याच्या आकांक्षा वाढीला लागल्या होत्या. राजकीय स्वातंत्र्याची भावना जरी येथील जनमानसात रुजू लागली होती तरी स्वातंत्र्यप्राप्तीचा नेमका मार्ग कोणता याची मात्र स्पष्ट कल्पना त्याना आली नव्हती. अशा या काळात स्वातंत्र्यप्राप्तीचे दोन मार्ग देशासमोर आले. पहिला मार्ग दहशतवादी क्रांतिकारकांचा. वासुदेव बळवंत हे या विचारप्रवाहाचे प्रमुख प्रवक्ते. पुढे याच परंपरेमध्ये स्वातंत्रवीर सावरकर, सेनापती बापट व बंगालमधील काही क्रांतिकारक पुढे आले. हातात बॉंब घेऊन गोऱ्या अधिकाऱ्याना ठार करणे व त्याना या देशातून हाकलून लावणे हा यांचा प्रमुख मार्ग होता. त्याप्रमाणे काही शहरांतून गोऱ्या अधिकाऱ्यावर बॉंब टाकून त्याना मारण्याचाही प्रयत्न केला. या दहशतवादी क्रांतिकारक तरुणांच्या मनातील ध्येयवाद थोर होता. त्यांचे स्वातंत्र्यप्रेम जळजळीत होते. आत्मयज्ञ करण्याची त्यांची मनाची तयारीही होती. ती उल्लेखनीय आणि अभिमानास्पद होती. परंतु मनातील ध्येयवाद कितीही थोर असला तरी त्यांचा हा दहशतवादाचा मार्ग देशाला फार पुढे घेऊन जाऊ शकत नव्हता. त्याचे एक साधे कारण असे की, औद्योगिक क्रांतीनंतर राज्यसंस्थेचे सारे स्वरूपच पालटून गेले होते. मध्ययुगातील राज्यसंस्था अतिशय दुबळी होती. १०-५ लोकांना ठार करून राज्ययंत्रणा ताब्यात घेता येत होती. परंतु औद्योगिक क्रांतीनंतर हे चित्र पार बदलून गेले. राज्यसरकारे अतिशय बळकट झाली. दळणवळणाची साधने प्रभावी झाली. शिवाय युद्धातील विध्वंसक शस्त्रे फार मोठ्या प्रमाणावर राज्यसंस्थेच्या हातात आली. अशा या काळात केवळ १०-५ गोऱ्या अधिकाऱ्याना गोळ्या घालून स्वातंत्र्य मिळविणे शक्य नव्हते.

त्यामुळे या दहशतवाद्याबद्दल योग्य तो आदर बाळगून देखील असे म्हणावेसे वाटते की, जरी त्यांच्या अंतःकरणातील स्वातंत्र्यप्रेम जळजळीत होते, तरी पण देशाला स्वातंत्र्य मिळवून द्यायला त्यांचा मार्ग उपयोगी नव्हता.

## मवाळांचे राजकारण

या दहशतवाद्यांप्रमाणे देशात दुसरा एक विचारप्रवाह होता. तो म्हणजे मवाळांचा. न्यायमूर्ती रानडे, ना. गोखले, दादाभाई नौरोजी हे या विचारप्रवाहाचे प्रतिनिधी. यांचा सनदशीर मार्गावर फार मोठा विश्वास होता. इंग्लंडमधील पार्लमेंटच्या सभासदांना आपण आवाहन केले, त्यांच्यातील सदिच्छा आणि सद्‌भावना जागृत केल्या तर या देशाला स्वातंत्र्य मिळेल, निदान या देशाची या दिशेने खूप प्रगति होईल अशी त्यांची श्रद्धा होती. त्यामुळे त्याची सर्व भाषणे इंग्रज अधिकारी, इंग्लंडमधील पार्लमेंटचे सभासद याना उद्देशूनच केलेली होती. इंग्लंडमधील पार्लमेंटच्या सद्‌भावनांवर त्यांची सर्व मदार होती. काही अंशी ते खरही असे परंतु याला देखील मर्यादा असतात आणि या मर्यादांची खोल जाणीव या मवाळ मार्गामध्ये फारशी दिसत नव्हती. एक तर हा मार्ग अतिशय मंद गतीचा होता आणि दुसरे या मार्गाने आपण इंग्रजाना घालवून देऊ शकू की नाही याबद्दलही देशात सर्वत्रच शंका होती. त्यामुळे हा मार्गही स्वातंत्र्यप्राप्तीला अपुरा आहे याची जाणीव देशात होऊ लागली होती.

## टिळक : सदनशीर
## जहाल राष्ट्रवादाचे जनक

दहशतवादी हे केवळ बॉम्बसारख्या मार्गावर अवलंबून होते. त्यामुळे तो मार्ग अपुरा होता, तर येथील मवाळ फारच मवाळ वाटेने जाणारे असल्यामुळे तोही मार्ग देशाला फार पुढे नेऊ शकत नव्हता. देश अशा वेळी एका कोंडीत सापडला होता. अशा या काळात लोकमान्य टिळक आमच्या राजकीय जीवनात पुढे आले. व त्यानी देशाला तिसरा मार्ग दाखविला. लोकमान्य टिळकानी दहशतवाद्यांचा जहालपणा घेतला व मवाळांचा सनदशीर मार्ग स्वीकारला. आणि सनदशीर मार्गामध्ये जितका जास्तीत जास्त जहालपणा ओतता येईल तितका

ओतण्याचा प्रयत्न केला. याला आपण जहाल राष्ट्रवादाचा तिसरा मार्ग म्हणू या. लोकमान्य टिळकानी या काळात घटनेच्या चौकटीत बसून, कायद्याचा काटेकोरपणा सांभाळून जितक्या जहाल मार्गाचा अवलंब करता येईल तितका केला. लोकमान्य टिळकांच्या या तिसऱ्या मार्गाचे इतके महत्त्व आहे की, या काळात लोकमान्य टिळकांनी जर हा मार्ग दाखविला नसता तर वरील दोन्हीही मार्गांनी आपली स्वातंत्र्याची चळवळ फारशी पुढे गेली नसती. या दृष्टीने लोकमान्य टिळकानी आपल्या कार्याने येथील राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासात अत्यंत मोलाचे कार्य केले असे म्हणावे लागेल.

## तत्कालीन आशियाचा झुंझार नरकेसरी

लोकमान्यानी जहालपणा स्वीकारताना आपल्या मागणीमागे लोकांच्या शक्तीचे अधिष्ठान उभे करण्याचा प्रयत्न केला. लोकमताचे सरकारवर दडपण आणण्याचा नवा उपक्रम सुरू केला. लोकमान्य टिळकांचे वैशिष्ट्य हेच की, ज्या वेळी इतर लोक राजमान्य बनण्याचा प्रयत्न करीत होते त्या वेळी राजमान्यतेकडे पाठ फिरवून त्यानी लोकमान्य होण्याचा प्रयत्न केला. आपल्या प्रत्येक विचारामध्ये जागृत लोकमताचे सामर्थ्य उभे करण्याचे त्यानी प्रयत्न केले. त्यांच्या काळात दुष्काळ, प्लेग व हिंदु-मुस्लिम दंगे हे तीन प्रमुख प्रश्न होते. या प्रत्येक प्रश्नाच्या वेळी त्यानी लोकमताला आवाहन करून हे सरकार लोकांच्या जीवनाशी कसा क्रूर खेळ खेळत आहे हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला. विशेषतः प्लेग आणि दुष्काळ या प्रश्नावर त्यानी सरकारी कारभारावर जी कडक टीका केली आहे ती खरोखरीच अतिशय उल्लेखनीय आहे. लोकमान्य टिळकांच्या इतकी जहाल टीका त्या वेळी सर्व हिंदुस्थानात कुणी करू शकत नव्हता. त्यानी आपल्या वृत्तपत्राला "केसरी" म्हणजे "सिंह" नाव दिले होते. एका दृष्टीने ते फार अर्थपूर्ण होते. त्यांच्या केसरीतल्या लेखात सिंहाची निर्भयता होती! शत्रूला लोळविण्याची जिद्द् आणि हिंमत होती! मी तर असे म्हणेन की, त्या वेळी हिंदुस्थानप्रमाणे सर्व आशियात स्वातंत्र्याच्या चळवळी सुरू झाल्या होत्या. स्वातंत्र्याच्या रणगर्जना होत होत्या. मलाया, ब्रह्मदेश, इंडोनेशिया, इंडोचायना यासारख्या अनेक देशांमधून स्वातंत्र्यप्राप्ती-

साठी लोकनेते पुढे येत होते. परंतु लोकमान्य टिळकांच्या कार्याचा आणि मार्गाचा विचार केला तर, सबंध आशियामध्ये त्यांच्याइतकी निर्भयता फार थोड्या लोकनेत्यात दिसून येईल. कदाचित लोकमान्य टिळक हे या बाबतीत सर्व आशियामध्ये एकमेव कणखर झुंजार राजकीय नेते असतील! लोकमान्य टिळकांचे हे वेगळेपण, आशियाच्या पार्श्वभूमीवर पटकन नजरेत भरते. लोकमान्य टिळकांच्या समोर यामुळेच आपले मस्तक नम्र होते!

### लोककल्याणकारी राज्याचा द्रष्टा चिंतक

लोकमान्य टिळकांचे दुसरे वैशिष्ट्य असे की, त्या काळातही त्यानी एका दृष्टीने आजच्या लोककल्याणकारी राज्याची कल्पना मांडलेली दिसते. सरकारने येथील सहकारी चळवळीला जर मदत केली नाही तर सहकारी चळवळ वाढू शकत नाही असे त्यानी १९०३ सालातील काही लेखातून म्हटलेले आहे. त्या वेळी सहकारी चळवळ अगदीच बाल्यावस्थेत होती. या काळात सहकारी चळवळीचा आर्थिक व्यवहार परस्पर लोकानी भागवावा अशी सरकारची दृष्टी होती. परंतु खेड्यापाड्यातील लोक इतके गरीब, अशिक्षित आहेत की, त्यांच्यावर हा सर्व व्यवहार सोपवून त्यातून काही फारसे साधेल असे त्याना वाटत नव्हते. सरकारचे हे धोरण चुकीचे आणि कातडीबचावूपणाचे आहे अशी टीका त्यानी त्या वेळी केली होती.

"शेतकऱ्यांच्या परस्पर साह्यकारी पेढ्या" या लेखात ते म्हणतात, "शेतकऱ्यांचे कल्याण व्हावे अशी सरकारची इच्छा आहे खरी, पण इच्छेप्रमाणे पैसा खर्च करण्यास त्यांचा हात चालत नसल्यामुळे लोकानी कितीही उपाय सुचविले तरी त्यापैकी परभारे किंवा परस्पर भागण्यासारखा जो उपाय तेवढाच सरकारास पसंत पडतो, असे म्हणणे भाग पडते." सहकारी चळवळीच्या वाढीसंबंधी लोकमान्य टिळकांनी केलेले हे विधान आता ५०-६० वर्षांनंतर अधिक खरे वाटू लागले आहे. १९५३-५४ साली रिझर्व्ह बँकेमार्फत शेती कर्ज पाहणीचा एक अहवाल प्रसिद्ध झाला. या अहवालात असे म्हटले आहे की, सरकारने सहकारी चळवळीला भांडवलाच्या रूपाने मदत केली नाही तर ती चळवळ वाढू शकत नाही. शेतकरीही कर्जातून मुक्त होऊ शकत नाही.

यासाठी सरकारने चळवळीला भांडवल पुरविले पाहिजे व तीत भागीदारीही घेतली पाहिजे; असा विचार मांडला आहे. ही सूचना त्यानंतर पुष्कळ अंशी मान्य झाली. त्यानंतर गेल्या १० वर्षांत या चळवळीची प्रगती किती झपाट्याने झाली आहे हे आपण पाहतो आहोत. लोकमान्य टिळकानी वरील विचारातून एका दृष्टीने आजच्या लोककल्याणकारी राज्याच्या कल्पनेचा पुरस्कार केला आहे. त्यांचा हा वारसा आजच्या आपल्या काळातही विशेष महत्त्वाचा आहे.

## लोकशक्ती : टिळकांनी दिलेला वारसा

लोकमान्य टिळकाचे श्रेष्ठत्व आजच्या काळात मला एका महत्त्वाच्या गोष्टीत दिसते आणि ते म्हणजे त्यानी प्रत्येक मागणीमागे लोकमताचे सामर्थ्य उभे करण्याचा प्रयत्न केला. लोकशाहीमध्ये लोक हीच सर्वांत मोठी शक्ती असते. सर्वसामान्य माणूस हाच आपल्या जीवनाचा शिल्पकार असतो. सर्वसामान्य लोक हेच खरे आपले भाग्यविधाते असतात. त्यांच्यामधील शक्ती जागृत करणे हाच त्यामधील समाजरचनेचा महत्त्वाचा मार्ग असतो. लोकमान्य टिळक हे कोणाच्याही आश्रयाला गेले नाहीत किंवा केवळ सरकारमान्य होण्याचाही प्रयत्न त्यानी केला नाही; तर लोकशक्तीला आवाहन करून त्यांची मान्यता त्यानी प्राप्त केली. या दृष्टीने गांधींच्याही आधी त्यानी लोकजागृतीचा मार्ग देशाला दाखविला. एका दृष्टीने ते द्रष्टे होते. सामान्य माणसामधील शक्ती मोठी आहे याची जाणीव कुठेतरी त्यांच्या अंतःकरणात वावरत होती. लोकशाहीमध्ये ही जाणीव जितकी खोलवर रुजेल तितकी लोकशाही बळकट होईल. लोकामधील टिळकांचा हा वारसा केवळ आजच्या काळातच नव्हे तर भविष्य काळातही वाटचालीसाठी महासागरातील दीपगृहाप्रमाणे आपल्याला मार्गदर्शक ठरेल असा मला विश्वास वाटतो.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.......................... वि: ..................
क्रमांक.......................... नों दि..................

# १०

# पंडित जवाहरलाल नेहरू : एक व्यक्तिमत्व

पंडित नेहरूंच्या मृत्यूनंतर साजऱ्या होत असलेल्या या पहिल्याच त्यांच्या वाढदिवशी त्यांच्या संबंधीचे अनेक विचारतरंग मनात निर्माण होतात. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वेगळेपण चटकन नजरेत भरते. त्याचप्रमाणे भारतीय लोकशाहीला त्यांनी दिलेला समृद्ध वारसा डोळ्यासमोर येतो. त्यांच्या व्यक्तिमत्वासंबधी व जीवन-कार्यासंबंधी माझ्या मनात जे विचार आले आहेत तेच मी या निमित्ताने आपल्यासमोर मांडीत आहे.

### तीन तत्त्वज्ञानांचा मनोहर मिलाफ

पंडित नेहरूंच्या व्यक्तिमत्वाचे पहिले वेगळेपण असे की, त्यांच्यामध्ये इंग्लंडमधील उदारमतवाद, रशियातील समाजवाद व भारतातील गांधीवाद या तिन्ही तत्त्वज्ञानातील चांगल्या तत्त्वांचा अत्यंत सुदर मिलाफ झाला होता.

सातारा, दि. १४ नोव्हेंबर
नेहरू जयंती

इंग्लंडमधील उदारमतवादातून मानवाच्या व्यक्तिमत्वाबद्दल सखोल आदराची भावना त्यांच्या मनात निर्माण झाली होती. व्यक्ती लहान की थोर ही गोष्ट त्यांच्या दृष्टीने कधीच फारशी महत्त्वाची नव्हती. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वा बद्दल आदराची भावना त्यांच्या अंतःकरणात नांदत होती. त्याचप्रमाणे समाजवादातील आर्थिक समतेच्या प्रेरणेचेही त्यांना जबरदस्त आकर्षण होते. औद्योगिक क्रांतीनंतर निर्माण झालेल्या आर्थिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर आर्थिक समतेची प्रेरणा अतिशय प्रभावी ठरते. त्याचप्रमाणे गांधीवादातील साधन सुचितेच्या विचाराचा त्यांच्या मनावर खोल ठसा उमटला होता. राजकारणाला नैतिक बैठक मिळाली पाहिजे हा गांधीवादी नीतिशास्त्राचा गाभा. नेहरूंच्या मनावर या तत्त्वाची विलक्षण छाप पडली. त्यातही विशेष म्हणजे गांधींच्या मृत्यूनंतर गांधीवादातील या विचाराचा त्यांच्या मनावर विशेष परिणाम झाला होता. गांधींच्या मृत्यूनंतर अमेरिकेत कोलंबो विद्यापीठाने त्यांना पी. एच. डी. ही सन्मानदर्शक पदवी दिली होती. त्या वेळी नेहरूंनी व्याख्यानासाठी "साध्य आणि साधने" हा विषय निवडला होता. आधीच्या कोणत्याही लिखाणातून वा भाषणातून त्यानी कधी दिला नाही इतका भर या व्याख्यानातून नैतिक अधिष्ठानावर दिला. एका दृष्टीने वरील तिन्हीही तत्त्वज्ञाने विसाव्या शतकातील थोर तत्वज्ञाने आहेत. आणि या तिन्ही तत्त्वज्ञानांचा उत्तम मिलाफ म्हणजे नेहरूंचे व्यक्तिमत्व. नेहरूंच्या इतका या तिन्ही तत्त्वज्ञानांचा सुंदर मिलाफ विसाव्या शतकातील दुसऱ्या कोणत्याही विचारवंतात सापडणार नाही. नेहरूंच्या व्यक्तिमत्वाचे हे खास मनोहर वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल.

### स्वातंत्र्य सेनानी व आधुनिक शिल्पकार

नेहरूंचे दुसरे वेगळेपण असे की, नेहरू हे भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीचे एक थोर सेनानी होते. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारताची उभारणी करणारे ते एक शिल्पकार होते. स्वातंत्र्यप्राप्तीच्या झगड्यात जास्तीत जास्त त्याग करून ते मिळविणारे व स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही त्या स्वातंत्र्याचे शिल्प उभे करणारे एक शिल्पकार अशा दोन्ही भूमिका जगाच्या इतिहासात फार मोठ्या व्यक्तींच्या वाट्यास येतात. एका दृष्टीने या बाबतीत अमेरिकेच्या

इतिहासातील वॉशिंग्टन व रशियाच्या इतिहासातील लेनिन यांच्याशीच नेहरूंची तुलना होऊ शकेल. वॉशिंग्टन, लेनिन व नेहरू हे तिघेही आपापल्या देशातील स्वातंत्र्याचे वा क्रांतीचे प्रणेते होते. त्याचप्रमाणे स्वतंत्र राष्ट्राचे थोर भाग्यविधाते होते. तरी देखील या तिघांच्यामध्ये नेहरू अधिक भाग्यवान. त्याना आपल्या कर्तृत्वाला दीर्घ काळ मिळाला व या काळात त्यानी भारतातील मोठ्या प्रमाणावर उभारणी केली. नेहरूंचा भारतीय समाजाला मोठा वारसा म्हणजे त्यानी या देशाचे तोंड आधुनिकतेकडे वळविले. वास्तविक नेहरूंच्या कार्याची सर्व पार्श्वभूमि गांधीवादी तत्त्वज्ञानाची होती. गांधीवादाचा यंत्र-युगाला विरोध होता. गांधीजींनी धर्म आणि राजकारण यांच्यात सरमिसळ केली. एका दृष्टीने आधुनिकतेला विरोधी अशी अनेक जीवनमूल्ये गांधी-युगात येथे रूजू लागली होती. या पार्श्वभूमीवर नेहरूनी आपल्या कार्याला सुरुवात केली व मायदेशाचे तोंड आधुनिकतेकडे वळविले. मला वाटते, नेहरुनी आपल्याला दिलेला हा फार मोठा वारसा आहे. नेहरूनी आपल्या १६–१७ वर्षांच्या काळात या देशात वैज्ञानिक प्रगतीचा पाया घातला. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र इत्यादी विविध क्षेत्रात संशोधन करणाऱ्या १२–१४ राष्ट्रीय प्रयोगशाळा सुरू केल्या. फाळणीच्या पार्श्वभूमीवर धर्मपंथातीत राज्याची कल्पना येथे रुजविली व लोकशाहीला पूरक अशा धर्मनिरपेक्ष राज्याचा चांगला पाया घातला. देशाचे औद्योगीकरण झपाट्याने सुरू केले. भिलाई येथील प्रचंड पोलाद कारखाना, कोयनेसारख्या वीज व पाटबंधाऱ्यांच्या मोठ्या योजना सुरू केल्या. आधीच्या १००–१२५ वर्षांत ज्या गोष्टी होऊ शकल्या नाहीत त्या त्यानी आठ–दहा वर्षांत सुरू केल्या. आधुनिक जीवनाची इतर अनेक वैशिष्ट्ये त्यानी तुमच्या आमच्या जीवनात आणली. हिंदुकोड बील हे या आधुनिकतेच्या प्रक्रियेतील फार महत्त्वाचे पाऊल आहे. स्त्रियाना संपत्ती-मध्ये पुरुषांच्या बरोबरीचा वाटा मिळावा व स्त्री–पुरुषामध्ये समता प्रस्थापित व्हावी ही एका दृष्टीने आधुनिक भारतातील मोठी क्रांतिकारक घटना आहे. केवळ नेहरूंच्या व्यक्तिमत्वामुळे हे सर्व होऊ शकले आणि त्यामुळेच नेहरूनी सर्वार्थाने आमच्या देशाचे तोंड ज्या आधुनिकतेकडे वळविले ते मला फार महत्त्वाचे वाटते.

## नियोजनाचे युग

आपल्या पंचवार्षिक योजना या देखील मुख्यतः पंडितजीमुळेच या देशात सुरू झाल्या. या दृष्टीने आमच्या योजनाबद्ध आर्थिक विकासाचे शिल्पकार म्हणून त्यांचे स्थान आमच्या इतिहासात कायमचे कोरले जाईल. जगातील पहिली योजना रशियामध्ये १९२८–२९ साली सुरू झाली. नेहरूनी तेथील योजनांचा अभ्यास केला होता. त्याचा ठसा त्यांच्या मनावर उमटणे स्वाभाविक होते. त्यानंतर काँग्रेसमध्ये असताना देशासाठी एक नियोजन मंडळ नेमण्यात त्यानी पुढाकार घेतला होता. १९३८ साली नेमलेल्या नियोजन मंडळाचे ते अध्यक्ष होते. त्यामुळे १९२८–२९ पासून तो ५० पर्यंत ते योजनाबद्ध आर्थिक विकासाचा विचार करीत होते. त्यामुळे ते १९५१–५२ साली या देशात नियोजनाचे नवे युग सुरू करू शकले. परंतु नियोजनाचा इतक्या सातत्याने, चिकाटीने पुरस्कार करणारे दुसरे कोणतेही नेते त्यांच्या समकालीनांमध्ये झाले नाहीत. आपल्या हयातीत त्यानी जवळ जवळ तीन योजना पुऱ्या केल्या व नियोजनाचे एक नवे युग या देशात निर्माण केले. नियोजनापूर्वीच्या अनेक वर्षांचा इतिहास डोळ्यासमोर आणला म्हणजे या नियोजनयुगाचे वेगळेपण आपल्या चटकन नजरेत भरते.

## अलिप्ततावादाचा अमोल वारसा

भारताचे परराष्ट्रीय धोरण हा देखील नेहरूंचा भारताला मिळालेला मोलाचा वारसा आहे. नेहरूनी ज्या काळात अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारले तो काळ या संदर्भात लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. १९५० ते ५१ साली सर्व जग दोन गटात विभागले गेले होते. एका बाजूला इंग्लंड, अमेरिकेसारखी लोकशाहीवादी राष्ट्रे होती तर दुसऱ्या बाजूला रशिया, चीनसारखी कम्युनिष्ट राष्ट्रे होती. सर्व जग या दोन गटात विभागले गेले होते. जागतिक राजकारणावर याचा फार खोल परिणाम झाला होता. अशा या काळात कोणत्याही गटात सामील न होता स्वतंत्रपणे अलिप्ततेचे धोरण स्वीकारणे याला स्वतंत्र विचारशक्ती लागते. त्याचप्रमाणे मोठे धैर्यही असावे लागते. पंडित नेहरूंच्या

या तटस्थ भूमिकेमुळे जागतिक राजकारणातील तपासणी कमी होण्यास महत्त्वाचे साह्य झाले. जागतिक युद्धाचे प्रसंग टाळण्यासही हा तिसरा गट उपयोगी पडला. जागतिक राजकारणात या अलिप्ततावादाच्या धोरणामुळे जागतिक शांततेच्या कार्यास महत्त्वाचा हातभार लागला. त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील अर्थव्यवस्थेलाही त्याची महत्त्वाची मदत झाली. आर्थिक विकास आणि युद्ध ह्या दोन गोष्टी परस्परविरोधी आहेत. आर्थिक विकास करावयाचा असला तर त्या राष्ट्रांना युद्धापासून अलिप्तच असले पाहिजे. अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारले नाही तर त्या राष्ट्राला युद्धासाठी सदैव तयारी करावी लागते. दररोज काही कोटींवर खर्च करावा लागतो. हिंदुस्थानसारख्या गरीब राष्ट्राला युद्धावर हजारो कोटी रुपये खर्च करणे म्हणजे आर्थिक विकासाचा विचार ढकलणे आहे. पंडित नेहरूंनी याचा विचार केला व आमच्या अंतर्गत धोरणासाठी जागतिक राजकारणात अलिप्ततावादाची भूमिका स्वीकारली. त्यांच्या या धोरणामुळे जगाच्या राजकारणात अलिप्ततावादी अशी तिसरी शक्ती निर्माण झाली. त्याचप्रमाणे अंतर्गत जीवनातही आमच्या आर्थिक विकासाचा पाया घातला गेला. पंडित नेहरू हेच आमच्या या धोरणाचे खरेखुरे जनक आहेत.

## समृद्ध गुणांचा वारकरी

नेहरूंच्या व्यक्तिगत जीवनाचा विचार करताना, त्यानी आपल्या जीवनात एक फार मोठी गोष्ट साध्य केली होती. आयुष्यातील सुमारे पन्नास वर्षे राजकारणात घालवून देखील त्यानी, मत्सर, भीति यावर पूर्ण विजय मिळविला होता. या ठिकाणी मला चर्चिलच्या वाक्याची आठवण होते. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर पंडित नेहरू आपल्या इंदिराजी यांच्याबरोबर इंग्लंडला गेले होते त्या वेळी चर्चिल इंदिराजींना म्हणाले होते, "तुमचे वडील जगातील एक फार थोर पुरुष आहेत. त्यांचे मोठेपण कशात आहे असे आपल्याला वाटते ? त्यानी आपल्या आयुष्यात द्वेष, मत्सर व भीति यावर मोठा विजय मिळविला आहे." चर्चिल यांचे हे मूल्यमापन मला अतिशय अर्थपूर्ण व महत्त्वाचे वाटते. ज्या इंग्रज सरकारने त्याना आयुष्यातील सुमारे १३–१४ वर्षे वेग-वेगळ्या वेळी तुरुंगात डांबून ठेवले होते त्या इंग्रज सरकारबद्दल त्यांच्या मनात द्वेषाचा तसूभरही भाग नव्हता. भीति तर त्यांच्या मनाला कधी शिवलीच

नाही. जगातील फार थोड्या व्यक्ती इतक्या उच्च पातळीवर जाऊ शकलेल्या आहेत.

नेहरूना या देशातील गरीब, सामान्य माणसाबद्दल वाटणारे प्रेम अमर्याद होते. खेड्यापाड्यातील दीनदुबळ्या, गरीब नागरिकावर त्यानी जन्मभर अलोट प्रेम केले होते, याला खरोखर महात्मा गांधींशिवाय जगाच्या इतिहासात तोड सापडणार नाही. आपल्या मृत्यूनंतरही आपल्या रक्षा शेतकरी काम करीत असलेल्या शेतात एकरूप व्हावी, त्याचप्रमाणे कामगार काम करीत असलेल्या कारखान्यात एकरूप व्हावी अशी इच्छा त्यानी आपल्या मृत्यूपत्रात व्यक्त केली. त्यांच्या मृत्युपत्रातील यासंबंधीची वाक्ये म्हणजे या देशातील गरीब माणसाबद्दल त्याना वाटणाऱ्या अमर्याद प्रेमाचे उत्कृष्ट पुरावेच आहेत. खरोखर २० व्या शतकात सामान्य माणसावर त्यांच्याइतके मनोभावे प्रेम फार थोड्या नेत्यानी केले असेल.

## लोकशाहीचा पुजारी

नेहरूंचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, त्यांच्या हातात भारतातील अमर्याद सत्ता दीर्घकाल गोळा झाली असूनही त्यानी त्या सत्तेचा वापर विलक्षण संयमाने केला. खरोखर त्यांच्या हातात इतकी अमाप सत्ता एकवटली होती की त्यानी मनात आणले असते तर एका रात्रीत ते या देशाचे हुकूमशहा बनू शकले असते. परंतु हुकूमशाहीचा मागमूसही त्यांच्या स्वभावात दिसत नव्हता. इतक्या अमर्याद सत्तेचा वापर इतक्या संयमाने करणाऱ्या व्यक्ती विसाव्या शतकात तरी अत्यंत दुर्मिळ असतील. उलट सत्तेचा वापर संयमाने करून त्यानी या देशातील लोकशाही मजबूत केली. १४ वर्षे आशियात सगळींकडे लोकशाहीची पडझड होत असताना त्यानी भारताला स्थिर सरकार, स्थिर लोकशाही, मिळवून दिली खरोखर त्यांच्यासारख्या संयमाला विसाव्या शतकाच्या इतिहासात तोड मिळणार नाही. त्यांचे व्यक्तिमत्त्व यामुळेच असामान्य, अलौकीक वाटते.

नेहरूंच्या मृत्यूनंतर तुमच्या आमच्यावरची जबाबदारी वाढली आहे. एखाद्या जुन्या घरातील पित्याचे छत्र गेल्यानंतर सर्वांनाच एकदम पोरके झाल्यासारखे वाटते तशीच काहीशी भावना या देशात निर्माण झाली आहे. परंतु आता आपल्याला आपल्या कर्तृत्वावरच उभे राहिले पाहिजे, याची

जाणीव लोकांमध्ये निर्माण होऊ लागली आहे. आपल्याला नेहरूंनी दिलेला लोकशाहीचा वारसा जतन करावयाचा आहे; इतकेच नव्हे तर तो आपणास समृद्ध करावयाचा आहे. नियोजनातून गरीब माणसाला आर्थिक विकासाचे आश्वासन द्यावयाचे आहे. सर्व धर्मीयाना समान वागणूक देऊन धर्म निरपेक्ष राज्याचा पाया खंबीर करावयाचा आहे. त्याचबरोबर आमचा हा देश आधुनिकतेच्या वाटेने पुढे न्यावयाचा आहे. मला खात्री आहे की, संक्रमण-अवस्थेचे आव्हान स्वीकारून आपण पंडित नेहरूंनी दिलेला वारसा जतन करू; इतकेच नव्हे तर यात आपल्या कुवतीप्रमाणे थोडीफार भरत्र घालू.

# ११

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक व्यक्तिमत्व

डॉ. आंबेडकर यांच्या या वाढदिवसानिमित्त त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्यासंबंधी गेले अनेक दिवस माझ्या मनात जे विचार रेंगाळत आहेत ते आपल्यासमोर मांडण्याची संधी मी घेत आहे.

## इतिहास बदलू पाहणारे कर्तृत्व

डॉ. आंबेडकर यांचे पहिले आणि फार मोठे कार्य म्हणजे अस्पृश्यासारख्या पददलित समाजामध्ये आपल्या मानव्याची, हक्काची तीव्र जाणीव निर्माण केली. शतकानुशतके हा अस्पृश्य समाज एका दृष्टीने स्पृश्यांच्या गुलामगिरीत सापडला होता. त्यांच्यातील स्वाभिमान पूर्णपणे नष्ट झाला होता. आपल्या हक्कांची जाणीव नाहीशी झाली होती. अशा या समाजामध्ये अवघ्या पंधरा वीस वर्षांत त्यानी जे सामर्थ्य निर्माण केले ते खरोखर असाधारण आहे. आज एखाद्या अस्पृश्य तरुणाशी बोलत असताना त्याच्या डोळ्यात स्वाभिमानाचे तेज पाहिले म्हणजे मनाला खूप संतोष होतो. एखादा अस्पृश्य तरुण ताठ मान करून स्पृश्याशी बोलत असला म्हणजे एक प्रकारचे समाधान वाटते.

याचे पुष्कळसे श्रेय डॉ. आंबेडकर याना द्यावे लागेल. डॉ. आंबेडकरांच्या आधी हे कार्य महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, बडोद्याचे सयाजी महाराज यानी केले होते. एका दृष्टीने यांच्या कार्यांचा वारसा घेऊनच डॉ. आंबेडकर यानी आपल्या जीवनकार्याला सुरवात केली. परंतु वरील सर्व थोर समाजसुधारक व डॉ. आंबेडकर यांच्या कार्यात एक सूक्ष्म फरक केला पाहिजे. तो असा की, वरील थोर समाजसुधारकांमुळे स्पृश्य समाजात अस्पृश्याबद्दल आपुलकी, जिव्हाळा उत्पन्न होण्यास मदत झाली. परंतु आंबेडकरानी मुख्यतः अस्पृश्यामध्ये त्यांच्या परिस्थितीबद्दल एक प्रकारचा संताप, त्वेष निर्माण केला. आपल्या हक्काबद्दलची खोल जाणिव त्यानी अस्पृश्य समाजात निर्माण केली. त्यांच्या कार्यापासून अस्पृश्यता निवारण्याच्या इतिहासातील दुसऱ्या प्रकरणाला सुरुवात झाली. त्यांचे हे कार्य त्यामुळे अतिशय महत्त्वाचे मानावे लागेल.

## ज्वलंत राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते

डॉ. आंबेडकरांचे जीवनकार्य पाहिले तर ते मूलतः भारतीय राष्ट्रवादाचे मित्र आणि पुरस्कर्ते होते असेच आपणाला दिसून येईल. १९२१।२२ साली लंडनमध्ये असताना त्यानी डी. एस. सी. पदवीसाठी ‘ दि प्रॉब्लेम ऑफ ए रुपी ’ हा प्रबंध लिहला होता. या प्रबंधातून त्यानी मुख्यतः हिंदुस्तानातील रुपाया व इंग्लंडमधील पौंड यांचे प्रमाण काय असावे यासंबंधी चर्चा केली आहे. या दोन्ही नाण्यांचे परस्पर प्रमाण ठरविताना इंग्लंडने प्रत्येक वेळीं हिंदी अर्थव्यवस्थेवर कसे आघात केलेले आहेत याचे विवेचन त्यांच्या या प्रबंधातून फार चांगल्या तऱ्हेने केले आहे. भारतीय राष्ट्रवादाचा अतिशय ज्वलंत आविष्कार त्यांच्या या प्रबंधातून आपल्याला पाहावयास मिळतो. पुढे १९४९ साली घटना समितीत भारतीय राज्यघटनेचा मसुदा सादर करताना त्यानी जे भाषण केले आहे त्यामधील भारतीय राष्ट्रवादाबद्दल ज्वलंत प्रेम व्यक्त झाले आहे. या देशाचे स्वातंत्र्य अनंत काळ सुरक्षित राहण्यासंबंधी त्यानी जी तळमळ व्यक्त केलेली आहे ती अत्यंत उल्लेखनीय आहे. पुढे धर्मांतराच्या वेळी त्यानी आपल्या अनुयायाना बौद्ध धर्म स्वीकारण्यास सांगितले. मुस्लीम वा ख्रिश्चन धर्मापेक्षा आपण बौद्ध धर्म पसंत करतो हे सांगताना त्यानी एके ठिकाणी असे म्हटले आहे की, “ माझे अनुयायी ख्रिश्चन वा

मुस्लीम धर्मात गेले तर कदाचित ते राष्ट्रीयत्वाच्या भावनेपासून दूर जातील." त्यांच्या जीवनातील या सर्व प्रसंगातून त्यांची खोल राष्ट्र निष्ठा प्रगट होते.

## सामाजिक समतेचा पुजारी

त्यांच्या जीवनातील वैचारिक उत्क्रांतीचा विचार करताना तिथे काही टप्पे स्पष्ट दिसतात. इंग्लंडहून ते १९२२–२३ साली आपला शिक्षणक्रम पूर्ण करून मायदेशी परत आले. त्यानंतर सुरुवातीची ८–१० वर्षे त्यानी मुख्यतः सामाजिक समतेसाठी खर्च केली. या काळात त्यानी अस्पृश्यांना स्पृश्याबरोबरच मंदिरप्रवेश मिळावा, सार्वजनिक ठिकाणी पाणी भरता यावे म्हणून सत्याग्रह केले. पुणे येथील २७–२८ चा पर्वतीचा सत्याग्रह, नाशिक येथील काळाराम मंदिराचा सत्याग्रह, महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह यामधून मुख्यतः त्यांच्या सामाजिक चळवळीचेच आपल्याला दर्शन घडते. याच काळात महार वतने नष्ट करावीत अशी त्यानी चळवळ सुरू केली होती. महार समाज वतनामुळे खेड्यापाड्यातील सामाजिक गुलामगिरीत अडकून पडला आहे. त्यातून त्याला मुक्त करावयाचे झाले तर ही वतने नष्ट करावयास हवीत असे त्यानी म्हटले आहे. यामागील मूळ प्रेरणा सामाजिक समतेचीच होती. सामाजिक चळवळीचे हे पर्व ३०–३२ पर्यंत प्रामुख्याने चालू होते. ३२ नंतर त्यानी अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांवर विशेष भर घालण्यास सुरुवात केलेली होती. गोलमेज परिषदेसमोर त्यानी अस्पृश्याना कायदेमंडळात स्वतंत्र प्रतिनिधित्व असावे अशी जोरदार मागणी केली होती. महात्मा गांधींच्या पुणे येथील प्राणांतिक उपोषणामुळे या स्वतंत्र मतदारसंघाचा आग्रह त्यानी सोडून दिला व संयुक्त मतदारसंघाचे तत्त्व त्यानी मान्य केले. याच काळानंतर अस्पृश्यांना सरकारी नोकरीतही काही जागा राखून ठेवाव्या असा आग्रह त्यानी धरला. १९३७–३८ नंतर त्यांच्या वैचारिक प्रवासात आणखी एक महत्त्वाचा फरक दिसतो. तो म्हणजे त्यानी या वेळेपासून अस्पृश्याच्या आर्थिक अंगावरही भर घालण्यास सुरुवात केली. १९३८ साली मनमाड येथे भरलेल्या रेल्वेमधील अस्पृश्य कामगारांच्या अधिवेनात त्यानी प्रथम आर्थिक हक्कांचा उच्चार केला असे दिसते. हिंदुस्थानात १९३० ते ३८ या काळात समाजवादाचा विचार

झपाट्याने पुढे येत होता. हिंदुस्थानातच नव्हे तर सर्व जगातही या काळात कम्युनिझमबद्दलचे वा समाजवादाबद्दलचे आकर्षण वाढत होते. १९२९ च्या जागतिक मंदीच्या लाटेमुळे लोकशाही व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास विचलित झाला होता. जर्मनी, इटलीमध्ये लोकशाहीच्या पराभवातूनच फॅसिझम, नाझी-झमचा उदय झाला होता. या वेळी रशियातील कम्युनिझम मात्र निर्वेधपणे प्रगती करीत होता. त्यामुळे कदाचित कम्युनिझमबद्दल आकर्षण विचारवंतांना अधिक वाटले असेल. कारणे काहीही असोत परंतु ३० ते ३८ हा कम्युनिझमच्या आकर्षणाचा काळ होता. यामुळे कदाचित आंबेडकरांच्या विचारावर आर्थिक विचाराची छाप पडलेली असावी. पुढे आंबेडकरांनी १९४७ साली लिहिलेल्या ' स्टेटस अॅण्ड मायनॉरिटीज ' या पुस्तकातही आर्थिक कार्यक्रमावर विशेष भर दिला आहे. परंतु १९५४–५५ नंतर मात्र त्यांच्या विचारावर अत्यंत महत्त्वाची कलाटणी मिळाली व धर्मांतराच्या द्वारे सामाजिक समता मिळविण्याकडे त्यांचे मन अधिक आकृष्ट झाले. १९५६ साली त्यांनी बौद्धधर्माचा स्वीकार केला. यामागे मूळ प्रेरणा आर्थिक वा राजकीय समतेपेक्षा देखील सामाजिक समतेचीच होती. आंबेडकरांच्या वैचारिक प्रवासात आपल्याला त्यामुळे वेगळीवेगळी वळणे दिसत असली तरी त्यांच्या कार्याचा मध्यबिंदू सामाजिक समता हाच होता. मानवी समतेची ही प्रेरणा जशी मध्यवर्ती होती, तशीच ती अत्यंत महत्त्वाची होती.

## धर्मांतरापाठचा आशय

आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दिक्षा घेतली, याचा अन्वयार्थ आपण नीट समजावून घेतला पाहिजे. आंबेडकरांच्या धर्मांतरामागील एक प्रेरणा भावनात्मक एकात्मतेची आहे, असेच मला वाटते. अस्पृश्यांना समाजाच्या अगदी खालच्या थरापासून काढावे व वरच्या पातळीवर समानतेच्या भूमिकेवरुन या समाजाशी त्याला एकरूप करावे अशीच त्यांची त्यामागे भावना होती. अस्पृश्य समाज हा अस्पृश्य म्हणून स्पृश्य समाजाशी भावनिक दृष्ट्या एकरूप होऊ शकत नव्हता. अस्पृश्यतेच्या कल्पनेशी शेकडो वर्षांचे संस्कार निगडीत झाले होते. त्यामुळे त्या पातळीवर भावनात्मक ऐक्य निर्माण होणे कठीण होते. या दृष्टीनेच त्यांनी हे धर्मांतर केले होते, अशी माझी श्रद्धा आहे.

बौद्ध धर्माचा अन्वयार्थ लावताना देखील शक्य तितक्या बुद्धीवादी व शास्त्रीय दृष्टीकोनातून तो लावण्याचा त्यानी प्रयत्न केला आहे. धर्म म्हणजे सामाजिक नीति. असा साधा, सरळ परंतु अत्यंत महत्त्वाचा अन्वयार्थ त्यानी लावला आहे. बौद्ध धर्माला त्यांनी पूर्ण ऐहिक बैठक दिली आहे. बुद्धाच्या पारलौकीक कल्पनांबद्दल जे अपसमज झाले आहेत ते त्यानी काढून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. बुद्धिप्रामाण्यवाद म्हणजे बुद्ध असे समीकरण त्यानी मांडले आहे व त्यासाठी जुन्या धर्मग्रंथातून अनेक पुरावे दिले आहेत. बुद्ध हा मुख्यतः कणादाच्या परंपरेमधील एक थोर बुद्धिप्रामाण्यवादी आहे असे त्यानी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. करुणा हा बौद्ध धर्माचा कणा आहे असे त्यानी सिद्ध केले आहे. करुणा म्हणजे मानवाचे मानवावर असणारे प्रेम आणि याच संदर्भात त्यानी येथील जातिव्यवस्था, अस्पृश्यता यावर कठोर टीका केली आहे. प्रज्ञान, करुणा आणि शील हा डॉ. आंबेडकरांच्या बौद्ध धर्माचा गाभा आहे. आपल्या लोकशाहीच्या दृष्टीने त्यांच्या बौद्ध धर्माचा हा अन्वयार्थ अतिशय महत्त्वाचा आहे. आंबेडकरांचे शास्त्रीय, बुद्धिवादी, भौतिकवादी मत त्यांच्या या अन्वयार्थातून स्वच्छ प्रतिबिंबित झाले आहे.

## मानवी स्वातंत्र्य व लोकशाही निष्ठा

भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने आंबेडकरांची मोठी कामगिरी म्हणजे त्यानी या देशातील लाखो अस्पृश्य समाजाला कम्युनिझमपासून दूर ठेवले. कम्युनिझमच्या प्रसाराला अस्पृश्य समाजात जितकी अनुकूल भूमी होती तितकी इतर समाजात क्वचितच असेल. तिथे अमाप दारिद्य होते, कमालीची सामाजिक विषमता होती, भरपूर वैफल्य होते, त्यामुळे तिथे कम्युनिझम हा हा म्हणता पसरला असता. परंतु डॉ. आंबेडकरांनी या लोकांपासून अस्पृश्य समाजाला बचावले. भारतीय लोकशाहीवर त्यानी हे केलेले मोठे उपकार आहेत, असे मानणारापैकी मी एक आहे. डॉ. आंबेडकरांनी मनात आणले असते तर एका रात्रीत त्यांनी सर्व अस्पृश्य समाज लाल केला असता. अस्पृश्य तरुण कम्युनिस्ट झाले असते तर खेड्यापाड्यातून कम्युनिझमला नवा पाया मिळाला असता. परंतु लोकशाहीवरील अभंग निष्ठेमुळे डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांना प्रयत्नपूर्वक

कम्युनिझमपासून दूर ठेवले. भारतीय लोकशाहीबळकट करण्यासाठी त्यानी केलेले हे कार्य मोलाचे नाही असे कोण म्हणेल ?

डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा विचार करताना त्यांचे एक वेगळेपण चटकन नजरेत भरते. दक्षिण हिंदुस्तानातील अस्पृश्यांच्या चळवळीचा आढावा घेतला तर आपणास असें दिसून येईल की, आंध्र, केरळ मधील अस्पृश्य कम्युनिझमकडे गेले, मद्रासमधील अस्पृश्य डी. एम. के. कडे गेले. या चळवळीला वांशिक बैठक आहे. आपण वेगळ्या वंशाचे आहोत असा अहंकार या चळवळीत आहे. त्यामुळे ती अतिशय घातकी आहे. उलट महाराष्ट्रातील अस्पृश्य हे बौद्ध धर्माकडे गेले. वरील दोन्ही चळवळीच्या मानाने महाराष्ट्रातील या चळवळीचा आविष्कार कितीतरी स्वागतार्ह आहे असे आपणास दिसून येईल. आंबेडकरांची मानवी स्वातंत्र्य व लोकशाहीवरील निष्ठा हीच यामध्ये प्रामुख्याने प्रतीत होते.

### हा वारसा पुढे चालवू या

स्पृश्यबंधूना माझी अशी आग्रहाची विनंती आहे की, त्यानी अस्पृश्यांची दुःखे समजावून घेण्याचा जिव्हाळ्याने प्रयत्न करावा. महाराष्ट्रातील सर्व थोर समाज सुधारकानी आपल्याला हाच वारसा दिला आहे. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिन्दे या सर्वांच्या कार्यामागील एक सारखा धागा कोणता असेल तर तो अस्पृश्यांबद्दलची अथांग सहानुभूती ! त्यांच्याबद्दलची अपरंपार करुणा ! महाराष्ट्रातील या सर्व थोर समाजसुधारकांचा हा वारसा आपण अवश्य घेतला पाहिजे. अस्पृश्यांची दुःखे आपण त्यानंतरच चांगल्या प्रकारे समजू शकू. त्यांच्या धर्मांतरामागील प्रेरणा आपण समजावून घेतल्या पाहिजेत. सहानुभूतीने त्यांच्या अडचणीकडे व दुःखाकडे पाहिले पाहिजे. असे जर झाले तर आमच्या समाजजीवनातील अनेक प्रश्न सहजासहजी आम्ही सोडवू शकू. यातूनच आमच्या समाजात भावनात्मक ऐक्यही प्रस्थापित होईल. आमच्यातील सर्वच विचारी तरुण काळाचे हे आव्हान स्वीकारतील व समाजाच्या सर्व थरात भावनात्मक एकात्मता प्रस्थापित करतील असा मला विश्वास वाटतो.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

# १२

## काँग्रेसजनांची कर्तव्ये

जे स्वतःला खरोखर सामान्य कार्यकर्ते समजतात—पुढारी नव्हे, त्यांच्याशी मला वेगळे बोलावयाचे आहे. त्यांना माझी कळकळीची विनंती आहे. काँग्रेसमध्ये निर्माण झालेल्या अंतर्गत कलहापासून, मतभेदापासून तुम्ही अत्यत दूर राहा. खेड्यापाड्यातील जनतेच्या प्रश्नावर विचार करून काम करणारे आणि मतभेदांना विटलेले सामान्य कार्यकर्ते यापासून दूर राहतील ही मी व्यक्त केलेली अपेक्षा काही अस्थानी आहे असे मला वाटत नाही. त्या सामान्य कार्यकर्त्यांनी या मतभेदाच्या चक्रव्यूहापासून, या भांडणापासून, या आश्रयाच्या प्रवृत्तीपासून दूर राहिले पाहिजे असे मला वाटते. सामान्य माणसाचे काँग्रेस प्रेमाने भारावलेले मन तयार करून खेड्यापाड्यांत त्यांनी विकासाचे काम सुरू केले पाहिजे. त्यामुळे मतभेदांचे क्षेत्र आपोआपच मर्यादित आणि लहान बनेल. एक दोन ठिकाणी कुठेतरी काहीतरी बिघडते. आणि त्याचे लोण सर्व ठिकाणी पोहोचते अथवा मग ते पोहोचवले जाते. त्यासाठी प्रत्येकाच्या मनात ' काँग्रेस भवन ' हे माझे स्वतःचे घर आहे, जिल्हा काँग्रेस कमिटीचा अध्यक्ष हा माझा

---

धुळे जिल्हा काँग्रेस कार्यकर्ता सभा, धुळे.

आहे, ही भावना दृढमूल व्हावयास हवी. आणि ही भावना निर्माण होण्यासाठी मला आपणास आग्रहाची विनंती करावयाची आहे की, भावनेच्या अथवा व्यक्तीच्या आहारी जाऊन मतभेदांचे क्षेत्र न वाढविता कामास लागा. स्वतःला सामान्य कार्यकर्ता समजणाऱ्या प्रत्येकाने शपथ घ्यावी की, "माझ्या भावनांचा उद्रेक मी कॉंग्रेस-भवनाच्या चार भिंतीच्या आत ठेवीन!"

## मतभेद म्हणजे उद्दिष्टांशी अप्रामाणिकपणा

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीने दुर्लक्ष करून आमच्यातील मतभेदांचे घोंगडे भिजत ठेवले असे आताच बोलले गेले. त्याबद्दल मला राग नाही आला. पण दुःख मात्र जरूर झाले. आम्ही औषध दिले नाही हे ठीक आहे. पण रोग आपण वाढविला नाही काय? एकाच संघटनेत, एकाच ध्येयपूर्तीसाठी, एकच उद्दिष्टाने आपण पुढे जात असताना एकमेकांबद्दल जाहीररीत्या आपण आरोप करावयाचे! खुलासे प्रतिखुलासे मागायचे! या सत्याला जबाबदार कोण? सहनशीलतेच्या सर्वत्र मर्यादा सर्वांनी ओलांडल्या नाहीत काय? मतभेदांचे क्षेत्र संकुचित करण्याऐवजी ते वाढविण्याचा प्रयत्न का केला जावा?

या मतभेदांचा जन्म कोणत्या जाणिवेतून होतो? सामान्यपणे व्यक्तिद्वेष आणि सत्तास्पर्धा यातून मतभेदांचा जन्म होतो. समाजातील अथवा संघटनेतील काही लोक मुद्दाम भांडणे लावण्याचा प्रयत्न करतात. काही वृत्तपत्रांचा जन्मही फक्त मतभेद वाढविण्यासाठीच होतो. भांडणे लावणे आणि त्याना खतपाणी पुरवून ती वाढविणे हा त्यांचा धंदा होऊन बसला आहे! एकमेकांबद्दल एकमेकांची मते साफ करावयाची कुणी? ती आपण एकत्रित बसून नको का करायला? मतभेद नष्ट करण्याचे दोन उपाय आहेत. एक म्हणजे मन जिंकून आणि दुसरे म्हणजे मन साफ करून! भांडणे लावणारी आणि भांडणारी मने काही कालावधीनंतर थकतात. आपण थकला नाहीत का? पण जनता मात्र आपल्या भांडणाना आता थकली आहे! ती आपल्या भांडणाला कंटाळली आहे, त्रस्त झाली आहे. कॉंग्रेस संघटनेची जनमानसावर पकड जरूर आहे, परंतु तरीसुद्धा आपल्यातील अंतर्गत कलहाचा खेदजनक परिणाम जनमानसावर झाल्या-

शिवाय राहात नाही! मतभेदांची समाप्ती करण्याचे बरेचसे आपल्या हाती आहे. तुम्ही सगळे म्हणता ते आमच्या म्हणजे प्रदेश काँग्रेसच्या हाती आहे. आमच्या हाती जे काही आहे त्याच्या परिणामाचा विचार करा. शिस्तीच्या बडग्याने काँग्रेस संघटना सुधारता येणार नाही. तो अगदी शेवटचा उपाय आहे. तो उपाय वापरला जाऊ नये या विचाराचा मी आहे. आपण सर्व एका संघटनेत एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारी माणसे आहोत. एकमेकास आपण बंधुतुल्य मानतो. जनतेने आपल्यावर कितीतरी मोठा विश्वास टाकला आहे. तिचा आपण विश्वासघात करणार आहोत का? शिस्तीचा बडगा जर उचलला गेला तर तिला कदाचित दुःख होईल! मतभेदांना उग्र स्वरूप येत राहील तर कदाचित तो शिस्तीचा बडगा उचलावाही लागेल. एकदा बसून अथवा चर्चा करून हा प्रश्न संपणार नाही, याची मला जाणीव आहे परंतु आपण सर्वजण एकत्रित बसलात तर मतभेदांचा जो परिघ आहे तो कमी झाल्याशिवाय राहणार नाही. कुठेतरी बैठक बोलावली जाते, काहीतरी ठरविले जात हे आम्हाला सहन होणार नाही याची मात्र दखल घ्या. मतभेद मिटविण्याची पहिली पायरी म्हणजे मतभेदांचे क्षेत्र कमी करणे होय! आणि त्यासाठी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पाठीशी आपली सारी ताकद लावली गेली पाहिजे.

### जनता काँग्रेसची विश्वस्त

आपण सर्वजण एकत्र काम करीत असताना प्रश्न जरूर निर्माण होतात. प्रश्नच निर्माण होणार नाहीत अथवा मतभेद होणारच नाहीत असे मला नाही म्हणायचे! पण त्याचा तितका बाऊ का केला जावा हे मला कळत नाही! सतत कुठेतरी पानाच्या दुकानावर संघटनेची बदनामी करणारी चर्चा व्हावी याला का संघटना म्हणायची? अशा या प्रकारामुळे आपला जो विश्वस्त आहे- आपल्यावर प्रेम करणारी आपल्यावर रागावूनही विश्वास टाकणारी जी जनता आहे, तिला काय वाटेल? आपली काँग्रेसची सारी ताकद जनतेच्या अंतःकरणात आहे. तिच्या आपल्यावरील प्रेमात आहे. आणि ते प्रेम गमावले जाऊ नये, ते अंतःकरण दुखावत जाऊ नये म्हणून तरी निदान आपले मतभेद

आपण संपविले पाहिजेत. त्यासाठी सर्वांनी एकत्रित बसले पाहिजे. आपण एकत्रित बसायचे नाही असे ठरविले तर हे मतभेद मिटणे केवळ अशक्य आहे. ज्या पातळीवर मतभेद निर्माण होतात त्या च पातळीवर मतभेद मिटविण्याची पराकाष्ठा करणे ही आजची प्रमुख गरज आहे. तक्रारी ऐकणे आणि त्या सडविणे हे एवढेच काम प्रदेश कॉंग्रेसचे आहे की काय ? प्रदेश कॉंग्रेसचे व्यासपीठ हे अत्यंत पवित्र व्यासपीठ आहे. ते अंतर्गत भांडणे सोडविण्यासाठी वापरून प्रदेश कॉंग्रेसची ताकद कमकुवत करू नका. खरे काय आणि खोटे काय यातील मूळ शोधण्याचा आपण कधी प्रयत्न केला आहे का ? प्रदेश कॉंग्रेस अशक्त आहे, तिच्याजवळ ताकद नाही, असा प्रचार करण्यात येतो. पण प्रदेश कॉंग्रेसची ताकद अजमावण्याचा प्रयत्न कृपा करून कुणी करू नका ! प्रदेश कॉंग्रेसची परीक्षा घेण्याचा प्रयत्न करू नका ! त्यात आपण नापास व्हाल ! मा. ना. यशवंतरावजी चव्हाण यांच्या नेतृत्वाने जनतेच्या अंतःकरणात तेवत ठेवलेली ज्योत जोपर्यंत प्रदेश कॉंग्रेसच्या पाठीशी आहे तोपर्यंत प्रदेश कॉंग्रेसच्या ताकदीची परीक्षा घेण्याचा प्रयत्न कुणी करू नये असे मला नम्रपणे सांगावेसे वाटते !

## कॉंग्रेस शुद्धीकरणाची भाषा का ?

आपले काम, आपले ध्येय, आपले उद्दिष्ट आणि आपले धोरण यांचा अभ्यास करून कामास लागणे हे मतभेदापासून दूर राहण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. आपल्या जिल्ह्याचे सारे रामायण पाहा आणि त्यातील शेवटचे पान उघडा. सारे काही आपल्या मनावर आहे याची तुम्हांस जाणीव झाल्याशिवाय राहणार नाही. प्रत्येकाच्या मनाला संयमाचा लगाम हवा आहे. ज्या दिशेने तुमच्या मनाची नाव हाकाराल त्याच दिशेने तुमचे मन काम करीत राहील. कॉंग्रेस पक्षाने आयोजित केलेल्या सभेत आपल्याच पक्षातील लोकांच्या मनाला वेदना होतील असे बोल काढू नका. ही पथ्ये नकोत का आपण सांभाळायला ? या साध्या गोष्टी सुद्धा का मी सांगावयास हव्यात ? जाहीररीत्या एकमेकावर आरोप केले जाताहेत—एकमेकांच्या विरोधात वृत्तपत्रातून रकानेच्या रकाने भरले जाताहेत जाहीर सभा आयोजित करून एकमेकांवर

आरोप–प्रत्यारोप केले जाताहेत कॉंग्रेसचे शुद्धीकरण करण्याच्या घोषणा दिल्या जात आहेत हे सारे कशाचे चित्र आहे ? कुठे चाललो आहोत आपण ? कुणीही उठावे आणि कॉंग्रेसच्या शुद्धीकरणाच्या घोषणा द्याव्यात इतकी अद्याप कॉंग्रेस बिघडलेली नाही, हे मला आपणास नम्रपणे सुचवायचे आहे. मला मुद्दामहून कुणास दुखवायचे नाही. ती माझी प्रवृत्तीही नाही. पण वृत्त-पत्रातील बातम्या वाचल्या म्हणजे मी बेचैन होतो. हे मी कुठेतरी बोलले पाहिजे असे वाटते. प्रदेश कॉंग्रेसचा अध्यक्ष या नात्याने मी बोललेच पाहिजे. माझी काही दुःखे आहेत. आणि ती मला आपल्यासमोर मांडलीच पाहिजेत.

संघटनेतील माणसांचे दोष पाहण्यापेक्षा आपण संघटनेच्या इमारतीकडे का बघत नाही ? दोष नाहीत कुणाच्यात ? प्रत्येक व्यक्तीत दोष आहेत. कुणाही व्यक्तीच्या गुणदोषावर आधारून संघटना पुढे जाणार असेल तरी ती टिकूच शकणार नाही. आणि तशा कॉंग्रेस संघटनेला जनताही मान्यता देणार नाही. जनतेला कॉंग्रेसकडून काय पाहिजे याचा विचार करायला आपण शिकले पाहिजे.

## जुन्या पिढीचे ऋणको आणि भावी पिढीचे विश्वस्त

आपल्याकडून जनतेच्या काय अपेक्षा आहेत अथवा जनतेला नेमके काय हवे आहे, याचा आपण कधी विचार केला आहे का ? मंडळ कॉंग्रेसच्या क्षेत्रातील समाजाच्या--जमातीच्या दुःखांचा विचार आपण करतो आहोत का ? त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा कधी प्रयत्न करतो आहोत का ? आणि हा विचार मंडळ कॉंग्रेस कमिटीने केला पाहिजे. परंतु मंडळ कॉंग्रेस कमिटीचाही विचार आपण कुठे करतो ? तीही कशी तरी जगते आहे ! लुळी-पांगळी बनली आहे ! मंडळ कॉंग्रेस कमिटीचे जीवन व्यवस्थित करण्यासाठी सामान्य कार्यकर्यांना मी आज हाक देतो आहे. मतभेदापासून आपले अंग काढून घ्या, आणि कामास लागा. सामान्य माणूस आज जागृत होतो आहे. त्याच्या मनातील विकासाच्या भावना जिवंत होताहेत. त्याला आपले उद्दिष्ट समजावून सांगा. आणि त्यातच आपले समाधान माना. कुणी विशिष्ट व्यक्ती कुणाशी भांडते आहे इकडे लक्ष देण्यात आपली ताकद संपवू नका. मंडळ

काँग्रेसचे काम अत्यंत महत्त्वाचे काम आहे या जाणिवेतून कामास लागा. मंडळ काँग्रेसचे काम हेच आपले जीवन आहे, याची जाणीव ठेवून काम करा तिच्या क्षेत्रात उद्योगधंदे कोणते आहेत? त्या विभागात बेकार किती आहेत? ते बेकार का आहेत? त्यातील प्रतिष्ठेसाठी किती बेकार आहेत? या सर्व गोष्टींचा प्रत्येक मंडळातील कार्यकर्त्याने अभ्यास करणे अगत्याचे आहे. आणि ते काम करण्यासाठी काँग्रेसची सारी ताकद पणास लावा. निगेटिव्ह राजकारण आता फार दिवस चालणार नाही. पूर्वपुण्याईवर आता आपण फार दिवस जगू शकणार नाही. आणि आता ते फार दिवस चालायचेही नाही. आपण आज मागच्या पिढीचे ऋणको आणि पुढच्या पिढीचे विश्वस्त आहोत ही भावना मनातून दूर करता येणार नाही.

## सहकारात सहकार्य हा प्राण

काही काही ठिकाणी सहकारी क्षेत्रातही भांडण असल्याचे आपण पाहतो. हे असे का घडावे? सहकार हे ज्या क्षेत्राचे नाव आहे त्या ठिकाणीच जर आपण भांडू लागलो तर लोक काय म्हणतील? मग जनतेने तुमच्यावर का विश्वास ठेवावा? सहकारक्षेत्रातील ही भांडणे समाजाला आणि पर्यायाने काँग्रेसला घातक ठरल्याशिवाय राहणार नाहीत. समाजाची भूक भागविणे हा सहकाराचा भावार्थ आहे. तो समजून घेण्याचा प्रयत्न आपण का करीत नाही? भांडवल-शाही नाहीशी करणे, कम्युनिझमची हुकूमशाही नष्ट करणे हा सहकाराचा हेतू आहे. आपण आपल्या डोळ्यांसमोर व्यक्तिविकासाला वाव देऊन सहकाराचा पुरस्कार केला आहे. भांडवलशाहीची मूळ प्रेरणा ही नफ्यात आहे. माणसाच्या अंतःकरणातील परमेश्वर काही अंशी जागृत करून व्यक्तीचा विकास सहकाराच्या मार्फत साधावयाचा आहे. आणि याच क्षेत्रात आपण भांडत बसलो तर त्याला दुर्दैवापेक्षा आणखी कोणते नाव देऊ? सहकारातही आपण निवडणुका स्वीकारल्या आहेत. परंतु त्या निवडणुका पार पडल्यानंतर त्यातून निर्माण झालेली कटुता विसरून जाऊन, एकमेकांच्या हातांत हात मिळवून सहकाराला वाढविले पाहिजे. निवडणुकांतील आणि लोकशाहीतील ते एक मूलभूत तत्त्व आहे. सहकारी क्षेत्रात काम करणारी मने जर दुभंगली गेली—

फाटली गेली अथवा दुरावली गेली तर आपण कामच करू शकणार नाही, याची जाणीव प्रत्येकाच्या अंतःकरणात असायला हवी.

### आपल्या निष्ठा अन् श्रद्धास्थाने

लोकशाहीची काही श्रद्धास्थाने आहेत, आणि ती आपण टिकवून वाढविली पाहिजेत. भारतीय संस्कृतीत जन्मलेला माणूस हा श्रद्धाशील असतो. बदलत्या काळाबरोबर आपली श्रद्धास्थानेही बदलताहेत. आणि ती चांगली गोष्ट आहे. सहकारात, संघटनेत, लोकशाहीत आपण स्वीकारलेली जी जीवनमूल्ये आहेत —आपली जी श्रद्धास्थाने आहेत त्यांना धक्का लागणार नाही याची प्रत्येकाने काळजी वाहावयास हवी. आणि त्या श्रद्धास्थानांनाच जर आपण धक्के देत सुटलो तर सारे लोक आपली चेष्टा केल्याशिवाय राहणार नाहीत. आणि मग लोक आपणाला या बाबतीत हसले तर मला वाईट वाटणार नाही. कारण तो त्यांचा अधिकार आहे. चीनच्या आक्रमणाच्या संदर्भात आपण विचार केला आणि आपल्या श्रद्धास्थानांची जपणूक केली तर आपली लोकशाही टिकेल, ती वाढेल आणि केवळ आशिया खंडात नव्हे तर साऱ्या जगात तो एक आदर्श ठरेल ! त्यासाठी लोकशाही टिकविणे आणि ती वाढविणे हे आपले कर्तव्य आहे. महात्माजी, लोकमान्य टिळक, पंडितजी यांनी अत्यंत कष्टाने निर्माण केलेली काँग्रेस फसली असा आरोप पुढील पिढीला करून देण्याची संधी आपण देणार आहोत काय ? पण मनाचे रोग आहेत त्यांना औषध कोण देणार ? माफ करा. आज मी जरा जास्त स्पष्ट बोलतो आहे. पण संघटनेचा प्रमुख या नात्याने हे बोलले पाहिजे.

### स्वाभिमानी माणूस बनविणे हे उद्दिष्ट

आपण ज्या क्षेत्रात काम करतो त्या क्षेत्रात आपण काम करीत असताना त्या कामातून निर्माण झालेली ताकद, स्वतःची प्रतिष्ठा राखण्यासाठी अथवा वाढविण्यासाठी कृपाकरून वापरू नका. ती कामातून निर्माण झालेली ताकद संघटना वाढविण्यासाठी वापरा. माझी ताकद कशी वाढेल हा विचार मनात

बाळगून काम करू नका. आजची आपली लोकशाही ही जागृत लोकशाही आहे. मला आनंद वाटतो की गेल्या १०–१५ वर्षांत आपण आपल्या देशात जागृत लोकशाही निर्माण करू शकलो. परंतु सहकारी क्षेत्रात काम करणारे माझे काँग्रेसचे कार्यकर्ते लोकांना लाचारीने वागवितात हे पाहून मला मनस्वी दुःख झाल्याशिवाय राहत नाही. आपणाला स्वाभिमानी जनता आणि स्वाभिमानी काँग्रेस निर्माण करावयाची आहे. आपल्या हातात असणारी सत्ता माणसाला लाचार बनविण्यासाठी वापरू नका. अशी मला आपणा सर्वांना कळकळीची विनंती करावयाची आहे.

आर्थिक लोकशाहीचे मन तयार करीत असताना ते स्वाभिमानी मन तयार करावयाचे आहे आपणाला! सरकारी क्षेत्रात काम करीत असताना आर्थिक सत्ता हाती येते आणि मग दुसऱ्याला लाचार बनविण्याची प्रवृत्ती बळावते! आर्थिक सत्तेच्या ताकदीवर लोक जवळ करता येतात आणि त्या लोकांच्या बळावर मग काँग्रेस ताब्यात ठेवण्याचे प्रयत्न केले जातात. ज्या लोकांच्या हितासाठी आपण विकासाची नवी नवी दालने उघडतो आहोत त्याच लोकांना त्याच दालनाद्वारा नाडण्याचे प्रकार का घडावेत हे मला कळत नाही! ज्या जनतेसाठी आपण हे सारे करतो आहो तिलाच दुःखी बनविण्याचे काम आपण का करतो आहोत? मायदेशातील कोणताही माणूस सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्या माणसाच्या दारातील याचक बनता कामा नये! तो तिथला हक्कदार बनला गेला पाहिजे! सहकारात काम जरूर करा. ते वाढवा. नव्हे आपण त्यात काम केलेच पाहिजे. परंतु सहकाराच्या ज्या मूळ कल्पना आहेत त्यांना काळे फासले जाईल असे काही घडू देऊ नका हीच आग्रहाची विनंती.

## या प्रवृत्ती मोडून काढल्या पाहिजेत

मी पाटील आहे. आता जमलेल्यांपैकी बरेचसे पाटील असतील! त्यात काही माझे सगेसोयरेही असतील. सध्या खेड्यापाड्यांतून 'पोलीस पाटीलकी' संपुष्टात आलेली आहे. त्यांच्या हातातील अधिकार काढून घेण्यात आले आहेत. पण 'पोलीस पाटील' आता 'सरपंच' होतो आहे. माफ करा. मी जरासे स्पष्ट

बोलतो आहे. राजकारणात स्पष्ट बोलणे हा दोष आहे. पण तरीही मी बोलतो आहे. मला ते बोलले पाहिजे म्हणून बोलतो आहे. एक प्रवृत्ती मी आपणांस सांगतो आहे. 'पोलीस पाटीलकी' हातची गेली म्हणून आता 'सरपंचकी' सुरू झाली आहे. पाटील या नावावर माझा राग नाही. कारण मी स्वतःच पाटील आहे! सरपंच झालेला हा पोलीस पाटलापेक्षा मोठा असतो. कारण तो निवडून आलेला असतो. काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मनांत असलेली सरंजामदारशाहीची प्रवृत्ती मोडून काढली पाहिजे या मताचा मी आहे. पाटीलपणा जाऊन तिथे खऱ्याखुऱ्या अर्थाने सरपंचकी आली पाहिजे. राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण पंचायत राज्यामार्फत आणि आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण सहकाराच्या मार्फत निर्माण करण्याचा आपला प्रामाणिक प्रयत्न आहे. विकेंद्रीकरणासाठी आपण ही छोटी छोटी केंद्रे बनविली आहेत. पण तीच केंद्रे सत्तेची केंद्रे बनू पाहात आहेत. आर्थिक क्षेत्रात आपण विकेंद्रीकरण केले नाही तर आपण समाजवाद निर्माण करणार नाही हे विसरून चालणार नाही.

## आश्रय शोधू नका

आपल्या मनातील राग, लोभ, मत्सर हे सारे काढून टाका आणि कामास लागा. मी येथून निघून गेल्यावर काय घडणार आहे, हे मला माहीत आहे. विनायकराव आले—बोलले—आणि गेले. त्यातून निर्माण काय करायचे हे तुमच्या मनावर अवलंबून आहे. नुसता चुकांचा पाढा आपण वाचणार असाल तर तो मला माहीत आहे. चुका दुरुस्त करण्यासाठी प्रथमच जवळकीचे —प्रेमाचे संबंध निर्माण करणे अगत्याचे आहे. माणसाच्या मनातील ईश्वरी अंशावर विश्वास ठेवणारा मी आहे. निरनिराळ्या क्षेत्रावर आश्रय शोधण्याची कार्यकर्त्यांची जी एक प्रवृत्ती आहे ती संघटनेत अनिष्ट अशी प्रवृत्ती आहे.

## काळाची गरज

कामगार क्षेत्रात काम करण्यासाठी कसा मार्ग काढावयाचा हे आपण ठरविले पाहिजे. त्या क्षेत्रात आपण काही विशेष प्रगती करीत आहोत असे नाही. आणि या गोष्टीची आपण वेळीच नोंद घेतली पाहिजे. कामगारांच्या

प्रश्नाची, त्यांच्या सांस्कृतिक दर्जाची काळजी आपण घेतली पाहिजे. कामगार हा संघटित आहे. शेतकऱ्याप्रमाणे तो विस्कळित व असंघटित नाही. शेतकरी वर्ग हा विस्कळित वर्ग आहे. परंतु मध्यमवर्गासारखा विस्कळीत मात्र कोणताच वर्ग नाही. मध्यमवर्ग बोलू शकतो. तो आपले विचार नीटपणे मांडू शकतो. परंतु तो संघटित मात्र होऊ शकत नाही. त्याला अनेक कारणे आहेत. भारताचा मध्यमवर्ग ब्रिटिशांच्या राजवटीत राज्यकारभाराच्या एका विशिष्ट उद्दिष्टाने निर्माण झालेला वर्ग आहे. तो हुषार आहे, विचारी आहे. पण आर्थिक बाबतीत त्याला मध्यमवर्ग म्हणता येईल किंवा नाही याबाबत मी साशंक आहे. त्या वर्गाच्या कामाचे स्वरूप वेगळे असले तरी तोही आर्थिक बाबतीत मागासलेलाच वर्ग आहे, असे माझे मत आहे. मध्यमवर्गाने आपणाला स्वातंत्र्य आणि पुढारीपण दिले आहे. आपल्या सर्व समाजात शेतकरी वर्ग हा अत्यंत विस्कळीत आणि अविकसित आहे. त्याच्या मनावर झालेले संस्कार अजूनही बदलत नाहीत. अजूनही तो आपला पैसा सहकारी बँकेत ठेवायला धजत नाही. मात्र तो आपला पैसा आडत्याकडे बिनदिक्कत ठेवतो. शेतकरी वर्ग हा विचारात अपरिपक्व असा आहे. त्याला विचार कळताहेत पण ते अंमलात कसे आणावेत हे समजत नाही. त्या मानाने कामगार वर्ग हा मात्र विशेष जागृत आहे. महाराष्ट्रात त्याची संख्या दिवसेदिवस वाढत आहे आणि राजकीय दृष्ट्या तो संघटित आहे, हे दृष्टिआड करता येण्यासारखे नाही. त्याचा दबाव आपल्या राजकीय जीवनावर पडल्याशिवाय राहात नाही. कामगार वर्गाच्या आपल्याकडून जरूर काही अपेक्षा आहेत. तसा तो वर्ग हुषार आहे. आपल्या पदरी काही पाडून घ्यावयाचे असेल तर तो आपल्या जवळ येतो आणि चळवळ करायची असेल तर तो दूर पळतो. हे असले तरी तो राष्ट्रनिष्ठ आणि देशप्रेमी आहे हे विसरून चालणार नाही. राष्ट्रीय आणीबाणीच्या प्रसंगी इतिहासाने नोंद घ्यावी अशी कामगिरी या वर्गाने केली आहे. त्याच्या अंतःकरणातील देशप्रेमी भावनेचा फायदा आपण घ्यावयास हवा. आणि त्यासाठी कामगार वर्गातीलच नेतृत्व आपणात वाढवायला हवे. त्यांच्यातील नेतृत्व वाढविण्याची जबाबदारी आपली आहे. कामगार हा संख्येने लहान असला तरी त्याची ताकद मोठी आहे. आणि त्याचे परिणाम महाराष्ट्राच्या राजकीय, आर्थिक वा सामाजिक जीवनावर झाल्याशिवाय राहणार नाहीत. या सर्व गोष्टींचा विचार

१५११९

करून तो आपणाशी प्रामाणिक राहील असे करावयास पाहिजे. कारण ती आजच्या काळाची गरज आहे.

## वैचारिक भूक भागविण्याची गरज

कामगार वर्गाप्रमाणेच युवक काँग्रेस बलवान करण्याच्या दृष्टीनेही आपण काही करत नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. युवक हा प्राणी जरा वेगळा प्राणी आहे. हा प्राणी जिवंत आहे. तरुणाचे मन समजून घेण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. तो जरासा चुकीचा वागेल कदाचित ! तरीपण त्याचे मन समजून घेऊन त्याला जवळ करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. स्वातंत्र्याची चळवळ जर आपण तरुणांच्या समोर इतिहास म्हणून ठेवली तर तो समजून घेण्याचा प्रयत्न करील. परंतु त्यातून काम करण्याची प्रेरणा मात्र त्याला होणार नाही. चमत्कारिक अथवा भडक गोष्टींचे तरुण मनाला आकर्षण असते. त्याच्या समोर तसले काही ठेवले तर ते त्याला पटेल. इतिहासाचे पठण, मनन, वाचन तो तीव्रतेने जरूर करील, पण तेवढ्यावर त्याची वैचारिक भूक भागणार नाही. टिळक–गांधीजी यांचे राजकारण त्यास बरे वाटेल पण स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर जे समाजाचे परिवर्तन होत आहे त्या अनुषंगाने त्यास काय हवे आहे, हे आपण पाहिले पाहिजे. आणि त्याचाच आपण विचार करीत नाही, म्हणून आजच्या कॉलेजमधील तरुण विद्यार्थी वर्ग कॉंग्रेसकडे आकृष्ट होत नाही. आजच्या तरुणाचे मन नवीन विचारांसाठी भुकेलेले आहे. पण त्याची वैचारिक भूक आपण भागवीत नाही. समाजाला वळण देणाऱ्या किंबहुना वेळप्रसंगी समाजात गोंधळ घालणाऱ्या तरुणाला आपण नवीन काही तरी दिले पाहिजे. त्याची वैचारिक भूक भागविली पाहिजे. लोकशाही समाजवाद म्हणजे काय आहे ? इतर पक्षीयांचा वैचारिक गोंधळ कसा आहे ? हे त्याला समजावून सांगितले गेले पाहिजे. आणि मग त्याला संघटित केले पाहिजे. आजचा कॉलेजचा विद्यार्थी शिक्षणाने विकृत बनला आहे असे म्हणण्यापेक्षा उघड्या वातावरणातील संस्कारापेक्षा काही तरी वेगळे संस्कार जर आपण त्याच्या मनावर करू शकलो नाही तर नवी पिढी मजबूत होणार नाही. तरुण मन हे कधीही पक्षपाती नसते. जी नवीन मानवी मूल्ये आपणास समाजात

रुजवायची अथवा वाढवायची आहेत ती प्रथम या तरुण मनावर प्रतिबिंबित केली पाहिजेत.

### जनता आणि कॉंग्रेस एकरूप

प्रतिकॉंग्रेस निर्माण करण्याची भाषा काही ठिकाणी बोलली जाते. मला त्याना एवढाच इशारा द्यावासा वाटतो की, कृपया तसा प्रयत्न कुणी करू नये. कारण तो यशस्वी होऊ शकत नाही. कारण प्रतिकॉंग्रेस या देशात जन्म घेऊ शकत नाही. कॉंग्रेसचा इतिहास आपण पडताळून पाहा. प्रतिकॉंग्रेस इथे खलास झालेलीच आपल्या दृष्टीस येईल. जनतेला कॉंग्रेसपासून दूर ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला अथवा स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी कॉंग्रेस आपल्या ताब्यात ठेवण्याचा ज्यांनी प्रयत्न केला तर ते स्वतःच समाजजीवनातून दूर फेकले गेल्याचे आपल्या नजरेस येईल ! कॉंग्रेस आणि जनता यांच्यांत अंतर पाडण्याचा कुणीही प्रयत्न करू नये. कारण तिचा जन्मच मुळी जनतेच्या अंतःकरणातून झाला आहे. देशाचा इतिहास हा जनतेचा इतिहास आहे, आणि तो इतिहास कॉंग्रेसने घडविला आहे. जनता आणि कॉंग्रेस एकरूप आहे. त्याना अलग करता येणार नाही. मग ती कोणतीही सत्ता वा ताकद असो.

जनता कॉंग्रेसची आणि कॉंग्रेस जनतेची होत असताना पक्षाचा प्रमुख या नात्याने मी काही बोललो नाही तर तो माझा दोष ठरेल. सामुदायिक आणि तरुण नेतृत्व निर्माण करण्याचा आपला प्रयत्न आहे. त्या निर्माण होणाऱ्या नेतृत्वाच्या पाठीशी आपली सारी ताकद घेऊन एकमताने एकदिलाने आपण उभे राहिले पाहिजे.

### जातीयवादाचा दुर्दैवी वारसा

जातीयवादाचा दुर्दैवी वारसा घेऊन आपण चाललो आहोत. जातीयवादाचा प्रश्न निर्माण करणारा प्रत्येक माणूस हा भारताचा शत्रू आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. हरिजनांच्या बाबतीत आपला दृष्टिकोन आपण बदलला पाहिजे. त्यांच्या बाबतीतील उपकाराची भावना आपल्या अंतःकरणातून बाजूला सारली

पाहिजे. त्यांचा स्वाभिमान न दुखावता, त्यांच्यातील स्वाभिमानाची भावना जागृत ठेवून, कर्तव्याच्या व्यापक दृष्टिकोनातून आपण त्यांच्याकडे पाहिले पाहिजे. महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी शिंदे यांनी जो उदार दृष्टीकोनाचा वारसा आपणास दिला आहे, तो आपण पुढे चालविला पाहिजे. काही काही ठिकाणी अद्यापही त्यांना ओंजळीने पाणी प्यावे लागते, हे दृश्य मनाला वेदना देणारे आहे. आपण हा प्रश्न कायद्याने सोडविण्याचा प्रयत्न जरूर केला आहे पण हा प्रश्न अंतःकरणापासून सोडविण्यासाठी कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी तो कार्यक्रम म्हणून स्वीकारला पाहिजे. तसेच कोणतीही नवीन सहकारी संस्था रजिस्टर करताना जर त्या संस्थेत हरिजन प्रतिनिधित्व नसेल तर ती संस्था रजिस्टर होणार नाही असा नियम केला जावा या मताचा मी आहे. हरिजनांच्या दुःखाबाबतच्य माझ्या भावना तीव्र आहेत. हरिजनांच्या ज्याप्रमाणे इतर समाजाकडून काही अपेक्षा आहेत. त्याप्रमाणे इतर समाजाच्याही त्यांच्याकडून काही अपेक्षा आहेत. हरिजन कॉंग्रेस कार्यकर्ता पांढरपेशा झाल्यासारखा वाटतो आहे आपले पुढारीपण आपल्या समाजासाठी तो वापरत नाही, असे मला म्हणायचे आहे. त्यांचे प्रश्न सोडविण्याची तुमची आमची जशी जबाबदारी आहे तशी त्यांचीही ती जबाबदारी आहे हे विसरता कामा नये.

मराठा ... य, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................. दि: ..................
.................. ..................

# १३

# काँग्रेस व विरोधी पक्ष

आपल्या कोल्हापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित केलेल्या या अभ्यास शिबिराचे उद्घाटन करताना मला मनापासून आनंद होत आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांचा वैचारिक पाया अशा शिबिरातून पक्का केला जातो. काँग्रेस ज्या ध्येयधोरणासाठी झगडत आहे, त्या ध्येयधोरणासंबंधी आपल्या कार्यकर्त्यांच्या कल्पना स्पष्ट केल्या जातील. यातूनच आपल्या संघटनेस मोठे बळ प्राप्त होणार आहे. या दृष्टीने अशा विकासशिबिराचे मी स्वागत करतो. आजच्या या शिबिराच्या निमित्ताने काँग्रेस पक्ष व विरोधी राजकीय पक्ष यांच्या भूमिकेसंबंधी थोडेसे विस्ताराने आपल्याशी बोलावयाचे मी ठरविले आहे. जे विचार गेले काही महिने माझ्या मनात घोळत आहेत तेच मी या उद्घाटनपर भाषणाच्या निमित्ताने आपल्यासमोर मांडत आहे.

गेली अठरा वर्षे लोकशाही इथे धीमेपणाने पण निश्चितपणे प्रगती करीत आहे. या काळातील भारतीय लोकशाहीचे एक वैशिष्ट्य असे की, इथे काँग्रेस हा पक्ष स्थिर आहे. विरोधी पक्षाची वाढ झालीच नाही. उलट गेल्या काही

कोल्हापूर जिल्हा काँग्रेस कार्यकर्ता शिबीर—
उद्घाटनाचे भाषण, पन्हाळा.

वर्षांत विरोधी पक्षांची अंतर्गत मतभेदामुळे शकले होऊन ते दुबळे होत आहेत. प्रजासमाजवादी पक्षात संयुक्त आघाडीच्या प्रश्नावर मतभेद होऊन त्यांची दोन शकले झाली. कम्युनिस्टांमध्येही पेकिंगवादी व मॉस्कोवादी असे दोन गट पडून एखाद्या कलिंगडाचे दोन सरळ भाग पडावेत त्याप्रमाणे त्यांचेही दोन तुकडे झाले आहेत. डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूनंतर रिपब्लिकन पक्षातही असेच दोन प्रमुख गट पडून त्याही पक्षाची शकले झाली आहेत. गेल्या काही वर्षांतील एक ठळक घटना म्हणून या घटनेचा उल्लेख करावा लागेल. सर्व विरोधी पक्ष अशा तऱ्हेने अंतर्गत मतभेदानी दुबळे होत आले याचे एक कारण त्यांच्या वैचारिक अस्पष्टतेत आणि गोंधळात असावे असे वाटते ! त्यांचा वैचारिक पाया चुकीचा तरी असावा वा तो अस्पष्ट तरी असावा ! यासंबंधी थोडेसे खोलात जाऊन माझे विचार मी स्पष्ट करू इच्छितो.

### कम्युनिस्ट पक्ष

कम्युनिस्ट पक्षाची दोन वैशिष्ट्ये मी आपणास मुद्दाम सांगू इच्छितो. पहिले असे की, कोणत्याही राजकीय स्थित्यंतरासाठी त्यांचा लोकशाही मार्गावर यत्किंचितही विश्वास नाही. सर्व राजकीय बदल हे घातपाती मार्गांनी, रक्तपात करूनच केले पाहिजेच अशी त्यांची समजूत आहे. त्यामुळे देशात अराजक कसे माजेल व गोंधळ कसा होईल यासाठी सदैव टपलेले असतात. आपल्या देशात संप, मोर्चे, हरताळ, बंद इत्यादी भाषा वापरून राज्ययंत्रणा खिळखिळी करण्याचा ते प्रयत्न करीत असतात. राज्ययंत्रणा खिळखिळी केली म्हणजे यादवी युद्धाला अनुकूल वातावरण निर्माण होईल अशी त्यांची समजूत आहे. अशा मार्गानेच क्रांती होते असे त्यांच्या गुरूने म्हणजे कार्ल मार्क्सने त्याना सांगून ठेवले आहे. मार्क्सने १८४८ च्या जाहीरनाम्यात या रक्तपाती मार्गांचा अवलंब केला आहे. याचे एक कारण कदाचित लोकशाही त्या काळात अगदीच बाल्यावस्थेत होती हे असेल. औद्योगिक क्रांतीनंतर युरोपमध्ये ती नुकतीच जन्माला येऊ लागली होती. अशा या काळात कदाचित लोकशाही मार्गांनी काही महत्त्वाचा बदल होऊ शकेल असे मार्क्सला वाटले नसावे. परंतु गेल्या १००–१२५ वर्षांत लोकशाही मार्गाने जगात केवढी तरी शांततामय क्रांती झाली आहे. मतदान पेटीमधले अमाप सामर्थ्य जगाच्या प्रत्ययाला

आले आहे. परंतु दुर्दैवाने कम्युनिस्ट हे मार्क्सनंतरच्या इतिहासापासून राजकीय बोध घ्यायला तयार नाहीत. त्यांचा अद्यापही रक्तपाती आणि घातपाती मार्गा-वर विश्वास कायमच आहे. या दृष्टीनेच १९४८ साली स्वातंत्र्यानंतर त्यानी आपल्या देशातही तेलंगण, केरळ इथे यादवी माजवून क्रांती रशियामधून " आयात " करण्याचा प्रयत्न केला. इतकेच नव्हे तर सर्व आशियातील प्रमुख अशा देशांमध्ये त्यांनी एकाच वेळीं अशा रक्तपाती मार्गांचा अवलंब केला. सुदैवाने तो ६ पैकी ५ देशांत फसला. आणि राहिलेल्या इंडोनेशियात थोडी-फार यादवी झाली होती. तिथे तो नुकताच पूर्णपणे फसला आहे. तथापि अपयश आले तरी या घातपाती मार्गावर त्यांचा विश्वास कायम आहे. व त्यांच्यापासून आपल्याला सदैव दक्षता घेतली पाहिजे.

दुसरे असे की, कम्युनिस्ट हे त्यांच्या जन्मापासून तो आजपर्यंत या देशा-तील राष्ट्रीय भावनेशी कधीही समरस झालेले नाहीत. त्यांच मुख्य निष्ठा भारताऐवजी रशिया-चीनमधील राजवटीत आहे. १९४२ च्या आंदोलनाच्या वेळीही ते येथील राष्ट्रीय भावनेशी समरस झाले नाहीत. गांधींच्या असहकाराच्या चळवळींतही ते कधी सहभागी झाले नाहीत. गेल्या ४० वर्षांत प्रत्येक वेळी ते आपल्या राष्ट्रीय आकांक्षेशी समरस न होता त्यांच्याशी विरोधी राहिले आहेत. अगदी अलीकडे चिनी आक्रमणानंतरही आपल्याला याचा प्रत्यय आला. या देशाच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याशी बेइमानी असणाऱ्या या पक्षापासून आपल्याला सदैव धोका आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

### शा. का. पक्ष

महाराष्ट्रातील दुसरा एक पक्ष म्हणजे शेतकरी कामकरी पक्ष. १९४८ साली दाभाडी प्रबंध हाच अद्यापही या पक्षाचा वैचारिक पाया आहे. या दाभाडी प्रबंधाचा आपण अभ्यास केला तर आपणास असे दिसून येईल की, हा प्रबंध पूर्णपणे कम्युनिस्ट तत्त्वज्ञानावर उभारलेला आहे. कम्युनिस्टांप्रमाणे यांचाही रक्तपात, अराजक, यादवीयुद्ध यावर विश्वास आहे. या पक्षाच्या या प्रबंधाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, रशियापेक्षा चिनी कम्युनिझमचा आदर्श त्यांच्या डोळ्यासमोर आहे. चीनने ज्याप्रमाणे खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांच्या सह-कार्याने लाखो माणसांची कत्तल करून तिथे कम्युनिझम प्रस्थापित केला त्याप्रमाणे

तो इथेही करावा अशी त्यांची सुप्त धारणा आहे. माओ हा या पक्षाच्या दृष्टीने आदर्श नेता आहे. या पक्षाच्या दाभाडी प्रबंधाचा लोकशाही मार्गावर विश्वास नसल्याने हा पक्षही लोकशाहीच्या दृष्टीने घातक आहे, असे मला वाटते. या पक्षाचे दुसरे वैशिष्ट्य असे की, त्यामध्ये कम्युनिझमबरोबरच कम्युनॅलिझमचेही मिश्रण झाले आहे. आणि त्यामुळे तो अधिकच कडवा झाला आहे. एका दृष्टीने महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीचे हे परिणत रूप आहे. परंतु त्यामध्ये ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीमागील समतेच्या प्रेरणेपेक्षा वादाचाच भाग अधिक आहे. कम्युनिझम आणि कम्युनॅलिझम यांच्या जोडीला कधी कधी सरंजामशाहीतील काही अवशेषही जाऊन बसतात. घराण्याचे अहंकार— वतनाचे अहंकार, त्यामध्ये अधूनमधून डोकावत असतात. आणि कम्युनिझम, कम्युनॅलिझम आणि फ्रीडॅझम यांचे हे मिश्रण त्यामुळेच आमच्या सामाजिक आणि राजकीय जीवनात अतिशय अनिष्ट होऊन बसले आहे. सुदैवाने हा पक्ष अखिल भारतीय रूप घेऊ शकला नाही. तो आज महाराष्ट्रापुरताच मर्यादित आहे. परंतु या प्रांतातीलही उरले सुरलेले सर्व अवशेष आपणास नष्ट केले पाहिजेत. हे लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी आवश्यक आहे.

### जनसंघ

कम्युनिस्ट पक्ष हा जसा डाव्या हुकूमशाहीचा पुरस्कार करणारा पक्ष आहे. त्याचप्रमाणे जनसंघ हा उजव्या हुकूमशाहीचा पुरस्कार करणारा पक्ष आहे. या पक्षाची मूलभूत श्रद्धा ही हुकूमशाहीवर आहे. लोकशाहीवरील श्रद्धा तकलुपी व फसवी आहे. त्यांच्या निवडणूक जाहीरनाम्यात ते जरी लोकशाहीचा पुरस्कार करीत असले तरी तो केवळ कागदी स्वरूपाचा पुरस्कार आहे. त्यांच्या पुरस्काराचे अंतरंग हुकूमशाहीच आहे. याचा एक उत्कृष्ट पुरावा म्हणून मी आर्. एस्. एस्. च्या संघटनेचा उल्लेख करीन. आर्. एस्. एस्. ही जनसंघाची प्राथमिक अवस्था आहे हे कोणत्याही राजकीय अभ्यासकाला सांगण्याची गरज नाही. या आर्. एस्. एस्. ची सर्व घटना ही हुकूमशाहीवर उभारलेली आहे. या संघटनेचे प्रमुख एकदा निवडले म्हणजे ते तिथे जन्मभर कायम असतात. त्यांचा शब्द वेदवाक्यासारखा प्रमाण मानला जातो. त्यांची गीतेही हुकूमशाहीला पोषक असतात. " श्वास हे निश्वासले–विश्वासले नेत्यावरी "

हे त्यांचे आवडते संघगीत आहे. त्यांच्या ओठावर नाचणाऱ्या या काव्यपंक्ती आहेत. यातून त्यांचा आदर्श स्पष्ट होतो. केवळ वातावरण अनुकूल नाही म्हणूनच ते लोकशाहीचा पुरस्कार करण्याचे नाटक करीत आहेत. परंतु संधी मिळाली म्हणजे ते पहिला घाव लोकशाही जीवनपद्धतीवर घालतील यात मला शंका नाही. हिटलरने ज्याप्रमाणे लोकशाहीच्या शिडीचा उपयोग करून नंतर ती लोकशाही नष्ट केली त्याप्रमाणे जनसंघ हा पक्ष भारतात केल्यावाचून राहणार नाही. त्यामुळेच लोकानी या पक्षाबद्दल अतिशय जागृत असले पाहिजे. काँग्रेस कार्यकर्त्यांनीही या पक्षाचे हे स्वरूप लोकासमोर वेळोवेळी स्पष्ट केले पाहिजे. भाषिक प्रश्नावर पंजाबमध्ये दंगली माजवून वा अन्न-धान्याच्या प्रश्नाचा आश्रय घेऊन ते या देशातील लोकशाही नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. आपल्याला त्यांचे हे अंतरंग जितक्या लवकर समजेल तितके ते भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने भाग्याचे ठरेल.

जनसंघाचे दुसरे वैशिष्ट्य असे की, त्याना धर्मावर आधारलेले राज्य हवे आहे. भारतीय राज्यघटनेत मान्य केलेले धर्मनिरपेक्ष राज्य त्याना नको आहे. वास्तविक २० व्या शतकाच्या उत्तरार्धात आता जगात धर्माधिष्ठित राज्याचा पुरस्कार करणारा राजकीय पक्ष एखादा दुसरा अपवाद सोडल्यास कुठेही सापडणार नाही. धर्माधिष्ठित राज्यामध्ये इतर धर्मीयांना दुय्यम दर्जाचे वा हिणकस नागरिकत्व दिले जाते. लोकशाहीमधील मानवी समतेच्या तत्त्वावरच हा आघात आहे. धर्मस्वातंत्र्य हा मानवी स्वातंत्र्याचा मूलभूत भाग आहे. लोकशाहीमध्ये हे मानवी स्वातंत्र्य आपल्याला प्रत्येक नागरिकाला दिले पाहिजे. आपण एकदा लोकशाही राजवट स्वीकारली की, आपणास आपो-आपच धर्मनिरपेक्ष राज्याचे तत्त्व स्वीकारावे लागते. लोकशाही व धर्मनिरपेक्ष राज्य हे अभिन्न आहेत. एका दृष्टीने एकाच नाण्याच्या त्या दोन बाजू आहेत आणि म्हणून जनसंघाने पुरस्कारलेले धर्माधिष्ठित राज्याचे तत्त्व हे आपल्या लोकशाहीलाच मारक ठरणार आहे. या देशात हिंदूप्रमाणे बौद्ध, शिख, मुसल-मान, पारशी, यहुदी, खिश्चन इत्यादी अनेक धर्मांचे लोक आहेत. या देशातील प्रत्येक नागरिकाला समान हक्क व विकासाची समान संधी मिळाली पाहिजे. लोकशाही जीवनाचा तोच उत्तम आविष्कार आहे.

जनसंघाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की तो दक्षिणेपेक्षा उत्तर हिंदु-

स्थानातच मुख्यतः वाढला आहे व त्यातही पुन्हा उत्तर हिंदुस्थानात फाळणीचे दुष्परिणाम झालेल्या भागातच तो अधिक वाढलेला आहे. आपण त्यांच्या बलाबलाचा जर नकाशा काढला तर चटकन आपल्या हे लक्षात येईल. यामधूनही जनसंघाचे अंतरंग अधिक स्पष्ट होते.

## संयुक्त समाजवादी

संयुक्त समाजवादी पक्षाचे एक वैशिष्ट्य असे की त्यांना काँग्रेस विरोधासाठी सर्व विरोधी पक्षांची एक संयुक्त आघाडी उभी करावयाची आहे. या आघाडीमध्ये ते कम्युनिस्टांना घेऊ इच्छितात. त्याचप्रमाणे जनसंघ, हिंदुमहासभा यानाही आणू इच्छितात. काँग्रेस विरोधासाठी अशा अत्यंत परस्पर विरोधी पक्षाना एकत्र आणून हा पक्ष लोकाना राजकीय शिक्षण कसा देणार आहे! त्यांचे कोणत्याही आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय प्रश्नावर काय एकमत होणार आहे? कम्युनिस्ट हे उत्पादनाच्या सर्व साधनांचे राष्ट्रीयकरण करा तरच देशापुढील प्रश्न सुटतील असे सांगणार, तर उलट जनसंघ-हिंदुमहासभा हा कार्यक्रम देशाला विनाशाकडे नेणारा आहे असे प्रतिपादन करणार! सामाजिक प्रश्नावर जनसंघाचे तोंड भूतकाळाकडे राहणार तर उलट कम्युनिस्ट हे भूतकाळाकडे पाठ फिरवून भविष्यकाळाकडे वाटचाल करणार! अशा अत्यंत परस्पर विरोधी राजकीय पक्षांना एकत्रित आणून हा पक्ष या देशाचे राजकारण कसे हाकणार! राजकीय पक्ष हे लोकाना शिक्षण देण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. अशी संयुक्त आघाडी कोणत्या प्रश्नावर कशा प्रकारचे राजकीय शिक्षण देणार आहे? शिवाय दुर्दैवाने उद्या त्यांच्या हातात सत्ता गेलीच तर ते सरकार तरी कसे चालविणार! त्यांचे कोणत्या प्रश्नावर एकमत होणार? त्यामुळे अशा प्रकारची संयुक्त आघाडी ही एका दृष्टीने बिघाडीच आहे! यातून लोकशाही समृद्ध होणार नाही!

या पक्षाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे सत्याग्रह, कायदेभंग यावर असलेला अवास्तव भर हे होय. गांधीनी सत्याग्रह, कायदेभंग यांचा उपयोग केला. परंतु गांधी व हा पक्ष यांच्यामध्ये या बाबतीत एक महत्त्वाचा फरक असा की, गांधीनी त्यांचा उपयोग औषधासारखा केला. पण हा पक्ष या साधनांचा उपयोग दैनंदिन आहारासारखा करीत आहे. औषधाचे हे जेवण करीत आहेत.

यातून भारतीय लोकशाही कमकुवत होईल असे मला वाटते. कायदेभंगाचा मार्ग या देशाला आजच्या काळात उपकारक ठरण्याच्या ऐवजी अपकारकच ठरेल असे वाटते. याचे एक कारण असे की, कायद्याबद्दलचा आदर हा लोकशाही राजवटीचा कणा आहे. कायदेभंगाच्या चळवळीमुळे न कळत कायद्याच्या चौकटीबद्दलचाच अनादर वाढत जातो. कायद्याबद्दलचा आदर समाजातून ढिसूळ झाला, तर या देशात कोणतेही सरकार आणखी १० वर्षांनंतर स्थिर राहणार नाही. अस्थिर सरकारचा शाप तुमच्या आमच्या कपाळी लिहिला जाईल. आणि या पक्षाचा सत्याग्रह, कायदेभंग यावरील फाजील भर या देशाला अखेरीला अराजकाच्या मार्गाला नेऊन सोडील. त्यांचा हेतू वाईट आहे असे मला म्हणायचे नाही. परंतु 'माणूस स्वर्गाला जाण्याचा हेतू मनात बाळगून नरकाच्या पायऱ्या चढू शकतो' तसाच काहीसा प्रकार याही पक्षाबद्दल होतो आहे. लोकानी याही बाबतीत जागृत राहावयास हवे.

### प्रजासमाजवादी

प्रजासमाजवादी पक्ष लोकशाही व समाजवाद आपले उद्दिष्ट आहे असे सांगतो. परंतु १९५४ च्या आवडीच्या ठरावाने कॉंग्रेसने समाजवादाची दीक्षा घेतली आहे. लोकशाही हा तर तिचा मूलाधारच आहे. त्यामुळे आवडीच्या ठरावानंतर प्रजासमाजवादी पक्ष निरुपयोगी तरी झाला आहे किंवा तो कालबाह्य ठरला आहे. कॉंग्रेसने ज्या दिवशी आवडी इथे समाजवादाचे धोरण स्वीकारले त्याच दिवशी वास्तविक प्रजासमाजवादी पक्षाचे कार्य संपुष्टात आले. कॉंग्रेसच्या आर्थिक धोरणावर समाजवादाचीच छाप आहे, असे आपणास दिसून येईल. हा पक्ष आता त्यामुळे भारतीय राजकारणात अनावश्यक ठरला आहे.

### स्वतंत्र

स्वतंत्र पक्षाचा आर्थिक कार्यक्रम व कॉंग्रेस पक्षाचा आर्थिक कार्यक्रम यामध्येच मूलभूत फरक आहे. स्वतंत्र पक्ष हा राष्ट्रीयीकरणाला विरोध करतोच परंतु त्याचबरोबर मुक्तस्पर्धेच्या अर्थव्यवस्थेचा तो पुरस्कारही करतो. ते ज्या अर्थाने मुक्तस्पर्धेवर उभारलेल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करतात, तशा तऱ्हेची

अर्थव्यवस्था आज जगात कोठेही नाही. खुद्द अमेरिकेत अशा तऱ्हेची अर्थव्यवस्था नाही. १९३०-३२ च्या जागतिक मंदीनंतर अमेरिकेतही सरकारी नियंत्रण वाढले. आज अमेरिकेत एकूण राष्ट्रीय उत्पादनापैकी सुमारे २५ टक्के उत्पादन हे राष्ट्रीय नियंत्रणाखालील उद्योगधंद्यापासून येते. स्वतंत्र पक्ष ज्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करतो अशी अर्थव्यवस्था युरोपमध्ये १९ व्या शतकात होती. किंवा अमेरिकेत १९३० च्या आधी होती. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात अशा प्रकारच्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणे आता कोणत्याही राष्ट्राला शक्यही नाही आणि इष्टही नाही.

विशेष म्हणजे कम्युनिझमला तोंड देण्यासाठी ते अशा अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करतात, परंतु या मार्गाने गेल्यास कम्युनिझम टाळण्याऐवजी त्याला आपण अधिक जवळ आणू! त्यांच्या मार्गाने या देशात कम्युनिझम लवकर येईल. त्यांचा हेतू काहीही असला तरी त्याचे परिणाम अटळ आहेत. आणि म्हणून स्वतंत्र पक्षाच्या विचारापासून आपण दूर राहिले पाहिजे.

स्वतंत्र पक्षाचा नियोजनाला वा सरकारी क्षेत्रातील उद्योगधंद्यांना विरोध आहे. परंतु या देशातील अर्थव्यवस्थेचा समतोल विकास करायचा तर आपल्याला खासगी, सहकारी क्षेत्रातील उद्योगधंद्यांची योग्य प्रमाणात वाढ केली पाहिजे. सरकारी क्षेत्रातील उद्योगधंदे अजिबात नकोत अशी आत्यंतिक भूमिका घेता येणार नाही. उलट सरकारी क्षेत्रातील उद्योगधंद्यांना भरघोस यश मिळाले आहे. उदा. स्टेट ट्रॅन्स्पोर्ट किंवा लाइफ इन्शुअरन्स यांचे राष्ट्रीयीकरण घ्या. स्टेट ट्रॅन्स्पोर्टमुळे आज आपल्या राज्यात दळणवळणाची उत्तम सोय झाली आहे. आता आपण एस्. टी. ने चारशे-पाचशे मैलांचा प्रवास विनासायास करू शकतो आहे. हा धंदा खासगी व्यक्तींच्या हाती होता तेव्हा ती गोष्ट अशक्य होती. शिवाय या धंद्यास आता नियमितपणा आला. नोकरवर्गाला चांगली वेतनश्रेणी आहे. प्रवाशांच्यासाठी एस्. टी. ची स्टॅण्डस् आहेत. यापैकी अनेक गोष्टी खासगी धंदेवाईक करू शकले नसते. त्याचप्रमाणे लाईफ इन्शुअरन्सच्या राष्ट्रीयीकरणामुळे करोडो रुपये आपल्याला कर्जरूपाने उपलब्ध झाले आहेत. सरकारी क्षेत्रातील उद्योगधंद्यांचे हे यश नाकारून चालणार नाही. स्वतंत्र पक्षाला अशा प्रकारचा कोणताही उपक्रम आवडणारा नाही. परंतु त्यामुळे ते गरीब नागरिकांच्या पदरात लोककल्याणाच्या योजना घालू शकणार नाहीत.

### रिपब्लिकन

रिपब्लिकन पक्षाचे मुख्य गाऱ्हाणे अस्पृश्यता निवारणाचे वा सामाजिक समतेचे आहे. इतर कार्यक्रमाच्या बाबतीत कॉंग्रेस व हा पक्ष यांच्यात फारसा फरक नाही. जवळ जवळ सर्व गोष्टी समान आहेत. अस्पृश्यता निवारणाच्या बाबतीत कॉंग्रेसचा तत्त्वतः या कार्यक्रमाला विरोध नाही. भारतीय राज्य घटनेने अस्पृश्यता निवारण्याचे कार्य मान्य केले आहे. इतकेच नव्हे तर १९२० पासून तो १९४८ पर्यंत गांधीनी अस्पृश्यता निवारण्याच्या कामावर सतत भर दिला आहे. कॉंग्रेसचा वारसाच मुळी अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यांचा वारसा आहे. खेड्यापाड्यातून अर्थात या कार्याला यावी तेवढी गती आली नाही हे खरे आहे. पण याचे कारण आमचा खेड्यातील समाज या प्रश्नावर फार सावकाश बदलत आहे, हेच आहे. कॉंग्रेसने या कार्याला गती द्यावी असे आम्हालाही वाटते. हे कार्य जितके महत्त्वाचे तितकेच अवघडही आहे. रिपब्लिकन पक्ष व कॉंग्रेस पक्ष यांच्यामध्ये या बाबतीत वैचारिक दृष्ट्या एकमत आहे. रिपब्लिकन पक्षात विशेषतः डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूनंतर जे अनेक गट पडले आहेत त्यामुळे तोही पक्ष हे कार्य विशेष गतीने करू शकेल असे वाटत नाही. कॉंग्रेसच आपल्या पुरोगामी कार्यकर्त्यांच्या सहकार्याने हे कार्य अधिक प्रभावी रीतीने पार पाडू शकेल असा मला विश्वास वाटतो.

या सर्व राजकीय पक्षांच्या ध्येयधोरणांचा एकत्रित आढावा घेतला तर हे सर्व विरोधी पक्ष भारतीय लोकशाहीला दुबळे तरी करतील किंवा अडचणीत तरी आणतील असे वाटते. त्यामुळे कॉंग्रेसच या देशाचे स्वातंत्र्य, लोकशाही जतन करायला समर्थ आहे. कॉंग्रेसचे स्थैर्य म्हणजे या देशातील लोकशाहीचे स्थैर्य आहे. या देशातील स्वातंत्र्य, लोकशाही बळकट करायची असेल तर कॉंग्रेस पक्षच बळकट केला पाहिजे. अर्थात कॉंग्रेसमध्ये आज पुष्कळ गुण असले तरी कॉंग्रेसच्या मर्यादांचीही जाणीव आपण ठेवली पाहिजे व त्या दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कॉंग्रेस पक्षाच्या हिताच्या दृष्टीने त्याची गरज आहे. आणि त्या दृष्टीने काही मर्यादांचा मी मुद्दाम उल्लेख करू इच्छितो.

### विचारवंताना जवळीक वाटली पाहिजे

कॉंग्रेस संघटनेबद्दल मला पहिली आणि ठळकपणे जाणवणारी उणीव म्हणजे

आपला हा पक्ष या देशातील विचारवंतात बुद्धिजीवी वर्गाला अद्यापहि फारसा जवळ करू शकला नाही. या देशातील बुद्धिजीवी वर्ग व कॉंग्रेस संघटना यामधील मोठे अंतर गेल्या अठरा वर्षात आपण कमी करू शकलो नाही. हा एक दृष्टीने आपला पराभव आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात आपण जेव्हा समाजाची पुनर्मांडणी करण्याचा प्रयत्न करीत आहोत, आपल्या समाजजीवनाची घडणच नव्याने घडवीत आहोत, अशा या काळात बुद्धिवंत वर्गाचेही आपल्याला सहकार्य घ्यावे लागणार आहे, किंबहुना स्वातंत्र्यपूर्व काळापेक्षा स्वातंत्र्योत्तर कालात त्याचे स्थान आणि कार्य अधिक महत्त्वाचे ठरणार आहे. या काळात विचारवंतांना—बुद्धिवंतांना आपण अधिक जवळ करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

कॉंग्रेस संघटना व विचारवंत यांच्यामधील अंतर कसे वाढत गेले याचा मागोवा घेत आपण मागे मागे गेलो तर गांधीयुगाच्या प्रारंभाशी मन थबकते. व गांधीयुगाच्या प्रारंभापासून ही दरी पडत गेली असे वाटते. गांधीयुगाच्या आधी न्या. गोखले, लोकमान्य टिळक, प्रा. आगरकर ही मंडळी स्वतःच मोठी विद्वान व व्यासंगी मंडळी होती. या काळात स्वाभाविक कॉंग्रेससंघटना व अभ्यासक बुद्धिजीवी वर्ग यांच्यातच एक प्रकारचे संवादित्व होते. परंतु १९२० नंतर या दोन वर्गात अंतर पडत गेले. गांधीयुगात व्यासंगापेक्षा, ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष कार्याला अधिक महत्त्व आले. काही प्रमाणात ते स्वाभाविकही होते. परंतु गांधीयुगाने चरखा, टकळी चालविणारास इतके अवास्तव महत्त्व दिले की, विचारवंत या काळात अगदी गुदमरून गेला व तो या संघटनेपासून दूर गेला. काही प्रमाणात १९३० नंतर कॉंग्रेसमधील समाजवादी पक्षाने विचारवंतांचा एक गट निर्माण करण्याचा प्रयत्न केला. याचे नेतृत्व पंडित नेहरूंच्याकडे असल्याने त्यांनी विचारवंतांची योग्य ती बूजही राखली. तरी देखील संघटनेत वरील दोन गटात जी दरी निर्माण झाली होती ती पुष्कळ अंशी कायमच राहिली. १९४८ नंतरही आपण या दोन वर्गातील अंतर कमी करण्यात यशस्वी झालो नाही.

मला तर असे वाटते की, १९२० च्या आधी म्हणजे रानडे, गोखले, टिळक, फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी यांच्या काळात या दोन वर्गात संवादित्व होते, ते संवादित्व आता आपणाला पुन्हा प्रस्थापित केले पाहिजे.

या कार्यांत आपण जितके यशस्वी होऊ तितकी काँग्रेस संघटनेची ताकद आपण वाढवू असे मला वाटते.

# १४

# लोकसंख्येची वाढ : एक समस्या

जिल्हा परिषेदेच्या द्वारे आयोजित केलेल्या या शिबिराचे उद्घाटन करताना मला मनापासून आनंद वाटतो. या शिबिराच्याद्वारे तुम्ही महाराष्ट्रातील आर्थिक विकासाबरोबरच वैचारिक क्रांतीची पाऊलवाट उजळून काढीत आहात. आजच्या उद्घाटनाच्या निमित्ताने आर्थिक विकास आणि भारतातील लोकसंख्येचा प्रश्न यासंबंधी काही विचार मी आपणासमोर मांडायचे ठरवले आहे.

गेल्या १०० वर्षातील लोकसंख्येचा आढावा घेतला तर एक गोष्ट चटकन आणि ठळकपणे नजरेत भरते ती अशी की, भारताची लोकसंख्या १८७१ पासून ते १९२१ पर्यंत जवळ जवळ कायम होती. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या काळात प्लेगसारख्या साथीचे रोग आणि वारंवार येणारे दुष्काळ यामुळे मृत्यूचे प्रमाण फार मोठे होते. जन्माचे प्रमाण जेवढे होते तितकेच जवळ जवळ मृत्यूचेही प्रमाण होते. त्यामुळे लोकसंख्या जवळ जवळ कायम राहिली. परंतु १९२१ पासून ते १९६५ पर्यंत लोकसंख्या सतत वाढत आहे. भारताच्य लोकसंख्येचा आपण जर आलेख काढला तर लोकसंख्येची रेषा सतत वरवर

---

कुटुंब नियोजन शिबिराचे उद्घाटन
जि. औरंगाबाद

चालली आहे असे आपणास दिसून येईल. गेल्या ४०–४५ वर्षांत लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. याचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे मृत्यूचे प्रमाण सतत खाली खाली येत आहे. आणि जन्माचे प्रमाण जवळ जवळ कायम आहे. या दोन्हीमधील तफावतीमुळे भारताच्या लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. उदाहरणार्थ, १९२१ साली मृत्यूचे प्रमाण १ हजारामध्ये ४०–४५ होते. ते आता १८–२० वर आले आहे. उलट जन्माचे प्रमाण हजारी ४०–४५ होते ते जवळ जवळ कायम आहे. याचा स्वाभाविक परिणाम म्हणून भारताची लोकसंख्या सतत वाढत चालली आहे.

## दृष्टी बदलल्याचे दृश्य

मृत्यूचे प्रमाण कमी होण्याचे कारण म्हणजे वैद्यकीय शास्त्रात झालेली क्रांतिकारक सुधारणा होय. पूर्वी प्लेग-कॉलरा झाला म्हणजे मरण हे जवळ जवळ अटळ होऊन बसलेले असे. आता वैद्यकीय शास्त्राने या साथीच्याच रोगावर नव्हे तर इतर अनेक रोगावर मात केलेली आहे. आता सर्वत्र दवाखान्यांचे प्रमाण वाढले आहे, डॉक्टरांची संख्या वाढलेली आहे. आणि लोकांचाही वैद्यकीय ज्ञानावरचा विश्वास वाढतो आहे. पूर्वी खेडयापाडयात आजारावर गंडे, दोरे, धूप, अंगारे यांचेच इलाज प्रामुख्याने चालत असत. टायफॉइडसाठी बकरी, कोंबडी यांचे बळी दिले जात असत. सुदैवाने आता पूर्वीपेक्षा खेड्यापाडयात शास्त्रीय उपचारावरील विश्वास वाढतो आहे. त्यामुळे मृत्यूचे प्रमाण खाली येत आहे. मृत्यूचे प्रमाण खाली येत आहे ही भाग्याची गोष्ट आहे, पण त्याचप्रमाणे आपणास जन्माचेही प्रमाण रोखले पाहिजे, तरच पुढील १० वर्षांत आपणास आर्थिक विकास करता येईल.

लोकसंख्येचा अभ्यास केला तर आणखी एक गोष्ट नजरेत भरते, ती अशी की, गेल्या ४०–४५ वर्षांत लोकसंख्येच्या वाढीचा हा दर १ टक्का होता. १९२ ते ३१ या काळात वाढीचा हा दर $१\frac{३}{४}$ टक्का होता. ४१ ते ५१ तो $१\frac{१}{२}$ टक्का झाला. ५१ ते ६१ या काळात तो २ टक्के झाला तर आता तो $२\frac{१}{२}$ टक्क्याच्या दरम्यान आहे. म्हणजे वाढीचा हा दर गेल्या ४०–४५ वर्षांत १ टक्क्याहून $२\frac{१}{२}$ टक्क्यावर गेला आहे. पुढील काळात तो असाच वाढत गेला तर वाढती लोकसंख्या राष्ट्रीय उत्पन्न सगळे खाऊन टाकील.

## आर्थिक विकासाचा कणा : भांडवलाचा पुरवठा

लोकसंख्येच्या संदर्भात आणखी एक गोष्ट मला महत्त्वाची वाटते. गेल्या १५ ते २० वर्षांत घरातल्या कर्त्या पुरुषावर अवलंबून राहणाऱ्या एकूण लोकांचे प्रमाण वाढत आहे. याचे एक कारण असे की बालमृत्यूचे प्रमाण कमी झाल्यामुळे घरात १५ वर्षांखालील मुलामुलींचे प्रमाण वाढलेले आहे. तर दुसरीकडे वैद्यकीय सुधारणेमुळे ६० वर्षांवरील वृद्धांचेही प्रमाण वाढलेले आहे. आणि त्यामुळे स्वाभाविकच घरातील मुख्य कर्त्या पुरुषावर अवलंबून असलेल्या व्यक्तींचेही प्रमाण वाढत आहे. यासंबंधी झालेल्या पाहणीमधून ही गोष्ट पुष्कळ वेळेला स्पष्ट झालेली आहे. याचा एक परिणाम आर्थिक विकासावर वाईट होतो तो असा की, या वाढत्या जबाबदारीमुळे माणसाची शिल्लक टाकण्याची वा बचत करण्याची कुवत कमी होते. आणि ही बचत कमी झाली तर स्वाभाविकच देशातील भांडवल निर्मितीवर वाईट परिणाम होतो. भांडवलाचा पुरवठा हा आर्थिक विकासाचा कणा आहे. देशातील भांडवल पुरवठा कमी कमी होत चालला तर विकास योजना मोठ्या प्रमाणावर हाती घेता येत नाहीत. आज आपल्या देशातील भांडवल पुरवठ्याचा प्रश्न महत्त्वाचा झाला आहे. याचे एक कारण बचतीचे प्रमाण कमी कमी होत आहे. आणि याचे मूळ वाढत्या लोकसंख्येत आहे. याही दृष्टीने लोकसंख्या आपल्याला नियंत्रणाखाली आणली पाहिजे.

## जीवनमान उंचावण्यास हे आवश्यक

लोकसंख्येचा प्रश्न आर्थिक विकासाशी एका दृष्टीने बांधला गेला आहे. आज अन्नधान्याचा प्रश्न आपल्या देशात गंभीर झाला आहे याचे कारण आपले अन्नधान्याचे उत्पादन देशात ३ टक्क्यांनी वाढत आहे तर लोकसंख्या २॥ टक्क्यांनी वाढत आहे. त्यामुळे वाढलेल्या अन्नधान्यांपैकी फक्त १-२ टक्का अन्नधान्य आपल्या पदरी पडते. अन्नधान्यवाढीचा हा वेग वाढला आहे, याचे एक प्रमुख कारण म्हणजे गेल्या १५ वर्षांत जवळ जवळ १ कोट एकर पडिक जमीन लागवडीखाली आली आहे. ४८ नंतर संस्थाने नष्ट झाली. जहागिऱ्या

नष्ट झाल्या. त्यामुळे बहुधा ही पडिक जमीन लागवडीसाठी उपलब्ध झाली, परंतु यापुढे पडिक जमीन लावगडीसाठी उपलब्ध होणार नाही. त्यामुळे अन्नधान्य उत्पादनवाढीचा वेगही वाढणार नाही. उलट लोकसंख्येचे प्रमाण मात्र सतत वाढत जाणार आहे. त्यामुळे वाढणारी लोकसंख्या नियंत्रित करणे हाच यावर उत्तम मार्ग आहे. अन्नधान्याच्या प्रश्नाप्रमाणेच राष्ट्रीय उत्पादनाच्या संदर्भातही हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. अर्थशास्त्रज्ञानी पाहणी करून जे आकडे प्रसिद्ध केले आहेत त्यावरून असे दिसते की, १९५१ ते १९६१ या १० वर्षांच्या काळात दोन पंचवार्षिक योजनांमुळे आपले राष्ट्रीय उत्पन्न ४० टक्क्यांनी वाढले आहे. उलट आपली लोकसंख्या मात्र या काळात २२ टक्क्यांनी वाढली आहे. त्यामुळे आपल्या पदरात फक्त १८ टक्के सरासरी उत्पन्न पडले. आपले जीवनमान उंचवावयाचे झाले तर सरासरी उत्पन्न हे वाढले पाहिजे. त्यासाठी लोकसंख्येची वाढ आपल्याला नियंत्रणाखाली आणणे जरुरी आहे. आपले वाढलेले राष्ट्रीय उत्पन्न वाढणारी लोकसंख्या खाऊन टाकायला लागली तर आपले उत्पन्न वाढवून देखील आपण आहे तिथेच राहू. यातून आर्थिक विकास कसा होणार ? यासाठी आपणास लोकसंख्येच्या प्रश्नावरच आपला मोहरा वळविला पाहिजे.

## बेकारीवरील रामबाण उपाय

आपल्या देशात बेकारीचा प्रश्न सतत भेडसावीत आहे. १८ ते ५० या वयाच्या गटातील प्रत्येक धडधाकट व्यक्तीस कामधंदा मिळाला पाहिजे, असा आपण प्रयत्न करीत आहोत. परंतु तीन पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्यानंतरही आपण बेकार लोकांची संख्या पाहिली तर ती सतत वाढतच चाललेली आहे, असे आपणास दिसून येईल. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीस सुमारे ८० लाख लोक बेकार होते. तिसरी पंचवार्षिक योजना आता जवळ जवळ पूर्ण झाली आहे. या वेळी बेकारांची संख्या ८० लाखांवरून १$\frac{3}{4}$ कोटीवर गेली आहे. याचेही कारण वाढती लोकसंख्या हेच आहे. नवे उद्योगधंदे या ३ पंचवार्षिक योजनांच्या काळात पुष्कळ निघाले. परंतु नवे कामधंदे ज्या प्रमाणात उपलब्ध झाले, त्यापेक्षा अधिक लोकसंख्या वाढली. त्यामुळे स्वभाविकच देशात एका बाजूला नव्या उद्योगधंद्यांचे प्रमाण वाढत आहे तर

दुसऱ्या बाजूला बेकारांची संख्या वाढत आहे असे अत्यंत विरोधी चित्र पाहावयास मिळते. लोकसंख्येवरील नियंत्रण हाच यावर रामबाण उपाय आहे.

### आशादायक चित्र

महाराष्ट्रात या बाबतीत गेल्या ५।७ वर्षांत झालेली प्रगती खरोखरीच उल्लेखनीय आहे. शेकडो पुरुष ऑपरेशन करण्यासाठी स्वेच्छेने पुढे येताहेत. तर हजारो स्त्रिया लिपीज लूपचा वापर करण्यासाठी रांगेत उभ्या रहात आहेत. महाराष्ट्रातील आमच्या समाजजीवनातील हे दृश्य अत्यंत उल्लेखनीय आहे. या कामामध्ये जिल्हा परिषदांचाही वाटा महत्त्वाचा आहे. जिल्हा परिषदांच्या अधिकाऱ्यांचा व सभासदांचा लोकांशी मोठ्या प्रमाणावर संबंध येत आहे. त्यामुळे लोकामध्ये ते हे नवे विचार पसरवू शकत आहेत. जिल्हा परिषदेच्या यंत्रणेवाचून हे झाले असते असे मला वाटत नाही. त्यामुळे या त्यांच्या कार्याबद्दल त्याना मी धन्यवाद देतो व संततीप्रतिबंधनाचे हे कार्य त्यानी आणखी जोमाने पुढे रेटावे असे मला वाटते. आता खेड्यापाड्यातही या प्रश्नाबाबत जाणीव वाढत चालली आहे. आणि मानसिक दृष्ट्या तिथे लोकांची या कामासाठी तयारीही आहे. त्यांचा विरोध आता वैचारिक व धार्मिक भावनेवर फारसा राहिला नाही.

आपण त्यांच्यापर्यंत हा कार्यक्रम नेणे हीच महत्त्वाची गोष्ट आहे. महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व सुबुद्ध नागरिक हे कार्य जोमाने पार पाडतील असा मला विश्वास वाटतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
वि: ..........
...........
... दि ..........

# १५

# महाराष्ट्रातील कामगार चळवळ

जगातील कामगार चळवळीचा इतिहास तसा अगदी अलीकडचा आहे. ही चळवळ जगात सर्वत्रच सुमारे १२५ ते १५० वर्षांपूर्वी सुरू झाली. युरोपचे १९ शतकाच्या प्रारंभी मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण व्हायला सुरुवात झाली. त्यातून एक नवा कामगारांचा वर्ग निर्माण झाला. तरी देखील कामगारांच्या चळवळीतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून मार्क्सच्या १८४४ सालच्या कम्युनिस्ट जाहीरनाम्याचा उल्लेख करावा लागेल. या जाहीरनाम्यात त्याने प्रथम जगातील कामगारांना एक व्हा असा संदेश दिला. त्याचबरोबर वर्गयुद्धाचे तत्त्वज्ञानही त्याने सांगितले. कामगार चळवळीस त्यामुळे तात्विक आणि व्यावहारिक बैठक मिळाली, हे जरी खरे असले तरी युरोपमध्ये मतदानाचे हक्क जसे विस्तृत होत गेले तसे कामगार चळवळीला नवे महत्त्व प्राप्त होऊ लागले. मतदानाच्या हक्कामुळे कामगार संघटना एक राजकीय शक्ती बनली. पहिल्या महायुद्धानंतर रशियात कामगारांचे राज्य आले आणि त्यामुळे जगात सर्वत्रच कामगार चळवळीला एक नवे अधिष्ठान मिळाले. १९२९–३० साली जगभर सर्वत्रच मंदीची

---

कामगार कार्यकर्ता बैठक
टिळक भवन मुंबई नं. २८

लाट आली होती. या काळात सर्वच भांडवलशाही राष्ट्रांत लाखो कामगार कारखान्याबाहेर फेकले गेले. या काळात सर्वत्रच कामगार लढ्याला मोठी धार प्राप्त झाली. आता दुसऱ्या महायुद्धानंतर कामगारांच्याकडे पाहण्याची दृष्टी जगात सर्वत्रच सहानुभूतीची आहे. इंग्लंडमध्ये तर मजुरांचा पक्ष सत्तारूढ झाला आहे. औद्योगिक क्रांतीच्या प्रारंभापासून तो आतापर्यंतच्या कामगार चळवळींचे बदलते चित्र हे असे आहे.

युरोपमध्ये जरी कामगारांची चळवळ १९ व्या शतकाच्या प्रारंभी सुरू झाली तरी हिंदुस्थानात तिची सुरुवात काहीशी उशीरा झाली. महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा इतिहास पाहिला तर कामगार चळवळीचा पहिला शिल्पकार म्हणून महात्मा फुलेंचे मित्र व शिष्य श्री. लोखंडे यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी १८८० साली कामगारांची संघटना उभी करण्याचा पहिला प्रयत्न केला. लोखंडे यांच्या या कार्यामागील मूळ प्रेरणा महात्मा फुले यांचीच होती. महात्मा फुले हे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सत्यशोधक चळवळ करीत होते, तर मुंबईसारख्या औद्योगिक शहरात लोखंडे यांच्याद्वारे कामगार चळवळ करीत होते. महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा प्रारंभ पाहता ती एका दृष्टीने सत्यशोधक चळवळीची दुसरी बाजू होती. या दोनही चळवळींमागील प्रेरणा एकच होती. एकाच प्रेरणेचे हे दोन आविष्कार मला गमतीदार आणि उद्बोधक वाटतात.

### शेतमजूर व कामगार यांच्यात जागृती

आपल्याकडे एकंदरीने बेकारीचे प्रमाण जास्त. एका जागेसाठी अनेक अर्ज येतात. मागणी थोडी आणि पुरवठा खूप. यामुळे सुरुवातीच्या काळात कामगार संघटना फारशी बळकट झालीच नाही. त्यातून आमचा शेतकरी आपल्या शेताकडे आशाळभूतपणे पाहात पाहात कारखान्यात काम करणारा. त्याची निष्ठा दोन्ही धंद्याना! त्यामुळे तो आपल्या खेड्यातल्या जत्रेला हटकून जायचा तो कारखान्यातील मजूर असला तरी हाडाचा तो शेतकरी व शेतमजूरच. यामुळे सुरुवातीची काही वर्षे आपल्याकडील कामगार संघटना चांगली बांधली गेली नाही. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर, आपले स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कामगार

चळवळीचे स्वरुप पुष्कळ बदलू लागले. याचे पहिले कारण असे की, गेल्या १८–२० वर्षांत कामगारांची संख्या जवळजवळ तिपटीने वाढलेली आहे. पूर्वी ही संख्या ३०–३५ लाखाच्या घरात होती. ती आता १ कोटीच्या पलीकडे गेली आहे. कामगारांची ही संख्या वाढण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे देशात झपाट्याने वाढणारी औद्योगिक क्रांती होय. स्वातंत्र्यपूर्व काळात हा देश राजकीय दृष्ट्या गुलाम असल्याने ब्रिटिशांनी हा देश मुख्यतः त्यांच्या पक्क्या मालाची एक बाजारपेठ केली होती. येथील कच्चा माल इंग्लंडमध्ये न्यायचा व तेथे पक्का केलेला माल या बाजारपेठेत आणून विकायचा. यामुळे त्यांनी येथे औद्योगिक वाढ फारशी होऊच दिली नाही. आता गेल्या अठरा वर्षांत आपली झपाट्याने औद्योगिक प्रगती होत आहे. आधीच्या १०० वर्षांत झाली नाही एवढी औद्योगिक प्रगती गेल्या २८ वर्षांत झाली आहे. यातून नवा कामगार वर्ग निर्माण होतो आहे. त्याचे स्वरूप आपण समजावून घेतले पाहिजे.

या कामगारवर्गाचे वैशिष्ट्य असे की तो राजकीय दृष्ट्या अतिशय जागृत बनत आहे. प्रौढ मतदानाचे तत्त्व सुरू करायला आणि मोठ्या प्रमाणावर कामगारांचा वर्ग निर्माण व्हायला गाठ पडली. यामुळे कामगारवर्गही नवी राजकीय शक्ती म्हणून पुढे येत आहे. पुढील १० वर्षांत तिचे हे सामर्थ्य वाढत जाणार आहे. कामगार चळवळीचे तिसरे वैशिष्ट्य असे की सर्व औद्योगिक क्षेत्रात एक प्रकारची एकतानता निर्माण होत आहे. एका कारखान्यातील कामगार चळवळीचा परिणाम ताबडतोब दुसऱ्या कारखान्यातील कामगार चळवळीवर होतो आहे. मुंबई शहरातील कामगारांच्या संपाचा परिणाम सोलापूर, नागपूर या शहरातही पाहावयास मिळतो. स्वातंत्र्यपूर्व काळात कामगार चळवळीचे हे स्वरूप आपणास फारसे पाहावयास मिळत नव्हते. सर्व कारखाने पुष्कळ प्रमाणात अलग अलगपणाने काम करीत होते. ही अलगता आता नष्ट होत असून या वर्गामध्ये नवी एकमानता निर्माण होत आहे. या चळवळीच्या अभ्यासकांनी या नव्या घटनांची दखल घेतली पाहिजे तरच तो हे प्रश्न समर्थपणाने सोडवू शकेल.

## कामगार चळवळीचे सत्य स्वरूप

महाराष्ट्र कॉंग्रेसच्या कार्यक्रमाप्रमाणे कामगारांच्या चळवळीत भाग घ्यायचा

आम्ही ठरविलेले आहे. देशातील कामगार चळवळ आज संभ्रमावस्थेत आहे. या चळवळीचे ध्येय काय असावे व त्याच्या अनुषंगाने कार्यपद्धती कोणती अवलंबावी याबाबत कामगारवर्ग आज गोंधळलेल्या अवस्थेत आहे. साहस-बाजीच्या चळवळीत तो सामील होतो व ती व्यर्थ ठरली म्हणजे निष्क्रिय अवस्थेत राहून चळवळीचे नुकसान करतो. सर्व सामाजिक–राजकीय चळवळीत कामगार चळवळ ही एक अतिशय महत्त्वाची चळवळ आहे व म्हणूनच ती फार जबाबदारीने चालविली पाहिजे. सामाजिक व राजकीय हे शब्दप्रयोग मी मुद्दाम केलेले आहेत. कारण कामगार चळवळीच्या आर्थिक बाजूविषयी सर्वांनाच माहिती असते. अर्थात हेही खरे आहे की कामगार चळवळीची सामाजिक व राजकीय ताकद त्यांच्या आर्थिक चळवळीतच असते. कामगारांच्या सर्व आर्थिक मागण्या मान्य व्हावयाच्या असतील तर समाजात विशिष्ट तऱ्हेची अर्थरचना असावयालाच हवी. इतकेच नव्हे तर त्यांच्या आर्थिक मागण्या मान्य होण्यासाठी त्याना संघटना करण्याचे हक्क सुपूर्त करणारी, त्यांसाठी प्रचार व विचार प्रदर्शनाचे हक्क देणारी शासनसंस्थाही असावी लागते.

म्हणजेच विशिष्ट राजकीय वातावरणातच कामगार चळवळ बाळसे धरू शकते व ती बलिष्ठही होऊ शकते. कामगार चळवळीच्या मुख्य दोन मागण्या आहेत.

( १ ) जीवनातील गरजा भागविण्याइतके वेतन मिळाले पाहिजे. या गरजा जशा अन्न, वस्त्र, निवारा याविषयीच्या खर्चावर आधारलेल्या आहेत; तशाच शिक्षण, करमणूक व समाजातील एक प्रतिष्ठित घटक म्हणून जगण्यासाठी आवश्यक असलेल्या खर्चावरही आधारलेल्या आहेत. हा एकुण खर्च किती असावा या तपशिलात मी येथे शिरत नाही. परंतु स्थूलमानाने कामगारांचा हा आग्रह सर्वांनाच मान्य होण्यासारखा आहे.

( २ ) दुसरी मागणी त्याना कामाच्या ठिकाणी असणाऱ्या स्थितीसंबंधी व सवलतीसंबंधी आहे. एक गोष्ट निश्चित आहे की दिवसाचे सर्वच तास कोणीही काम करू शकणार नाही, या परिस्थितीतूनच कामाच्या तासासंबंधीची मागणी तयार झालेली आहे. आजच्या मान्य संकेताप्रमाणे दिवसामागे जास्तीत जास्त आठ तास काम करणे शक्य आहे अथवा इष्ट आहे असे ठरविण्यात आले आहे. पण या अटीनाही काही काही धंद्यात अपवाद आहेत. अमेरिका व इंग्लंड-

सारख्या प्रगत औद्योगिक देशात आठ तासांपेक्षाही कामाचे तास कमी आहेत आणि तसे ते कमी करावे याकडे तिकडील कामगार चळवळीचा कल आहे. जागतिक संदर्भ लक्षात घेऊन आपणही आपली धोरणे आखावी एवढेच मला येथे सुचवावयाचे आहे. नोकरीतील सुरक्षितता हाही एक महत्त्वाचा विषय आहे. कामगारांना केव्हाही व कोणीही आपल्या गरजेप्रमाणे कामावर घ्यावे व काम संपले म्हणजे दरवाजा दाखवावा हे धोरण कदाचित वैयक्तिक उद्योग-धंद्यांच्या चालकांच्या दृष्टीने इष्ट असले तरी कामगार धरून सर्व समाजाचा विचार करणाऱ्या शास्त्यांना हा दृष्टिकोन सुतराम पटण्याजोगा नाही. एखादा कामगार बेकार होणे ही एक महान सामाजिक आपत्ती आहे असे आपण समजले पाहिजे. आपल्या आर्थिक नाकर्तेपणाचीच ती साक्ष आहे.

### कामगारांचे स्वास्थ्य व आरोग्य

सामाजिकदृष्ट्या या कामगारांची जी मुले आहेत त्याना आपण देशात होणाऱ्या प्रगतीपासून वंचित करीत आहोत हे आपण ध्यानात ठेवले पाहिजे. आर्थिक उत्कर्षाचा जो भव्य कार्यक्रम आपण आखला आहे त्याला अशा धोरणाने गालबोट लागल्याशिवाय राहणार नाही. म्हणून नोकरीतील असुरक्षितता जेवढी कमी करता येईल तेवढी करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. आपले कायदे त्या दृष्टीने तयार झाले पाहिजेत. सध्या असलेल्या कायद्यात त्या दृष्टीने सुधारणा झाली पाहिजे. याबरोबरच आणखीही एका मुद्द्याचा मला उल्लेख करावयाचा आहे. सुरुवातीला मी म्हटले की कोणीही माणूस दिवसाचे सर्व तास काम करू शकत नाही तसेच मी असेही म्हणतो की आयुष्यातील सर्व वर्षेही कामगार काम करू शकणार नाही. वयाची साठी ओलांडल्यानंतरही चरितार्थ चालावा म्हणून कोणालाही काम करावे लागू नये. आपल्या उमेदीची वर्षे त्यानी काम करण्यात घालविलेली असल्यामुळे त्यांच्या उत्तरायुष्यात त्याना काम न करिता चरितार्थ चालविण्याचे साधन समाजाने उपलब्ध करून दिले पाहिजे. प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी, पेन्शन वगैरेच्या ज्या मागण्या आहेत त्या वरील विचारामधून उद्भवल्या आहेत. हा विचारही आज मान्य झालेला आहे. परंतु हे उपाय तितकेसे परिपूर्ण नाहीत. कामगारांच्या याबाबतच्या अपेक्षांना आपण उतरलो आहोत असे दिसत नाही. उत्तरायुष्यातील या तरतुदी

अधिक भरीव व जन्मभर कष्ट केलेल्या कामगाराला अधिक समाधानकारक होतील या दृष्टीने यत्न होणे जरूर आहे.

अपुरा पगार, राहण्यासाठी असलेली अस्वच्छ घरे, पौष्टिक अन्नाचा तुटवडा इत्यादी घटकामुळे आमचे कामगार व त्यांची संतती यांना आज औषधावर व वैद्यकीय उपचारांवर भरमसाट खर्च करावा लागत आहे. कामगारांचे आरोग्य व तंदुरुस्ती राखण्याचे कार्य केवळ त्यांच्याच तुटपुंज्या मिळकतीवर सोपविण्यात धोका आहे. यातील मोठा हिस्सा उद्योगधंद्यांचे खाजगी अथवा सरकारी चालक आणि सरकार यांनी उचलला पाहिजे. याही बाबतीत थोडेसे कार्य झाले आहे, पण अद्यापही बरेच व्हावयाचे राहिले आहे.

### शासकीय धोरण कामगार हिताचे

सामाजिक न्यायाच्या दृष्टीने पाहता काम करणाऱ्या कामगारांचे त्यांच्या कामातून उत्पन्न होणाऱ्या धोक्यापासून ( रासायनिक कामे, खाणीतील कामे, मोठ्या यंत्राबरोबरची कामे वगैरे ) रक्षण केले पाहिजे. जीविताला इजा झाल्यास नुकसानभरपाई मिळाली पाहिजे या दृष्टीने बरेच कायदे झाले आहेत. परंतु अद्यापही सर्वच आंतरराष्ट्रीय संकेत आपण पूर्णपणे अंमलात आणतो असे नाही. तेव्हा येथेही सुधारण्याला वाव आहे. थोडक्यात कामाच्या चांगल्या अटी व पुरेसे वेतन या कामगारांच्या दोन मागण्या आहेत याचा मी केलेला उल्लेख आता आपल्याला पटेल. याचे विवेचन आतापर्यंत झाले. या पदरात पाडून घेण्यासाठी आपल्या चळवळीची दिशा कशी असावी, कार्यपद्धती कशी असावी याचा विचार करू, परंतु हा विचार करण्यापूर्वी कामगार चळवळ ज्या राजकीय व सामाजिक संदर्भात चालवावयाची आहे त्याची स्पष्ट कल्पना मनात आणली पाहिजे. आपल्या देशाची राज्यघटना ही कामगार चळवळीला पूरक आहे इतकेच नव्हे तर प्रेरकही आहे. स्पष्ट कायदेशीर तत्त्व म्हणून जरी नसले तरी कामगारांना " Living wage " मिळाले पाहिजे हे मार्गदर्शक तत्त्व म्हणून स्वीकारलेले आहे व औद्योगिक निवाडा देताना ते अनेक वेळा मानलेलेही आहे. त्रिपक्ष मजूर परिषदा, वेज बोर्ड्स, कामगार कायदे यांच्याशी वरवर जरी परिचय झाला तरीही हे कळून येईल की शासनाचे धोरण कामगारहिताच्या विरुद्ध नाही. १९५७ साली झालेल्या त्रिपक्ष मजूर

परिषदेत किमान वेतनाला स्पष्ट असा व्यवहार्य आशय प्राप्त झाला आहे. म्हणजे राज्यघटना व शासनाचे राजकीय धोरण या दोनही दृष्टीने कामगार किमान वेतनाची कल्पना अमलात आणणे किती तरी सोपे व सुलभ झाले आहे. हिताचा विचार हा या देशातील राजकीय विचाराचा एक महत्त्वाचा भाग आहे. देशाच्या आर्थिक पुनरुत्थानात कामगारांचे कार्य मान्य केलेले आहे व सरकारी अथवा खाजगी चालकांच्या बरोबरीने उत्पादनकार्याच्या व्यवस्थेत कामगारांना हिस्सा असावा हे मान्य केलेले आहे व काही काही उद्योगात या दृष्टीने प्रत्यक्ष प्रयोग करावयासही सुरुवात झालेली आहे. उत्पादनाच्या जबाबदारीत कामगारांचे महत्त्वाचे स्थान अशा तऱ्हेने मान्य करण्यात आले ही गोष्ट कामगार चळवळ करणाऱ्यानी ध्यानात धरणे आवश्यक आहे. हे सारे सांगावयाचा माझा उद्देश इतकाच आहे की सरकार आणि कामगार यांच्या हितसंबंधात कोणत्याही तऱ्हेचे मौलिक द्वैत नाही. अंमलबजावणीतील दिरंगाई अथवा उपाययोजनेतील कमतरता हे मतभेदाचे विषय होऊ शकतील. परंतु त्यामुळे कामगार चळवळीचे ध्येय व सरकारचे ध्येय या दोहोत तत्त्वांचा संघर्ष निर्माण होण्याचे कारण नाही. अशा तऱ्हेचा संघर्ष काही परिस्थितीत अपरिहार्य असतो. उदाहरणार्थ, ज्या वेळी सरकार हे भांडवलदारांचे अथवा धनिक वर्गाचेच हित साधण्यासाठी अस्तित्वात आलेले असते, सर्व कायदे व सरकारचे राजकीय कार्य त्याच दृष्टीने चाललेले असते अशा वेळी असे सरकार खाली खेचण्याशिवाय कोणतेही कामगारहित करता येण्यासारखे नसते. म्हणून अशा वेळी कामगार चळवळीचे ध्येय ते सरकार प्रथम खाली ओढणे हेच असते व अशा राजकीय व सामाजिक संदर्भात ते चूक असते असे म्हणावयाचे कारण नाही. परंतु मी आधीच दाखविल्याप्रमाणे आपले सरकार व कामगारहित यांच्यात कोणतेही तात्त्विक द्वंद्व संभवनीय दिसत नाही. आणि ही गोष्ट लक्षात ठेवूनच कामगार चळवळीचे ध्येय, धोरण व डावपेच ठरविले पाहिजेत. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की समाजवादी नियोजनाकडे कल असलेल्या, लोकशाही समाजवादाची प्रतिज्ञा घेतलेल्या व भांडवलदार आणि कामगार यांच्या झगड्यामध्ये कामगारहित साधण्याकडे कल असलेल्या सरकार विरुद्ध या देशातील कामगार चळवळींना राजकीय असे काही ईप्सित असावयाचे कारण दिसत नाही.

## कामगार, सरकार व खाजगी मालक यांच्यांत एकोपा आवश्यक

देशातील दारिद्र्य व अज्ञान या दोन घनघोर संकटाविरुद्ध सरकार लढत आहे. सरकारने चालविलेल्या या लढाईत अनेक उणिवा आहेत, त्या नाहीशा केल्या पाहिजेत हे मानणाऱ्यांपैकी मी आहे. मला असेही वाटते इंग्लंडमध्ये युद्धकालात कामगार आणि तिथले खाजगी संचालक या दोहोत अगदी निकटचे सहकार्य होते व दोन्हीही पक्ष एकमेकाचे हितसंबंध जपत होते. त्यांच्यात मतभेद नव्हते असे नाही, ते विकोपाला जात नव्हते असेही नाही. परंतु दोघांचे हितसंबंध वेगळे आहेत असा आग्रह अशा कलहामध्ये केव्हाही निर्माण झाला नाही. कारण युद्ध जिंकण्यासाठी उत्पादन वाढविणे आवश्यक आहे हे दोनही पक्षाना पटलेले होते. समान ध्येय निर्माण झालेले होते. आपल्याही देशात आपले सरकार दारिद्र्य व अज्ञान यांच्या विरुद्ध लढाई करीत आहे, ही लढाई जिंकणे हे कामगार, खाजगी मालक व सरकारी धंद्यांचे चालक यांच्या समान हिताचे आहे. कामगारांच्या वेतनात वाढ झाल्याशिवाय, अधिक संपत्ती निर्माण झाल्याशिवाय अशक्य आहे ही गोष्ट सहज लक्षात येण्याजोगी आहे. देश संपन्न झाल्याशिवाय कामगाराना तरी कशी संपन्नता येणार? खेरीज ही संपत्ती निर्माण होत असताना तिच्या विभाजनाविषयीचे प्रश्न उत्पन्न करण्यास कामगार संघटनाना वाव आहे. कारण त्यांचे संघटनेचे हक्क व चळवळ करण्याचे हक्क आपण मान्यच केले आहेत. म्हणजे दारिद्र्य नाशासाठी उत्पादनवाढ किंवा संपत्तीत वाढ करणे हे आज सर्वच वर्गाच्या निकडीचे असे कर्तव्य झालेले आहे. व ते सर्वांच्याच हिताचे असल्यामुळे सर्वांना एकत्र बांधणारा असा हा कार्याचा धागा आपल्याला सापडला आहे. आता हे शक्य आहे की आपल्या पैकी काहींच्या मनात असा प्रश्न उभा राहील की प्रथम कामगारांचे सहकार्य मागून नंतर आर्थिक बळाच्या साहाय्याने कामगारांना खऱ्या सत्तेपासून वंचित ठेवले जाईल. शंका रास्त आहे व अशा तऱ्हेचे विपरीत काही घडू नये म्हणून कामगार चळवळीने दक्ष राहिले पाहिजे. परंतु देशातील समाजवादाचे ध्येय मान्य केले आहे व सुजाण कामगार चळवळीचे हेच ध्येय आहे.

# १६

# महाराष्ट्रापुढील समस्या

स्वातंत्र्य व लोकशाही या जीवनमूल्यांमुळे युरोपियन राष्ट्रांना सामर्थ्य प्राप्त झाले असा १९ व्या शतकाचा इतिहास आहे. त्या जीवनमूल्यांचा आग्रह दादाभाई नौरोजींपासून महात्मा गांधींपर्यंतच्या सर्वच लहान थोर राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांनी धरला आहे. या मूल्यांच्या प्रभावाने आपले समाज-जीवन उजळून निघावे. ते अधिकाधिक सकस व समृद्ध बनाव यासाठी या कार्य-कर्त्यांनी आपले शक्तिसर्वस्व वेचले. जी राज्यघटना आपण स्वीकारली आहे त्यात सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, व्यक्तीची प्रतिष्ठा, विचार-स्वातंत्र्य, दर्जा आणि संधी यांची समानता व भ्रातृभाव इत्यादी तत्त्वांचा अंतर्भाव केला आहे, परंतु ही तत्वे घटनेच्या कलमातच न राहता गरिबातल्या गरीब माणसाच्या झोपडीपर्यंत त्याचा प्रकाश जाऊन पोहोचला पाहिजे. नित्याच्या व्यवहारात या तत्त्वांचा चांगुलपणा प्रतीत झाला पाहिजे. ध्येय आणि वास्तव, तत्त्व आणि व्यवहार यांमध्ये सुसंवाद निर्माण झाला पाहिजे. ग्रामीण जीवनात अजूनही रूढीचे अनियंत्रित साम्राज्य आहे. अज्ञान, दारिद्र्य, गतानुगतिकत्व आणि सामाजिक उच्चनीच भाव यामुळे लक्षावधी लोकांची सर्व बाजूनी कुचंबणा होत आहे. घटनेने अस्पृश्यतेला मूठमाती दिली

---

वसंत व्याख्यानमाला,
लालबाग, मुंबई नं. १२

असली तरी खेड्यापाड्यातून ह्या अमानुष रूढीचे उच्चाटन झालेले नाही. जातीजातीतील भांडणे, गटागटातील स्पर्धा, प्रांताप्रांतातील दुजाभाव यामुळे समाजजीवन दूषित झाले आहे. सर्वांना मतस्वातंत्र्य मिळाले आहे पण निरनिराळ्या प्रश्नांची सांगोपांग छाननी करून स्वतःचे मत बनविण्याइतकी पात्रता किती जणांना लाभली आहे ? कितीही नामी संधी चालून आली तरी तिचा पुरेपूर फायदा उठविण्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण व साधनसामग्री उपलब्ध असावी लागते. यासाठी शिक्षणाचा प्रसार झपाट्याने कसा होईल, आर्थिक प्रगतीचा वेग कसा. वाढविता येईल, एकंदर समाजाची नैतिक पातळी कशी उंचावेल इत्यादी प्रश्नांकडे आपण तातडीने लोकांचे लक्ष वेधले पाहिजे.

आपल्या देशात पक्षनिष्ठ राजकारण अपरिपक्व दशेत आहे, या बाबतीत पक्ष संघटनेतील शिस्त व कार्यक्षमता व पक्षोपक्षांचे परस्पर संबंध हे प्रश्न विशेष महत्त्वाचे आहेत. इतर प्रांतांपेक्षाही महाराष्ट्रात आज काँग्रेसपक्ष लोकांच्या अधिक जवळ आला आहे. आणि सर्व जनतेवर प्रभाव पाडू शकेल असा तोच एकमेव पक्ष आहे, ही वस्तुस्थिती आहे. उत्तरेत काँग्रेसला मुख्यतः उजव्यांचा विरोध आहे. महाराष्ट्रात डाव्यांचा आणि उजव्यांचाही विरोध आहे. यामुळे महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला अधिक काळजीपूर्वक आपली पावले टाकली पाहिजेत. महाराष्ट्रातले डावे पक्ष दुभंगलेले आहेत व ते एक होऊ शकत नाहीत. नाही तर त्या सर्वांची मिळून बनलेली ताकत काँग्रेसनेही दखल घ्यावी एवढी जोरदार आहे.

### काँग्रेस व इतर पक्ष
### समाजहितैषी हवेत

हे सुटे पक्षही केव्हा केव्हा काँग्रेसला आव्हान देतात, तेव्हा त्यांची अवस्था "**नाही पाईतन भूपतीशी दावा**" या तुकारामबुवांच्या अभंगात वर्णिल्याप्रमाणे होते. काँग्रेस व डावे पक्ष यांचेमधील राजकीय हेव्यादाव्यामुळे राजकारणाव्यतिरिक्त क्षेत्रात पसरू नयेत व सत्तास्पर्धेतील त्वेष आणि कडवटपणा यानी सर्वच समाजजीवन ग्रासले जाऊ नये यासाठी. महाराष्ट्राच्या हितासाठी सर्वच पक्षानी जपले पाहिजे. लोकशाहीचा विकास करण्याची

जबाबदारी अशा तऱ्हेने केवळ काँग्रेसवरच येऊन पडली आहे. हा घडवून आणताना तीन बाबतीत जागरूक राहण्याची जरूर आहे.

विरोधी पक्षाशी समजूतदारपणाची व सहकार्याची वागणूक.

सरकारी यंत्रणा व न्यायदान या बाबतीत हस्तक्षेप टाळून पक्ष व सरकार यातील भेद निःसंदिग्धपणे कायम राखण्याची जबाबदारी.

पक्षाचे पदाधिकारी हे लोकशाही मनोवृत्तीचे व चारित्र्यवान असण्याची खबरदारी घेणे.

## फुटकळ पक्षांचा जन्म ही एक समस्या

महाराष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीने लोकशाही आणि समाजवाद या ध्येयांच्य दिशेने वाटचाल केलीच पाहिजे. या कार्यात अडथळा आणण्यासाठी प्रतिगामी शक्ती व गट देशात संघटित होत आहेत. त्यांच्या धोरणाचे पडसाद, काँग्रेसमधील अंतर्गत संघर्षाचे स्वरूप हे पक्षातील दोन भिन्न प्रवाहातील मतवैचित्र्य एवढेच नसून ते अधिक गंभीर व मूलगामी आहे. ह्यात मतभेद कसा सुटतो यावर देशाचे भवितव्य अवलंबून आहे. महाराष्ट्र काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी या बाबतीत खंबीर भूमिका घेतली आहे. संकुचित पक्षहितापेक्षा व्यापक राष्ट्रहितालाच प्राधान्य दिले आहे. काँग्रेसपक्षातील समाजवादी निष्ठेला पोषक असणाऱ्या शक्तीशी एकरूप झालो आहोत. अखिल भारतीय पक्ष व त्यांच्या प्रांतिक शाखा यांचे परस्परसंबंध कसे असावेत हा बराच गुंतागुंतीचा प्रश्न आहे. प्रत्येक प्रांतातील समाजजीवनात काही मूलभूत समस्या असतात. त्यांच्या अनुषंगाने **स्वतंत्र प्रादेशिक पक्ष** अस्तित्वात येतात. अखिल भारतीय पक्षाच्या प्रादेशिक शाखांनाही या समस्या जमेस धरून धोरण आखावे लागते. आपल्या या खंडप्राय देशात एका प्रांताची परिस्थिती, मनोवृत्ती व प्रश्न पूर्णपणे समजून घेणे दुसऱ्या प्रदेशातील कार्यकर्त्यांना अवघड जाते. प्रांताची निवड आणि पक्षश्रेष्ठींचा निर्णय यामध्ये तफावत पडली की पेचप्रसंग उत्पन्न होतो. लोकमताचा कौल मानावयाचा तर पक्षाची शिस्त बिघडते. पक्षप्रमुखाचे आदेश मानावयाचे तर स्वतःच्या विवेकबुद्धीशी प्रतारणा करावी लागते. जनतेच्या भावना दुखावतात व पक्षाची पुण्याई संपुष्टात येते. आपल्या देशाच्या राजकारणात लोकमताचा प्रभाव जसा वाढू लागेल तसे असे प्रसंग वाढू लागतील.

हे केवळ काँग्रेसलाच लागू आहेत असे नाही तर प्रजासमाजवादी, कम्युनिस्ट, जनसंघ या सर्वांपुढेच हा प्रश्न आहे. पक्षाची शिस्त, जनतेच्या व अनुयायांच्या अपेक्षा या दोहोमध्ये सुसंवाद निर्माण करण्याच्या दृष्टीने खटपट केली पाहिजे. राज्यघटनेत आपण प्रांतिक स्वायत्ततेचे तत्त्व स्वीकारले आहे. पक्षीय राजकारणातही त्याचा अवलंब करता येईल की काय याचा तात्त्विक व व्यावहारिक अशा दोन्ही बाजूंनी विचार झाला पाहिजे. नियोजनाच्या मार्गाने आर्थिक क्रान्तीची वाटचाल करू पाहणाऱ्या आपल्या देशात केंद्र सत्ता स्थिर व प्रबळ असली पाहिजे हे उघड आहे. त्याचप्रमाणे देशात फुटीरपणाच्या वृत्ती बोकाळू नयेत म्हणून प्रत्येक पक्षांच्या प्रदेश शाखांच्या कार्याला काही मूलतत्त्वांचे आणि सर्वसामान्य धोरणांचे समान अधिष्ठान असले पाहिजे. म्हणून एकात्मता व स्वायत्तता यांचा समन्वय साधण्याच्या दृष्टीने पक्षीय राजकारणात नव्या प्रथा पाडल्या पाहिजेत.

आणखी एक प्रश्न साधनाबद्दल आहे. जनतेच्या न्याय्य आकांक्षा सतत सनदशीर मार्गानेच प्रगट करता येतील काय ? सत्याग्रहाचा मार्ग तत्त्वतः निषिद्ध आहे काय ! अप्रगत देशात निव्वळ सनदशीर धोरणावर अवलंबून राहता येणार नाही.

## सीमा भागातील जनतेस न्याय मिळाला पाहिजे

बेळगाव, कारवार, निपाणी या सीमाभागाचा प्रश्न गेली १० वर्षे भिजत पडला आहे. हा सर्व भाग महाराष्ट्राचा अभिन्न भाग आहे हे खरोखर आता इतक्या वेगवेगळ्या पद्धतीने सिद्ध झाले आहे की तिथे आता नव्या युक्तिवादाची गरज उरलेली नाही. गेल्या १०-१२ वर्षात या भागातून ज्या वेगवेगळ्या निवडणुका झाल्या त्या सर्व निवडणुकात मतदारानी पुनः पुन्हा महाराष्ट्राच्या बाजूनी आपला कौल दिला आहे. स्थानिक, राज्य व केंद्र पातळीवरील सर्व निवडणुकांचा आपण अभ्यास केला तर मतदारानी निर्णायक बहुमताने महाराष्ट्राच्या बाजूने निर्णय दिला आहे. मतदारानी लोकशाहीमध्ये ज्या मार्गांनी आपली मते व्यक्त करावयाची असतात त्या सर्व मार्गांनी त्यानी ती केलेली आहेत. आणि तरीदेखील हा प्रश्न अनेक वर्षे भिजत पडला आहे. यामुळे या सीमाभागातील नागरिकांमध्ये वैफल्याची भावना निर्माण झाली आहे.

ह्यांच्यामध्ये लोकशाही मार्गाबद्दलही एक कडवट अविश्वास निर्माण होऊ लागला आहे. अशा या वैफल्याच्या वातावरणात आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांकडे यांचे कसे लक्ष लागणार ? केंद्र सरकारने या सीमाभागातील लोकांना न्याय द्यावा अशी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचा अध्यक्ष म्हणून माझी त्यांना आग्रहाची आणि कळकळीची विनंती आहे.

## गोव्याचे महाराष्ट्र राज्यात विलिनीकरण

या सीमाभागाप्रमाणेच गोवा प्रश्नाचाही केंद्र सरकारने त्वरित निर्णय लावून टाकावा. गोवा हा महाराष्ट्राचा भाग आहे हे या दोन प्रदेशातील भाषा, ऐतिहासिक संबंध पाहता चटकन लक्षात येते. गोव्यातील मराठी व महाराष्ट्रातील मराठी यांच्यात विलक्षण साम्य आहे. गोव्यातील आजच्या मराठीमध्ये यादवकालीन मराठीतील अनेक शब्द सापडतात. गोव्यातील मराठीवर पोर्तुगीज भाषेची काही प्रमाणात छाप पडल्याने ती काहीशी वेगळी वाटते. पोर्तुगीजांचे तिथे ३०० ते ३५० वर्षे राज्य असल्यामुळे ते काही प्रमाणात स्वाभाविकही आहे. परंतु गोव्यातील मराठीची प्रकृती ही महाराष्ट्रातील मराठीच्या प्रकृतीसारखी आहे, हे या भाषाशास्त्रज्ञांनी अनेक प्रकारे सिद्ध केले आहे. गोव्यातील पूर्वीचा व्यवहार मराठीतूनच चालत होता यालाही नव्या संशोधनातून अनेक प्रकारे पुरावे मिळालेले आहेत. गोव्यात नुकत्याच झालेल्या निवडणुकानी तर सुमारे ७० टक्के मतदारानी महाराष्ट्राच्या बाजूने जाहीरपणे आपला कौल दिला आहे. गोव्याचे महाराष्ट्राशी असलेले भाषिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, संबंध इतके निगडीत आहेत की गोवा महाराष्ट्रात विलीन झाला पाहिजे हे सांगण्याची देखील गरज पडू नये. या बाबतीत गोव्यातील अल्पसंख्यांकाना जी भीती वाटते ती निराधार आहे असे मी त्यांना आवर्जून सांगतो. तेथील अल्पसंख्यांकांवर ते केवळ अल्पसंख्याक आहेत म्हणून अन्याय होईल अशी भीती त्यांनी बाळगू नये. मुंबई महाराष्ट्रात आली तर मुंबईतील अल्पसंख्यांकांवर अन्याय होईल अशी भीती पूर्वी व्यक्त केली होती. परंतु महाराष्ट्राच्या ६-७ वर्षांच्या इतिहासात ही भीती निराधार ठरली. हा इतिहास गोव्यातील अल्पसंख्यांकांनी अवश्य विचारात घ्यावा.

## कृष्णा–गोदावरी पाणी वाटप

तिसरा महत्त्वाचा आपला प्रश्न म्हणजे 'कृष्णा-गोदावरी पाणी वाटप तंटा' कृष्णा-गोदावरी पाणी वाटप तंट्याबाबत केंद्रसरकारने जी हंगामी स्वरूपाची योजना तयार केली आहे त्या योगाने मूळ महाराष्ट्रावर फार मोठा अन्याय झाला आहे. महाराष्ट्र कॉंग्रेसने याबाबत आपली निश्चित स्वरुपाची अशी भूमिका अद्याप बनवलेली नाही. प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आणि महाराष्ट्राच्या जीवनाशी निगडीत स्वरूपाचा असल्यामुळे ज्याप्रमाणे त्या प्रश्नाचे स्वरूप बनेल त्या स्वरूपाची भूमिका तयार केली गेली पाहिजे. कृष्णा-गोदावरी पाण्याची वाटणी निश्चित स्वरूपात केली गेली पाहिजे, अशी आपली मागणी आहे. ती मागणी आपण केंद्रसरकारकडे मोठ्या ठाम मनाने मांडली आहे. प्रत्येक ठिकाणी ज्या तत्त्वांचा स्वीकार झालेला आहे, तीच तत्त्वे आम्ही पुढे मांडलेली आहेत. आणि त्या तत्त्वांप्रमाणेच वाटप झालेले नाही म्हणून आमच्यावर अन्याय झाला आहे अशी आमची रास्त तक्रार आहे.

१९५१ साली कृष्णा-गोदावरी पाणी वाटपाबाबत एक करार केला गेला. त्या कराराच्या वेळी ओरिसाला बोलाविले गेले नाही. म्हैसूर राज्याने तो करार योग्य असल्याचे मान्य केले नाही. आणि आंध्र सरकार मात्र तो करार मान्य करा असा आग्रह धरत आहे. १९७६ पर्यंत त्या कराराचे स्वरूप बदलू नये अशी त्यांची भूमिका आहे. राज्याचे स्वरूप आता बदलले आहे. त्यामुळे महाराष्ट्र आणि म्हैसूर राज्याना तो करार बदलला गेला पाहिजे असे वाटत आहे. आणि त्यानंतर केंद्रसरकारने निर्णय देऊन तो करार रद्द केल्याचे जाहीर केले. तो करार रद्द केला पण त्यानंतरची जी योजना जाहीर केली त्यातूनही त्या कराराचाच अर्थ ध्वनित होतो आहे. पूर्वीच्या करारान्वये होणारा अन्याय पुन्हा त्या निर्णयामुळे आहे तसाच राहिला आहे. आणि त्या अन्यायामुळे महाराष्ट्राच्या जीवनावर दूरगामी असा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. कृष्णा-गोदावरीच्या पाण्यातून महाराष्ट्र–मुंबईच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि कोकणच्या विद्युतीकरणाचा प्रश्न सोडविला जाणार आहे.

आपण सारी संघराज्यात राहतो. संघराज्यात संघर्ष निर्माण झाल्यामुळे आपल्या

जबाबदाऱ्या वाढल्या आहेत. त्या वाढत्या जबाबदारीच्या जाणिवेतून आपल्य मुख्यमंत्र्यांनी सर्व पश्चिम प्रमुखांना या प्रश्नावर विचार करण्यासाठी एकत्रित बोलाविले होते. त्यांचे सर्वांचे या प्रश्नाबाबतचे विचार समजून घेतले आहेत. महाराष्ट्रराज्य सरकारने जी भूमिका घेतली आहे तिचे सर्वांनी एकमुखी स्वागत करून पाठिंबा दिला आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाला त्या वेळी जे स्वरूप प्राप्त झाले होते तेच स्वरूप जर या प्रश्नाला प्राप्त झाले तर फार मोठा धोका आहे. या प्रश्नाला चळवळीचे स्वरूप दिले जाऊ नये असे माझे प्रांजल मत आहे. चळवळ करू नका पण लोकांना या प्रश्नाची जाणीव मात्र जरूर करून द्या.

या प्रश्नाची सोडवणूक तीन गोष्टींवर करता येईल असे मला वाटते. या प्रश्नाची जाणीव लोकाना देऊन, त्या बाबतचे लोकशिक्षण देऊन लोकमत तयार करणे ही पहिली बाब. आपल्यावर काय व कोणता अन्याय झाला आहे हे दुसऱ्या राज्यांतील प्रमुखांना पटवून देणे ही दुसरी बाब. आणि तिसरी बाब म्हणजे दिल्लीतील जे प्रमुख लोक आहेत त्याना आपल्या प्रश्नाची जाणीव करून देणे ही होय. या तीन पायऱ्यांनी आपण आपले प्रश्न सोडविण्याची पराकाष्ठा करू या.

## सामाजिक सुधारणांची
## गरज अत्यावश्यक

महाराष्ट्रातील समाजजीवनाचा विचार करताना आज आम्हास सर्वांगीण सुधारणावादाची नितांत गरज आहे, असे वाटते. महाराष्ट्रातील प्रारंभीचे सुधारक न्या. रानडे, प्राचार्य आगरकर यांनी या सर्वांगीण सुधारणावादाचा पुरस्कार केलेला होता. राजकीय क्षेत्रात पुरोगामी, सुधारणावादी, परंतु सामाजिक क्षेत्रात मात्र सनातनी ही विसंगती आहे. यामुळे समाजजीवनाचा समतोल विकास होणार नाही असे न्या. रानडे वारंवार म्हणत असत.

हे त्यांचे वाक्य त्यामुळे मला अतिशय अर्थपूर्ण वाटते. न्या. रानडे यांचा हा सर्वांगीण सुधारणावाद आधी सामाजिक की राजकीय या वादाच्या संदर्भात पुढे आला. राजकारणात आपण उदारमतवाद, स्वातंत्र्य, लोकशाही बुद्धिप्रामाण्यवाद स्वीकार करतो, परंतु सामाजिक जीवनात मात्र चातुर्वर्ण्य

जातिव्यवस्था, बालविवाह, स्त्रियांबद्दल अनुदार भूमिका यांचा स्वीकार करतो. ही मूलभूत विसंगती आहे. या सामाजिक, राजकीय सर्वच क्षेत्रात आपणास सुसंगती ठेवली पाहिजे. हा त्यांच्या विवेचनाचा गाभा होता. दुर्दैवाने महाराष्ट्राची वाटचाल या सर्वांगीण सुधारणावादाच्या मार्गाने होऊ शकली नाही. १९ व्या शतकाच्या शेवटी शेवटी राजकीय चळवळींला महत्त्व येऊ लागले व त्याबरोबर सामाजिक सुधारणेकडे दुर्लक्ष होऊ लागले. १८८७ पासून तो १८९६ पर्यंत आमच्या राजकीय परिषदा व सामाजिक परिषदा एकत्रच भरत होत्या. परंतु १८९६नंतर त्या अलग अलग भरू लागल्या. राष्ट्रीय चळवळींच्या मंडपातून सामाजिक परिषदही बाजूला काढली गेली. आमच्या जीवनातील ही घटना मला एका दृष्टीने प्रतिकारक वाटते. यानंतर आमच्या सामाजिक परिषदा मागे पडल्या व राजकीय चळवळीलाच खूप महत्व येत गेले. १९०१ पासून तो १९२० पर्यंत सामाजिक सुधारणावादाची तर पीछेहाटच झाली. महात्मा गांधींनी पुढे या दोन्ही सुधारणावादाचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. परंतु गांधीजींची ती दृष्टी आमच्या जीवनात कितपत खोलवर झिरपली याची शंका वाटते. स्वातंत्र्यानंतर राजकीय जीवन व आमचे सामाजिक जीवन यातील अंतर वाढत चालले आहे की काय अशी शंका अनेक वेळा मनाला चाटून जाते. आमच्या राजकीय सुधारणा जितक्या झपाट्याने होत आहेत त्या मानाने आमचे सामाजिक जीवन बदलत नाही. आमच्या राजकीय सुधारणा पूर्णांशाने यशस्वी व्हायच्या झाल्या तर आमचे सामाजिक जीवनही बदलले पाहिजे. आमच्या राजकीय जीवनाची मुळे आमच्या सामाजिक जीवनातच असतात. समाजजीवन न बदलता केवळ राजकीय जीवन बदलण्याचा प्रयत्न केला तर आमचा हा प्रयत्न कितपत यशस्वी होईल याबद्दल मला शंका आहे.

### आर्थिक उन्नतीने समाज सुधारतो असे नाही

१९ व्या शतकात आधी सामाजिक की आधी राजकीय हा जो वाद होता त्याचे उत्तर राजकीय स्वातंत्र्यानंतर आपल्याला काय मिळाले हेही अभ्यासण्याजोगे आहे. एकदा राजकीय स्वातंत्र्य मिळाले की,बाकीच्या सर्व सुधारणा

आपोआप होतील असा एक युक्तिवाद राजकीय सुधारणावाद्यांकडून केला जात होता. रात्र संपली की, पहाट उजाडेल हा क्रम जितका अटळ आहे तसाच क्रम राजकीय स्वातंत्र्याबाबत आहे असे या पक्षाने म्हटले होते. गेल्या अठरा वर्षांतील आपला अनुभव या पक्षाच्या बाजूने कितपत साक्ष देत आहे ? मला स्वतःला अनेक वेळा असे वाटते की, आमच्या राजकीय सुधारणा या काळात खूप झपाट्याने झाल्या परंतु आमचे खेड्यापाड्यातील सामाजिक जीवन जवळ जवळ स्थिर आहे. ही घटना मला फारशी स्पृहणीय वाटत नाही.

आमच्या राजकीय नेत्यानी सामाजिक सुधारणेबाबत जसा एक दृष्टिकोन मांडला तसा मार्क्सवाद्यानी दुसरा दृष्टिकोन मांडला. त्यानी सांगितले आर्थिक परिस्थिती बदलली की, समाजाची सामाजिक व इतर सर्व परिस्थिती आपोआप बदलते. आर्थिक सुधारणा हा सर्व सुधारणांचा गाभा आहे. आर्थिक सुधारणा झाली म्हणजे इतर सुधारणा करण्याची गरजच वाटत नाही. त्या आपोआप तिच्यामागून चालत येतात. एखाद्या झाडाचा बुंधा मोडला म्हणजे त्याच्या फांद्या जशा आपोआपच खाली येतात तसाच काहीसा प्रकार आमच्या परंपरागत समाजजीवनाचा आहे असे मार्क्सवाद्यांनी म्हटले आहे. काही प्रमाणात हे खरेही आहे. परंतु या विधानातील सत्य आपण फार काळजीपूर्वक तपासून घेतले पाहिजे. काही काही वेळा माणसाची आर्थिक परिस्थिती बदलते परंतु त्याचे सामाजिक जीवन मात्र तसेच राहते. आर्थिक परिस्थितीमुळे त्याच्या जीवनात वरवरचे, उथळ स्वरूपाचे बदल होतात. परंतु त्याचा मूलभूत दृष्टिकोन हा सनातनी, जुना, टाकाऊच राहण्याचा संभव असतो. चार पैसे मिळण्यामुळे अंगावर उत्तम कपडे येतात, घरात चूल जाऊन बरशेन येते, चांगल्यापैकी फर्निचर येते, रेडिओ येतो, परंतु स्त्रियांकडे पाहण्याची त्याची दृष्टी अतिशय सनातनी राहण्याचाच संभव असतो. जुन्या अंधश्रद्धांना तो कवटाळून बसलेला असतो. आर्थिक बदल झाला की, सामाजिक बदल होतोच असे मला वाटत नाही. मार्क्सवाद येथे तोकडा पडतो.

आमच्या खेड्यापाड्यातील समाजजीवनात तो कोसळून पडतो असे मला अनेक वेळा पाहावयास मिळते. आणि त्यामुळे आर्थिक स्थिती बदलली की, सर्व सामाजिक जीवन बदलते हा सिद्धान्त मला असमाधानकारक, अपुरा वाटतो.

## वैचारिक क्रांती खरी महत्त्वाची

आमच्या राजकीय वा आर्थिक सुधारणांचा मूळ पाया आमच्या वैचारिक व सामाजिक जीवनात आहे. किंबहुना वैचारिक बदल हाच मानवी जीवनातील मूलभूत बदल आहे. वैचारिक क्रांती हीच राजकीय वा आर्थिक क्रांतीची गंगोत्री आहे. त्यामुळे आज आपल्या महाराष्ट्राच्या जीवनात आपल्याला मानसिक वैचारिक क्रांतीवरच विशेष भर दिला पाहिजे. या वैचारिक क्रांतीतूनच आजच्या आपल्या सर्वांगीण सुधारणावादाचे ज्ञान आपणास मिळू शकेल. आजच्या महाराष्टाच्या जीवनाचा विचार करताना न्या. रानडे व प्रा. आगरकर यांच्या सर्वांगीण सुधारणावादाकडे आपणांस पुन्हा गेले पाहिजे असे मला वाटते. त्या विचाराचा सुधारलेला धागा अनेक वर्षानंतर आता आपण पुन्हा पकडला पाहिजे. या सर्वांगीण सुधारणावादातूनच उद्याच्या महाराष्ट्राचे रम्य स्वप्न आपण साकार करू शकू. आजचा महाराष्ट्र या सर्वांगीण सुधारणावादाला प्रतिसाद देईल व तुमच्या आमच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनातील एक गरज भागवील असा विश्वास वाटतो. या वाटेने आपण गेलो तर पुढील दहा वर्षात देखील महाराष्ट्राची चेहरेपट्टी पुष्कळ बदलल्याचे रम्य चित्र आपणास पाहायला मिळेल. आपण हे करू शकू असा मला जबरदस्त विश्वास वाटतो.

लोकसंख्येच्या मानाने जमिनीची टंचाई, असलेल्या जमिनीची विषम वाटणी, शेतकऱ्याचे दारिद्र्य व कर्जबाजारीपणा, व्यापारी व सावकार यांच्याकडून होणारी पिळवणूक, दुय्यम उद्योगधंद्यांचा अभाव, बेकारी व वाढती लोकसंख्या हे भारतीय स्वरूपाचेच प्रश्न आपल्याही पुढे आहेत. मुंबईत थोडेबहुत उद्योग-धंदे आहेत. पण महाराष्ट्रातील नैसर्गिक साधनसामग्री उपयोगात आणून नवे नवे उद्योगधंदे उभारल्याखेरीज लोकांचे राहणीचे मान सुधारणार नाही. उद्योगाचा विकास भांडवलवाढीवर अवलंबून असतो. आणि महाराष्ट्राला शेतीतील जादा उत्पन्नाखेरीज भांडवल जमविण्यास दुसरे साधन नाही. शेतीची पुनर्रचना व औद्योगिक विकास यांचा एकत्रच विचार करणे म्हणूनच युक्त होय.

खेड्यातील आर्थिक जीवनावर व्यापारी व सावकार यांची दृढ पकड आहे. वरिष्ठ वर्गाशी नेटाने झगडू शकेल अशी जोरदार संघटना खेड्यात अस्तित्वात आल्याशिवाय शेतकऱ्याची पिळवणूक थांबणे शक्य नाही.

सहकारी शेतीचा पुरस्कार करावा परंतु त्यासाठी सहकारी पतपेढ्या व सहकारी खरेदी-विक्री संस्था चांगल्या चालल्या पाहिजेत.

शेतमजुरांचा प्रश्न—संख्या शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येच्या १५ टक्के आहे.—अपुरा रोजगार, अत्यल्प मजुरी यांचा प्रश्न सोडविणे निकडीचे आहे.

उद्योग फक्त मुंबईसारख्या चार दोन लहान मोठ्या शहरातच केंद्रित झाले आहेत. त्यांची वाटणी अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने झाली पाहिजे.

## समृद्ध समाज जीवन हाच पुरुषार्थ

आधुनिक काळाशी सुसंगत अशी नवी जीवनदृष्टी, नवे भावबंध, नवी कर्मप्रवृत्ती निर्माण केली पाहिजे. रूढीचे वर्चस्व काढून टाकून लोकजीवनात उत्साहाचे, ऐहिक जीवननिष्ठेचे, प्रयत्नशीलतेचे, सहकार्याचे, सामाजिक कर्तव्यबुद्धीचे वातावरण फैलावण्यासाठी खटपट केली पाहिजे. आज खेडुतांची अंतःकरणे हेलावून सोडणाऱ्या जाणिवा बव्हंशी पारमार्थिक स्वरूपाच्या आहेत. ज्ञानेश्वर—तुकारामांच्या तत्त्वबोधातून त्यांचा मनःपिंड पोसला आहे. महाराष्ट्रातील संतमंडळाने मराठी जनतेच्या परमार्थ बुद्धीला ऐहिकतेची जोड देण्याचा थोडासा प्रयत्न केला पण या उपक्रमाची व्याप्ती फारच मर्यादित आहे. संतांच्या विचारप्रणालीत सुखाच्या अभिवृद्धीपेक्षा दुःखनिवारणावरच अधिक कटाक्ष आहे. रंजल्या गांजलेल्यांना साहाय्य देणे, दिलासा देणे हीच खरी भगवद्भक्ती, असा त्यांचा उपदेश आहे. संतानी भूतदया, परोपकार, समदृष्टी इत्यादी गुणांचा उदोउदो करून लोकांच्या दातृत्वाचा, त्यागभावनेचा, सेवावृत्तीचा ओघ दलितांच्या यातना व क्लेश कमी करण्याकडे वळविला. पण त्यातही जीवन दुःखमय आहे, सुखाची अभिलाषा धरणे हे मृगजळामागे धावण्याइतके वेडेपणाचे आहे हा सिद्धांत गृहित धरला आहे. या विचारामधून सर्वांचे जीवन ऐहिक दृष्ट्या सुखी होऊ शकेल असा आशावाद निर्माण होणे शक्य नाही.

न्याय्य मार्गाने व्यक्तीचे व समाजाचे जीवन समृद्ध व सुखी करणे हाच खरा पुरुषार्थ आहे अशी शिकवण दिली पाहिजे. परंतु ऐहिक जीवननिष्ठा म्हणजे सुखवाद किंवा भोगवाद नव्हे. मनुष्याच्या नैसर्गिक शक्तींचा संपूर्ण विकास आणि त्यांच्या सहज प्रेरणांची योग्य प्रमाणात परिपूर्ती हे या जीवन-निष्ठेचे मूळ आहे. संपूर्ण विकासाच्या कल्पनेत मानवी मनातील उदात्त भावनांचा व प्रवृत्तींचा समावेश होतो. संयम, सहानुभूती, सेवा, त्याग, नीती, धैर्य समर्पणशीलता इत्यादी गुण या नव्या जीवननिष्ठेलाही जवळचेच वाटतात.

# १७

# भारतीय नियोजन

भारतीयांच्या नियोजनाचे एक वैशिष्टय असे की, लोकशाहीच्या मार्गाने नियोजन यशस्वी करणारे भारत हे आज सर्व आशियातील नव्हे तर जगातील सर्व अविकसित राष्ट्रातील एकमेव राष्ट्र आहे. इतकेच नव्हे तर युरोपमध्ये देखील योजनाबद्ध आर्थिक नियोजन करणारे कोणतेही राष्ट्र आज दिसत नाही. त्यामुळे लोकशाही आणि आर्थिक नियोजन यांची यशस्वी सांगड घालू पाहणारे जगातील एकमेव राष्ट्र म्हणून भारताचा उल्लेख करावा लागेल.

नियोजनामुळे आपली भारतीय अर्थव्यवस्था गतीमान बनली आहे. नियोजनपूर्व काळात आपली अर्थव्यवस्था भांडवलशाहीच्या मार्गाने जात होती. आधीची अनेक वर्षे आपली अर्थव्यवस्था चिखलात रुतलेल्या स्थितिशील अर्थव्यवस्थेसारखी बनली होती. आपल्या तीन पंचवार्षिक योजनानी आपल्या अर्थव्यस्थेला या चिखलातून बाहेर काढले व तिला गतीमान करण्याचा प्रयत्न केला. माझ्या दृष्टीने योजनेचे हे मोठे यश आहे.

आपण आपल्या तीन पंचवार्षिक योजनांचा ढोबळ मानाने विचार केला तर

---

सातारा जिल्हा कॉंग्रेस कार्यकर्ता बैटक,
सातारा.

आपणास असं दिसून येईल की, आपली प्रत्येक पंचवार्षिक योजना ही पहिल्या योजनेपेक्षा दुप्पट आकाराची होते आहे. आपली पहिली योजना दोन हजार कोटींची होती. तर दुसरी योजना साडेचार हजार कोटींची झाली आणि तिसरी योजना नऊ हजार कोटींची व चौथी योजना बावीस हजार कोटींची होत आहे. प्रत्येक योजना अशा प्रकारे दुप्पट आकाराची होत आहे. यामध्ये राष्ट्राच्या वाढत्या आकांक्षा सामावून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

आपल्या तीन पंचवार्षिक योजनातील ठळक यश आपल्याला औद्योगिक क्षेत्रात पाहावयास मिळेल. या १५ वर्षांत आपला औद्योगिक विकासाचा पाया हा चांगल्या प्रकारे घातला गेला आहे. या काळात औद्योगिक क्षेत्राची समतोल प्रगती झाली आहे. नियोजनपूर्व काळात आपल्या देशाची मूलभूत धंद्याबाबतची प्रगती जवळ जवळ काहीच झाली नव्हती. खाजगी भांडवलदारानी उपभोग्य वस्तूंच्या उत्पादन वाढीवर सर्व भर दिला होता. कारण त्या मालाला मागणीही त्वरित मिळते. गुंतवलेल्या भांडवलावर नफा ताबडतोब मिळतो. आपल्या औद्योगिक क्षेत्राची वाढ त्यामुळे मुख्यतः उपभोग्य वस्तूंच्या बाबतीत झाली. मूलभूत उद्योगधंदे उपेक्षितच राहिले. खाजगी भांडवलदारानी या धंद्याकडे लक्ष दिले नाही याचे साधे कारण असे की, अशा मूलभूत उद्योगधंद्याना अनेक कोटींचे भांडवल लागते. आणि १०–१० वर्षे हे भांडवल गुंतवल्यानंतर त्याचे उत्पादन सुरू होते. खाजगी भांडवलदार अनेक कोटींचे भांडवल दहा दहा वर्षे गुंतवून नफ्याची वाट पाहू शकत नाहीत. स्वाभाविकच १९५० च्या आधी अनेक वर्षे आपली औद्योगिक वाढ जी झाली ती काहीशी असमतोल झाली. आपल्या औद्योगिक वाढीतला हा दोष आपल्या पंचवार्षिक योजनानी आहे. आणि आता आपल्या अर्थव्यवस्थेची समतोल वाढ होऊ लागली आहे. यातूनच आपल्या सर्वांगीण औद्योगिक विकासाचा पाया घातला गेला आहे. आपल्या योजनांचे हे यश मला फार उल्लेखनीय असे वाटते.

## शेतीच्या विकासाला प्राधान्य

औद्योगिक वाढीबरोबरच शेतीच्या विकासावर आपण भर दिला आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेत आपण एकूण खर्चापैकी सुमारे ४२ टक्के खर्च शेतीवर केला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत शेतीवरचा भर कमी झाला. व हे

प्रमाण २७ टक्क्यावर आले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी ही चूक आपल्या लक्षात आली व हे खर्चाचे प्रमाण आपण पुन्हा २७ टक्क्यावरून ३६ टक्क्यावर नेले. शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आपल्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी आपले ५० टक्के उत्पन्न शेतीच्या उत्पादनातून आहे. त्यामुळे शेतीचा विकास हा आपला मुख्य आर्थिक विकास आहे. या दृष्टीने आपल्या चौथ्या पंचवार्षिक योजनेत शेतीवर जितका भर देता येईल तितका तो आपण दिला पाहिजे.

शेतीच्या विकासाच्या बाबतीत एक ठळक गोष्ट म्हणजे आपण गेल्या पंधरा वर्षांत जास्तीत जास्त जमीन कालव्याखाली आणण्याचा प्रयत्न केला आहे. भारताच्या शेतीच्या अर्थव्यवस्थेचा मोठा प्रश्न म्हणजे पुष्कळशी जमीन ही पावसाच्या लहरीवर अवलंबून असते. ही अगतिकता जितकी कमी होईल तितका शेतीचा विकास अधिक होईल. या दृष्टीने लाखो एकर जमीन कालव्याखाली आणण्याचा आपला प्रयत्न हा मला अतिशय स्वागतार्ह वाटतो.

या कालव्याच्या योजनेबाबत एक गोष्ट मात्र मला आग्रहाने सांगावयाची आहे की, या कालव्याच्या योजना दीर्घ मुदतीच्या व करोडो रुपयांच्या असण्याऐवजी त्या अल्पमुदतीच्या व छोट्या प्रमाणावर असल्या तर बरं होईल. कालव्याच्या काही योजनांमध्ये आपण दीडदीडशे कोट रुपये गुंतवले आहेत व त्यांचे पाणी मिळायला दहा दहा पंधरा पंधरा वर्षे आपल्याला थांबावे लागले आहे. अशा योजना आमच्या शेती विकासाच्या दृष्टीने फारशा स्वागतार्ह नाहीत. आमच्या शेतकऱ्याला ३–४ वर्षांत पाणी मिळायला पाहिजे. व या धरणयोजना लहान लहान प्रमाणावर अनेक ठिकाणी झाल्या तर शेकडो शेतकऱ्याना त्याचा फायदा होईल.

शेतीच्या उत्पादनवाढीच्या दृष्टीने आणखी एक गोष्ट मला ठळकपणे आपल्या नजरेला आणावयाची आहे. या उत्पादनवाढीत बी-बियाणांना अतिशय महत्त्व आहे. आतापर्यंतचे आपले बी-बियाणे आपण तपासले तर त्यांचा मुख्य गुण म्हणजे कसेबसे जगून राहणे हा होता. अपुरा पाऊस असला वा रोगराई आली तरी मरू नये, एवढाच त्यांचा गुण होता. त्या बियाण्यामध्ये पिके फोफावण्याचे सामर्थ्य नव्हते. कुडकुडत कसेबसे जगणे हाच जुन्या बी–बियाण्यांचा मुख्य धर्म होता. आता आम्ही नव्या बी-बियाण्याकडे लक्ष दिले

पाहिजे. यासाठी स्वतंत्र ‘ सीड फार्मस् ’ काढली पाहिजेत. शेतकऱ्याना अशा नव्या प्रकारची बी-बियाणी पुरवली पाहिजेत. व त्यांचा उपयोग करण्याची प्रवृत्ती त्यांच्यात वाढविली पाहिजे. गेल्या १५ वर्षांचा शेती विकासाचा आढावा घेतला तर रासायनिक खतांचा अपुरा पुरवठाही चटकन नजरेत भरतो. एकूण गरजेच्या मानाने रासायनिक खतांचा आपण किती पुरवठा करू शकलो असा आढावा घेतला तर आपल्या पदरी निराशाच पडेल. रशियाने या खतांच्या पुरवठ्याकडे फार मोठे लक्ष पुरवले होते. खतांचे त्यानी अनेक कारखाने काढले होते. भारताला देखील आपल्या चौथ्या पंचवार्षिक योजनेत खतांच्या कारखान्याकडे खूप लक्ष पुरवावे लागेल. त्यातूनच उत्पादनवाढीचा आमचा कार्यक्रम यशस्वी होण्यास मदत होणार आहे.

### शेतीसाठी दिलेले गर्ज शेतीकरिताच वापरले पाहिजे

सहकारी सोसायट्यांमार्फत गेल्या १० वर्षात शेतीसाठी जे भांडवल पुरवले गेले ते पाहता भांडवलाचा पुरवठा सतत वाढत आहे असे आपल्या नजरेस येईल. या काळात सहकारी सोसायट्यांमार्फत होणारा भांडवलाचा पुरवठा सुमारे १० पटीने वाढला आहे. परंतु हे भांडवल शेतीच्या कामासाठीच वापरले जाते असे ठामपणे म्हणता येणार नाही. यातील पुष्कळशी रक्कम बिगर शेतीच्या कामासाठीच उपयोगात आणली जाते. ही प्रवृत्ती प्रयत्नपूर्वक कमी झाली पाहिजे. शेतीसाठी दिलेले कर्ज शेतीसाठीच कसे वापरले जाईल याची काळजी आम्ही घेतली पाहिजे. सहकारी सोसायट्यानी शेतकऱ्याना दिलेले कर्ज शेतीसाठीच वापरले तर पुढील ५ वर्षात आम्ही उत्पादनवाढीचा कार्यक्रम सहज यशस्वी करू शकू.

### शास्त्रीय औषधयोजना आरोग्यास उपकारक

तीन पंचवार्षिक योजनातील आरोग्याची आपण पाहणी केली तर आपल्या बालमृतांचे प्रमाण पुष्कळ खाली येत आहे असे दिसून येते. ५१ साली बालमृतांचे प्रमाण हजारी २८–३० होते. आज ते १७ वर आले आहे. खेड्यापाड्यात आता दवाखान्याची सोय झाली आहे. डॉक्टरांची संख्या वाढलेली

आहे. प्लेग, कॉलरा, देवी यासारख्या साथीच्या रोगांचे खेड्यापाड्यातून निर्मूलन झाले आहे. मलेरियासारखा रोगही आपण आटोक्यात आणला आहे. नागरिकांच्या आरोग्यास पोषक असे वातावरण तयार होत आहे. याचा उत्तम पुरावा आपल्या वाढत्या आयुर्मानात दिसत आहे. १९५१ साली आपले आयुर्मान सरासरीने जे होते ते आता ४२ वर गेले आहे. बालमृतांचे खाली आलेले प्रमाण व आयुर्मानाचे वाढते प्रमाण यामधून आमच्या वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. अर्थात याला तंत्रज्ञानात झालेली वाढ, वैद्यकीय क्षेत्रात झपाट्याने झालेली प्रगती हेही कारणीभूत आहे. आमचा खेड्यापाड्यातला माणूस आता शास्त्रीय औषधोपचाराकडे वळतो आहे. पूर्वी तो आजारी पडला तर गंडे, धागे, दोरे यांचा आश्रय घेत असे. बकरी, कोंबडी, अंडी यांचा बळी देऊन मरीआई, अंबाबाई, पिराई याना प्रसन्न करण्याचा प्रयत्न करीत असे. आता त्याचा बिमोड होतो आहे. कारणे काहीही असोत गेल्या १५ वर्षांत या क्षेत्रात आपण केलेली प्रगती स्पृहणीय आहे असे मला वाटते.

# १८

# लोकशाही समाजवाद

आज तुमचे स्वागत करताना मला आनंद होत आहे. आपण जमलो आहोत ते एकमेकांचे विचार ऐकण्याकरिता. त्यांच्या युक्तायुक्ततेचा मागोवा घेण्याकरिता. सुदैवाने आपण लोकशाहीवादी राष्ट्राचे नागरिक आहोत. आणि अशा लोकशाहीप्रधान देशात विचारांच्या लोणाचे मंथन अत्यावश्यक आहे. नव्हे ते अपरिहार्य आहे. त्यातून आपली लोकशाही अद्याप बाल्यावस्थेत आहे. तिला इंग्लंड अथवा अमेरिकेसारख्या राष्ट्रांना असलेली शेकडो वर्षांची ऐतिहासिक घडण लाभलेली नाही. तथापी सुबुद्ध भारतीय जनसमाजाने तिला आत्मसात करण्याचा प्रयत्न केल्याने ती आताशी कुठे बाळसे धरू लागली आहे. तिचे संवर्धन करणे आपले कर्तव्य आहे. आणि तिच्या वर्धिष्णु आणि विकासक्षम अवस्थेला ते पोषक आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय जनमत लोकशाहीवादी राज्यव्यवस्थेला अनुकूल आहे याचा गेल्या तिन्ही सार्वत्रिक निवडणुकींनी कौल दिला आहे.

लोकशाहीमुळे व्यक्तीला सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक या जीवनाच्या विविध क्षेत्रांत अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. किंबहुना लोकशाही व्यक्तीच्या विकासासाठींच राबविली जात असल्याने व्यक्ती ही या

..........................................

अहमदनगर जिल्हा काँग्रेस कार्यकर्ता शिबीर, भंडारदरा

सर्व व्यापाचा मानबिंदु ठरते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अपरिहार्यपणे लोकमताचे प्रतिनिधित्व काँग्रेसकडे आले. ती एक इतिहासदत्त जबाबदारी होती आणि काँग्रेस ती टाळूच शकत नव्हती. कारण, राजकीय पारतंत्र्य संपले होते तरी राष्ट्राची सर्वांगीण उभारणी हे भविष्यातील आव्हान पूर्ण करण्यास काँग्रेस बद्धपरिकर होती. राष्ट्राच्या उभारणीसाठी म्हणूनच नियोजनबद्ध विकास योजनांच्या कार्यक्रमाने देशाला विकसित राष्ट्राचे स्वरूप देण्याकरिता काँग्रेसचे प्रयत्न झाले. याकरिता काँग्रेसने संमिश्र आर्थिक नियोजन पद्धतीचा मार्ग स्वीकारला. कारण कुठलेही नियोजन शेवटी एका विशिष्ट राज्यापुरते संमिश्र राहते. कृषिप्रधान अर्थव्यवस्थेला औद्योगिकरणाची जोड देऊन भविष्यामध्ये एका मनोहर समाजचित्राचे रेखाटन काँग्रेसने करून या महान कार्याचा प्रारंभ केला. यापैकी कुठली तरी एक आघाडी भक्कम करण्यापाठीमागे आपण लागलो असतो तर अर्थव्यवस्था विस्कळीत झाली असती. एक विशिष्ट क्षेत्र बलवान झाले असते आणि राष्ट्राचे दुसरे अंग विकल होऊन पडले असते. त्यामुळे राष्ट्रगाडा सुरळीत चालला नसता. आपण रशियाचे उदाहरण घेऊ. आपल्या-पेक्षा निम्मी लोकसंख्या असणारे हे राष्ट्र त्याची वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगती जगात अग्रेसर ठरली तरी त्याची कृषिव्यवस्था ढासळली आणि त्यामुळेच आज रशिया अमेरिकेकडून अन्नधान्याची आयात करीत आहे. पादत्राणे वगैरे-सारख्या जीवनावश्यक इतर कांही अन्य गोष्टींचाही रशियात तुटवडा भासत आहे हे खुद्द रशियन वृत्तपत्रेच कबूल करतात. आपल्या देशात ३३ कोटी एकर जमीन लागवडीखाली आहे. रशियात ती ५० कोटी एकर आहे. आपल्याहून त्यांची लोकसंख्या कमी असूनही जास्त जमीन लागवडीखाली असूनहि आपल्या-पेक्षा किती तरी पटीने जादा धान्य रशियन सरकार आयात करते. ही घटना विचार करण्यासारखी आहे. चीनचे तेच झाले. लष्करी दृष्टया स्वयंपूर्ण आणि आशियातील प्रचंड शक्ती बनण्याच्या भ्रमात कृषिव्यवस्था कोलमडली आहे. याचाच अर्थ साम्यवादी देशांचे एकांगी नियोजन निरर्थक आहे. ते कोलमडले आहे. एका विशिष्ट मर्यादेपर्यंत प्रगतीची प्रचंड झेप त्यांनी मारली हे मान्य करूनहि त्यांचे अपयश अपरिहार्यपणे त्यांच्या वाट्यास आले. असे होण्यापेक्षा टप्प्याटप्प्यानें सर्वच क्षेत्रांत प्रगती करीत कालांतराने स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था निर्मिण्याची आपली मनीषा निश्चित श्रेयस्कर आहे.

## लोकशाही श्रेयस्कर

मी हे कबूल करतो की लोकशाहीत वेग कमी असतो. मंद असतो. हुकूमशाहीत ती गती प्रचंड असते. परंतु एका विशिष्टमर्यादेपर्यंतच. कारण लोकशाहीतील व्यक्तीविकासाला तिथे वाव नसतो. हुकूमशाहीच्या दडपणाखाली मेलेली मने यंत्राप्रमाणें काम करतात. तिथे जीवनाबद्दल विचार नाही. सुखमय भविष्याची कल्पनाचित्रेही अशक्य. तिथे व्यक्तीच मुळी यंत्र बनून जाते, तिची मानसिक, शारीरिक, आणि बौद्धिक प्रगतीच खुंटते. लोकशाही व्यक्ती-स्वातंत्र्याचा विकास हे समाजजीवनातील भावगीत बनले आहे. आचार, उच्चार आणि संचारस्वातंत्र्य हे लेणे लोकशाहीने व्यक्तीला बहाल केले आहे. अर्थात सर्वांगीण परिपूर्णतेसाठी लोकशाहीत वेळ लागेल, पण ती निश्चित प्राप्त होईल. कुणी एकाने म्हटले आहे की, ' क्या बडा तो दम बडा '. लोकशाही मार्गाने प्राप्त होणाऱ्या स्वजनावस्थेची प्रतीक्षा मात्र जनतेकडून अभिप्रेत आहे. अर्थात ही केवळ प्रतीक्षा असू नये, त्याला जनतेची साथ हवी.

याकरिता एका महान राष्ट्राचे नागरिक आणि राज्यकर्त्या आणि जनतेच्या अपेक्षा ज्याभोवती गुंजारव करीत आहेत त्या जबाबदार पक्षाचे घटक म्हणून आपल्यावर काही जबाबदाऱ्या येऊन पडतात. लोकशाहीवर्धन व जपणूक केली पाहिजे. दुसरे, व्यक्तीस्वातंत्र्याचा विकास हा लोकशाहीचा आत्मा आहे याची जाणीव ठेवून व्यक्तीव्यक्तीचा विकास साधून समाजजीवन निकोप आणि सौहार्दपूर्ण दाखवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तिसरे, समाजवादी समाजरचना ही जीवनदृष्टी ठेवून समाजवादाच्या उभारणीत हातभार लावला पाहिजे. चौथे आणि महत्त्वाचे काम म्हणजे आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण होण्यासाठी उत्पादन-वाढ करून समानतेच्या पायावर राष्ट्रीय उत्पादनाचे न्याय्य वाटप होईल याकरिता प्रयत्न केले पाहिजेत. महाराष्ट्रातील काँग्रेसजन हा दृष्टीकोन अवलंबून कामास लागतील असा विश्वास मनास वाटतो. आणि हे प्रकट करताना मला आनंदही वाटतो. कारण ग्रामीण जीवनातून एका नवीन विवेकी आणि कार्य-मग्न तद्वतच कार्यक्षम कर्तृत्वाचा हुंकार आज येत आहे. हे नवे रोपटे वाढेल. त्याच्या नेतृत्वाच्या विशाल छायेत भावी महाराष्ट्र सुखाचे निश्वास सोडील हे निःसंशय सत्य आहे.

**लोकशाही**
**नेहमीच त्याज्य**

तेव्हा याकरिता लोकशाही मूल्यांची जपणूक अत्यावश्यक आहे. उद्याच्या नव्या नेतृत्वाची घडण या प्रक्रियेतून होणार आहे. लोकशाही ही जीवननिष्ठा बाळगूनच कामास लागावयाचे आहे ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. हुकूमशाही देशांतील प्रगतीची झेप पाहून दिपून जाऊन जर लोकशाहीची उपेक्षा करण्याचा चुकून जरी प्रयत्न झाला तरी तो आत्मघात ठरेल. व्यक्तीजीवनच मुळी संपुष्टात येईल. हुकूमशाहीत गती जास्त असली तरी व्यक्ती विचार आचार आणि बौद्धिक विकास या बाबतीत मेलेली असते. कारण ती यंत्र बनून काम करते. ही मेलेली मने कधीतरी कितीही दडपली तरी बंड करून उठतात. मग क्रांतीची उलथापालथ होते. रक्ताचे पाट वाहतात. अपराधी निरपराधी सगळेच चिरडले जातात. जीवनातील हे भीषण आणि रौद्रस्वरूप आपणांस ज्ञात अथवा परिचित नाही असे नव्हे. परंतु शांतता हा आजच्या युगाचा महामंत्र आहे. सर्वसमन्वय हा आपल्या संस्कृतीचा वारसा आहे. लोकशाहीचा प्रचंड विकास आपल्या देशात नसला तरी तिला भारतीय संस्कृतीचा वारसा आहे. पहिली लोकशाहीप्रधान राज्यव्यवस्था भारत वर्षात महाराष्ट्राच्या शिवछत्रपतींनी अष्टप्रधान मंडळाद्वारे प्रस्थापिली. अनादी कालापासून भारताच्या इतिहासात गावगाडा ग्रामपंचायतीकडून चालविला जात असे. म्हणून केवळ प्रगतीच्या गतीसाठी हुकूमशाहीच्या अंगीकाराचा विचार माथेफिरूपणा ठरेल, नव्हे हा विचारच मुळीं चुकीचा आहे.

उत्पादनवाढ ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. गरीब आणि श्रीमंत यांत पडणारे अंतर ही भयानक गोष्ट आहे. हा आर्थिक असमतोल असूयेपोटी साम्यवादाच्या आहारी जाईल अशी भीती वाटते. दरिद्री राहू नये म्हणून आपण योजनांचा खटाटोप आपण करुन राहिलो आहोत. देशाच्या दारिद्र्यनिर्मूलनाच्या कार्यक्रमास दरिद्री माणसापासून सुरुवात झाली पाहिजे. हे दारिद्र्य न राखण्यासाठी उत्पादनाच्या न्याय्य वाटपाची अपरिहार्यता आली. आपल्या देशातील लोकांत एक फार मोठा दोष आहे. तो म्हणजे काम कमी पण बडबड मात्र फार. या कामी व्यक्तीस्वातंत्र्याचा भरपूर दुरुपयोग मात्र होतो. प्रत्येक-

जण उठून बडबड करू लागला तर कामाचे काय? या बडबडीमुळेच लोकशाहीतील विकासाची गती रोखली गेलेली आहे. ही गती वाढविणे आपले कर्तव्य आहे. म्हणजे विकासाच्या मार्गावरील प्रत्येक अडचणीचा बंदोबस्त करावयाचा. काही अडचणी समजून यावयास वेळ लागतो. त्यासाठी त्याचा अभ्यास करून, त्याचे स्वरूप अवलोकन करून त्या समजून सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न आपण केला तरच लोकशाहीतील विकास कार्यक्रम कार्यक्षम व गतीशील होतील, आणि विकासाचा वेग वाढल्याशिवाय उत्पादनवाढ अशक्य आहे. याकरिता लोकशाहीत जीवनाधिष्ठान मानणारे शिस्तबद्ध विचाराचे कार्यक्षम कार्यकर्ते हवे आहेत. लोकशाही ही जीवननिष्ठा मानून समाजात कार्य केले पाहिजे. आपली संघटना अशी बनण्यासाठी प्रत्येकाने हे जीवनाधिष्ठान आत्मसात करावे हेच आजचे आव्हान आहे. लोकशाही समाजवादासाठी ही काळाची हाक आहे, तिला योग्य तो प्रतिसाद महाराष्ट्रातील सुबुद्ध कॉंग्रेस कार्यकर्ता निश्चित देईल असा मला दुर्दम्य विश्वास आहे.

## लोकशाही समाजवाद आदर्श

आज जगाची साम्यवादी आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या चौकटीत विभागणी झालेली आहे. लोकशाही समाजवादाने दिलेले आव्हान आपण स्वीकारून यशस्वी केले तर या जगाला लोकशाही भारताने घालून दिलेला तो एक महान आदर्श ठरेल. अर्थात लोकशाही समाजवादासाठी विकासाची सर्वांगीण प्रक्रिया बारकाईने अभ्यासली पाहिजे. आज हे ज्ञान समाजातील सर्वसामान्य माणसाला आहे. परंतु उच्च पातळीवर याचा कितपत योग्य विचार होत असेल याबद्दल मी साशंक आहे. माझे हे विचार मी कुणावर टीका करावी म्हणून मांडीत नाही. आत्मसंशोधनाच्या प्रामाणिक भावनेने मी आपल्यासमोर हे बोलत आहे. तुमच्या माझ्यात वैचारिक सुस्पष्टता आणि कार्यक्रमाचे योग्य आकलन झाले असेल तरच कार्यक्रमाची अंमलबजावणी यशस्वी होईल. ही आत्मटीका आवश्यक आहे म्हणून स्पष्टपणे बोलणेच भाग आहे.

मोठमोठ्या असामींना विकासाच्या गतीबद्दल तातडीची, तीव्रतेची जाणीव

होईल, मरेमरेतो शेतावर राबणाऱ्या गरीब शेतकऱ्याच्या शेतमालाच्या किमतीबद्दल अशाना काळजी उत्पन्न होईल तेव्हा ही विकासप्रक्रिया त्यांना समजली आहे असे मला वाटेल. शेतमालाच्या किमतीचा प्रश्नही ज्वलंत समस्या आहे. माल माझा तर किमती ठरविण्याचा अधिकारही माझाच राहिला पाहिजे, हे रास्त आणि न्याय्य आहे. यात कुठल्याही प्रकारचा आक्रमक विचार नाही. उलट आजवर शेतीमालाचे उत्पादन शेतकऱ्यानी करायचे आणि त्याच्या बाजार किमती मात्र व्यापाऱ्यानी ठरवायच्या. शेतकऱ्याच्या हक्कावरील हे अतिक्रमण नष्ट केले पाहिजे. शेकडो वर्षांचा हा अन्याय दूर झालाच पाहिजे. भारतीय शेतकरी इतका प्रामाणिक आहे की, कितीही अन्याय होवो, शेतीत कितीही तूट येवो, पोटाला चिमटे घेऊनही तो सहनशील आहे. त्याच्या सहनशीलतेची, शांत स्वभावाची कधी कधी सदसद्‌विवेकी व्यक्तीला चीड येते. इतका तो चांगला असूनही त्याच्याकडे मात्र वर्षानुवर्षे दुर्लक्ष व्हावे ? ही अवस्था अत्यंत हीन आहे. हे थांबले पाहिजे. हंगाम सुरू होण्यापूर्वी शेतमालाच्या किमती निश्चित ठरविल्या गेल्या पाहिजेत. म्हणजे युरोपियन देशाप्रमाणे शेती हा एक उत्पादक फायद्याचा धंदा करणे त्याला सुलभ होईल. कृषीव्यवस्था सुधारणे व शेतमालाच्या किमती ठरवून देणे ही जबाबदारी सरकारने स्वीकारावी असे माझे मत आहे. याबरोबरच किमतीच्या शाश्वतीची निश्चितता सरकारने शेतकऱ्यास दिली पाहिजे. आपले महाराष्ट्र राज्य सरकार या दिशेने पावले टाकीत आहे. त्यांच्या प्रयत्नास धन्यवाद देऊन संघटनेची ताकद आपण त्यांच्या पाठीशी ठेवू या.

### संपत्तीचे विकेंद्रीकरणच न्याय्य

देशातील सत्तर टक्के शेतकरी हाच शेवटी ग्राहक वर्ग आहे याचा विसर पडता कामा नये. हा वर्ग मालाच्या किमतीची हमी देऊन व योग्य किमत देऊन जर सुखी ठेवला तरच औद्योगीकरणास खराखुरा जोर येईल, पाठिंबा मिळेल. या वर्गाची क्रयशक्ती हीच औद्योगिक प्रगतीच्या भरभराटीची किल्ली आहे आणि हा वर्ग जर कंगाल राहिला तर औद्योगिक उत्पादनास ग्राहक कुठला ? म्हणून शेतीविकास हवा आणि शेतीविकासासाठी शेतकऱ्याला संरक्षण हवे.

शेतकरी शहाणा आहे. त्याला नवीन क्षितिजांचे, तंत्राचे आकलन होत आहे. त्याला जर योग्य संरक्षण दिले गेले नाही तर आपले नियोजन कोसळून पडेल. त्याकरिता लोकशाही पद्धतीने विकासाची गती वाढविली पाहिजे आणि त्याबरोबरच संपत्तीचे न्याय्य आणि समानतेच्या भूमिकेवर विकेंद्रीकरण साधणे ही आजची खरी गरज आहे.

आपल्या विकासाची गती रोखली गेली आहे. त्याला अनेक कारणे आहेत. काही संस्कारामुळेहि विकास खुंटतो. ठेविले अनंते तैसेचि राहावे हा आपल्यावर झालेला पहिला संस्कार. याने पुरुषार्थाची इच्छाच मारली. ठेविले अनंते तैसेची राहावे हे तुकाराम महाराजांनी वेगळ्या संदर्भातून उच्चारले. त्याचा त्यांच्या चेल्यानी विपर्यास केला. कर्तृत्व शक्तीलाच त्यामुळे कुंठित केले. आजच्या युगात येथील लक्ष वर अध्यात्माकडे लागून काय उपयोग ? मी नास्तिक नाही पण हे अवडंबर मला मानवत नाही. तुकाराम महाराजांच्या काळात शिवछत्रपतीनी महाराष्ट्राज्य प्रस्थापनेच्या महान कार्यास सुरुवात केली. तेच जर ते ‘ ठेविले अनंते तैसेची राहावे, चित्ती असू द्यावे समाधान ’ करून गप्प बसले असते तर आजचे स्वराज्यातले समाधान आपणास मिळाले असते का ? तेव्हा तत्त्वज्ञानाचे मिथ्या अवडंबर झटकून दिले पाहिजे. तुकारामाच्या अभंगपंक्तीचा असा विपर्यास झाला. तसेंच मार्क्सच्या मार्क्सवादाचे झाले. आपला धर्म घ्या किंवा मार्क्सवाद्यांचा आर्थिक धर्म घ्या, हेच अवडंबर. हाच गोंधळ सर्वत्र आहे. काही मार्क्सवादी कट्टर काटेकोर मार्क्सवादी बनून माणसातला माणूसच विसरून चालले आहेत. हा तात्त्विक विपर्यास, वैचारिक अराजक समूळ झटकले पाहिजे.

लोकशाही समाजवाद ही या युगाची साद आहे. नुकतेच भुवनेश्वराचे अधिवेशन संपले आहे. गांधीजींकडे काँग्रेसची सूत्रे आल्यावर काँग्रेसमध्ये समाजवादी विचारमंथनास सुरुवात झाली. मूलतः म. गांधींच्या नेतृत्वाखाली पंडितजीनीच या देशाला समाजवादी विचारांची दीक्षा दिली. १९२४ नंतर समाजवादाचे स्वरूप दिवसेदिवस विकसित होत होत १९५६ साली काँग्रेसने समाजवादी समाजरचनेच्या निर्मितेचे वाण पत्करले. भुवनेश्वराच्या अधिवेशनाने काँग्रेससंबंधीचे धोरण विशद केले आहे. आपण लोकशाहीच्या मार्गाने समाजवादी समाजनिर्मितीप्रत जाणार आहोत. आपण जीवननिष्ठा मानली

आहे. ती आपल्यासाठी आता केवळ राज्यपद्धती राहिली नाही. ही जीवननिष्ठा घेऊन आपणास समाजवाद आणावयाचा आहे. अर्थात समाजवादाची व्याख्या होणे अशक्य आहे, कारण ती एक विशिष्ट अर्थाभिप्रेत अशी कल्पना नसून ते एक गतिमान तत्त्वज्ञान आहे. कालप्रवाहाबरोबर ते सतत बदलत राहणार आहे. उद्याच्या समाजवादी समाजरचनेत एक विशिष्टच स्वरूप समाजवाद धारण करील असे समजणे चुकीचे होईल. कारण औद्योगिक क्रांतीनंतर युरोपात प्रचारात आलेल्या या समाजवादी कल्पनेची स्वरूपे अनेक स्थित्यंतरातून बदलत आलेली आहेत. म्हणून समाजवाद ही एक जीवनपद्धती मानून तिच्या निर्मितीसाठी लोकशाही जीवननिष्ठेतून आपणास प्रयत्न करावयाचा आहे.

आपल्याकरिता समाजवाद हा अभ्युदयाच्या मंदिराचा रस्ता आहे. विकासाकडे नेणारा तो मार्गदर्शक आहे आणि हा विकास आपण लोकशाही पद्धतीने साधावयाचा आहे. समाजवाद आपली मंझिल नाही. आपली मंझिल आहे आर्थिक अभ्युदय, आर्थिक विकास आणि त्या ध्येयाप्रत जाण्याचा रस्ता आहे लोकशाही समाजवाद.

भुवनेश्वरच्या ठरावाने समाजवादी कार्यक्रमास आता भरीव स्वरूप प्राप्त झाले आहे. मानवी जीवनाच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य ह्या महान गरजा पूर्ण करण्याकरिता काँग्रेस बद्धपरिकर झाली आहे. समाजवादाचे विश्लेषण करताना या ठरावात काही मार्ग सांगितले आहेत. काही सांगितले नाही, त्याची आम्ही मागणी केली आहे. शेतमालाच्या किमती ठरवून देणे, बँकांचे राष्ट्रीयकरण करणे आणि समाजवादी कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी तातडीचे प्रयत्न करणे या मागण्या करणारा म. प्र. काँ. चा ठराव भुवनेश्वर अधिवेशनापूर्वीच आम्ही अ. भा. काँ. ला पाठविला आहे.

आता या समाजवादी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या पाठीशी आपण लागायचे आहे. एक मनाने एक दिलाने लोकशाही निष्ठेने हा समाजवादी समाजरचनेचा कार्यक्रम फलद्रूप करावयाचा आहे. कामातून निष्ठा वाढते आणि निष्ठेतून कामाची वृद्धी होते असे एक मजेदार चक्र आहे. अर्थात ही निष्ठा कार्यप्रवण असेल तर ते पूर्ण होते. कार्यकर्त्यांना माझी विनंती हीच की काम शोधा आणि आताही तेच सांगत आहे. प्रदेश काँग्रेसनेच अमुक अमुक करा

असे सांगण्याची आवश्यकता आहे असे नाही. समाजात मिसळल्यावर आपोआप काम मिळते, ते वाढतही जाते. काम मात्र शोधले पाहिजे. ते अभ्यासले पाहिजे. हे महत्त्वाचे आहे. दैनंदिन जीवनात जनतेच्या अनेक सामाजिक समस्या असतात. शेवटी कार्यकर्त्यांनी शोधलेले काम महत्त्वाचे आहे. कामामार्फत लोकविकास व जनसंपर्क ही धारणा यात हवी. मग लोकसंपर्कातून आपोआप काम वाढते आणि कामांतून लोकसंपर्क निकटचा होतो. कर्तव्य आणि निष्ठेच्या चक्राप्रमाणेच हेही एक मजेदार चक्र आहे. प्रदेश काँग्रेसने काम सांगावे आणि कार्यकर्त्यांनी ते पार पाडावे असे स्वरूप मला नको आहे. जनतेत मिसळून काम शोधणे हे महत्त्वाचे आहे.

## पंचायत राज्य विकासाचा पाया

शेवटी एक गोष्ट मला सांगावीशी वाटते. वर्धिष्णू भारतीय लोकशाहीचे विकसित स्वरूप म्हणून पंचायत राज्य झाले. पंचायत राज्याने लोकशाही विकेंद्रीकरणाचा महान वारसा आपल्यापुढे ठेवला. लोकशाही विकासक्रमातील विकसित पुष्प म्हणजे पंचायत राज्य. जनतेच्या समस्या जनतेने समजून स्वतः सोडवावयाच्या, अब्राहम लिंकनने म्हटल्याप्रमाणे.

असे पंचायत राज्याचे वर्णन करता येईल. स्थानिक स्वराज्य संस्था लोकशाहीची आद्य व्यासपीठे आहेत. या क्षेत्रात निर्भेळ सहकार्याचे व सौहार्दपूर्ण कार्यक्षमतेचे चित्र निर्माण होत आहे. याबद्दल मला अत्यंत आनंद होत आहे. परंतु काही ठिकाणी घराणे, प्रतिष्ठा, वैयक्तिक मोठेपणा, याचा महाराष्ट्रात वास यावा ही वाईट गोष्ट आहे. त्याचे निर्मूलन करणे आपले सर्वांत प्रथम कर्तव्य आहे. लोकशाही समाजवादामध्ये प्रतिष्ठा या शब्दासही नवा अर्थ प्राप्त झाला आहे. याकरिता प्रतिष्ठा या शब्दाचा अर्थ काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष कार्य करून बदलून टाकला पाहिजे. वैयक्तिक अथवा घराण्याची प्रतिष्ठा समाजवादाशी विसंगत आहे. नव्हे ती समाजवादास आड येत असेल तर अशी प्रतिष्ठा मोडून काढली पाहिजे. अगर आपणाला प्रतिष्ठा वाढवायची आहे ती श्रमाची, समाजाची कुण्या एखाद्या विशिष्ट व्यक्तीची नव्हे, प्रामाणिक व निष्ठेने कार्य करून कृत्रिम प्रतिष्ठेची अडचण कार्यकर्त्यांनी नष्ट केली पाहिजे.

शेवटी मानवी प्रतिष्ठा फार मोठी आहे. आपण जीवननिष्ठा मानलेल्या लोकशाहीचा तो आत्मा आहे. ती प्रतिष्ठा वाढवायची आहे. जाती, धर्मपंथ, राजसत्ता यांच्या प्रतिष्ठा मानवी प्रतिष्ठेपुढे कःपदार्थ आहेत हे विसरू नका.

लोकशाही समाजवादाचा भुवनेश्वर काँग्रेसने दिलेला संदेश अंतःकरणात बाळगून भविष्यातील अभिवृद्धीची अवस्था प्राप्त करण्यासाठीं, आपल्यापैकी प्रत्येकजण कार्यरत होण्यासाठी कंबर कसून श्रम करण्यास तयार होईल असा विश्वास बाळगून मी आपली रजा घेतो.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ दि: ..................
[illegible] ........................ नों: दि: ..............

REFBK-0015111

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. १५१११